म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
स. क्र. ५६४

REFBK-0027374

संदर्भ
भू-प्रवास
७६४
२७३७४
२४३।८४


## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 JUN 1994
5 JUN 1994
2 JUL 1994
16 JUL 1994
20 JUL 1994
6 AUG 1994
17 AUG 1994
24 AUG 1994
10 SEP 1994
2 NOV 1994
16 NOV 1994
3 DEC 1994
4 JAN 1995
18 MAR 1995
7 FEB 1996
27 NOV 1996
14 JUN 1997
१५।१०।९७

(क्र मा. पहा)
१००००—११—८९

# हिमयात्री

श्री. सुरेशचन्द्र वारघडे

REFBK-0027374

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४

**प्रकाशक**
सौ सविता जोशी
उत्कर्ष प्रकाशन
रेणूका अपार्टमेंटस्
डेक्कन जिमखाना
पुणे ४११ ००४

© **सौ. निर्मला वारघडे**

**प्रथमावृत्ती**
वटपौर्णिमा १४ जून १९९२

**मुखपृष्ठावरील छायाचित्रे**
स्वामी सुदरानंद ( गगोत्री )
डॉ. सत्यशील नाईक ( पुणे )
डॉ जॉर्ज वर्गीस ( मनाली )

**अक्षरजुळणी**
अभिषेक टाईपसेटर्स
१२६५, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

**मुद्रक**
प्रमोद वि बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

किंमत ६० रुपये

माझी हिमयात्रा चालू
असताना ज्याची प्राणज्योत
मालवली. तो माझा बंधू
- रमेश -
याचे स्मृतीस

# मनोगत

गढवाल आणि हिमाचल प्रदेशातील हिमालय हा प्राचीन भारतीय सस्कृतीचा वारसदार आहे भारतीय शिल्पकला आणि जीवनकला याच दर्शन घडविणारी अनेक प्राचीन मदिरे त्याच्या कुशीत दडलेली आहेत भारतीय सस्कृतीचा हा वारसा पुढील पिढ्यासाठी अद्याप त्यानं जपून ठेवला आहे गोपेश्वर महादेव, आदिबदरी, योगबदरी, तुगनाथ ही मी पाहिलेल्या मदिरापैकी काही मदिरे आहेत ही सारी मदिरे हिमालयातील निसर्गरम्य दुर्गम भागात आहेत ही मदिरे तिथ कशी बाधली गेली याच नवल वाटत या प्राचीन मदिराची पुर्न·स्थापना करण्यात आद्य शकराचार्य याच फार मोठ योगदान लाभल आहे अशा चार मंदिराच्या इतिहासाचा समावेश या पुस्तकात केला आहे ही माहिती वाचकाना प्राचीन भारतीय सस्कृतीच दर्शन घडवील

हिमालयात भटकत असताना चिपको आदोलनाचे प्रणेते पद्मश्री सुदरलाल बहुगुणा, हिमयात्री स्वामी सुदरानद, डॉ जॉर्ज वर्गीस हे तीन पुरुषोत्तम मला भेटले हिमालयातील निसर्ग आणि त्यात राहणारे गरीब पहाडी लोक याच्या सेवेसाठी या तिघा पुरुषोत्तमांनी आपले सपूर्ण जीवन वाहून घेतले आहे या पुस्तकातील त्याची जीवन कहाणी निसर्गाच्या शत्रूविरुद्ध लढणाऱ्या निसर्गप्रेमी तरुणाना प्रेरणादायी ठरेल झाडाचे जीव वाचविण्यासाठी मरायला तयार असणारे सुदरलाल बहुगुणा याच जीवन तर तरुणाना नवीन सामर्थ्य व नैतिक अधिष्ठान देणार ठराव वनखात्याचे ठेकेदार हिमालयातील जगल तोडायचे. त्यामुळे पावसाळ्यात व उन्हाळ्यात बर्फ वितळू लागल्यावर ठिसूळ झालेली माती वाहायची नद्याकाठची हजारो एकर जमीन वाहून जायची. वृक्षतोडीमुळे ढिले झालेले कडे कोसळून त्याखाली शेती व गावे गाडली जायची त्यात वित्त व प्राण हानी व्हायची वरपर्यंत हात पोहोचलेल्या धनिक ठेकेदाराविरुद्ध सुदरलालजींनी चिपको आदोलन छेडले झाडाना मिठ्या मारून आदोलक चिपकले झाडावर कुऱ्हाड चालवण्या अगोदर आमच्या मानेवर ती चालवा असे ठेकेदाराना निर्भयपणे त्यानी सागितले त्यामुळे ठेकेदारीला पायबद बसला हिमालयातील वृक्षसंहार थाबला

सुदरलालजींचे आदोलन यशस्वी झाले त्याबद्दल त्याना अनेक आतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले उतारवयात त्यांनी आता विनाशाचा पाया घालणाऱ्या गगेवरील टेहरी धरणाचे विरोधात अहिंसक लढा पुकारला आहे परतु उत्तर प्रदेश सरकार हिंसेचा वापर करून तो लढा दाबून टाकीत आहे या धरणाचे विरोधात कलकत्ता ते गगोत्री अशी सायकलयात्रा त्यानी काढली त्याचवेळी टेहरी उत्तरकाशी परिसरात भूकपाचा धक्का बसून प्राणहानी व मोठी वित्तहानी झाली सुदरलाल बहुगुणा ज्या कारणासाठी धरणाला विरोध करत आहेत त्या भूकपाने धरण पूर्ण होण्याच्या अगोदर धोक्याची सूचना दिली परतु हटवादी सरकार व नेते त्यातून बोध घ्यायला तयार नाहीत धरणाचे काम चालू आहे हिमालयातील निसर्ग व माणसाच्या विनाशाचा पाया ते खोदीत आहेत या सबंधीची सुदरलालजींची १९९० साली घेतलेली सविस्तर मुलाखत या पुस्तकात आहे.

वाढत्या लोकसख्येला पायबद घालण्याचे सोडून निसर्गाला हटवून प्रदूषणाचा भस्मासूर निर्माण करणाऱ्या औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचे काम सर्व राज्यात वेगात सुरू आहे महाराष्ट्र त्यात आघाडीवर आहे कितीही विकास झाला तरी वाढती लोकसख्या तो खाऊन टाकणार आहे औद्योगिकरणाचा उपद्व्याप आजच शाप ठरू लागला आहे. हा शाप गगायमुनेसारख्या पवित्र नद्याना भोवून त्या प्रदूषित झाल्या आहेत त्याबाबत 'भगीरथ तेरी गगा मैली' हा लेख उद्बोधक वाटेल


कस्तुरीमृगाचे निसर्गदत्त जीवन व पालन केंद्रातील बंदिस्त जीवन याविषयी दोन लेख या पुस्तकात आहेत याशिवाय भारत तिबेट सीमेवरील अखेरच गाव माणा व त्यातील पहाडी लोकाच जीवन दर्शन घडवणारा, हिमालय कन्या नदा हिच्या अद्भूत यात्रेची कहाणी, हिमालयातील देवबाग, जिम कॉर्बेट नॅशनल पार्क, कॉर्बेट साहीब व कुलूमनालीची निसर्गयात्रा हे लेख वाचकांना निश्चितपणे आवडतील

उत्कर्ष प्रकाशनचे श्री सुधाकररावं जोशी व सौ सविता जोशी यांनी हे पुस्तक सर्वांगसुदर व्हावे यासाठी खूप परिश्रम घेतले त्यामुळेच हिमयात्री प्रकाशात आल या दोघाचाही मी अत करणपूर्वक आभारी आहे श्री सुदरलाल बहुगुणा, श्री स्वामी सुदरानद, डॉ जॉर्ज वर्गीस यानी अतिशय आपुलकीने मुलाखती देवून सहकार्य केले याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे. धन्यवाद

सुरेशचन्द्र वारघडे

## अनुक्रमणिका


(१) हिमयात्री स्वामी सुदरानंद / ७
(२) हिमालयातील देवदूत / २३
(३) यात्रा हिमालयाच्या कन्येची / ३३
(४) जिम कॉर्बेट नॅशनल पार्क / ४६
(५) कॉर्बेट साहिब / ५९
(६) कस्तुरी मृग / ६५
(७) हिमालयातील देवबाग / ७४
(८) माणा सीमेवरील अखेरचं गाव / ८६
(९) आदिबदरी आणि योगबदरी / ९२
(१०) भगीरथ तेरी गगा मैली / ९६
(११) गोपेश्वर महादेव - हिमालयातील प्राचीन मंदिर / १०३
(१२) केदारनाथ कस्तुरीमृग पालन केंद्र / १०८
(१३) तुंगनाथची निसर्गयात्रा / ११५
(१४) टेहरीबांध एक विनाशकारी प्रकल्प / १२०
(१५) कुलूमनालीची निसर्गयात्रा / १३०



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवास
ग्रा. क्र. ५६३ २७३६८ २४३।९२


☐ स्वामी सुंदरानंद

☐ नंदाच्या यात्रेतील रंगबेरंगी छत्र्या व यात्रीगण



## अनुक्रमणिका

(१) हिमयात्री स्वामी सुंदरानद / ७
(२) हिमालयातील देवदूत / २३
(३) यात्रा हिमालयाच्या कन्येची / ३३
(४) जिम कॉर्बेट नॅशनल पार्क / ४६
(५) कॉर्बेट साहिब / ५९
(६) कस्तुरी मृग / ६५
(७) हिमालयातील देवबाग / ७४
(८) माणा सीमेवरील अखेरच गाव / ८६
(९) आदिबदरी आणि योगबदरी / ९२
(१०) भगीरथ तेरी गंगा मैली / ९६
(११) गोपेश्वर महादेव - हिमालयातील प्राचीन मदिर • १०३
(१२) केदारनाथ कस्तुरीमृग पालन केंद्र / १०८
(१३) तुगनाथची निसर्गयात्रा / ११५
(१४) टेहरीबांध एक विनाशकारी प्रकल्प / १२०
(१५) कुलूमनालीची निसर्गयात्रा / १३०



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे


□ स्वामी सुंदरानंद

□ नंदाच्या यात्रेतील रंगबेरंगी छत्र्या व यात्रीगण





कार्बेट नॅशनल पार्कमधील मुक्त हत्ती वनविहार करताना



इंद्रजीत आसनात
स्वामी सुंदरानंद



हिमालयातील देवदूत
डॉ. वर्गीस आणि कुटुंबीय



चिपको आंदोलनाचे प्रणेते
पद्मश्री सुंदरलाल बहुगुणा



☐ कार्बेट नॅशनल पार्कमधील मुक्त हत्ती वनविहार करताना

☐ कार्बेट पार्कमधील वाघ



☐ रुपकुण्ड ते होमकुण्ड मार्गातील सुंदर निसर्ग दृश्य

# १

# हिमयात्री स्वामी सुंदरानंद

सप्टेंबर मध्ये गगोत्रीत प्रसिद्ध हिमयात्री स्वामी सुदरानद याची भेट झाली हिमालयाला आशुतोष मानून त्याची भक्ती करणाऱ्या स्वामी सुदरानदांचा आश्रम भागीरथीच्या किनाऱ्यावर आहे तेथे गेली चाळीस वर्षे त्याचे वास्तव्य आहे निसर्गचित्रानी सजलेल्या त्याच्या सुदर प्रसन्न कुटीत स्वामींनी आमचे स्वागत केले जीवनातील चाळीस वर्षे निसर्गाची पूजा बाधीत त्यानी हिमालयाच्या सहवासात घालविले आहेत ते एक सिद्धयोगी तर आहेतच त्याशिवाय साधूसतात न आढळणारी एक कला त्याच्यात आहे. त्याच फोटोग्राफीच्या कलेने त्याना जगप्रसिद्ध केले त्यानी टिपलेली हिमालयाची अद्भूत छायाचित्रे पाहताना देहभान विसरून गेलो. हिमशिखरात, फुलात, वृक्षात, अनत आकाशात त्याना ईश्वराचे दर्शन झाले त्याचबरोबर अनेक वेळा मृत्यूचेही दर्शन घडले तरीही हिमालयावरील त्याचे प्रेम अभग राहिले गोमुखाच्यावर त्याना अविनाशी अक्षरब्रह्म ओम् - चे दर्शन झाले त्याचे मोठे छायाचित्र त्यानी आपल्या कुटीत लावले आहे. अनेक दुर्मिळ वनस्पती जमवून त्यानी कुटीच्या आवारात लावल्या आहेत छायाचित्रे व पारदर्शिकाचे भारतभर प्रदर्शन करून त्यानी सामान्य माणसाला हिमालयाचे दर्शन घडविले आहे असख्य भारतीयाच्या तनमनात हिमालय पोहोचवला आहे

याच छायाचित्र - वैभव पाहून कॅमेरा सोसायटी ऑफ इडियाने त्याना आजीव सदस्यत्व बहाल केले. आयफॅक्स व जहागीर आर्ट गॅलरीसारख्या राष्ट्रीय सस्थानी त्याच्या छायाचित्राची प्रदर्शने भरविण्यात पुढाकार घेतला जपान, प जर्मनी, स्वित्झर्लंडमध्ये त्यांची प्रदर्शने खूपच गाजली. जपान, जर्मन फिल्म निर्मात्यानी

स्वामींच्या जीवनावर लघुपट काढले

सतत पाच वेळा त्याच्या छायाचित्राना उत्कृष्ट छायाचित्रे म्हणून राष्ट्रीय स्तरावरील सुवर्णपदके मिळाली इलस्ट्रेटेड वीकली, धर्मयुग, हिंदुस्थान टाईम्स, कादम्बिनी, हिंदुस्थान पराग, नॅशनल हेरॉल्ड, द टाइम्स ऑफ डेक्कन, पेट्रियट या हिंदी - इग्रजी दैनिके व मासिकात त्याची छायाचित्रे प्रसिद्ध झाली तसेच परदेशांतील अनेक प्रतिष्ठित वृत्तपत्रे - मासिकात स्वामींच्या छायाचित्रानी मानाचे स्थान मिळवले आहे माजी पतप्रधान कै इंदिरा गाधी, श्री मोरारजी देसाई, कै जयप्रकाश नारायण, माजी पतप्र' न कै राजीव गाधी व इतर अनेकानी त्याच्या चित्राची प्रशसा केली आहे

साठ तासापर्यंत पुरतील इतक्या प्रचड प्रमाणात स्लाईडस्चा प्रचड खजिना स्वामींकडे आहे जाण्या - येण्याच्या प्रवास खर्चाशिवाय काहीही मोबदला न घेता अडीच तासाचे स्लाइड - शो स्वामींनी भारतातील प्रमुख शहरात विनामूल्य केले आहेत सात - आठ वर्षापूर्वी पुण्यात उद्योगप्रसादात त्याच्या छायाचित्राचे प्रदर्शन भरले हाते स्लाईड शोही झाला होता. या प्रदर्शनास भेट देऊन 'सकाळ' मध्ये सपादक कै श्री ग मुणगेकर यानी चागली प्रसिद्धी दिल्याची आठवण स्वामींनी आवर्जून सागितली

**जगातील एकमेव**

ही मन्त्रून टाकणारी सुदर छायाचित्रे म्हणजे स्वामींची चाळीस वर्षांची हिमयात्राच होय एकशेआठ वेळा स्वामींनी गोमुखाची अवघड यात्रा केली गोमुख चढून नदनवनामार्गे एकोणीस हजार पाचशे दहा फूट उचीवरील कालिदी ग्लेशियर पार करून बद्रिनाथाला पाच वेळा ते गेले आहेत पुन्हा त्याच दुर्गम मार्गाने गगोत्रीस येणारे ते जगातील एकमेव साहसी पुरुष होत या प्रसगी अनेक वेळा ते मृत्यूच्या सापळ्यात अडकले केवळ हिमालयाच्या कृपेने वाचलो, अशी त्याची मनोभावना आहे हिमालय चढण्याच्या तात्रिक ज्ञानासाठी उत्तर काशीच्या नेहरू गिर्यारोहण सस्थेचे कोर्स त्यानी पूर्ण केले. एव्हरेस्टविजेता तेनसिग नोर्गे याच्या मार्गदर्शनाखाली दार्जिलिगमध्ये गिर्यारोहणाचे शिक्षण त्यानी घेतले जोगिन, गगोत्री, कोटेश्वर, केदारडूम, चंद्रपर्वत, भगीरथ (गढवाल विभाग), कुमॉऊमधील नदाखाट, बलजोरी, कब्र (सिक्कीम) तसेच लडाख, हिमाचल प्रदेश इत्यादी भागातील वीस ते तेवीस हजार फूट उचीवरील हिमशिखरे त्यानी पादाक्रात केली आहेत या हिमयात्रेबरोबरच सपूर्ण भारताच्या कानाकोपऱ्यात त्याचा प्रवास झाला आहे. आसेतू हिमालय प्रवास करणारे ते सच्चे सत्यवादी व पुरोगामी वृत्तीचे साधूपुरुष होत.

हिमालयाच्या लालसेने सोळाव्या वर्षी घरून पळालेला मुलगा जीवनात संघर्ष करून व अनेक हालअपेष्टा सोसून सच्चा साधू बनला - स्वामी सुदरानद बनला – आतरराष्ट्रीय ख्यातीचा हौशी छायाचित्रकार बनला

अस्पृश्यता कर्मकाडे, अधश्रद्धा इ च्या विरुद्ध स्वामी आहेत आजकालचे ढोंगी साधू पैसे गोळा करण्यासाठी मदिरे उभारून राहिले आहेत तपस्येच्या नावावर देणग्या गोळा करतात फलाहाराच्या नावावर दुधातुपाचा आहार घेतात. काहीही कष्ट न करता राजासारखे सुखोपभोगात राहतात असे साधू समाजशत्रूच होत वस्तूच्या भोगाने तपस्या फलित होत नाही. देशासाठी भुकेनगे राहून मानवतेची सेवा करणे, हीच खरी तपस्या होय असे त्याचे मत आहे

सतीच्या चालीबद्दल आपले काय विचार आहेत ? असा प्रश्न मध्येच माझा मित्र रामप्रसाद शर्मानि विचारला त्यावर स्वामी उत्तरले, ''पतीच्या मृत देहाबरोबर जळण्यासाठी पतिव्रतेला बळजबरीने प्रोत्साहित करून भाग पाडणे हे पाप होय. सतीचा अर्थ अग्निपरीक्षा आहे ती रूपक कथा आहे बिकट परिस्थितीत पतीशी एकनिष्ठ राहून ससारात त्याला साथ देणारी, मनोधैर्य देणारी, संकटसमयीही ईश्वराचे नाम न विसरणारी स्त्री ही खरी सती होय परतु त्याचा विकृत अर्थ आज घेतला जातो

गगोत्री परिसरातील निसर्गविनाशाबद्दल ते म्हणाले, ''दहा हजार तीनशे फुटावरील गगोत्रीच्या परिसरातील जगातील सर्वात सुदर जगलाची लोकानी वाट लावली गगोत्रीचे सौंदर्य नष्ट केले महात्मा म्हणवून घेणाऱ्या येथील ढोंगी साधूंनी जगल तोडून सरकारी जमीन लाटली आहे तसेच ऐरावतासारखे गगोत्रीतले सुदर सुदर शिलाखड तोडून त्यावर पैसे कमावण्यासाठी हॉटेल्स व धर्मशाळा उभारल्या आहेत या जागा नावावर करण्यासाठी सरकारी अधिकाऱ्याना पैसे चारले आहेत ज्या विशाल शिलाखडावर भगीरथाने पाच हजार पाचशे वर्षे तप केले, त्या विशाल शिलेवर रॉक गार्डन बनविण्याची सरकारी योजना होती त्या शिलेवर घरे, आश्रम व स्वच्छतागृहे बाधून पवित्र भगीरथशिला मलमूत्राचे भाडार बनविण्यात आली आहे अनेक आश्रमातील महात्म्यांनी मलमूत्र पवित्र गगेत सोडले आहे उगमापासून गगा अस्वच्छ करून टाकावयास प्रारभ केला आहे लालबाबाने भडाऱ्याच्या नावाखाली भोजवासाचे भूर्जवृक्षाचे सुदर जगल तोडून भट्टीत जाळले आहे गगोत्रीतला हिमालय नगा झाला आहे त्यामुळे गोमुख मागे हटत आहे काही दिवसानी गगेचा प्रवाह लुप्त होईल अशी अवस्था आहे या जगलतोडीविरुद्ध आवाज उठवतो आहे त्यामुळे काही दिवसापूर्वी एका महात्म्याच्या आश्रमातून दीड लाख रुपयाचे लाकूड जप्त करण्यात आले याच महात्म्याने सार देवदाराच

जगल कापल रस्ता तोडून घर बाधल भ्रष्ट आणि ढोंगी साधूचा गगोत्रीत सुळसुळाट आहे अफू, गाजा, चरस ओढून ते धुद असतात, योगाच्या नावाखाली परदेशी स्त्री - पुरुषाना प्रवेश देऊन इथे भोगशाळा बनविल्या आहेत

गगोत्रीचे सौंदर्य वाढविण्यासाठी व विकासासाठी सरकारने गगाविकास प्राधिकारणाची स्थापना केली आहे जगल, शिलाखड तोडून घरे, धर्मशाळा बाधण्यास बदी घातली त्याविरुद्ध या ढोंगी महात्मे व पड्यानी मोर्चा काढून प्राधिकारणास विरोध केला अधिकारी आले की ते काम बद ठेवतात त्यानी पाठ फिरवली की पुन्हा जगलतोड व बाधकामे सुरू असतात दरवर्षी हजारो झाडे तुटतात सातशे - आठशे एकर देवदाराचे घनदाट जगल या महात्म्यानी साफ केले आहे गगोत्रीत प्रशासन नावाची चीज राहिली नाही या महात्म्याच्या कृत्याविरुद्ध मी सातत्याने निर्भयपणे आवाज उठवितो आहे त्यामुळे हे सर्व पडे - महात्मे माझ्याविरुद्ध झाले आहेत मला पाण्यात पाहू लागले आहेत मी गावाला गेलो असताना माझ्या कुटीचे दार तोडण्यात आले कॅमेरा - लेन्सेस, चित्रे, स्लाईडच्या खजिन्याची चोरी झाली पोलिसात, सरकारकडे तक्रारी करूनही चोरीचा शोध लागलेला नाही तरीही गगोत्रीचे पावित्र्य व सौंदर्य राखण्यासाठी मरेपर्यंत झगडत राहावयाची प्रतिज्ञा मी केली आहे

गगोत्रीतील वन्यजीवनही धोक्यात आल्याचे त्यानी सागितले पूर्वी गगोत्रीत अनेक कस्तुरीमृग दिसत, तपकिरी अस्वले होती, गोपेश्वराजवळ दहा - पधरा वर्षांपूर्वी दोन दुर्मिळ पाढरी अस्वले मी पाहिली होती, परतु त्याचे निवासस्थान असलेले जगलच उद्ध्वस्त झाल्याने हे बेघर प्राणी नष्ट झाले अशी माहिती त्यानी दिली म्हणून आजकाल गगेची पवित्रता राखण्याचे, वृक्षतोडीस आळा घालण्याचे, माणसामाणसातील [illegible]

स्वामींनी वयाची एकषष्ठी गाठली आहे आजही हिमालयातील शिखरावर चढून हिमालयाचे सौंदर्य कॅमेऱ्यात गोळा करण्याचे त्याचे कार्य चालू आहे आपल्याजवळच्या छायाचित्राचे कायम स्वरूपाचे 'हिमालय दर्शन सग्रहालय' उभारण्याचे त्याचे स्वप्न आहे त्या दृष्टीने ते प्रयत्नशील आहेत त्याच्या जीवनातील प्रत्येक दिवस एक कहाणी होय त्याची जीवनयात्रा ऐकण्याची ओढ मनाला लागली होती, आम्ही त्याना विनती केली पुन्हा मध्ये प्रश्न विचारून त्याच्या कथनात व्यत्यय येऊ नये म्हणून मनातले प्रश्न त्याना अगोदरच विचारून टाकले हिंदी लेखिका पद्मा सचदेव यानी त्याची आत्मकथनपर प्रदीर्घ मुलाखत घेतली होती, त्याच कथनाची पुन्हा पुनरावृत्ती करतो असे सांगून स्वामी सुदरानदजी ओघवत्या लालित्यपूर्ण हिंदीत [illegible] सागू लागले

**घरातून पलायन**

आंध्र प्रदेशातील नेल्लोर जिल्ह्यातील अनतपुरम् हे माझ जन्मगाव पूर्वाश्रमीच नाव सुदरामय्या घरची परिस्थिति चागली होती काजू, आबे, नारळाच्या बागा होत्या

एकोणिसाव्या वर्षात सळसळणाऱ्या तारुण्यात प्रवेश केला परतु कधीच कामविव्हल झालो नाही कोणत्याही तरुणीचे आकर्षण वाटले नाही माझ मन निसर्गातील गूढ शक्तीकडे ओढल गेल होत जगलात जाऊन जीवनाच्या नव्या वाटा धुडाळत रहायचा शेवटी घरात मन गुदमरू लागले त्यावेळी चोरून काही पैसे घेऊन अनतकाळच्या प्रवासासाठी घरातून पळालो कलकत्त्याला आलो पुढे नक्की काय करायच याच स्पष्ट चित्र मनापुढे नव्हते विचार करीत एका धर्मशाळेत मुक्काम ठोकला. तेथे सुभाषबाबूच्या विचाराने भारावलेला तरुण मित्र भेटला आझाद हिंद सेनेत भरती होतो का, असे विचारले मी तात्काळ होकार दिला त्यासाठी रगूनला बोटीने जायचे ठरविले सुभाषबाबूच्या मैमनसिग या जन्मगावी आलो त्याच्या घरी त्याचा सेक्रेटरी भेटला रस्त्यात कडक पहारा असल्याने रंगूनला सुभाषबाबूकडे जाणे अशक्यप्राय असल्याचे त्याने सांगितले निराश होऊन कलकत्त्याला आलो तो बगाली मित्र मध्येच हरवला भाषेअभावी कलकत्याला राहणे अवघड वाटू लागले कलकत्यावरून विजयवाड्यास आलो जवळचे पैसे कधीच सपले होते उपासमार होऊ लागली. परतु हृदयात पेटलेली दिव्यत्वाची ज्योत विझायला तयार नव्हती त्यामुळे पुन्हा घरी परतायला मन तयार नव्हते दोन रुपये रोजावर हॉटेलात भाडी घासण्याचे काम करू लागलो तेथेच 'इडली साबार' सारखे पदार्थ बनविण्यास शिकलो गोदावरीच्या तीरावरील कुटीत एक महात्मा राहत होता. त्याच्या दर्शनास रोज जायचो साधूबद्दलचे माझे आकर्षण पाहून काशीला खूप साधूसत आहेत असे सागून काशीला चलण्याचा आग्रह हॉटेलमधील मित्राने केला त्याच्याबरोबर एक दिवस हॉटेलमधून पळालो राजमहेंद्रमार्गे कलकत्त्याला आलो हॉटेलात सहा महिने काम केल्याने हिंदी भाषा बोलता येऊ लागली होती कलकत्त्यावरून विनातिकीट काशीला प्रयाण केले मुगलसराय स्टेशनात तिकीट चेकर गाडीत आला त्या वेळी घाबरगुडी उडाली गाडीने वेग घेतला होता प्लॅटफार्मवर उडी मारता येईना शेवटी दरवाजाबाहेर बारला धरून पायऱ्यावर उभा राहिलो टी सी ला दिसू नये म्हणून दरवाजा लावून घेतला परतु प्लॅटफॉर्मला एक पाय घासल्याने सोलवटून निघाला मरणप्राय यातना झाली परंतु टी सी च्या भीतीने ओरडलो नाही दरवाजा उघडून गाडीत येऊन कोसळलो साथीदार गायब झाला होता टी सी दयाळू होता

त्याने रुग्णवाहिकेतून काशीच्या हॉस्पिटलमध्ये पाठवले तेथे सहा महिने राहिलो ख्रिश्चनधर्मीय परिचारिकेने माझी चागली सेवा केली

हॉस्पिटलमधून सुटलो आणि विश्वनाथाच्या आश्रयाला आलो खाली पडलेले अन्न गोळा करून भूक शमवू लागलो गगाघाटावर स्नान करून दगडी पायऱ्या चढत होतो, त्यावेळी एका साधूने चमत्कारिक नजरेने पाहत विचारले, ''घरून पळून आलास काय ?'' मी 'हो' म्हणाले. 'चलो मेरे साथ' असा आदेश त्याने मला केला त्याच्याबरोबर गगाकिनाऱ्यावरील त्याच्या स्वच्छ, सुदर कुटीत आलो त्याने पोटभर जेवू घातले त्याच्याबरोबर भिक्षेसाठी जाऊ लागलो काशीत त्या वेळी असख्य अन्नछत्रे होती कधीकधी शुद्ध तुपातील लाडू - जिलेबी खावयास मिळे पोटाची चिता दूर झाली होती मी मन लावून त्या साधूची सेवा करत होतो तो महात्मा मला अनेक धार्मिक, पौराणिक कथा रोज सागत होता परतु तो विरक्त असल्याने शिष्यसप्रदायाची प्रथा त्याच्याकडे नव्हती त्यामुळे शिष्य म्हणून त्याने माझा स्वीकार केला नाही त्यामुळे त्याच्याजवळ अडीच महिने राहून त्याच्या ओळखीच्या दक्षिण भारतीय साधूच्या टोळीत सामील झालो श्रवणनाथ मठाच्या जवळील विशाल वटवृक्षाखाली त्याच्या दोन झोपड्या होत्या तेथेच मला साधूच्या सर्व रीतीभाती समजल्या साधुत्वाचा रग माझ्यावर चढला तीन महिन्याने या स्वामी व त्याच्या शिष्यगणाबरोबर हरिद्वारला आलो.

**काळ आला होता**

शिष्याच्या मनात वाईट भाव आला तर स्वामी त्याना चिमट्याने मारीत त्याना धुनीसाठी लाकडे आणून देण्याची कामगिरी माझ्याकडे होती मी जगलात जाऊन लाकडे गोळा केली त्याचवेळी फॉरेस्ट - गार्डने मला पकडले बेदम मारून लाकडे व जवळचे एकुलते एक ब्लॅकेट हिसकावून घेतले माराने तेथेच बेशुद्ध पडलो. शुद्धीवर आलो त्या वेळी थडीने जीव जायची पाळी आली पोते पाघरून झाडाच्या ढोलीत राहू लागलो थडीने झोप येत नसे आरोग्य बिघडले, जुलाब होऊ लागले सारख्या होणाऱ्या जुलाबाने शरीर हाडाचा सापळा बनले उठण्याची ताकद राहिली नाही अनेक दिवस स्नान नाही शरीर ऊवाचे भाडार झाले कुणी माझ्याकडे लक्ष द्यायला तयार नव्हते खरडत खरडत गगाकिनारी भिकाऱ्याच्या रागेत येऊन बसलो साऱ्या शरीराला घाण वास येऊ लागला. इतर भिकारी तिरस्कार करायचे यात्रेकरू लाबून नाक दाबून पैसा - भाकरी फेकायचे भाकर पचायची नाही खरडत प्रवाहाजवळ जाऊन गगाजल प्यायचो. अर्धमूर्च्छित अवस्थेत तसाच पडून राहिलो नरकयातना भोगीत होतो मृत्यूही येत नव्हता

तरीही रामनाम मात्र विसरलो नाही. मेलो तर गंगाकिनारी मरणार याचे समाधान वाटत होते एके दिवशी पूर्ण बेशुद्ध अवस्थेत गेलो दुसऱ्या दिवशी डोळे उघडले तर अनोळखी चेहरे दिसले अंगाखाली मऊ गुदगुल्या करणाऱ्या पांढऱ्याशुभ्र गाद्याचा बिस्तरा होता. ते रामकृष्ण मिशन हॉस्पिटल होते कुणी दयाळू माणसाने गगाकिनाऱ्यावरून उचलून हॉस्पिटलमध्ये आणले होते

## गांजा धुंदीमधील साधू

एक महिन्यात पूर्ण बरा झालो एका साधूच्या टोळीत सहभागी झालो या साधूनी अमृतसर, कागजा, ज्वाला, पजतरणी या ठिकाणी नेले हे साधू ढोंगी होते त्याच क्रियाकर्म भ्रष्ट होते चरस, अफू, गाजाच्या धुदीत वावरायचे लोकाना नादी लावून फसवायचे या साधूमुळे खाद्यावर चादर आली होती. हातात तुबा आला होता. परतु माझ्या मनात मात्र हिमालय होता. हिमालयाच्या दर्शनासाठी मन व्याकुळ होते म्हणूनच या साधूच्या नादी लागलो त्याचे समाजद्रोही वर्तन लक्षात आल्यावर त्याच्या हातावर तुरी देऊन निसटलो पुन्हा हरिद्वाराला आलो

## सदैव पलायनच

हरिद्वार व ऋषिकेशच्या मध्ये श्यामापूर नावाचे गाव आहे तेथे अडियार स्वामींची शेती होती त्याच्या शेतीवर कामास लागलो हत्तीच्या टोळ्या व हरणाच्या कळपापासून पिकाचे रक्षण करणे, त्याच्या म्हशी चारणे, इत्यादी पडेल ते काम करावे लागे. खाण्यापिण्याची मात्र चगळ होती येथील हिरव्या शेतात शाती होती एक दिवस एक म्हैस हरवली जगलात पुष्कळ शोधली परतु सापडली नाही अडियार स्वामींच्या भीतीने ऋषिकेशला पळून आलो जीवनात सदैव पलायन मागे लागले होते त्यातील ईश्वरी हेतू समजत नव्हता ऋषिकेशमध्ये दोन - तीन दिवस उपाशी फिरलो गगेचे पाणी पिऊन भूक शमविण्याचा प्रयत्न करायचो परतु पोटातली आग भडकत राहिली मग बाबा कालीकमलीवाले अन्नछत्रासमोर लागलेल्या साधूच्या रागेत जाऊन उभा राहिलो. कोतवालाला माझ्या साधुत्वाचा सशय आला त्याने मठाचे, गुरुचे नाव विचारले सागता येईना. त्याने रागेतून हाकलून लावले पोटात भूक वागवीत त्रिवेणी घाटावर फिरत राहिलो तेथे धर्मदत्त रतुडी नावाचे पडित भेटले घरातून पळून आलायस का ? साधू बनणार का ? असे प्रश्न विचारले मी होकार दिला. मला चल म्हणाले त्याच्या पाठोपाठ पचकुटिया या ठिकाणी त्यानी मला नेल प रतुडीचे चुलतभाऊ स्वामी दयानदगिरी या ठिकाणी कुटीत राहत होते तुझ्यासाठी एक चेला घेऊन आलोय असे ते त्याना म्हणाले त्यानी मत्रदीक्षा घेणार काय म्हणून विचारल मी होय

त्याने रुग्णवाहिकेतून काशीच्या हॉस्पिटलमध्ये पाठवले तेथे सहा महिने राहिलो ख्रिश्चनधर्मीय परिचारिकेने माझी चागली सेवा केली

हॉस्पिटलमधून सुटलो आणि विश्वनाथाच्या आश्रयाला आलो खाली पडलेले अन्न गोळा करून भूक शमवू लागलो गगाघाटावर स्नान करून दगडी पायऱ्या चढत होतो, त्यावेळी एका साधूने चमत्कारिक नजरेने पाहत विचारले, ''घरून पळून आलास काय ?'' मी 'हो' म्हणाले 'चलो मेरे साथ' असा आदेश त्याने मला केला त्याच्याबरोबर गगाकिनाऱ्यावरील त्याच्या स्वच्छ, सुदर कुटीत आलो त्याने पोटभर जेवू घातले त्याच्याबरोबर भिक्षेसाठी जाऊ लागलो काशीत त्या वेळी असख्य अन्नछत्रे होती कधीकधी शुद्ध तुपातील लाडू - जिलेबी खावयास मिळे पोटाची चिता दूर झाली होती मी मन लावून त्या साधूची सेवा करत होतो तो महात्मा मला अनेक धार्मिक, पौराणिक कथा रोज सागत होता परतु तो विरक्त असल्याने शिष्यसप्रदायाची प्रथा त्याच्याकडे नव्हती त्यामुळे शिष्य म्हणून त्याने माझा स्वीकार केला नाही. त्यामुळे त्याच्याजवळ अडीच महिने राहून त्याच्या ओळखीच्या दक्षिण भारतीय साधूच्या टोळीत सामील झालो श्रवणनाथ मठाच्या जवळील विशाल वटवृक्षाखाली त्याच्या दोन झोपड्या होत्या. तेथेच मला साधूच्या सर्व रीतीभाती समजल्या साधुत्वाचा रग माझ्यावर चढला तीन महिन्याने या स्वामी व त्याच्या शिष्यगणाबरोबर हरिद्वारला आलो.

### काळ आला होता

शिष्याच्या मनात वाईट भाव आला तर स्वामी त्याना चिमट्याने मारीत. त्याना धुनीसाठी लाकडे आणून देण्याची कामगिरी माझ्याकडे होती. मी जगलात जाऊन लाकडे गोळा केली त्याचवेळी फॉरेस्ट - गार्डने मला पकडले बेदम मारून लाकडे व जवळचे एकुलते एक ब्लॅंकेट हिसकावून घेतले माराने तेथेच बेशुद्ध पडलो शुद्धीवर आलो त्या वेळी थडीने जीव जायची पाळी आली पोते पाघरून झाडाच्या ढोलीत राहू लागलो थडीने झोप येत नसे. आरोग्य बिघडले, जुलाब होऊ लागले सारख्या होणाऱ्या जुलाबाने शरीर हाडाचा सापळा बनले उठण्याची ताकद राहिली नाही अनेक दिवस स्नान नाही शरीर ऊवाचे भाडार झाले कुणी माझ्याकडे लक्ष द्यायला तयार नव्हते खरडत खरडत गगाकिनारी भिकाऱ्याच्या रागेत येऊन बसलो साऱ्या शरीराला घाण वास येऊ लागला इतर भिकारी तिरस्कार करायचे यात्रेकरू लाबून नाक दाबून पैसा - भाकरी फेकायचे भाकर पचायची नाही खरडत प्रवाहाजवळ जाऊन गगाजल प्यायचो अर्धमूर्च्छित अवस्थेत तसाच पडून राहिलो नरकयातना भोगीत होतो मृत्यूही येत नव्हता

तरीही रामनाम मात्र विसरलो नाही मेलो तर गंगाकिनारी मरणार याचे समाधान वाटत होते एके दिवशी पूर्ण बेशुद्ध अवस्थेत गेलो दुसऱ्या दिवशी डोळे उघडले तर अनोळखी चेहरे दिसले अंगाखाली मऊ गुदगुल्या करणाऱ्या पाढऱ्याशुभ्र गाद्याचा बिस्तरा होता ते रामकृष्ण मिशन हॉस्पिटल होते कुणी दयाळू माणसाने गंगाकिनाऱ्यावरून उचलून हॉस्पिटलमध्ये आणले होते

### गांजा धुंदीमधील साधू

एक महिन्यात पूर्ण बरा झालो एका साधूच्या टोळीत सहभागी झालो या साधूंनी अमृतसर, कागजा, ज्वाला, पजतरणी या ठिकाणी नेले. हे साधू ढोंगी होते त्याच क्रियाकर्म भ्रष्ट होते चरस, अफू, गांजाच्या धुंदीत वावरायचे लोकांना नादी लावून फसवायचे या साधूमुळे खाद्यावर चादर आली होती हातात तुंबा आला होता परंतु माझ्या मनात मात्र हिमालय होता हिमालयाच्या दर्शनासाठी मन व्याकुळ होते म्हणूनच या साधूच्या नादी लागलो. त्याचे समाजद्रोही वर्तन लक्षात आल्यावर त्याच्या हातावर तुरी देऊन निसटलो. पुन्हा हरिद्वाराला आलो

### सदैव पलायनच

हरिद्वार व ऋषिकेशच्या मध्ये श्यामापूर नावाचे गाव आहे तेथे अडियार स्वामींची शेती होती त्याच्या शेतीवर कामास लागलो हत्तीच्या टोळ्या व हरणाच्या कळपापासून पिकाचे रक्षण करणे, त्याच्या म्हशी चारणे, इत्यादी पडेल ते काम करावे लागे खाण्यापिण्याची मात्र चंगळ होती येथील हिरव्या शेतात शांती होती एक दिवस एक म्हैस हरवली जंगलात पुष्कळ शोधली परंतु सापडली नाही अडियार स्वामींच्या भीतीने ऋषिकेशला पळून आलो जीवनात सदैव पलायन मागे लागले होते त्यातील ईश्वरी हेतू समजत नव्हता. ऋषिकेशमध्ये दोन - तीन दिवस उपाशी फिरलो गंगेचे पाणी पिऊन भूक शमविण्याचा प्रयत्न करायचो परंतु पोटातली आग भडकत राहिली मग बाबा कालीकमलीवाले अन्नछत्रासमोर लागलेल्या साधूच्या रांगेत जाऊन उभा राहिलो कोतवालाला माझ्या साधुत्वाचा संशय आला त्याने मठाचे, गुरुचे नाव विचारले सांगता येईना त्याने रांगेतून हाकलून लावले. पोटात भूक वागवीत त्रिवेणी घाटावर फिरत राहिलो तेथे धर्मदत्त रतुडी नावाचे पंडित भेटले घरातून पळून आलायस का ? साधू बनणार का ? असे प्रश्न विचारले मी होकार दिला मला चल म्हणाले त्याच्या पाठोपाठ पचकुटिया या ठिकाणी त्यांनी मला नेले प. रतुडीचे चुलतभाऊ स्वामी दयानंदगिरी या ठिकाणी कुटीत राहत होते तुझ्यासाठी एक चेला घेऊन आलोय असे ते त्यांना म्हणाले त्यांनी मंत्रदीक्षा घेणार काय म्हणून विचारलं मी होय

म्हणालो "भगवान शकराची दीक्षा तुला देतो कानमत्र देतो तो खरा गुरू होय" असे ते म्हणाले दुसऱ्या दिवशी पाच गुरुच्या साक्षीने त्यानी मला कानमत्रदीक्षा दिली माझे मन आनदले कानमत्रदीक्षा देताना स्वामी दयानदगिरी म्हणाले, "आजपर्यंत जे पापपुण्य तू केलेंस ते माझ्या चरणाजवळ ठेव यानतरच्या पापपुण्याचे उत्तरदायित्व तुझ्यावर रोज तीन वेळा मत्रदीक्षाजप करीत जा त्याचे पाप [illegible] राजा व तुझ्यात समप्रमाणात विभागले जाईल ज्या घरात तुझा जन्म झाला, त्या घरादाराला विसरून जा आता तुझा पुनर्जन्म झाला आहे निष्कामभावाने, जे तुझ्याजवळ येतील त्याची मनोभावे सेवा कर गुरु हाच तुझा माता, पिता, ईश्वर आहे," असा उपदेश त्यानी केला तेच बुनियादी सत्य स्वीकारून आजपावेतो जीवनाची वाटचाल करतो आहे, करीत आहे

गुरुदीक्षेच्या प्रसगी मी तेविसाव्या वर्षात पदार्पण केल होत गुरुसेवा व त्याच्या अतिथीची सेवा हेच माझ जीवनकार्य बनल त्याशिवाय आश्रमाची साफसफाई करण, लावलेल्या वृक्षाना पाणी पाजण, सर्व प्रकारची कामे आनदाने करू लागलो आजन्म ब्रह्मचारी राहण्याचे नैष्ठिक ब्रह्मचर्याचे व्रत मी स्वीकारले होते मनाला खूप समाधान वाटत होते हिमालयात निर्जन ठिकाणी राहणाऱ्या सिद्धयोगी महात्म्याची माहिती रोज स्वामींना विचारीत होतो या महात्म्यांच्या दर्शनाची ओढ मनाला लागली होती मी कुटीच्या वरील देवीच्या मदिरात गेलो मदिराखाली गुहा होती तेथील वातावरण अतिशय स्वच्छ, शात, आनददायी होत तेथेच आसन, प्राणायाम, जपाचा अभ्यास केला कठोर साधना केली दोन - अडीचशे माणसे बसू शकतील एवढी मोठी गुहा तेथे होती खाली वाहणाऱ्या गगेचे सुदर दृश्य पाहून मन पुलकित व्हायच हळूहळू योगाभ्यासात प्रगती होत गेली. जप [illegible] आनदाश्रू वाहायच शरीर पुलकित व्हायच.

एके दिवशी शिवलिगात दिव्य ज्योतीचे दर्शन झाले या गुहेभोवती दाट अरण्य होत भरदिवसा वाघाने गाय मारताना येथे पाहिली येथे नाग आरामशीर सरपटत होते गुहेत अजगर लटकताना पाहिला, परतु मन निर्भय झाले होते मृत्यूची भीती वाटत नव्हती त्यामुळे वन्यजीवाच्या दर्शनाने साधनेत खड पडला नाही त्यानतर तेथे अनेक साधुगण येऊन राहू लागले गर्दी वाढली योगाभ्यास थाबला दोन महिन्याने पुन्हा खाली ऋषीकेशमध्ये गुरुचरणाजवळ येऊन त्याची सेवा करू लागलो

गगोत्रीत श्री तपोवनजी महाराज नावाचे महान तपस्वी व सिद्धयोगी राहत होते. त्याचे दर्शन लाभलेले अनेक साधुसन्यासी त्याचे महात्म्य वर्णन करून सागत त्याच्या दर्शनाची उत्कठा मनाला सतावू लागली भीत भीत गुरुदेवांजवळ

तपोवनजींच्या दर्शनासाठी जाण्याची परवानगी मागितली त्यानी आनदाने दिली. गुरुच्या चरणास स्पर्श करून मौन धारण करून निघालो खाद्यावर चादर व हातात कमडलू घेऊन अनवाणी तपोवनजींकडे वाटचाल करू लागलो नग्या पायाने खडकाळ मार्गावरून चालणे कठीण जात होते मुक्काम करीत तीन दिवसात टिहरीला पोहचलो धरासूपासून पाऊलवाटेच्या खाली पाताळासारखी खोल दरी होती वर आकाश होते ही पाऊलवाट जीवन आणि मृत्यू याच्यामधील एक धागा होती या पाऊलवाटेवर डोळे चिकटवून मी चालत होतो मौनामुळे इशाऱ्याने मार्ग विचारीत होतो हृषिकेशपासून सात दिवस अनवाणी प्रवास करून उत्तरकाशीला पाहोचलो गगेत स्नान करून अधीरमनाने त्याच्या कुटीजवळ पोहोचलो वारुणावत पर्वताच्या पायथ्याशी मृत्यूला जिकलेल्या नचिकेताच्या तपोभूमीत प्रवेश करताच शातिसागरात आल्याचा भास झाला येथील निसर्गाच फुललेल वैभव पाहताना डोळ्याची तारबळ उडाली ओट्यावर समाधीत लीन झालेले तेजस्वी ललाटाचे गौरवर्णीय तपोवनजी पाहताच हृदय आनदाने थयथय नाचू लागले त्याच्या दर्शनाने हृदयात सात्त्विकता उतरली मी स्वामींना साष्टाग नमस्कार घातला त्यानी विचारल, ''कोठून आलास ?'' मी कागदावर लिहून उत्तर त्याच्या हातात दिल ''मौन धारण केलय का ?'' अस पुन्हा प्रश्नाकित विचारल मी डोक हलवून हो सागितले, तस ते म्हणाले, ''इतक्या तरुण वयात हठयोगाचा आसरा घेतलास हठधर्म मार्ग योग्य नाही त्यात अध पतन आहे. त्याद्वारे तुला ईश्वर समजणार नाही.'' त्याना पाहून त्याचा हा सदेश ऐकून घरातून ज्यासाठी पळालो ते कार्य पूर्ण झाल्याचे समाधान झाले जे मिळवायच होत ते मिळाल

त्यानी दिलेल्या चिठ्ठीनुसार कालीकमलीवाले अन्नछत्रातून रोज भोजन मिळू लागले गंगास्नान करून रोज त्याच्या दर्शनासाठी जात होतो त्याच्या दर्शनाने मनातल्या उरल्यासुरल्या वासना व माया - मोहाची जळून राख झाली

उन्हाळ्याचा प्रारभ सुरू झाला होता स्वामी तपोवनजींनी सेवकासह गगोत्रीस प्रयाण केले त्याच्याबरोबर जाण्याची माझी इच्छा होती परतु त्यांनी मला मनाई केली दोन - चार दिवस उत्तरकाशीत राहिलो परतु मन गगोत्रीत घिरट्या घालू लागल गगोत्री उत्तरकाशीवरून शभर किलोमीटर अतरावर आहे एका दुपारी चादर खाद्यावर टाकून हातात तुबा घेऊन गगोत्रीकडे निघालो अतिशय खडतर मार्ग होता. चालून चालून पाय रक्तबबाळ झाले हात - पाय थडीने आखडले पाच दिवस पायपीट करीत थकलेला भुकेला सुदरानद गगोत्रीत येऊन तपोवनजी महाराजाच्या कुटीसमोर येऊन भागीरथी किनारी उभा राहिला मला पाहताच स्वामी म्हणाले, ''अखेर तू इथे पोहोचलासच तर. जा कुठे तरी निवासासाठी

जागा शोध '' शेवटी एक गुहा मिळाली स्वामी तपोवनजी रोज शिष्यांना उपनिषदाचा पाठ देत तो ऐकत बसे स्वामींचे शिष्य चिन्मयानद याचा परिचय झाला. गुहा आता माझ घर झाली होती दिवसेंदिवस स्वामींवरील भक्ती वाढत होती. तीन हजार त्र्याण्णव मीटर उचीवरील गगोत्रीच निसर्गसौंदर्य देवदार, भूर्जपत्र आदी वृक्षानी सजवल होत निसर्ग आणि स्वामींचा सहवास स्वर्गीय सुखाचा आनद देत होता गुहेत झोपलो होतो. त्याच वेळी स्वामी तपोवनजी गुहेसमोर येऊन उभे राहिले

हाक मारताच झटकन उठून त्याच्या चरणकमलास स्पर्श केला स्वामींचा ब्रह्मचारी नावाचा सेवक उत्तरकाशीला निघून गेला होता, म्हणून स्वामींनी मला त्याच्या कुटीत कायमचे राहावयास बोलाविले मला स्वर्गलाभाचा आनद झाला गगोत्रीसारख्या भयानक थडीत चहा अमृतासारखा लागतो स्वामींना मी चहा करून दिला. स्वामींच्या कायम सेवेत आणि सहवासात राहण्याचे भाग्य मला मिळाले आज मी जो काही आहे. जे जीवन जगतोय ही स्वामी तपोवनजींची कृपा होय

स्वामींची उची एकशे ऐंशी सेंटीमीटर होती ते केरळचे निवासी होते साहित्य कला क्रीडेत त्याच मन रमायच

तनमनाने सुदर असलेल्या या महायोग्याचे शरीर अतिम समयी जीर्ण झाले होते दैनदिन कार्यही त्याना करता येईना मृत्यूच्या अगोदर स्वामी मला म्हणाले, ''बेटा तुझ्या सेवेचे ऋण मी फेडू शकणार नाही, जीवनात तुला काही कमी पडणार नाही असा माझा तुला आशीर्वाद आहे आता मी विश्राती घेतो ईश्वरास माझे धन्यवाद शरीर सोडण्याच्या आदल्या दिवशी गीतेतील श्लोक म्हणायला सागितले बुधवार, सोळा जानेवारी एकोणीसशे सत्तावनची पौष पौर्णिमा होती. मी त्याचे पाय दाबीत होतो त्यावेळी स्वामींनी सागितले, ''मला जलसमाधी द्या '' तीन वेळा माझ्याकडे पाहिले आणि स्वामी तपोवनजींचा आत्मा त्याचे शरीर सोडून गेला मी अनाथ झालो. जीवनातला प्रकाश गेल्यान मन अधारात बुडाल. उत्तरकाशीत मकरसक्रातीचा मेळा चौदा जानेवारीपासून भरलेला होता स्वामी तपोवनजींच्या दर्शनासाठी अपार जनसमुदाय जमला त्याच्या देहाला स्नान घालून विश्वनाथाची परिक्रमा करविली त्याच्या अतिम इच्छेनुसार त्याना जलसमाधी देण्यात आली

माझ्या आनदी जीवनातला एक अध्याय सपला आणि दुसरा अध्याय सुरू झाला उत्तरकाशीच्या कुटीत स्वामी चिन्मयानद राहू लागले स्वामी तपोवनजींची गगोत्रीतील पवित्र कुटी माझे निवासस्थान बनली एकोणीसशे तेवीस मध्ये स्वामींच्या

पहाडी भक्तानी ही खास कुटी त्याना बाधून दिली होती ही पवित्र कुटी गगेइतकीच मला पूजनीय आहे.

**एकशेआठ वेळा गोमुखाचे दर्शन**

स्वामींच्या मृत्यूनतर गोमुखाच्या दर्शनाची आस मनाला लागली दिल्लीचे एक व्यापारी आपल्या गुरुसह गोमुखयात्रेला निघाले होते. सामान वाहण्यासाठी त्याना एक हमाल लागत होता तो त्याना मिळत नव्हता त्यामुळे त्याना मोठा प्रश्न पडला होता गोमुख दर्शनाच्या लालसेने मी त्याचा हमाल बनलो चादर, तुंबा घेतला त्याचा बोजा पाठीवर लादून गोमुखाकडे प्रयाण केले. गगोत्रीपासून अठरा किलोमीटरवर जायच होत. सर्व रस्ता मोठमोठ्या शिलाखडातून होता. वरून मोठे धोंडे खाली येत. जणू गोमुखाकडे जाण्यास प्रतिबध करणारे ते मृत्युदूतच होते तीन किलोमीटनतर पाय लटपटू लागले पुढे मागे जाता येईना हमाल असल्याने कुणी थोडी विश्राती घेऊ दिली नाही जिवाच्या बाजीने चौदा किलोमीटर अतर कापून भोजबासाला पोहोचलो तेथे लाकडे गोळा करून धुनी पेटवली सर्वांना स्वयपाक करून जेवायला घातले स्वत: भोजन केले रात्रभर थडीत धुनीजवळ चादर ओढून पडून राहिलो

भोजबासावरून सकाळी निघालो गोमुखावर जाऊन पोहोचलो नीलमण्यासारख्या चिरसनातन हिमगर्भातून प्रगट झालेली गगा पाहून मी स्तब्ध झालो सारे कष्ट, थकवा क्षणात विसरलो फुलावर ठेवल्यासारखी आल्हादपणे गगाप्रवाहात पावले घातली गगास्नान केले जन्म - जन्मातराच्या पापातून मुक्त झालो एक वेळ गोमुखाची यात्रा केल्यावर अतिकष्ट, मार्गातील धोके पाहून ती पुन्हा न करण्याबाबत लोक कान पकडतात परतु मी प्रतिज्ञा केली एकशेआठ वेळा गोमुखावर येईन डुबकी लावीन याप्रमाणे मी एकशे आठ वेळा गोमुखाची दुर्गम यात्रा पूर्ण करून प्रतिज्ञा पूर्ण केली त्यामुळे गगा आणि माझ नात आई - मुलासारख झाल आहे प्रत्येक वेळी गगामातेच्या कुशीत जाण्यासाठी माझ मन तडफडत अनेक यात्रिक, नवयुवक, निसर्गप्रेमी गिर्यारोहक, पत्रकार याना मी गोमुखाची चिरआनदमयी यात्रा घडविली आहे

गगोत्रीच्या वास्तव्यात धातुधारणा, योग, प्राणायाम याचा मन:पूर्वक अभ्यास केला हॉटेलातील अनुभवामुळे मी चागले भोजन बनवायचो भडारा असेल त्या ठिकाणी लोक मला बोलवायचे गगाजल आणण्यापासून लाकडे फोडणे, भाजी चिरणे, बटाटे सोलणे व स्वादिष्ट भोजन तयार करणे ही सर्व कामे एकटा करायचो सातशे - आठशे माणसाचा स्वयंपाक बनवायचो दुसऱ्याची सेवा हा

माझा आनद होता. लोकाना मी बनविलेले भोजन स्वादिष्ट लागायचे. स्वामी तपोवनजींनाही माझे भोजन आवडायचे पुढे सतत भट्टीपुढे बसून बसून आजारी पडू लागलो त्यामुळे भंडाऱ्याच्या कामातून मुक्त झालो

**बर्फ आणि बर्फच**

दिवाळीनतर गंगोत्रीचे मदिर बद होते हिवाळ्यात बर्फ पडू लागते त्यावेळी सर्व लोक गगोत्री सोडून जातात त्या वेळी गगोत्रीत मी एकटा राहिलो भूर्जपत्र, जळाऊ लाकूड व भाकर वाळवून तिचा चुरा करून ठेवायचो एकदा असाच हिवाळ्यात गगोत्रीत राहायचा निर्णय घेतला दोन - चार महात्म्याशिवाय सर्वजण उत्तरकाशीस निघून गेले ऑक्टोबर महिना आरामात गेला. नोव्हेंबरात एकशेवीस सेंटीमीटर बर्फ पडले कुटीचा दरवाजा हिमराशींनी झाकला गेला रात्री दरवाजाच्या फटीतून पाहिले तर चद्रप्रकाशात बर्फ चादीसारखे चमकत होते या शीतल प्रकाशकिरणातून दिव्यलोकाची हिमसृष्टी निर्माण झाल्याचा भास होत होता या स्वर्गीय दृश्याने स्वत-चा विसर पडला बाहेर पडण्याचा प्रयत्न करू लागलो तर कमरेइतक्या बर्फात खचलो थडीही भयानक होती ब्लँकेट फाडून त्याचा कोट बनविला पोत्याच्या तुकड्याची पॅन्ट बनविली. ही कोट - पॅन्ट घालून बाहेर आलो हिमवर्षावाचा अभूतपूर्व आनद उपभोगला. थडी वाजतेय याचे भान राहिले नाही मनात अजब उन्माद निर्माण झाला माझ्यासारखा भाग्यवान जगात कुणी नाही, अशी भावना मनात निर्माण झाली

डिसेंबर उगवताच एकात खायला उठला. सगळीकडे बर्फच बर्फ होते. त्यामुळे दूरवर असणाऱ्या महात्म्याचीही भेट घेता येईना हजारो सस्कृत श्लोक म्हणत बसलो तरी दिवस लवकर समाप्त होत नसे एकाताने कधी मानसिक सतुलन ढळायचे आत्महत्या करावीशी वाटायची मनाची विचित्र अवस्था झाली मेमध्ये मदिर उघडण्यासाठी लोक आले. त्याना पाहून ईश्वर भेटल्यासारखा आनद झाला. मला जिवंत पाहून सर्वांना आश्चर्य वाटले देवता दिसल्या का ? घटा वाजल्या का ? नारदजी पूजा करायला आले का ? असे अनेक प्रश्न त्यानी मला विचारले. परतु या सर्व प्रश्नांची उत्तरे मी नकारात्मक दिली. हिवाळ्यात बर्फ पडू लागल्यावर नारद येऊन गगापूजा करतात देवता घटा वाजवतात, अशी लोकाची श्रद्धा होती

सतत चार वर्षे हिवाळ्यात बर्फवर्षावात मी एकटा मानव गगोत्रीत राहिलो नतर निसर्गाशी नाते जुळत गेले.

हिवाळ्यातील निसर्गाच्या रूपाची अलौकिक अनुभूती येऊ लागली. नंतर एकांताशी इतकी मैत्री जुळली की भेटायला येणारा दुष्मन वाटू लागला. आटा

भाजून या एकातात दिवस काढले. हे दिवस माझ्या जीवनातील सोनेरी दिवस होते.

## फोटोग्राफीचा श्रीगणेशा

प्राण सकटात टाकणाऱ्या हिमालयातील धाडसी मोहिमांबद्दल स्वामी म्हणाले, "गोमुखावरून नदनवनमार्गे बदरीनाथाच्या धाडसी मोहिमेत भाग घेऊन ती यशस्वी करण्याचे भाग्य मला लाभले या मोहिमेत हिमालयातील अतर्भागात विखुरलेल्या ईश्वरी सौंदर्याचे दर्शन मला झाले. हा योग अलाहाबादचे प्रख्यात गिर्यारोहक डॉ. एस पी आगरवाल याच्यामुळे आला. ते गोमुखावरून आपल्या सहा साथीदारासह बद्रिनाथकडे निघाले होते चौदा हजार फुटांवरील नदनवनापर्यंतच ते पोहोचू शकले. अवघड हिमवाटेवर त्याना मार्ग सापडेना ते पुन्हा माघारी गगोत्रीस आले श्री. आगरवाल माझ्याकडे आले आमच्या टीममध्ये सामील होऊन आमचे मार्गदर्शक बना, अशी विनती त्यानी मला केली माझ्याजवळ एक ब्लँकेट व फाटका बूट होता आगरवाल टीमने एक टोपी व गॉगल दिला बद्रीनाथकडे आम्ही सात जणानी कूच केले गोमुखावरून आम्ही तीन हजार आठशे मीटर उचीवरील नंदनवनात आलो त्याचे नदनवन नाव स्वामी तपोवनजींनीच ठेवले नंदनवनात आल्यावर टीममधील बहुतेक लोक आजारी पडले. तेथे तबू ठोकून सर्वांना स्टोव्हवर स्वयपाक बनवून जेवू घातले पचवीस हिमनद पार करून पाच हजार आठशे त्रेपन्न मीटर उचीवर कालिंदीजवळ पाहोचलो इतक्या उंचीवर खडतर पायपीट करून कसे पोहोचलो ईश्वरच जाणे बर्फावरच तंबू ठोकला येथे आल्यावर जणू जिवत समाधीत वावरतोय असा भास होऊ लागला येथे अगणित शिखरांच विराट दर्शन घडल

तिथे अनत हिमगालिचावर खूप भटकलो. कितीतरी वेळा मृत्यूच्या फासात अडकता वाचलो प्रत्येक वेळी ईश्वरच मार्ग दाखवत होता एका ठिकाणी पाठीवर सामान लादून छोटी हिमदरी (क्रिवायसेस) पार करीत होतो भुसभुशीत मातीवर पाय ठेवल्याबरोबर एकदम आत गेलो खाली जाताना हात पसरवण्याची बुद्धी झाली त्यामुळे सपूर्ण शरीर आत व डोके बाहेर अशा अवस्थेत लटकत राहिलो. 'वाचवा' असे मोठ्याने ओरडलो दलातील एकाने आवाज ऐकून माझ्या दिशेने नॉयलॉनचा दोर फेकला जीवनाचा मोह सुटत नव्हता मृत्यूबरोबर झुज देऊन मोठ्या प्रयासाने बाहेर आलो दोराने मृत्यूच्या मिठीतून सोडवले त्यानतर मृत्यूचे भयच मनातून निघून गेले. अनत हिमसागराच्या गर्भाशयातून माझा पुनर्जन्म झाला ज्या ठिकाणी मृत्यूच्या सौंदर्याचे दर्शन घडले त्या सुदर मृत्यूकुडाला प्रणाम करून

पुढे चालू लागलो. उर्श्वीताल (सरोवर) वरून अरवा नदीच्या किनाऱ्याने सहा दिवसानी घासतोलीवरून बद्रीनाथला पोहोचलो.

तीन दिवस बदरीधामात थाबून हृषीकेशला आलो. हिमालयाच्या अतरगातील सौंदर्याचे वर्णन इतरांना सागितले हिमदरीत फसल्याची हकिगत सांगितली. सगळ्यानी ही गोष्ट अशक्य असल्याचा अभिप्राय देऊन माझ्यावर अविश्वास दाखवला डॉ एस पी आगरवालने हिमदरीत अडकलेल्या अवस्थेत माझे अनेक फोटो काढले होते असख्य पत्रे लिहूनही त्यानी फोटो पाठविले नाहीत खंत वाटली माझ्याजवळही कॅमेरा असता तर लोकाना हिमसौंदर्य दाखवता आले असते हा विचार मनात पिंगा घालू लागला काही निर्धाराने मी एका स्टुडिओत गेलो पचवीस तीस वर्षापूर्वी साधे परदेशी कॅमेरे स्वस्तात मिळत. खिशात फक्त पचवीस रुपये होते त्यातून एक साधा कॅमेरा व बारा फिल्म रोल घेतले. माझी

छप्पन्नमध्ये हा देवभाग यात्रा पुन्हा करण्याची तयारी केली पाच जणाच एक कुटुब गोमुखावरून बदरीनाथला जाण्यासाठी मला भेटल त्यात साठ वर्षांचे एक महात्मा होते त्याना घेऊन भगवताचे स्मरण करून निघालो

बदरीनाथवरून अत्यत अवघड, जीवघेण्या मार्गाने गगोत्रीस येणारे जगातील आमचे पहिलेच दल होते. गगोत्रीत पाहोचताच सर्व साधू, सन्याशी, बैरागी व पड्यानी आमचे ढोल, रणशिंगे वाजवून प्रचड स्वागत केले. फोटोग्राफीचा श्रीगणेशा मी याच मार्गातील हिमपाटीवर गिरवला. नतर दहा वेळा या मार्गाने गेलो आलो अखेरची यात्रा एकोणीशे एक्क्याऐंशीमध्ये केली. या यात्रेत स्वैरपणे कॅमेरा चालविला त्यातून आलेले फोटो अतिशय सुदर निघाले पहिल्याप्रथम मी काढलेले फोटो पाहताना तनमन आनदाने शहारून गेले सर्वत्र फोटो दाखवीत फिरलो 'बालभारती' ... झाला

लोकाना मी यात्रा करून आणायचो. ते लोक माझे का... साहस व प्रेमाने भारून जाऊन मला दक्षिणेच्या रूपात पैसे द्यायचे एका जो... प्याला मी गोमुख बदरीनाथ यात्रा घडवली त्यानी मला शभराची नोट दिली... जीवनात प्रथमच नोट पाहिली त्यातून एक आयसोली कॅमेरा घेतला त्यातून घे...लेले अनेक फोटो विविध प्रतिष्ठित हिंदी – इग्लिश मासिके, वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले... हिंदुस्थान टाइम्सने माझ्या छायाचित्रावरून सहा पानी कॅलेंडर एकोणीसशे बहात्तर...ध्ये काढले त्याचे तीन हजार रुपये मिळाले त्यातून एक भारी कॅमेरा घेतला हळहळ... छायाचित्रणकलेत माझी प्रगती झाली. स्वामी तपोवनजी मला जीवनप्रकाश दाखविणारे माझे अध्यात्मिक गुरू, तर फोटोग्राफीत कै एन पी वर्मा व का... नाथन माझे गुरू

होत. या दोघांनी फोटोग्राफी कलेत मला पारगत केले.

### साधू आणि फोटोग्राफी

एक साधू आणि फोटोग्राफर आहे त्याचा लोकांना ताळमेळ बसत नाही फाटोग्राफीच्या कलेमुळे मिळणारी प्रसिद्धी याचा हेवा अनेक ढोंगी साधू करतात सुंदरानद साधू नाही खाली फोटोग्राफर आहे असा प्रचार करतात त्याला माझा नाईलाज आहे स्तुतीने हुरळून जायचे नाही निंदेने ढासळून जायचे नाही अहकारी वृत्तीला मनात प्रवेश द्यायचा नाही कुणाचाही द्वेष करायचा नाही. जवळ येणारास प्रेम द्यायच हा माझा स्थायिभाव आहे

यूकीको फुजिता नावाची जपानी महिला माझे नाव ऐकून योगशिक्षणासाठी माझ्याकडे आली. तिला योगविद्या विनामूल्य शिकवली. तिने ब्रह्मविद्या असे आपले नाव धारण केले भगवी वस्त्रे परिधान करू लागली. या जपानी महिलेला हिमालयात भटकती करून आणली दुसऱ्यांदा ती जपानहून माझ्याकडे आली छायाचित्रणाचा माझा छद पाहून तिकडून आणलेला उत्तम कॅमेरा व झूम लेन्स तिने मला भेटीदाखल दिला त्यामुळे माझी कला अधिक समृद्ध झाली हिमालयाचे हृदय प्रतिबिंबित करणारे सुदर सुदर फोटो काढले भारतमातेचा मुगूटमणी असलेल्या हिमालयाचे दर्शन भारतीयाना घडविण्यासाठी देशभर छायाचित्राची प्रदर्शने भरवली प्रेक्षकानी रागा लावून डोळे भरून हिमसौंदर्य पाहिले मी धन्य झालो

### हिमशिखरे आणि बर्फ विहिरी

सर्व छायाचित्रे घेताना अनेक वेळा प्राण हातात घेऊन धाडस करावे लागले. १९८१ मध्ये पाच हजार चारशे मीटर उचीवर उभा होतो समोर नीलमण्यासारखे दिव्य सरोवर होते. पाण्यावर मलईसारखे बर्फ जमले होते. त्यातून मॉडर्न आर्टमधील अनेक चित्रे साकार झाली होती आकाशात काळ्या मेघांचा सचार सुरू झाला होता. कधीही हिमवर्षाव होऊ शकत होता. मी आकाशाकडे डोळे लावून बसलो होतो क्षणभर ढगात ओम चा आकार दिसला तत्क्षणी कॅमेऱ्याचे बटन दाबले फोटो येतो का नाही शका होती. परतु प्रिंटवर ओमचे दर्शन होताच आनदाने गहिवरून गेलो सरोवरचे चित्र काढण्याच्या विचारात असताना आकाशात ओमचे दर्शन झाले त्या अक्षरब्रह्माच्या आकाशातील दर्शनाने जीवनाचे सार्थक झाले. असाच पाच हजार सातशे मीटर उचीवर सुरालय ग्लेशियरवरून चालत होतो तसेच माझी नजर खोल पाताळात जाऊन थाबली. मित्राना थाबवले त्यानी माझ्या कमरेला दोर बाधला. दीड मीटर आत उतरलो चोवीस मीटर खोलीची ही हिमविहीर नैसर्गिकरित्या तयार झाली होती मी अधिक खोल खोल उतरलो. काचेसारख्या

चकाकणाऱ्या या बर्फ विहिरीचे सौंदर्य पाहून स्तभित झालो. त्याचबरोबर या खोल हिमविहिरीतील भयानकता जीवाचा थरकाप उडवीत होती दोरीला लटकून मी अनेक छायाचित्रे घेतली साथीदारानी दोर खेचून मला वर काढले. जोडीदारानी या विहीराला मृत्यूकुड नाव दिले. मला ती ईश्वरी सौंदर्याचे प्रतीक वाटली.

मी हिमालयात जगतो आहे हिमालय माझ्या रोमारोमात भिनलेला आहे सर्वोच्च आनद मिळविण्यासाठी गिर्यारोहक बनून हिमालयाच्या पर्वतशिखरावर दऱ्याखोऱ्यात मनसोक्त भटकलो तेथे राम आणि भगवान शकराला पुकारले. वृक्ष, हिमशिखरे, फुलात मला ईश्वराचे दर्शन झाले. शिवलिग शिखर तर साक्षात शिवाच्या रूपात दिसले शिवलिंगाचे छायाचित्र माझे आवडते चित्र आहे. गढवालमधील अद्भुत हिमालयाची अनेक रूपे मी पाहिली शिवलिग शिखरापासून काही अतरावर वाहणाऱ्या स्फटिक जलप्रवाहात सूर्यप्रकाशात हिमशिखराची प्रतिबिंबे नाचू लागतात त्यावेळी जलप्रवाहातून जणू सोनच वाहतय. अस सुदर दृश्य पाहावयास मिळाले. हिमालयाच्या कुशीत महासिद्धयोगी महात्मे मला भेटले नाहीत परतु कस्तुरीमृग भेटले रंगीबेरंगी पक्षी भेटले. दिव्य वनस्पती भेटल्या निसर्ग सर्व प्रकारचे ज्ञान देणारा एक महान गुरू होय हिमालय [illegible] केवळ एक पर्वत नाही, ते एक विराट जीवन आहे त्याच वर्णन करायला अनेक जन्म घ्यावे लागतील

असे सागून स्वामी सुदरानदानी आपले आत्मकथन सपविले. सतत चार तास स्वामींनी बोलत राहावं, आम्ही ऐकत राहाव अस वाटत होत दुपारचा एक वाजला होता स्वामींना स्वयपाक करायचा होता दीडच्या बसने आम्हाला उत्तरकाशीला परतायच होत स्वामींनी मला पचवीस सुदर रंगीत फोटो दिले. पैसे द्यायला लागलो तर घेतले नाहीत या निसर्गपूज्य देवमाणसाच्या चरणास स्पर्श करून आम्ही त्याचा निरोप घेतला

# २

# हिमालयातील देवदूत

आपले सपूर्ण जीवन पश्चिम हिमालयाच्या कुशीतील गरीब माणसासाठी वाहून घेतलेल्या सेवाभावी डॉक्टरची ही कहाणी आहे केरळ मधील हा तरुण १९७५ साली लुधियानाच्या ख्रिश्चन मेडिकल कॉलेज मधून एम बी बी.एस्. झाला डेहराडून येथे दीड वर्षे उमेदवारी करून तो पुण्यात आला. त्याने वाडिया हॉस्पिटलमध्ये दोन वर्षे काम केले. पुण्याचे श्री. अमृतराव साळवी याची मुलगीही त्याच्याबरोबर लुधियानाला शिकत होती पुण्यात दोघांचा परिचय अधिक घनिष्ट झाला त्याचे रुपातर प्रेमात झाले दोघेही विवाहबद्ध झाले. वाडियात काम केल्यावर डॉक्टरकीचा दोघानाही चागला अनुभव आला. आता पुण्यात दवाखाना थाटून दोघांनीही सुखाचा ससार करावा अशी सासरेबुवाची इच्छा होती त्यासाठी शुक्रवार पेठेतली स्वत:ची जागा देण्याची तयारी त्यानी केली होती. परतु नियतीच्या मनात मात्र काहीतरी वेगळ होत अमृतरावांचा हा डॉक्टर जावई दोन महिन्याच्या सेवेसाठी केडगांवच्या मुक्तीधाम मिशन हॉस्पिटलमध्ये गेला आणि त्याच्या जीवनात क्रांती झाली. तेथे त्यान एक स्लाईड शो पाहिला पश्चिम हिमालयातल्या दऱ्याखोऱ्यात राहणारे भारतीय, वैद्यकीय उपचाराअभावी रोगी कसे मृत्यूशी झगडत आहेत हे त्यान त्या स्लाईड शोत पाहिल. त्याच हृदय वेदनानी भरून गेल त्याच क्षणी त्यान निर्णय घेतला जगायच तर याच गरीब लोकासाठी

मनाली येथे एक हॉस्पिटल आहे. परतु ते डॉक्टरअभावी बद पडल आहे अस त्याला समजल होत वैद्यकीय व्यवसायातून शहरात मिळणाऱ्या सुखसमृद्धीकडे

पाठ फिरवून तो आपल्या पत्नीसह तात्काळ मनालीला आला बद पडलेल ते हॉस्पिटल त्यान हुडकून काढल. परतु हॉस्पिटलला टाळं लागलेल होत त्यान चौकशी करता दोन नर्सेस त्याला भेटल्या. त्यान आपली आणि पत्नीची ओळख करून दिली हॉस्पिटल चालविण्यासाठी आपण पुण्यावरून आल्याचे सागितले ऐकून त्याना नवल वाटल त्या डॉक्टराना म्हणाल्या,

"बाबा इथ राहून आयुष्य बरबाद करू नको हॉस्पिटल चालविण्यासाठी व तुला पगार देण्यासाठी पैसा नाही १९३५ साली लेडी विलिग्डन यानी सुरू केलेल्या या हॉस्पिटलला अमृतसरच्या कॅनेडियन हॉस्पिटलकडून येणारी मदत १९६२ ‌ बद झाली अनेक डॉक्टर आले आणि गेले. कुणीच इथ टिकला नाही आम्ही जखमेवर मलमपट्ट्या करून कसे तरी जगतोय हॉस्पिटलला एक पैशाचीही मदत मिळत नाही. तू परत जाण्यातच शहाणपण आहे

परतु हा तरुण डॉक्टर आपल्या निश्चयापासून तसूभरही ढळला नाही अर्धशतकापूर्वी बाधलेल्या मनालीतल्या या लेडी विलिग्डन हॉस्पिटलच कुलूप त्यान उघडल हॉस्पिटलची स्वत साफसफाई केली. स्वत च्या पैशातून औषध आणली काम सुरू केले त्याला आज जवळ जवळ एक तप झाल हॉस्पिटलमध्ये रुग्णाची सख्या वाढते आहे आता २२ जणाचा स्टाफ हॉस्पिटलमध्ये आहे हॉस्पिटल कुणाच्याही मदतीविना स्वत च्या पायावर उभ राहिल आहे मनालीच्या परिसरातील खेड्यापाड्यात या तरुण डॉक्टरला लोक देवमाणूस मानू लागले आहेत या सेवाभावी तरुण डॉक्टरच नाव आहे डॉ जॉर्ज वर्गीस व त्याच्या सुविद्य पत्नी आहेत, सौ शीला वर्गीस

पैसा नाही औषध नाही, हॉस्पिटलमध्ये साधन नाहीत, विजेचा पत्ता नाही अशा अवस्थेत वर्गीसन काम सुरू केल. पहिलीच केस हॉस्पिटलमध्ये दाखल झाली ती एका मूल आडव आलेल्या गर्भवती महिलेची परतु न डगमगता त्यान कौशल्यान शस्त्रक्रिया करून मुल बाहेर काढल मुलाचा व त्याच्या आईचा प्राण वाचवला या एकाच केसवरून डॉक्टरच नाव कुलू मनालीच्या दऱ्याखोऱ्यात पोहोचल अतिशय दुर्गम अश्या लाहूल स्पिती व्हॅलीतल्या खेड्यापाड्यात ते जाऊन पोहोचल अनेक असाध्य रोगांनी खितपत पडलेले पश्चिम हिमालयातील लोक मनालीला येऊ लागले डॉ जॉर्ज वर्गीस कडून उपचार करून घेऊ लागले कुणी पायी तर कुणी घोड्यावरून १०० / २०० किलोमीटरचा प्रवास करून आले गेल्या वर्षी डॉ वर्गीसनी २५ हजार रुग्णावर उपचार केले हॉस्पिटलमध्ये १७०० ॲडमिशन्स झाल्या त्यापैकी ७०० रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या २३० प्रसूतीत अडलेल्या महिलावर शस्त्रक्रिया करून त्याचे प्राण वाचविले रोज रुग्णसख्या

वाढते आहे डॉ वर्गीस आणि त्याची पत्नी सौ शीला रोज १६ / १७ तास काम करत आहेत

अत्यत गरीब माणसाला मोफत औषधोपचार करण्यात येतो त्याच्यावर शस्त्रक्रियाही मोफत करण्यात येते ज्या रुग्णाची परिस्थिती चागली आहे ते ऐपतीप्रमाणे पैसे देतात त्यातून हॉस्पिटल खर्च व स्टाफचा पगार भागतो त्यातून जे काही अल्प धन शिल्लक राहिल, तेवढेच डॉ वर्गीस आपल्या चरितार्थासाठी दैनंदिन मानधन म्हणून स्वीकारतात कधी ही रक्कम पाचशे तर कधी हजार पधराशे असते जीवन खर्च कमी करून अत्यत साधेपणाने वर्गीस कुटुब राहाते. स्वत च्या दैनदिन खर्चात बचत करून डॉ. वर्गीसनी हॉस्पिटलमध्ये छोटीसी लॅबोरेटरी सुरू केली आहे. एक एक्सरे मशीन घेतल आहे मनालीतील स्थानिक लोकाच्या मदतीन हॉस्पिटलची २२ बेडस्‌ची मर्यादा ३३ बेडस्‌पर्यंत वाढविली आहे. हॉस्पिटल अद्ययावत करण्याचा त्याचा प्रयत्न सातत्यान चालू आहे

'मनाली'सारख्या ६५०० फूट उचीवरील हिमालयातील या हॉस्पिटलमध्ये काम करताना येणाऱ्या अडचणीबाबत बोलताना डॉ वर्गीस म्हणाले

"आर्थिक अडचणीशी झुज देत मला काम कराव लागत शरीरातील एखाद्या रोगाचा शोध घेण्यासाठी इन्व्हेस्टीगेशन सुविधा आमच्याकडे नाहीत क्लिनिकवरून सारा तपास करावा लागतो. ब्लड बँक नाही तसेच इर्मजन्सी केसमध्ये सेकड ओपिनियन घेण्यासाठी कुणी वरिष्ठ सहकारी डॉक्टर नाही भुल देण्यापासून शस्त्रक्रिया करण्यापर्यंत सारी कामे मला करावी लागतात हवामान सतत बेभरवश्याच असत पूर्वी लाइट नव्हती. त्यावेळी मेणबत्ती वा टॉर्चच्या प्रकाशात ऑपरेशन करायचो आज लाईट असली तरी अधूनमधून गायब होते थडीत मनालीच तपमान उणे ८ ते १० वर घसरत हॉस्पिटलमध्ये हिटींग सिस्टीम नसल्यान ईथरही गोठत त्याला पाण्यात उकळून गरम कराव लागत. कधी कधी कडे कोसळून रस्ता बद होतो दिल्लीवरून औषध वेळेवर पोहोचत नाहीत. खराब हवामानाच्या वेळी रुग्णाला एकदम १ / २ महिन्याची औषध द्यावी लागतात कारण त्याला दर आठवड्याला हॉस्पिटलमध्ये तपासणीसाठी येण अवघड असत" अशा अनेक अडचणी त्यानी सागितल्या. परतु ईश्वरावर पूर्ण विश्वास आणि आत्मविश्वास याच्या जोरावरच डॉक्टर वर्गीसच काम चालू आहे प्रसिद्ध डॉक्टरानी लिहिलेली शस्त्रक्रियेवरील पुस्तके वाचून व आत्मविश्वासाचे जोरावर त्यानी अनेक अवघड शस्त्रक्रिया पार पाडल्या एका लाहूली महिलेचे पोटातून १७ किलो वजनाचा मासल गोळा त्यानी काढला एका कुलू माणसाला अस्वलान अतिशय वाईट जखमी केल होत त्याच्या जखमावर ७० टाके घालण्याच अवघड काम लेडी

विलिंग्डन हॉस्पिटलमध्ये करण्यात आल. अशा अनेक अवघड शस्त्रक्रिया हॉस्पिटलमध्ये पार पडल्या आहेत पूर्वी कुलू मनाली भागातला एखादा माणूस सिरीयस झाला तर त्याला शेकडो किलोमीटरचा प्रवास करून अमृतसर वा दिल्लीला न्याव लागत होत कधी कधी सिरीयस रुग्णाचा वाटेतच मृत्यू व्हायचा अमृतसर वा दिल्लीला रुग्ण आणण फक्त पैसे असणाऱ्यासच शक्य होत. दुर्गम प्रदेशात राहणाऱ्या गरीबास मृत्यूला शरण जाण्याशिवाय दुसरा इलाज नव्हता परतु लेडी विलिंग्डन हॉस्पिटल व डॉ वर्गीस याच्या सेवेन रुग्णाचा पैसा व मृत्यू वाचू लागला आहे. गरीब सामान्य माणसाला तर फार मोठा आधार लाभला आहे कोटी, पलचान, कुलू, अलीयू, चिचोगा, प्रिनी, गुलाबा, सोलग, सियाल, डुगरी, या मनालीच्या आसपासच्या गावावरून रोज रुग्ण मनालीला लेडी विलिंग्डन हॉस्पिटलमध्ये येतात. शिवाय लाहूलस्पिती व्हॅली (२०० कि.मी ), चंबा (३०० कि मी.) कागडा (२०० कि.मी ) या दूर अतरावरील दुर्गम ठिकाणावरूनही पेशंट येत असतात

कुलू - मनाली परिसरातील लोकाच्या आरोग्याबाबत माहिती सागताना डॉ वर्गीस म्हणाले, "पश्चिम हिमालयाच्या कुशीत राहणाऱ्या नेपाळी, तिबेटी, कुलू, लाहोली या जमातीच्या लोकाना मधुमेह होत नाही त्याना हृदयविकार नाही परंतु टी बी. मोठ्या प्रमाणात आहे त्याच्या लाकडी घराना दारे खिडक्या नसतात, त्यामुळे हवा घरात येत नाही स्वयपाकासाठी ते लाकडे जाळत असल्यान सतत घर धुरान भरलेल असत सतत या कोंदट घरात राहिल्यान टी बी च प्रमाण वाढल आहे शुद्ध पाण्याअभावी विषमज्वर, कावीळ, न्युमोनिया. जुलाब याच प्रमाणही वाढत आहे लहान मुलाना गोवर, पोलिओ मोठ्या प्रमाणात होतो हे लोक महिनेन् महिने आंघोळ करीत नाहीत कपडे बदलत नाहीत स्वच्छतागृहाची उणीव असल्याने कुठेही प्रातर्विधी करतात त्यामुळे अनेक रोगाची ते शिकार बनतात लाहुलस्पिती व्हॅली ही ओसाड आहे तिथ गवतही उगवत नाही. या व्हॅलीत राहणाऱ्या बौद्ध धर्मियाची घर पधरा हजार फूट उचीवर आहेत येथे हिवाळ्यात भयकर थडी असते. उणे ३८ पर्यंत तपमान घसरते तसेच उन्हाळ्यात ऊन अतिशय कडक असते उन्हातील अल्ट्रा व्हायलेट किरणामुळे त्याची कातडी भाजून निघते कातडी लाल पडून चर्मरोग होतात तीव्र उन्हामुळे त्याना डोळे बारीक करून पहावे लागते त्यामुळे डोळ्याचे विकार होतात तसेच प्रत्येक घरात दारुचे व्यसन मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचेही दुष्परिणाम त्याना भोगावे लागतात "

कुलु - लाहूल स्पिती व्हॅलीतले पुरुष लोक बोजा वाहण्याच काम करतात.

स्त्रिया शेतातली कामे करतात. गवताचे व जळणाचे लाकडाचे प्रचड भारे पाठीवर वाहून आणतात. त्यासाठी त्याना हिमालयातील चढ उतार चढावे लागतात या कामामुळे पाठीचे, मणक्याचे व कमरेचे विकार त्याना उतारवयात जडतात. तसेच कडे कोसळणे, कड्यावरून खाली कोसळणे, यामुळे दरवर्षी अपघात घडतात हातपाय फ्रॅक्चर होतात यासाठी डॉ जॉर्ज वर्गीस यानी पुण्यात सचेती हॉस्पिटलमध्ये काही महिने ट्रेनिंग घेतल . त्यामुळे त्याना मोडलेल्या हाडात प्लेटिंग व नेलिंग चागल करता येऊ लागल आहे स्थानिक लोकाबरोबरच कुलू मनालीत येणाऱ्या गिर्यारोहक व ट्रेकर्स याचीही डॉ वर्गीसमुळे चागली सोय झाली आहे अपघातात सापडलेल्या अनेक गिर्यारोहकाना डॉक्टरानी जीवदान दिले आहे

कुलु व्हॅलीतील अधविश्वासाबाबत बोलताना डॉ वर्गीस म्हणाले, "खेड्यापाड्यात मोठ्या प्रमाणात अधश्रद्धा अस्तित्वात आहेत प्रत्येक गावच्या आपआपल्या वेगवेगळ्या देवता आहेत या देवताचा पुजारी गावचा भगत असतो त्याला जालमु म्हणतात त्याला मनालीच्या हिडींबा देवीचा भाऊ मानण्यात येतं त्याच्या अगात येत त्यावेळी प्रत्यक्ष देवच त्याचे मुखातून बोलतो अशी या लोकाची भावना आहे पाऊसपाणी, हवामान, रोग व आजाराबद्दल लोक जालमुला प्रश्न विचारतात प्रश्नाची मोडवणूक करण्यासाठी तो दारू मागतो बकऱ्या, कोंबड्याचा बळी मागतो बळी देऊन आजार वा रोग बरा झाला नाही तर पाप जबर आहे त्यातून आजाऱ्याला मुक्त करण्याची शक्ती आपल्यात नाही देव माझ ऐकत नाही अस सागून मोकळा होतो गरीब माणस जालमुला घाबरतात त्यामुळे कुणी त्याच्या विरुद्ध बोलत नाहीत गावावर त्याच राज्य चालत "

समाजातील अधश्रद्धा दूर करण्यासठी डॉ वर्गीस यानी आता खेड्यापाड्यात काम सुरू केल आहे" तसेच स्वच्छता न राखल्यामुळे अनेक आजार होतात याच महत्त्व पटवून देण्यासाठी कुलू व्हॅली व लाहूल स्पिती व्हॅलीत त्याची भटकती चालू आहे १४ गावात स्थानिक महिलाना व तरुणाना आरोग्य रक्षणाचे प्रशिक्षण देण त्यानी सुरू केलं आहे त्यासाठी १४ आरोग्य केंद्रे उघडली आहेत वर्गीस याच्यामुळ स्वच्छतेच महत्त्व लोकाना पटू लागल आहे लोकाना अधश्रद्धेतून बाहेर काढण्यासाठी डॉ वर्गीसनी जालमुशी मैत्री जोडून त्याचच मतपरिवर्तन घडवून आणण्यास प्रारंभ केला आहे त्यामुळे माणूस आजारी पडल्यावर जालमु त्याला डॉ वर्गीसकडे पाठवतो तसेच काही जालमुनी गावात पूर्ण दारूबदी घडवून आणली आहे आपलं दु ख निवारण करण्यासाठी परमेश्वरानच डॉ वर्गीस याना आपल्याकड पाठविल, अशी आता कुलु - स्पिती व्हॅलीतल्या माणसाची श्रद्धा बनली आहे. पैसा व कोणत्याही सुखाची अभिलाषा न धरता डॉ वर्गीस गरीब

माणसाच दु ख निवारण करण्यासाठी अहोरात्र झटत आहेत, त्याला बारा वर्षे झाली आहेत. त्याच्या वयान अडतीसाव वर्ष ओलाडल आहे. पत्नी सौ शीला याची त्याना चागली साथ लाभली आहे. माणसाची सेवा करता करता मृत्यू यावा अशी त्याची इच्छा आहे

डॉक्टरी व्यवसायातून मिळणाऱ्या पैसा आणि सुखसमृद्धीला लाथ मारून हिमालयातील दुर्गम प्रदेशातील गरीब माणसाची सेवा करण्याच व्रत स्वीकारलेला डॉ जॉर्ज वर्गीस म्हणजे हिमालयातला देवदूतच होय, असं म्हणल्यास त्यात मुळीच अतिशयोक्ती होणार नाही

डॉ जॉर्ज वर्गीस निसर्गावर उत्कट प्रेम करणारा माणूस आहे. हिमालयातील निसर्गाचा आविष्कार डोळे भरून पाहण्यासठी पश्चिम हिमालयाच्या कानाकोपऱ्यात तो पायी भटकला आहे प्रत्येक ऋतुचक्रात बदलणार हिमालयाच निसर्ग सौंदर्य त्यान अवलोकन केलं हे सौंदर्य आपल्या कॅमेऱ्यात बद्ध केल जसा तो निष्णात डॉक्टर आहे, तसाच तो प्रतिभावत छायाचित्रकारही आहे त्यांनी काढलेली छायाचित्रे व पारदर्शिका पाहून त्याची साक्ष पटते

लाहूल स्पिता व्हलात डाक्टर आधक भटकल आहेत. तरी येथल्या निसर्गात आगळ्यावेगळ्या सौंदर्याचा अविष्कार आहे येथे प्रामुख्याने बौद्धधर्मियाची वस्ती आहे, जगातील दुसऱ्या क्रमाकाचा बौद्ध मठ इथ आहे. या बौद्ध गुफेत एक हजार वर्षापूर्वीची अतिशय सुदर चित्रे रेखाटलेली आहेत. डॉक्टराच्या कॅमेऱ्याने ही सुदर चित्रे टिपलेली आहेत बारालाचा, सियारनाला, चन्द्रताल ही लाहूल मधील सौंदर्यस्थळे पहाताना डॉक्टराचं देहभान हरपून गेल स्पितीतली किब्बर, डगर, मनी, ताबो या परिसरात फिरताना तर ते मत्रमुग्ध झाले

एकदा मत्रमुग्ध अवस्थेत ते पुढ जात राहिले. १६ हजार फुटावर पोहचले. प्राणवायूच्याअभावी त्याच्या मनाचा गोंधळ उडाला कोठून आलो व कोठे जायचे काहीच कळेना. भ्रमिष्ट झाल्यासारखी त्याची अवस्था झाली दोन तीन तास ते एकाच जागी शांतपणे बसून राहिले. त्यावेळी त्याच्या मेंदूतला गोंधळ थाबला त्याना खाली येण्यासाठी रस्ता सापडला भटकतीत आलेले असे अनेक प्रसग त्यानी सागितले

"मनालीच्या लेडी वेलिग्डन हॉस्पिटलमध्ये १६ / १७ तास काम कराव लागल्यान शरीर मन थकून जात अशावेळी सुट्टी काढून मी निसर्गाकडं धाव घेतो. हिमालयातल्या देवदार, कायल, पाईन आक्रोड या वृक्षानी व फुलानी मला खूप काही दिल जगली बकऱ्या, अस्वले, कोल्हे व मोनॉल सारख्या सुदर प्राणी पक्ष्यानी माझ्या मनाला उभारी दिली आनद व प्रसन्नता दिली निसर्गाचा सहवास

लाभला नसता तर अतिश्रम व मनावरील ताण यामुळ मी कोसळून पडलो असतो हिवाळ्यात मनालीच्या दऱ्याखोऱ्यात बर्फाच्या पाढऱ्याशुभ्र गालीच्यावरून मी मनसोक्त भटकलो उन्हाळ्यात फुललेल्या निसर्गाच्या सहवासात, कित्येक क्षण घालवले सतलज, बियास, पार्वती या नद्याच संगीत मला ऐकायला मिळाल हिवाळ्याला सामोरं जाण्यासाठी तयारी करीत असलेला विविधरंगी सुदर निसर्ग मी पाहिला माझ्या डॉक्टरी व्यवसायातील, जीवनात निसर्ग हा मला जीवाभावाचा मित्र वाटतो तो माझ्या जीवनातील प्रेरणास्थान आहे" आपल्या पारदर्शिका दाखवून त्यानी कुलू मनालीच्या बहारदार निसर्गाच दर्शन आम्हास घडवल कुलू मनालीचा निसर्ग श्रीमंत आहे या श्रीमती निसर्गात राहणारे लोक मात्र दारिद्र्य आणि अज्ञानाच्या अधारात खितपत पडले आहेत. डॉक्टरांनी निसर्गाबरोबरच येथील मानवी जीवनाचाही अभ्यास केला त्यावेळी हे लोक सुधारायला तयार नाहीत आपल चालचलन ते बदलू इच्छित नाहीत उद्याची काळजी ते करीत नाहीत "ठेविले अनते तैसेचि रहावे" अशी त्याची वृत्ती आहे, असे त्याना वाटले. असो

मनीकरणच्या पुढे चढाईच्या रस्त्याने पायी गेल्यावर उचीवर वसलेल मलाना नावाचं गाव आहे या गावाबद्दल सागताना डॉ वर्गीस म्हणतात,

"या परिसरात वसलेल हे एकमेव गाव आहे. कधीकाळी ते स्वतत्र राष्ट्र होत आपली संस्कृती वेगळी आणि श्रेष्ठ मानतात जवळ जवळ एक हजार लोकाची वस्ती या गावात आहे त्याची भाषा वेगळी आहे त्यात कुलू स्पिती व फिनगेट भाषेतील काही शब्द आहेत हे लोक मुळ - कोणत्या वशाचे आहेत. ते कुठून आले याची काही माहिती नाही इतराना ते आपल्याजवळ येऊ देत नाहीत घरात व मंदिराजवळही फिरकू देत नाहीत स्पर्श करीत नाहीत पाणी मागितले तर भाडे खाली ठेवतात एक शब्दानेही परकीय माणसाशी बोलत नाहीत गावाबाहेर मात्र बोलतात हे लोक अतिशय अस्वच्छ राहतात पोट, छाती, व हाडाच्या क्षयाच प्रमाण या लोकात मोठ्या प्रमाणात आहे बहुतेक लोक मनालीला येऊन परदेशीय पर्यटकाना चरस विकण्याचा व्यवसाय करतात या गावात एक सरकारी आयुर्वेदिक डिस्पेन्सरी आहे परतु औषधे नसल्यान ती कायम बद असते येथील सरकारी शाळाही बद असते गावातली मुलगी बाहेर दिली जाते, परतु बाहेरच्या मुलीशी गावच्या मुलाचा विवाह करीत नाहीत गावातल्याच मुलीशी लग्न करण्याचे बधन प्रत्येक कुटुब पाळते मुलगा मुलीच्या घरी जाऊन मुलगी पसत करतो तिला घरी घेऊन येतो. सपूर्ण गावाला दारू पाजतो. एवढाच विवाहाचा उपचार."

पश्चिम हिमालयातील कुलू, मलाना, डुगरी व लाहुली जमातीत बहुपत्नीकत्वाची

पद्धत होती एकजण अनेक बायका करीत अथवा एक स्त्री कुटुबातल्या साऱ्या भावाशी समागम देई. ही पांडवकालीन विवाह पद्धतीही होती. परंतु आता या प्रथा बंद झाल्या आहेत लाहुल स्पिती व्हॅलीत प्रत्येक कुटुबातील थोरल्या मुलाला स्थावर मिळकतीचा वारसा मिळतो. फक्त त्याचाच विवाह होतो त्याच्या पाठचे सारे भाऊ बौद्ध लामा बनतात. मर्यादित शेतजमिनीचे वाटणीत तुकडे होऊ नयेत यासाठी ही पद्धत अवलबिली गेली आहे

कमी वयातच इथ मुलींची लग्ने लावली जातात मुलगी २२ वर्षाची असतानाच २ / ४ मुलाची आई बनलेली असते. वयाच्या ३० /-३५ व्या वर्षी ती आजी बनते. लहान वयात विवाह, तसेच कुटुबातली अतिकष्टाची कामे केल्याने ३५ / ४० व्या वयातच या भागातल्या महिला ६० / ६५ वयाच्या वृद्धा दिसू लागतात कमरेचे विकार त्याना होतात.''

डॉक्टर सागत होते, मी ऐकत होतो आपल्या स्लाईडसद्वारा व निवेदनातून त्यानी मला लाहुल स्पिती व्हॅली, मलाना व सपूर्ण पश्चिम हिमालय फिरवून आणल. शेवटी ते मनालीकडे वळले मनालीच्या वाढत्या पर्यटनाबद्दल बोलताना ते म्हणाले, ''मनालीच टूरिझम अक्राळ विक्राळ राक्षसासारख फोफावत आहे मनालीत आज १६० च्या वर हॉटेल्स उभी राहिली आहेत त्यामुळे मनालीच्या निसर्गावर आघात होऊ लागला आहे त्याचा पर्यावरणावर वाईट परिणाम होतो आहे वाढत्या पर्यटकासाठी हॉटेल्समध्ये सारखी भर पडत आहे फिल्टर वॉटर सप्लाय स्कीम अपुरी पडू लागली आहे शुद्ध पाण्याच्या पुरवठा करण्यात ती असमर्थ ठरली आहे पाण्याअभावी अनेक हॉटेल्स बंद पडली आहेत उघड्या गटारातून हॉटेल्सचे साडपाणी, सडासचा मैला बियास नदीत सोडला जातो. त्यामुळे घाण वाढली आहे माशा वाढल्या आहेत लोक अशुद्ध पाणी पितात पर्यटकांबरोबरच स्थानिक लोकाच आरोग्यही धोक्यात आल आहे १९९० साली मनालीत ७० टॉयफाईडच्या केसेस झाल्या काश्मीरचे व्यापारी व पर्यटक आता मनालीत गर्दी करू लागले आहेत त्यामुळे प्लॅस्टीक पिशव्या. इतर घाणीचे साम्राज्य सर्वत्र पसरू लागले आहे ६५०० फुट उचीवरन मनालीच सौंदर्य विद्रुप बनू लागल आहे, एखाद्या भागात पर्यटन केंद्र झाल, म्हणजे स्थानिक लोकाचा विकास होण्याऐवजी बाहेरच्या धनदाडग्याचा अधिक विकास होतो ही आपली खास पर्यटन सस्कृती आहे त्याला मनाली अपवाद नाही स्थानिक माणसाच्या जमिनीवर उभी राहिलेली हॉटेल्स दिल्ली, मुबई व कलकत्त्याच्या सेठ सावकाराची आहेत. याशिवाय इतर व्यवसाय बाहेरील लोकाच्या हातात आहे. स्थानिक लोकांच्या नशिबी हमालीशिवाय दुसरा व्यवसाय नसतो कारण त्याना पर्यटन नितीत काही स्थान

नसत. मनालीत तिबेटी लोक स्वेटर विकतात कुलू लोकाच्या सफरचंदाच्या बागा आहेत लाहुली लोक छोटा मोठा व्यवसाय करतात नेपाळी व स्थानिक गरीब हमाली व रस्त्याच्या कामावर असतात आता काश्मीरी लोक मनालीत व्यापारासाठी मोठ्या प्रमाणात येऊ लागले आहेत. २५ टक्के लोकाची आर्थिक स्थिती चागली आहे ७५ टक्के लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहेत पर्यटक येथील निसर्ग वैभव पाहण्यासाठी येतात परतु स्थानिक लोकाची काय हालत आहे ? ते कसे जगतात ? या प्रश्नाकडे कुणी पहात नाही स्थानिक लोकाच दारिद्रय कुणाला दिसत नाही पर्यटन केंद्र म्हणून मनालीचा विकास झाला, परतु स्थानिक माणसाचा व आसपासच्या खेड्याचा विकास झाला नाही मनाली पासून दोन किलोमीटरवरील खेड्यात पिण्यास शुद्ध पाणी नाही शाळा नाही आरोग्य केंद्र नाही. खेड्यापाड्यांना जोडणारे रस्ते नाहीत पाऊल वाटेवरून डोंगरकडे चढून लोकाना ये - जा करावी लागते कडे कोसळून कित्येक जण मृत्यू पावतात नदी ओलाडण्यासाठी छोटे छोटे पूल नाहीत तारेला लोंबकळून गिर्यारोहकासारखी कसरत करत नदी ओलाडावी लागते. पोटात कळा सुरू झालेल्या अनेक गर्भवती स्त्रिया मनालीला डॉक्टराच्या हॉस्पिटलमध्ये या तारेवरून कसरत करत अनेकवेळा आलेल्या आहेत तब्येत खालावलेले अनेक जण हॉस्पिटलकडे येता येता रस्त्यातच मृत्यू पावतात अशी स्थिती आहे.

मनालीत येणाऱ्या आधुनिक श्रीमत पर्यटकासाठी साऱ्या सुखसोयी करण्यात आल्या आहेत. टी व्ही आहे, तसेच आता व्हिडिओ दाखविण्याच्या छोट्या छोट्या मिनी चित्रपट गृहाचा मनालीत सुळसुळाट झाला आहे त्याच आकर्षण स्थानिक तरुणाना व लहान मुलाना वाटण साहजिक आहे घाणेरडे चित्रपट दाखविण्यात येतात त्यामुळे स्थानिक सस्कृतीवर त्याचा वाईट परिणाम होऊ लागला आहे पर्यटन सस्कृतीमुळे विविध व्यसने येथल्या तरुण पिढीला जडू लागली आहेत ती भागविण्यासाठी ते चोऱ्या करू लागले आहेत. काहीजण परदेशी पर्यटकाना चरस विकण्याचा व्यवसाय करतात पर्यटकाना चहात झोपेच औषध पाजून त्याच साहित्य लुटण्यापर्यंत काही तरुणांची मजल गेली आहे जुआरी आणि दारू यात स्थानिक तरुण बुडू लागला आहे हा सारा परिणाम घाणेरड्या व विकृती जोपासणाऱ्या चित्रपटांचा आहे.

मोठी माणस सुधारायला तयार नाहीत तरुण पिढी बिघडत चालली आहे. अशा अवस्थेत लहान मुलाना शिक्षण देऊन सुसस्कृत करण्याच कार्य डॉ. वर्गीसनी हाती घेतलं आहे त्यासाठी मनालीत एक शाळा १९८५ साली त्यानी सुरू केली आहे. प्रारभी ९ मुले शाळेत आली. आता मुलांची सख्या २०० चे वर पोहोचली

आल नदा आदिशक्तीचेच एक रूप होय त्या काळात असुराचे प्राबल्य वाढले होते. मृत्यू, पाताळ व स्वर्ग या तिन्ही जगातील लोकाना त्यांनी त्राही भगवान करून सोडले होते शिव आणि शक्ती एकरूप झाल्याशिवाय असुराचे निर्दालन होणार नव्हते म्हणून नदा उपवर झाल्यावर देवदेवता व ऋषीगण हिमालयाकडे गेले नदाचा विवाह भगवान शकराशी करावा अशी प्रार्थना त्यानी हिमालयापाशी केली हिमालयाने त्याच्या प्रार्थनेचा स्वीकार केला त्यानुसार हिमालय कन्या नदा आणि कैलासपती श्री शिवशकर याचा विवाह थाटात संपन्न झाला. भारद्वाज ऋषीने कन्यादान केले या नववधूला पतीबरोबर सासरी पाठवण्याचा प्रसग आला, त्यावेळी पिता हिमालय रडू लागला माता मैना सैरभैर झाली हिमालयाच्या या रूपगुणसपन्न बेटीवर देवदेवता, ऋषीमुनी, प्रजानन, वृक्षवेली, वन्यप्राणी याचे तिच्या बालपणापासून मनस्वी प्रेम होते तिचा विरह क्षणभरही कुणाला सहन होण्यासारखा नव्हता आता तर ती कायमची पतीगृही निघाली होती या कायमच्या ताटातुटीमुळे सर्वाच्या डोळ्यातून अश्रूचा महापूर वाहू लागला बेटी नदाची तर मोठी शोचनीय अवस्था झाली माहेरच्या प्रेमाची सावली सोडून जाणे - तिच्या जीवावर आले स्फुदून स्फुदून ती रडू लागली. ज्या माहेरातील प्रत्येक निर्जीव आणि सजीव वस्तूशी आपल जिव्हाळ्याच नात जडल होत काही क्षणापूर्वी जे माहेर आपल होत, ते सर्व सोडून जाताना नदाच्या काळजाचा ठोका चुकत होता ज्या वृक्षाच्या खाद्यावर ती बालपणी खेळली, त्या देवदारवृक्षाना ती मिठ्या मारू लागली ज्या कस्तुरीमृगाबरोबर ती बागडली होती, त्या कस्तुरीमृगाना कवटाळू लागली

कन्या कितीही प्रिय असली तरी तिला आपल्या पतीगृही जावेच लागते यानुसार छातीवर दगड ठेवून नदा भगवान शकराबरोबर कैलासची वाट चालू लागली मातापिता ऋषीमुनि, देवदेवता, माहेरातील तिचे सगेसोयरे, तिच्या प्रिय मैत्रिणी व इतर प्रजा तिच्या बरोबर चालू लागल्या शिवगण पुढे जाऊन कैलास पर्वतात जाण्याचा मार्ग तयार करीत होते डोंगर दऱ्यातून चढ उतार करीत नदाची वरात पुढे वाटचाल करीत चालली होती रस्त्यात हिमालयाच्या राज्यातील पहाडी लोक आपल्या या प्रिय बेटीला येऊन भेटत अश्रूचा अभिषेक तिच्या पदकमलावर करीत नदासाठी भेटी आणत आणि वराती बरोबर पुढे चालू लागत. आपल्या प्रिय माहेराकडे मागे वळून ती पुन्हा पुन्हा पहात होती ते दृष्टिआड झाल्यावर तिच्या कमलनयनातून सतत अश्रूमोती टपकू लागले माहेराकडून सासरी निघालेली ही काव्यमय व करुणामय यात्रा बरेच अतर चालून आली परतु नदाला सोडून कुणीही परतायला तयार होईना.

एका अवघड चढावर नदाला तहान लागली परतु आसपास कुठेही पाण्याचा झरा नव्हता श्री शकरानी खडकावर जमिनीवर त्रिशूल मारला तिथे जमिनीतून पाण्याची धार वर आली. क्षणार्धात तिथे जलकुड तयार झाले खाली वाकून नदा या पारदर्शी जलकुडातील पाणी प्याली त्याच वेळी शकराबरोबर कुणीतरी स्त्री असल्याचे प्रतिबिंब तिला कुडातील पाण्यात दिसले स्त्रीसुलभ स्वभावानुसार ती शकरावर रागावली आपल्या पतीने दुसऱ्याचा कुणा स्त्रीवर प्रेम आहे या भावनेने नदा रूसली यावर भगवान शकर तिला म्हणाले

''नदा तू फार भोळीभाबडी आहेस पाण्यात पडलेले प्रतिबिंब हे तर तुझेच रूप होय तुझ्यापासून मी कधीच अलग नाही शिव आणि शक्ती सदैव एकरुप आहे चिरतन काळापर्यंत आपण एकरुप राहणार आहोत शका असलीच तर जवळ ये माझ्यात एकरुप होऊन जा '' नदाचा भ्रम दूर झाला लाजत लाजत ती शिवाजवळ गेली तिची काया शहारली ती शिवाशी एकरुप झाली तेव्हापासून श्रीशकराला अर्धनारीनटेश्वर असे लोक म्हणू लागले ज्या जलकुडात नंदाने आपले रूप प्रथमच पाहिले त्या कुडाला रुपकुड असे नाव पडले

या रुपकुडावरून नदाच्या माहेरवासियानी परत जाव अशी शकराची अपेक्षा होती हे लोक नदाच्या प्रेमापोटी कोठपर्यंत चालत येणार ? असा प्रश्न त्याना पडला त्यानी मागे परताव अस सागणही त्याना योग्य वाटेना रुपकुडापासून तरी ते परततील अस त्याना वाटल होत ते रुपकुडापासून पुढे चालू लागले त्याच्या मागे नदा, त्यानतर इतर लोक चालत होते रुपकुडावरुन खाली उतरून सर्वजण होमकुडाजवळ आले प्रिय नदाला क्षणभरही दृष्टीआड करायला लोक तयार नव्हते होमकुडापासून कैलासापर्यंतचा मार्ग अतिशय दुर्गम या मार्गावरील उच कडे, आणि शिखरे उल्लघून जाणे सामान्य माणसाला अशक्यप्राय होते लोक तर नदाला सोडायला तयार नव्हते भगवान शकरापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले शेवटी त्याना राहवले नाही ते समजूतीच्या स्वरात म्हणाले

''नदा ही आदिशक्ती आहे जगाच्या उत्पत्तीचे कारण ती आहे नदा ही सृष्टीतील सर्वोच्च शक्ती आहे जगातील सर्व प्राणीमात्रात ती सदैव निवास करून आहे ती माझ्यात आहे तशी तुमच्यात आहे जगाला विनाशाकडे नेणाऱ्या पापी असुरी प्रवृत्तींचे निर्मूलन करण्यासाठी तिने स्त्री शरीररुप धारण केले आहे जगाचे कल्याण हे तिचे ध्येय आहे ''

असे सागून नदाच्या माहेरवासीयाना त्याना परतण्याची विनती केली भगवान शकराच्या या बोलण्यावर सर्वांनी मौन पाळले डोळ्यातील अश्रूच्या रूपान त्यानी आपल्या भावना व्यक्त केला नदा ही आपले मातापिता आणि सख्याच्या गळ्यात

पडून अश्रू गाळत होती. माहेरचा विरह तिलाही दाहक वाटत होता भगवान शिव लोकाना पुन्हा पुन्हा परतण्याची विनती करीत होते. परतु अश्रूच्या रूपात त्याना त्यांच्या विनतीचे उत्तर मिळत होते या लोकाना कसं समजून सागाव ते त्याना समजेना या कारुण्यमय दृश्याचे ते गहिवरून गेले शेवटी ते भारावलेल्या सद्गदीत आवाजात म्हणाले

''हा सपूर्ण भूभाग या पुढे नदाच्या नावान ओळखला जाईल डावीकडील सर्वोच्च शिखराच नाव नदादेवी राहील त्या शेजारच दुसर शिखर नदाकोट (नदाचे घर) व तिसर शिखर नदाखाट (नदाची शेज) म्हणून ओळखल जाईल त्याच्या शेजारी माझा त्रिशूल आहे त्यावर आमचा निवास राहील. त्या निवास स्थानाला नदाघुघुटी असे सबोधले जाईल. त्रिशूल आणि नदाघुघुटीमधून निघालेली जलधार नदाकिनी या नावान प्रख्यात होईल या देव भूमीतील पर्वतशिखरे व जलधारेच्या रुपाने नदा तुम्हाला भेटेल कृपया आता तुम्ही आपआपल्या घरी जा ''

शकराच्या या निवेदनावर प्रत्येकाच्या डोळ्यातून पुन्हा अश्रूचा महापूर सुरू झाला नदाचे डोळे तर सातत्याने पाझरत होते नदाला सोडून जाणे लोकाना पाण्याबाहेरील मासळीसारखे वाटत होते त्यामुळे कुणाचही तनमन परतायला तयार नव्हत भगवान शकराची मोठी चमत्कारिक अवस्था झाली

शेवटी आपल्या त्रिशूलाने त्यानी एका दगडावर श्रीयत्र कोरले अत्यत हृदयस्पर्शी शब्दात ते उच्चारले .

''नदादेवीच्या परम भक्तानो, नदावरील तुमच्या निरागस, उत्कट प्रेमाने मी भारावलो आहे नदा व तुमची भेट व्हावी या उद्देशाने मी हे श्रीयत्र येथे कोरले आहे. या श्रीयत्रात नदाच सदैव अस्तित्व असेल या यत्राची पूजा करताच नदा भेटल्याचा साक्षात्कार तुम्हास होईल. आज भाद्रपद अष्टमी आहे. या अष्टमीला पुढे नदाष्टमी म्हणून ओळखले जाईल या दिवशी जे भक्त येथे येऊन श्रीयत्राची पूजा व जप करतील त्याची नदाच्या विरहाची जाणीव नष्ट होऊन त्याना नदाभेटीचा आनद लाभेल या परिसरात फिरल्यावर तुम्हास जागोजागी नंदाच्या अस्तित्वाची जाणीव होईल म्हणून हा भाग घुमकी या नावान ओळखला जाईल माझे निवासस्थान व नदाचे सासर कैलास शिखर मानवापासून सदैव अस्पर्श राहणार आहे तिथे कुणाही मानवाला पोहचता येणार नाही नदाला ज्यावेळी माहेराची आठवण येईल त्यावेळी ती तुमच्याकडे येईल आता तुम्ही नंदाला शुभाशिर्वाद देवून परतण्यातच तुमचे कल्याण आहे ''

भगवान शकराच्या मुखातून बाहेर पडलेल्या या शब्दानी सर्वांचे समाधान झाले नंदाची कैलासाकडे पाठवणी करून सर्वजण आपआपल्या गावी परतले

या प्रसगापासून हिमालयाची प्रिय कन्या नदास माहेरावरून सासरी पाठविण्याची स्मृती म्हणून आणि नदाबेटीला भेटल्याचा आनद मिळावा, यासाठी भाद्रपदातील नदाष्टमीला लोक खडतर मार्गावरून चालत होमकुडाची यात्रा करू लागले तेथील श्रीयत्राची पुजा करू लागले सातव्या शतकातील गढवालचा राजा भानुप्रताप याने नदादेवीचा आपल्या राज्याची कुलदेवता म्हणून स्वीकार केला तो दरवर्षी होमकुडापर्यंत चालत जाऊन श्रीयत्राची समत्र पूजा लागला जप करू लागला या श्रीयत्राच्या प्रभावाने तो अपार सिद्धीचा स्वामी बनला. तो इच्छिल तसे घडायला लागले लोक बोलता बदरीनाथ असे त्याला म्हणू लागले

दरवर्षी गढवाल राज्यातील लोक रुपकुडमार्गे होमकुडाची यात्रा मोठ्या उत्साहात करु लागले प्रसगी हिमवादळात सापडून रुपकुडाजवळ अनेक लोक मृत्युमुखी पडत. एक दिवस नदादेवी राजा भानूप्रतापच्या स्वप्नात गेली राजाला ती म्हणाली, ''निसर्गदेवतेच्या अवकृपेमुळे माझ्या माहेरवासियाना खूप त्रास सहन करावा लागतो त्याना मृत्यूला सामोरे जावे लागते त्यामुळे मला अतिशय दु.ख होते यापुढे मला ज्यावेळी माहेराचे स्मरण होईल त्यावेळी मी माहेराला येईल भगवान शिवाशी एकरुप होऊन मी शिवशक्ती झाले आहे मला सदेह माहेरी येता यायचे नाही माहेराची आठवण येताच तुझ्या राज्यात मी चारसिगाच्या मेंढ्याच्या रुपात जन्म घेईन चारसिगे ही माझ्या ओळखीची निशाणी काही दिवस माहेरपणाचे सुख भोगीन मग तुम्ही कैलासला माझी पाठवणी करा. श्रीयत्रापर्यत मला पोहचवण्यासाठी या यापुढे दरवर्षी माझ्या भेटीसाठी होमकुडापर्यंत येण्याची गरज नाही मनाला आणि देहाला क्लेष देण्याची जरुरी नाही.

नदादेवीच्या या दृष्टातामुळे दरवर्षी निघणारी नदादेवीची यात्रा बद झाली तरी काही थोडे लोक नदाष्टमीला होमकुडापर्यंत जाऊन श्रीयत्राची पूजा करतात बहुसख्य लोक आपआपल्या गावातच नदाची पूजा करतात दुर्गासप्तशती व शतचडीचा पाठ लावतात नदा भगवतीची नवरात्र मोठ्या उत्साहात साजरी करतात

नदाच्या दृष्टातानुसार नदाला माहेराची आठवण होऊ लागली की दर बारा वर्षानि चारसिंगवाल्या मेंढ्याच्या रुपात तिच्या माहेराच्या परिसरात ती जन्म घेऊ लागली मेंढ्याच रूप घेऊन माहेरात आलेल्या नदाला रोज पाच पक्वान्ने भरविली जातात त्याची कुटुबातील बालकाप्रमाणे काळजी घेतली जाते गोकुळातल्या बालकृष्णाप्रमाणे त्याची जोपासना करण्यात येते तो एक वर्षाचा होताच या मेंढारुपी नदाची तिच्या सासरकडे भाद्रपदातील नदाष्टमीला पाठवणी होते नौटी या तिच्या जन्मगावापासून ही यात्रा सुरू होते येथे नदाच्या नावाच्या नौबती वाजतात म्हणून या गावाला नौटी नाव पडले पूर्वी ही यात्रा नदाजात यात्रा म्हणून ओळखली

जाई जात म्हणजे मेंढा कालातराने भानुप्रताप राजाच्या निमत्रणावरून गढवाल, कुमॉऊ मधील सर्व राजे या यात्रेत उत्सहाने सहभागी होऊ लागले ही यात्रा मध्य हिमालयातील अत्यत पवित्र यात्रा समजली जाऊ लागली तिला राजमान्यता मिळाली यात्रेचे नियोजन आणि खर्च राजाच्या वतीने होऊ लागला त्याकारणाने या यात्रेचे नदाराजयात्रा असे नाव पडले

दरम्यानच्या काळात बदरीनाथाच्या दृष्टातानुसार राजा भानुप्रतापाने आपल राज्य आणि कन्या धारमाळवा येथील राजकुमार कनकपाल यास दान केले वानप्रस्थाश्रम स्वीकारून तो अरण्यात गेला नदाला माहेराची आठवण कधी कधी अनेक वर्षाच्या कालावधीनतर यायची त्याचवेळी ती चारसिगाच्या मेंढ्याच्या रुपान जन्म घ्यायची .अरण्यातही राजा भानुप्रतापला नदाच स्मरण यायच. तिन दरवर्षी माहेराला याव, दरवर्षी ही आनदमयी यात्रा व्हावी, अस वाटायच दरवर्षी आपण तिला निमत्रित करीत नाही म्हणूनच प्रत्येक वर्षी ती माहेराला येत नाही म्हणून राजा भानुप्रताप आपला धाकटा भाऊ कासुवा याच्या स्वप्नात गेला 'नौटीच्या नदामदिरात दरवर्षी वसतपचमीला जाऊन नदास माहेराचे निमत्रण देत जा' असे भावास सागितले त्यानुसार कासुवा दरवर्षी वसतपचमीला नौटीस जाऊन नदाची प्रार्थना करू लागला नदास माहेरी येण्याच निमंत्रण देऊ लागला कालातराने राजाचे भावाचे नावावरून त्या गावाचे नावही कासुवा पडले आज ही कासुवाचे राजवशीय प्रत्येक वर्षी प्रार्थनेच्या रूपात नदास माहेराच निमत्रण देतात

परतु दरवर्षी निमत्रित करूनही ज्यावेळी नदाची माहेराची स्मृती जागृत होई, त्याचवेळी चौसिगी मेंढ्याच्या रुपान ती माहेराला येऊ लागली यावेळी बारा वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनतर तिला माहेराची आठवण झाली त्याप्रमाणे गढवालच्या सीमेत चारसिंगाच्या मेंढ्याने जन्म घेतला वर्षभर त्याला तळहातावरील फोडासारखे साभाळण्यात आले सकस आहार भरवून त्याला धष्टपुष्ट करण्यात आले माहेरपणाला आलेल्या मुलीसारखे त्याला प्रेमाने साभाळण्यात आले मेंढारूप घेऊन आलेल्या नदाने वर्षभर माहेराच सुख भोगल १९८७ सालच्या ऑगस्ट महिन्यात नदाला सासरी पाठविण्याची नदाराजजात यात्रा मोठ्या उत्साहात पार पडली

या यात्रेच्या प्रथम दिनी कासुवा गावच्या राजवशीयानी चारसिगवाल्या कृष्णवर्णीय मेंढ्यास नौटीस आणले नौटी गावचे राजपुरोहित नौटियाल यानी मेंढ्याचे पूजन केले नदामदिरातील नदाच्या सुवर्णमूर्तीची यथाशक्ती पूजा करण्यात आली. नदाचे भाऊ समजल्या जाणाऱ्या भानुप्रताप राजाच्या वशातील लोकानी नदास गगाजलाने अभिषेक केला मेंढ्यास व सुवर्णमूर्तीस सुवर्णालकार व उची

वस्त्रानी सजविण्यात आले नदासाठी फळफळावळ, इतर मिठाई, खाद्यपदार्थ डोलीत भरण्यात आले यात्रेत सहभागी होण्यासाठी गढवाल, कुमॉऊमधील श्रद्धाळू यात्रीगण, सतसाधु मोठ्या सख्येने जमले होते. त्यात काही परदेशी नागरिकही होते या अलौकिक यात्रेसाठी उत्तरप्रदेश सरकारने सर्व प्रकारचे सहकार्य केले होते

हिमालयाच्या प्रिय कन्येस सासरी पाठविण्याची सर्व तयारी झाली सजवलेली रगीबेरगी छत्रचामरे गोळा झाली पारपरिक गढवाली वाद्ये वाजू लागली नौबती झडू लागल्या त्या निनादात मगळवार ता १८ ऑगस्ट १९८७ रोजी या ऐतिहासिक अद्भूत यात्रेच्या प्रस्थानास शुभारभ झाला वाजत गाजत नदादेवाची डोली इडावधाणीला पोहोचली या स्थळी एका युवतीच्या शरीरात नदाचा आत्मा प्रवेशला प्रत्येकाच्या गळ्यात पडून ही युवती रडली येथील रात्र नदावरील लोकगीते गाऊन जागवली गेली

१९ ऑगस्टला यात्रा पुन्हा नौटीला आली रात्रभर नदागीते गाऊन नदाच्या स्मृती आळवल्या गेल्या गीतात नदा सासरी जाताना जस जसे प्रसग साकारू लागले त्याप्रमाणे सुदर गढवाली तरुणी नृत्य करू लागल्या त्याच्या चेहऱ्यावर सासरी जाणाऱ्या कन्येचे भाव निर्माण झाले २० ऑगस्टला यात्रेने नौटी गावचा निरोप घेतला त्यावेळी युवतींनी एकमेकाना आलिगून आसवे ढाळण्यास प्रारभ केला अतिशय कारुण्यमय दृश्य निर्माण झाले या दृश्याने यात्रिकाचेही डोळे पाणावले यात्रा कासुवा गावात आली. महादेव घाटावर व चादपूर गढीत नदाची पूजा करण्यात आली २१ ऑगस्टला यात्रा सेमला पोहचली भर पावसात पाऊल वाटेवरील दगडधोंड्यातून यात्रिगण चालत होते या परिसरातील निसर्ग दर्शनाने सुखावत होते श्रम विसरून अढळ श्रद्धेने पुढे पुढे चालत होते रात्री सेमला गेरोली, चुलाकोट, चगोल गावचे यात्रिक रगीत छत्र्यासह यात्रेला येऊन मिळाले

२२ ऑगस्टला यात्रा सेमवरून निघाली मेंढ्याच्या मागे मागे चालत ती कोटी गावात प्रवेशली कोटीमध्ये कोटीचा लाटु (भाऊ) व भगोलीचा लाटू नदा भेटीस येतात यात्रेत त्याची निशाणे अग्रभागी राहतात येथे केदारु, रतुश, खडुडा या छोट्या छोट्या गावचे नदाभक्त भेटी घेऊन छत्रचामरासह यात्रेत सहभागी होतात

कोटी गावच्या मार्गात धारकोट व सिमतोली घाट येथून नदाचे नौटी माहेर दृष्टीआड होते येथून नदा पुन्हा पुन्हा मागे वळून आपल्या माहेराकडे डोळे लावून बसते पुढे जाण्याचे नाकारते त्यावेळी गीतातून तिला उपदेश करण्यात येतो कोटी प्रयत्नानतर ती उठून पुढे चालू लागते म्हणून या ठिकाणचे नाव कोटी

पडले आपल्या माहेरातील मातृभूमीचे अखेरचे दर्शन घेऊन ती कोटीस पोहोचते तिच्या सात्वनासाठी रात्री लोकगीते गायली जातात. नदाच्या आत्म्यास नाचवले जाते

काटावरून सकाळी नदापूजन करून यात्रा निघाली दुपारी हातोडाच्या शिवारात पोहचली येथे देवाच्या पैलवानाच्या कुस्त्या झाल्या रस्त्यात बम्याला, कैडवाल या गावच्या पूजा स्वीकारून सायकाळी ती भगोलीच्या मदिरात विश्रातीसाठी आली भगोलीस मुक्काम करून यात्रा सकाळी गुलसारीला जायला निघाली भगोलीच्या पुढे क्यूर, चादपूर व गधेरा या छोट्या नदीच्या अलिकडचा भाग नदाच्या माह चीं हद्द समजला जातो गधेरानदीच्या पलीकडे वधान पारुवालपासून तिच्या सासरची हद्द सुरू होते गधेरा नदी ओलाडून सासरच्या हद्दीत पाऊल टाकताना नंदाचे हृदय भरून येते तिचे डोळे वाहू लागतात. नदाचा आत्मा सचारलेली युवती येथे कमालीचा शोक व्यक्त करते तिचे हृदयस्पदन पाहून यात्रेकरूच्या हृदयालाही पाझर फुटतो यावेळी आकाशातून जलधारा कोसळत होत्या. त्या नदाच्या शोकाने व्यथित झालेल्या आभाळाच्या अश्रूधाराच वाटल्या हा हृदयस्पर्शी प्रसग पाहून समोरचा देवदारही गप्प झालेला दिसला येथे प्रार्थना आणि लोकगीते गाऊन नदाचे सात्वन करण्यात येते दु.खद अत·करणाने नदा गधेर नदी ओलाडते आपल्या सासरच्या भमीवरून चालत [illegible] यात्रा कुलसारीला पोहोचते अमावस्येच्या रात्री जमिनीत गाडलेले कालीयत्र बाहेर काढण्यात येते नदाची व कालीयत्राची स्पर्श भेट घडवली जाते उत्तररात्री कालीयत्र पुन्हा जमिनीत पुरले जाते

२५ ऑगस्टला ही नदाराजजात यात्रा चेपडियू या गावात पोहोचली बुटोला थोकदार या पहाडी जमातीच हे छोटस गाव पारपरिक वाद्ये वाजवून हे लोक नदाच स्वागत करतात कुलसारीपासून धरालीपर्यंतचे हिमालयातील दऱ्याखोऱ्यातले गरीब गढवाली येथे येऊन श्रद्धापूर्वक नदाचे पूजन करतात यथाशक्ती भेटी देऊन तिचा निरोप घेतात २६ ऑगस्टला चेपडियूवरून यात्रा फलदिया गावाकडे वाटचाल करते मार्गात नंदकेसरी नावाचे ठिकाण लागते येथे कुरुडची नदा भेटण्यास येते तसेच चारसिगाच्या बकऱ्यास येथे प्रसाद चढविला जातो

नदकेसरी या ठिकाणी अष्टभुजाधारी होऊन नदाने मधुकैटभ राक्षसाचा वध केला अशी कथा आहे म्हणून या स्थळाला पवित्र मानले जाते हिमालयातील कुमाँऊ भागातील खेड्यापाड्यातले, डोंगरदऱ्यातले लोक येथे येऊन यात्रेत सामील होतात यात्रा जसजशी पुढे जाऊ लागते तसतशी नदीच्या प्रवाहासारखे विशाल

रूप धारण करते फलदिया गावच्या मीधधार मदिरात देवीचा मुक्काम होतो या मदिर स्थळी नदाने चडिकेचे रूप धारण करून तिलवा राक्षसास शस्त्राने फाडून मारले, म्हणून या ठिकाणास तिलफाडा असे ही म्हणतात

२७ ऑगस्टला आम्ही यात्रेकरूनी फलदिया गावचा निरोप घेतला ११ किलोमीटर पदभ्रमण करीत सायकाळी यात्रा मुदोलीला (उची २१३४ मीटर) पोहोचली येथे रात्रभर नदागीते गायली गेली मत्रजागरात सकाळी नदाची सवाद्य पुजा झाली देवीची भावपूर्ण आरती झाली या ठिकाणी नौटी ग्रामस्थाच्यावतीने प्रसाद शिजवण्यात आला तो सर्वांनी ग्रहण केला. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी सकाळ सध्याकाळ वेगवेगळ्या गावाच्यावतीने प्रसाद शिजवून वाटण्यात येतो. हा प्रसाद हेच १९ दिवस चालणाऱ्या या यात्रेतील यात्रेकरूचे दोन वेळचे भोजन होय

मुदोली गावाच्या पाठीवर लुहाजग नावाचा पर्वत आहे. या पर्वतावर देवादिकाना छळणाऱ्या रक्तबीज नावाच्या राक्षसाचे व नदादेवीचे घनघोर युद्ध झाले या युद्धात रक्तबीज देवीकडून मारला गेला म्हणून या पर्वताचे नाव लुहाजग पडले देवीच्या विजयाबद्दल यात्रेकरू येथे आनदोत्सव साजरा करतात

२७ ऑगस्टला चौसिगी मेंढ्यासह यात्रा १४ किलोमीटर अतर चालून वाण या गावी पोहचली २४३९ मीटर उचीवरील वाण हे मनुष्यवस्ती असलेले अतिम गाव होय पाऊलवाटेवरील हा १४ किलोमीटर मार्ग तसा दुर्गम आहे ठिकठिकाणी मोठेमोठे चढउतार आहेत गढवाली लोकगीते गातगात यात्रेकरू मेंढ्यामागे हे अतर अगदी लिलया चालून जातात २० / २५ सुदर घरे असलेल वाण हे अतिशय सुरम्य गाव होय दशमद्वार दशोली व अल्मोडा येथून निघालेल्या नदाच्या मूर्ती येथे भक्तगणासह येतात नदाची त्याची भेट होते तसेच गढवाल, कुमॉऊमधील असख्य गावचे ग्रामस्थ आपआपल्या देवदेवताना डोलीतून येथे नदास भेटविण्यासाठी घेऊन येतात अल्मोडातील कोटच्या गरुड तलवारीचे येथे विशेष प्रदर्शन झाले देवीने याच तलवारीने दैत्यांचा सहार केला अशी भाविकाची श्रद्धा आहे ही तलवार अल्मोड्याच्या नदामदिरात सुरक्षित ठेवण्यात आलेली आहे नदादेवीच्या सुवर्णमूर्तीस आणि चौसिग्या मेंढ्यास स्पर्श करून ही गरुड कट्यार व इतर देवता वाणवरून परत आपआपल्या गावी परततात

वाण गावात नदाचा चुलतभाऊ लाटूदेव याचे मदिर आहे हा लाटूदेव नेहमी कडीकुलपात बदिस्त असतो वाणचे गावकरी फक्त नदाराजजात यात्राप्रसगी मदिर उघडून त्याची पूजा करतात विवाह झाल्यावर नदा सासरी जात असताना या लाटूने नशापान करून गोंधळ घातला. म्हणून नदाने त्यास वाण गावात बदिस्त

करून ठेवले आहे तेव्हापासून पाषाणमूर्ती स्वरूपातला हा लाटूदेव कायम बंदिवानात असतो वाण गावात नदायात्रा आल्यावर त्यादिवशी त्याची मुक्तता होते नदाची व त्याची भेट घडवून आणल्यावर पुन्हा त्याला बंदिस्त करण्यात येते. बहिणीच्या सासरी पाठवणी प्रसंगी पाठीराखा म्हणून भाऊ असावा. या भावनेपोटी लाटूदेवाचे निशाण यात्रेत नेले जाते त्याला मेंढारुपी नदाच्या मागून चालण्याचा मान असतो इतर निशाणे त्याच्या मागे असतात वाणमध्ये नदाची विशेष पूजा बांधण्यात येते नदागीते आळविण्यात येतात

२९ ऑगस्टला यात्रा चढणीच्या रस्त्यावरून ९ किलोमीटर अंतरावरील गरोली पाताळ या ठिकाणी आली ३०४९ मीटर उंचीवर हे ठिकाण आहे वाणच्यापुढे स्त्रियांना यात्रेबरोबर येण्यास मनाई आहे येथून नदाला सासरला पोहोचवण्यासाठी आलेल्या सर्व स्त्रिया परत जातात मात्र एक परदेशी युरोपियन स्त्री याला अपवाद ठरली अखेरपर्यंत ती यात्रेबरोबर चालली

वाणच्या पुढे यात्रा मौन धारण करून चालते कोणतही वाद्य वाजवलं जात नाही गाणी म्हणली जात नाहीत चौसिंगी मेंढा या यात्रेच नेतृत्त्व करतो तो पुढे पुढे जात असतो यात्रा त्याच्या मागे मागे चालते मेंढ्याच्या मागे लाटूचे निशाण असते त्यामागे नदाचे माहेर नौटी गावची छत्री असते त्यामागे रिंगालची छत्री असते त्यानंतर इतर देवदेवताची छत्रचामरे, पालख्या असतात सर्वात शेवटी भूर्जपत्राची छत्री असते मेंढा जिथे उभा राहील तिथे यात्रा थांबते लोकवस्तीच्या अभावामुळे गरोली पाताळ येथे यात्रेकरूसाठी राहुट्या ठोकल्या जातात त्यात थंडीत कुडकुडत यात्रेकरू रात्र काढतात

भल्या पहाटे कैलगंगेत स्नान करून यात्रेकरू ११ किलोमीटरवरील पातरनचौनिया या ठिकाणाकडे वाटचाल करू लागली ३६५८ मीटर उंचीवरच हे ठिकाण गाठताना दमछाक होते दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर पातरनचौनियास सर्वजण सुखरुप पोहचले

नदाच्या सासरी पाठवणी प्रसंगावर गढवाली भाषेत अनेक लोकगीते रचण्यात आली आहेत या लोकगीतात नदाच्या विरहाचे करूणरसात भिजलेले, हृदयस्पर्शी वर्णन तर आहेच शिवाय अनेक कथा आणि आख्यायिका या गीतात गुंफण्यात आल्या आहेत पातरनचौनिया या स्थानासंबंधी अशीच एक कथा या लोकगीतात आहे वाण गावी गायल्या गेलेल्या लोकगीतातून ही कथा ऐकावयास मिळाली

१४ व्या शतकातील कनोजचा राजा यशधवल याची ती कथा होय या पवित्र नदाराजजात यात्रेत आपली गर्भवती राणी व सैन्यासह तो सहभागी झाला होता हरिद्वार हृषीकेश मार्गे तो वाणला पोहचला तेथून यात्रेबरोबर चालू लागला.

करमणुकीसाठी आपल्याबरोबर त्याने नृत्यागना आणि गायिकाही नेल्या होत्या यात्रेबरोबर ते निरालीधार या ठिकाणी पोहचले गोठविणारी थडी पाहून त्याना मद्यप्राशन करण्याचा मोह आवरता आला नाही भरपूर मद्यप्राशन करून सर्वजण धुद झाले नृत्यगायनाचा कार्यक्रम झाला तसेच धुद झालेले राजाबरोबरचे लोक राजासह नृत्यागना व गणिकाबरोबर व्यभिचार करु लागले या भ्रष्ट कृत्याने नदादेवीचा कोप झाला त्यामुळे नृत्यागना नाचता नाचता दगड होऊन पडल्या आजही याठिकाणी मोठमोठे दगड सर्वत्र विखुरलेले आहेत त्यामुळे या ठिकाणचे निरालीधार हे नाव जाऊन पातर नचौनिया (वेश्याचे नृत्यस्थान) असे नाव पडले राजाच सैन्य रुपकुडलला पोहोचल होत तेही यात्रेत गणिकाबरोबर कामचाळे करीत होते. अनितीने वागत होते त्यानाही नदाच्या कोपाला बळी पडाव लागल रुपकुडाजवळ प्रचड हिमवादळ झाले व्यभिचारी सैन्य बर्फात गाडल गेल

या यात्रेत अत्यत पवित्र मनाने सहभागी व्हावे लागते अपेयपान करून व्यभिचारी प्रवृत्तीने वागणाऱ्या नितीभ्रष्ट माणसाला नदादेवीच्या कोपाला बळी पडावे लागते त्याच्या दुष्कृत्याबद्दल त्याला निश्चितपणे शासन होते अशी सर्व भाविकाची अढळ श्रद्धा आहे यात्रेत सहभागी होणारा प्रत्येक यात्रेकरू यात्रेच पावित्र राखण्याचा आटोकाट प्रयत्न करतो

गरोली पातळ - पातरनचौनियाच्या मार्गावर वैतरणाकुड नावाचे सरोवर आहे पूर्वी यात्रेत मृत्यू पावलेल्या यात्रेकरूच्या आत्मशातीसाठी पिंडदान करण्याचा दृष्टात देवीने येथे दिला त्यानुसार या कुडात स्नान करून यात्रेकेरू कुडाच्या भोवती चोहोबाजूने उभे राहतात मृत यात्रेकरूना श्रद्धाजली वाहून पिंडदान करतात या सरोवराकाठी नदादेवीचे पुरातन मदिर आहे

३१ ऑगस्टला यात्रा पातर नचौनियावरून निघाली रस्ता छातीवरील चढाचा होता सपूर्ण १० किलोमीटरची वाटचाल चढाईची होती अतिशय अवघड व बिकट अशी ही वाट चालताना छाती दडपून जायची चौसिगी मेंढा थाँबत थाबत पुढे जायचा थाबला की यात्रिगणाकडे मागे वळून पहायचा. सारी यात्रा एकेक पाऊल पुढे टाकीत त्याच्या मागून चालली होती. शेवटी उत्कृष्ट आत्मबलाच्या जोरावर सर्वजण १६५०० फुटावरील बर्फाच्छित रुपकुडाजवळ सुरक्षित पोहचले नदापार्वती व भगवान शिवाच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या या पवित्र देवभूमीत पाऊल ठेवताच सर्वांचा श्रमपरिहार झाला सर्वत्र एकप्रकारचं तेजोवलय पसरल्याचा भास झाला अलौकिक आनदाने सर्वांचे चेहरे उजळून गेले

या १६५०० फुट उचीवरील रुपकुडाभोवती जमिनीत थोडस खणल की मानवी सागाडे आणि हाडे हाती लागतात. १९५५ साली या कुडाभोवती भ्रमण करणारास

मानवी हाडाबरोबर काही अलकारही सापडले त्यामुळे साऱ्या जगाचे लक्ष या कुडाकडे लागले. प्रख्यात स्वामी प्रणवानद यानी ही हाडे नदाराजजात यात्रेतील लोकाचीच असल्याचे सागितले उत्तरप्रदेशातील ख्यातनाम मानववश शास्त्रज्ञ डॉ डी एन मुझुमदार यानी ही हाडे १९५६ साली अमेरिकेला पाठवली विश्वविख्यात शास्त्रज्ञ श्री ग्रिफन यानी कार्बनपरिक्षणाद्वारे या हाडाचे परिक्षण केले या परिक्षणाद्वारे ही हाडे ६५० वर्षापूर्वीची असल्याचे जाहीर केले जगातील अनेक शास्त्रज्ञानी रुपकुड परिसरात फिरून सशोधन केले आहे येथील लोकगीते व कथाचा आधार घेऊन अनेक सशोधनात्मक पुस्तके त्यानी प्रकाशित केली आहेत

रुपकुडाजवळ नदाची व मेंढ्याची पूजाअर्चा होते रुपकुडातील जलाने नदास अभिषेक होतो प्रार्थना होते प्रसाद वाटला जातो काही धाडसी, श्रद्धाळू यात्रेकरू रुपकुडाच्या बर्फाळ पाण्यात स्नान करतात रुपकुडातील जलाशयात पडलेल्या स्वत च्या शरीर देवतेच्या प्रतिबिंबाला नमस्कार करतात १ सप्टेंबरला यात्रा १७५०० फुटावरील ज्युरागली धार पार करून काली १३५०० फुटावरील होमकुडापाशी उतरली जीवघेणी थडी सहन करीत १३ किलोमीटरची अवघड वाट सर्वांना चालावी लागली सैलसमुद्र ग्लेशियर पार करावे लागले सपूर्ण यात्रेतील हा अतिशय कठीण व अखेरचा टप्पा होता यात्रा होमकुडापाशी पोहचताच सर्वांना यात्रा साफल्याचे समाधान लाभले

रुपकुड ते होमकुड ही १३ किलोमीटरची वाटचाल दुर्गम असली तरी नयनरम्य आहे मार्गात अनेक ठिकाणी फुललेली नेत्रकमळे, मन मोहित करतात कालु विनायक, वेदिनी देवी आदी अनेक पुरातन मूर्ती रुपकुडाच्या मार्गावर आहेत

होमाकुडापाशी श्री. शकरानी दगडावर कोरलेल्या श्रीयत्राचे विधिवत पूजन करण्यात आले त्यानतर नदाचे प्रतीक असलेल्या चारसिंगाच्या मेंढ्यास तिच्या सासरी कैलासात पाठवण्याचा प्रसग आला त्यावेळी सर्वांच्या नेत्रपाकळ्यावर अश्रूचे दवबिंदू चमकू लागले सर्वांच्या हृदयात कालवाकालव झाली या मेंढ्यावर नदासाठी अलकार, खाद्यपदार्थ, वस्त्रभूषणे लादण्यात आली सर्व भक्तानी त्याचे दर्शन घेतले जड अत करणाने त्याची कैलासाकडे पाठवणी केली सर्वांचा निरोप घेऊन हा मेंढा कैलासाकडे जाऊ लागला आपल्यावर प्रेम करणाऱ्या माणसाना सोडून जाताना या मुक्या प्राण्याचा डोळ्याच्या कडाही ओलावल्या अतिशय कारुण्यमय आणि हृदयस्पर्शी अस अद्भूत दृश्य होत ते पाऊले पुढे पुढे टाकताना तो पुन्हा पुन्हा मागे वळून पहायचा जणू आपल्या माहेरच्या विरहामुले विव्हल होऊन करुण नजरेने नदाच अखेरचा निरोप घेते आहे. दृष्टिआड होईपर्यंत सर्वांच्या

नजरा त्याच्यावर खिळून राहिल्या बरेच अतर गेल्यावर हा मेंढा झपाट्याने पर्वतशिखरे ओलाडीत कैलासाकडे रवाना झाला हिमालयाची कन्या नंदा हिला सासरी पाठवणीच्या या ऐतिहासिक, पारपरिक दिव्य यात्रेची सागता झाली

होमकुण्डापासून यात्रिक उदास मनाने खाली उतरू लागले १८ किलोमीटरवरील सुतोला (उची २१९२ मीटर) या ठिकाणी २ सप्टेंबरला आले ३ सप्टेंबरला २६ किलोमीटर ३ तारावरून सर्वजण घाट (उची १३३१ मीटर) या स्थळी मुक्कामास आले नदाकिनीच्या किनाऱ्या किनाऱ्याने ४ सप्टेंबरला सर्वजण नौटीस पोहचतात नदाच्या सुवर्णमूर्तीची मदिरात प्रतिष्ठापना करतात नदाची स्मृतीगीचे गायली गेली या अलौकिक नदाराजजात यात्रेची चिरतन स्मृती हृदयात साठवून ५ सप्टेंबरला सर्वजण आपआपल्या गावी परतले

हिमकन्या नदा ही आदिशक्ती आहे शिवशक्ती आहे पूर्वजन्मी ती शकराची पार्वती होती उमा होती दुर्गा होती सती होती चिरतन काळापर्यंत तिचा जीव शिवाशी जठलेला आहे. जगउत्पत्तीची ती प्रेरकशक्ती आहे या आदिशक्ती नदाचे पवित्र पाठवणी यात्रेत सहभागी होणे जीवनातील परमभाग्य समजले जाते यात्रेतल्या सहभागामुळे हृदयात बसलेल्या आदिशक्तीचा साक्षात्कार माणसास होतो या यात्रेत सहभागी झालेली माणस खरोखरच पुण्यवत आणि भाग्यवान होत ८५ वर्षाच्या एका गढवाली वृद्धासही हे भाग्य लाभले. ही सपूर्ण यात्रा अनवाणी चालून त्याने पूर्ण केली अविचलित श्रद्धा प्रखर आत्मबल आणि जिद्द याचा सगम या म्हाताऱ्याच्या हृदयात झालेला होता त्या जोरावरच तो या अवघड साहसी यात्रेत अनवाणी चालू शकला त्याच हे दिव्य त्याच्या सुदर जीवनातल भव्य प्रतिक ठरल आहे

नदाराजजात यात्रेस कधी प्रारभ झाला याचा इतिहास कुणालाही ज्ञात नाही लोकगीतात सातव्या शतकातील यात्रेच्या अस्तित्वाचा उल्लेख सापडतो १४ व्या शतकातही या यात्रेचे भव्य आयोजन होत होते हे यशधवल राजाच्या कथेवरून स्पष्ट होते या यात्रा कमिटीचे प्रमुख पडित देवराम नौटियाल या वयोवृद्ध पुरोहिताकडे यात्रेचा २०० वर्षाचा इतिहास आहे १९५१ व १९६८ साली सपन्न झालेल्या या यात्रेत ते सहभागी झाले होते १९६८ साली झालेल्या यात्रेवर फिल्म डिव्हीजनने एक वृत्तचित्र तयार केले आहे त्यामुळे जगाला व भारतीयाना या यात्रेचा परिचय झाला अजूनही बहुसख्य भारतीयाना ही यात्रा आणि तिचा इतिहास अज्ञान आहे ही यात्रा म्हणजे पौराणिक भारताचा सास्कृतिक वारसा जतन करणारा राष्ट्रीय उत्सव होय तिची कथा प्रत्येक भारतीयाच्या घरोघर जाऊन पोहोचली पाहिजे

४

# जिम कॉर्बेट नॅशनल पार्क

कर्णप्रयागवरून पहाटे पाच वाजता बसने निघालो भर पावसातला हा प्रवास अतिशय सुखद वाटत होता सिमली, आदिबदरी, गैरसन, मनाई, चौखुटिया, मासी, बथरोजरखान, मोहान, धनगडी ही हिरवी गावे रस्त्यात लागली गावालगतच्या डोंगरावरील हिरवे वृक्ष, या वृक्षाच्या गळ्यात अडकलेला ढगाचा पाढरा दुपट्टा, उतारावरची हिरवी शेती, गावातली सुदर घरे आणि पुरातनमदिरे सारे दृश्य अतिशय मनोहारी वाटत होते प्रत्येक गाव निसर्गाच्या हिरव्या चौकटीत वसविल्यासारखे सुदर दिसत होते पावसाने रस्ते तुटले होते रस्त्यात मोठमोठे दगड येऊन पडले होते खाली उतरून ते धोंडे दरीत ढकलून देण्याची मौजही आम्ही अनुभवली खराब रस्त्यावरून ड्रायव्हर कुशलतेने गाडी चालवत होता

रामगगा नदीवरील पूल पार करून गाडी मोहानला आली हा रस्ता नॅशनलपार्क आणि रामगगा नदीकिनाऱ्याच्या मधून घनदाट झाडीतून जातो या रस्त्यावरून प्रवास करताना अक्षरश आनदाच्या डोही बुडालो नदीकिनाऱ्यावरील शेतकऱ्याच्या सुदर झोपड्या आणि पावसाळी लकाकी चढलेल निसर्गाच हिरव लेण पाहण्यासाठी बसच्या खिडकीला डोळे चिकटून राहिले रामनगरात कधी येऊन पोहोचलो ते कळलेच नाही

सतत १० तास प्रवास झाला होता शरीर थकले होते पण विलोभनीय निसर्गदर्शनाने मन प्रफुल्लीत झाले होते रामनगरच्या टूरिस्ट सेंटरमध्ये निसर्ग स्वप्ने पहात पहात रात्र घालवली. पहाटे ५ वाजता रेस्ट हाऊस सोडल नॅशनल पार्क हद्दीतील गार्जिया या १० किलोमीटरवरील गावाकडे आम्ही वाटचाल सुरू केली

सुप्रभाती घनदाट झाडीतले हे पदभ्रमण अतिशय रोमाचकारी वाटत होत आकाश मेघानी व्यापून टाकल होत हवेतला सुखद' गारवा प्रसन्न वाटत होता. विविध रगीबेरगी पक्ष्याची गोड किलबिल आणि मयुराच्या केकावल्याच सगीत हिरवी वृक्षवल्लरी आणि रानफुलाच्या गधान मन धुद झाल होत मधूनच वन्यजीवाचे वेगवेगळे आवाज ऐकू यायचे रस्त्यात कुणी भेटत नव्हत शरीरावर भयाने काटा उभा राहायचा अशा निर्जन वेळी या अरण्यातील रस्त्यावरून चालणे खरोखर मूर्खपणाच होता परतु या मूर्खपणातून मिळणारा आनद हवाहवासा वाटत होता म्हणून निर्भयपणे पुढे चालत होतो मधे मधे आढळणाऱ्या पाढऱ्याशुभ्र धुक्याच्या पट्ट्यात शिरताना तन - मन मोहरून जात होत

चालता चालता पूर्व दिशा उजळली आकाशातल्या ढगाची पळापळ सुरू झाली पूर्वदिशेचा मार्ग मोकळा करून ते पश्चिमेकडे सरकले पूर्वेच्या मोकळ्या मार्गावरून सूर्य वर आला त्याच्या किरणानी जगलावरील धुक्याचे पाढरे वस्त्र हिरावून घेतले आपल्या उबदार सुवर्ण किरणाची भरजरी शालू त्याने अरण्याच्या अगाखाद्यावर टाकली आता वृक्षवल्लरीच हिरव सौंदर्य अधिक खुलून दिसू लागले रामगगा किनारी असलेल्या अतिशय सुदर कलात्मक झोपड्या जाग्या होऊ लागल्या काही किलोमीटरच्या अतराअतरावर या नदीकिनारी शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या झोपड्या अहित पहाटे पहाटे अरण्यातील रस्त्यावर भटकणाऱ्या आम्हा निसर्गवेड्याकडे झोपड्यातील चेहरे नवलाने पहात आणि आपल्या कामाला लागत.

आम्ही झोपड्यातले आणि झोपडी भोवतालचे सौदर्य न्याहाळीत वाटचाल करीत होतो एका भव्य रानआब्याच्या झाडावर हळदीसारखा पिवळा धमक, सुदर पक्षी दिसला त्याच्या पखावर काजळाच्या तीटेसारखी काळीभोर चिन्हे होती हा हळद्या पक्षी होय (हिमालयीन गोल्डन ओरियल) तो फादी - फादीवरून उड्या मारीत होता त्याची प्रत्येक हालचाल नृत्यागनेसारखी वाटत होती. पुढे पुढे विविध रगीबेरगी पक्षाच्या दर्शनाने आणि त्याच्या कर्णमधूर सगीताने धुद झालो रगीबेरगी पोपटाचे थवे, हुदहुद्, चातक, निळकठ, हिमालयीन काळे बुलबुल, श्यामा, सारिका मुनिया, धनेश, धोबी असे कितीतरी परिचित अपरिचित पक्षी पहावयास मिळाले डोळ्याला दुर्बिण लावून हा पक्षी निरीक्षणाचा आनद बराच वेळ उपभोगला

सकाळी १० वाजता गर्जिया वस्तीवर आलो तेथून उजवीकडे वळून रामगगानदीच्या पात्रात उतरलो रस्त्यात वाघ किंवा हत्तीच्या टोळीची भेटगाठ होऊ नये, म्हणून मनात देवाला प्रार्थना करीत होतो रामगगा आणि कोसी नदीच्या

सगमावर पात्राच्या मधोमध असलेल्या गर्द वनराईच्या टेकडीवर गर्जिया देवीचे मदिर आहे ही गर्जिया माता या अरण्याची वनदेवता मदिर आणि देवीची मूर्ती अतिशय पुरातन आहे. नुकताच या मदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. नव्याने अतिशय सुदर आणि कलात्मक मदिर बाधण्यात आले आहे. नदीपासून वरपर्यंत सुरेख पायऱ्या बाधण्यात आल्या आहेत आम्ही या पायऱ्या चढून वर गेलो त्यावेळी कॉर्बेटपार्कच्या परिसरातील जगलाचे अतिशय मनोहारी दर्शन घडले

रामगगेच्या कडेकडेने आम्ही धनगडीला येऊन पोहोचलो रामनगरपासून १८ / २० किलोमीटर चाल झाली होती परतु निसर्गसानिध्यामुळे अजिबात थकवा वाटला नाही जिमकॉर्बेट नॅशनलपार्कच्या प्रवेशद्वारातून आम्ही आत गेलो दुसरे प्रवेशद्वार रामनगरजवळ आहे आवारातच जिमकॉर्बेटचा पुतळा आहे तसेच स्टफ केलेल्या वन्यप्राण्याचे सग्रहालय आहे त्यात वाघ, हत्ती, चित्ता, भेकर, रानमाजर वगैरे स्टफ केलेले प्राणी व त्या प्राण्याची हाडे आहेत या प्रवेशद्वाराच्या आवारात पार्कच्या कर्मचाऱ्याची निवासस्थाने आहेत कार्यालय आहे या ठिकाणी सहाय्यक वन्यप्राणी सरक्षक श्री हिरासिग रावत आणि फॉरेस्ट ऑफिसर श्री उमेशसिग नेगी भेटले पुण्यासारख्या दूरच्या शहरातून आलेलो आहोत हे कळताच त्यानी आमचा आस्थेने पाहुणचार केला पार्कसबधी माहिती सागितली.

हिमालयातील शिवालिक टेकड्याच्या पायथ्याला रामगगानदीच्या खोऱ्यात वसलेल्या या पार्कचे एकूण क्षेत्रफळ ५२८ ८ किलोमीटर आहे पार्कचा काही भाग कुमॉऊ विभागातील नैनीताल जिल्ह्यात, तर काही गढवालमधील पौडी जिल्ह्यात मोडतो चमोली भागातील दिवालीखाल पर्वतश्रेणीतून उगम पावणाऱ्या रामगगानदीने या पार्कमधील वन्यजीवन समृद्ध बनविले आहे १९३५ साली स्थापन झालेला, भारतातील हा प्रथम पार्क होय पूर्वी अतिशय घनदाट अरण्य आणि वन्यप्राणी या जगलात विपुल होते शेकडो वाघ होते बेसुमार वृक्षतोड आणि शिकारीमुळे हा प्रदेश सकटात सापडला ही परिस्थितीची जाणिव होताच या भागाचा इग्रज गव्हर्नर माल्कम हेली याने हा प्रदेश सरक्षित जगल म्हणून जाहीर करून वृक्षतोडीस बदी केली जगप्रसिद्ध शिकारी आणि निसर्गप्रेमी जिम कॉर्बेटने त्याला त्याप्रसगी सहकार्य केले माल्कम हेलीने या पार्कची स्थापना केल्याने त्याला हेली नॅशनल पार्क असे प्रारभी नाव देण्यात आले स्वातत्र्यानतर हेली नाव बदलून त्याचे रामनगर नॅशनल पार्क असे नामकरण करण्यात आले नैनीतालमध्ये जन्मलेल्या आणि आपल सर्व जीवन वन्यप्राणी आणि निसर्गरक्षणासाठी घालविलेल्या जिमकॉर्बेटला या भागातील लोक गोरा साधू म्हणून ओळखत रामनगरपासून ३४ किलोमीटरवर (हल्दानी रोड) कालादुगी येथे तो

राहात असे लहानपणापासून शिकारीचा नाद पुढे शिकार सोडून तो वन्यप्राण्यावर प्रेम करू लागला फक्त नरभक्षक वाघ त्याने मारले येथील गरीब जनतेची मनोभावे सेवा केली. अनेक पुस्तके लिहीली खेड्याखेड्यात जाऊन वन्यप्राणी आणि निसर्ग सरक्षणाचे महत्त्व त्याने लोकाना पटवून दिले भारतावर त्याचे अतोनात प्रेम 'माय इडिया' या पुस्तकात त्याने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत २९ एप्रिल १९५५ साली तो मृत्यू पावला त्याचे स्मरणार्थ १९५७ साली उत्तरप्रदेश सरकारने या पार्कला जिम कॉर्बेट असे नाव दिले कुमॉऊ गढवाल भागात झोपडी झोपडीत त्याचे नाव घेतले जाते त्याच्यावर लोकगीते रचली आहेत पार्क म्हणजे त्याचे जिवत स्मारक होय कालादुगी येथे कॉर्बेट म्युझियम आहे तेथे त्याची बदुक, पलग, त्याने मारलेल्या नरभक्षक वाघाची कातडी, वापरातले कपडे, भाडी आहेत

या पार्कच्या परिसरात कालागढ, बोक्साड, काण्डा, धनगडी, गर्जिया, आमडण्डा, लोहाचौडा, ढिकाला, पटेरपानी, धारा, गौजपानी, जमनाग्वार, सर्पदुली, गैरल, सुलतान, मलानी, मोहाण, बिजरानी, लालढाक, ढेला, खिन्नानौली आदी वनगावे आहेत येथील लोकवस्ती आता उठवण्यात आली असून, टूरिस्टसाठी विश्रामगृहे व ठिकठिकाणी १० / १५ माणसे बसू शकतील असे निरीक्षण टॉवर बाधण्यात आले आहेत साल व आब्याच्या झाडावरही मचाणे बाधलेली आहेत

दुपारी ४ वाजता काचेच्या खिडक्या असलेल्या बद जीपमधून आम्ही ढिकाल्याकडे निघालो. थोड अतर गेल्यावर चितळाचे कळपच्या कळप दिसू लागले नर, माद्या आणि लहान पिलाचा समावेश असलेला ५० / ६० चितळाचा हा कळप उड्या मारीतच रस्ता ओलाडून गेला पुढे गेल्यावर गवतात उभा असलेला साबर नर दिसला आपल्या सुदर शिगाचा डौल साभाळीत अतिशय शातपणे हा नर परिस्थितीचे अवलोकन करीत होता. त्याच्यामागे ४ / ५ माद्या काही अतरावर उभ्या होत्या. या जगलात १४ ते १५ हजार चितळ आणि १००० ते १५०० साबरे आहेत इतक्या मोठ्या प्रमाणात चितळ असलेले आशिया खडातील हे एकमेव अभयारण्य होय वाघ आणि बिबळे या चितळाचे मुख्य शत्रू या हरणाची शिकार करून ते त्याची सख्या मर्यादित ठेवतात. याशिवाय जगलातील अजगर, सुसरी, कोल्हे लाडगे, रानकुत्री ही हरणाची शिकार साधतात

पार्कमधील निसर्ग आणि वन्यप्राण्याचे अवलोकन करीत आमची गाडी हळूहळू पुढे चालली होती वाघ आणि रानटी हत्ती पाहण्याची मनस्वी ओढ लागली होती सुल्तानवरून सर्वदुली मार्गे आम्ही ढिकाल्याला पोहोचलो परतु रस्त्यात

वाघ आणि हत्ती दिसले नाहीत त्यामुळे निराशा झाली ढिकाल्याच्या भोवती जगल खूप घनदाट आहे या सपूर्ण जगलात ४०० ते ५०० प्रकारचे वृक्ष, लता, वेली आणि वनस्पती आहेत. भारतात आढळणारी बहुतेक झाडे येथे आहेत साग, साल, बेल, आवळा, रानआबा, वनपिंपळ, वड, मोह, अर्जून, अजिरी, चिच, लिब, काचन, अमलतास, करज, अबाडा, कढीलिब, करवंदे, कामिनी, काळा शिरटा, कर्दळ, केळी, खजूर, खस, खैर, घाणेरी, चीड, चिकटी, सप्तवर्ण, जाभुळ, बोर, तेजपत्र तुळस, तेन्दू, धामण, नागरमोथा, रानकपाशी, रानहळद, रानलिबू, बेहडा, सुपारी, बाबू, वेत, माधवी, मैदा, रानमिरची, माका, रोहिणी, शीसम्, पाढराशिरस, वड इत्यादी झाडे, फळझाडे व वनस्पती जगलात आहेत मोठ मोठी कदम्बाची झाडे आहेत. याखाली हत्तीच्या झुडी आराम करतात जगलात मुख्यत: साल मोठ्या प्रमाणात आहेत ढिकाल्याजवळच अतिशय जुना १०० / १५० वर्षापूर्वीचा सालवृक्ष आम्हास दाखविण्यात आला त्याची उची १५७ फुट आहे खोडाचा घेर २२ फुट आहे या अरण्यातील हा सर्वात जुना आणि मोठा सालवृक्ष होय येथील लोक त्याला देववृक्ष मानून त्याची पूजा करतात १९८० साली उन्हाळ्यात जगलाला लागलेल्या आगीत होरपळून तो अर्धा तुटला आहे याशिवाय अनेक उच व विशाल आकाराची झाडे जगलात आहेत.

रात्री ढिकालाच्या रेस्ट हाऊसमध्ये आमचा मुक्काम होता येथे टूरिस्टसाठी अतिशय सुदर रेस्ट हाऊसेस बाधण्यात आलेली आहेत रात्र पडताच वाघ, हत्ती, लाडगे व विविध प्राण्याचे आवाज कानावर येऊ लागले सपूर्ण जगल जीवन जागे झाले. रात्री वा दिवसा जगलात कुठेही पायी फिरावयास बदी होती हत्तीवरून अथवा रस्ता असेल तिथे गाडीतून फिरण्याचा सूचना होत्या वन्यप्राण्याच्या आवाजाने मित्र तर खूप घाबरला रात्रभर त्याला झोप आली नाही. या प्राण्याचे विलाप आणि विविध रातकिड्याचे संगीत ऐकता ऐकता मला कधी झोप लागली कळलेच नाही.

विविध पक्षी आणि मोराच्या आवाजाने पहाटे जागे केले अगणित पक्ष्याचे गोड गुजन आणि मयुराच्या गोड केकावलीचे हे मिश्र सगीत ध्यानस्थ होऊन कितीतरी वेळ ऐकत बसलो पक्षी देववाणी बोलतात असे म्हणतात या देववाणीमुळे माझ्या चित्तात आगळेवेगळे समाधान आणि गूढरम्य शातता उतरली. त्याचे शब्दात वर्णन करू शकत नाही या जगलात ३ ते ४ हजार मोर आहेत. भारतात आढळणाऱ्या एकूण १२०० पक्षाच्या जातीपैकी ५९० पक्षाच्या जाती जगलात आढळत असल्याची माहिती आम्हास देण्यात आली त्यात काही स्थलांतरीत पक्षाचाही

समावेश आहे ढिकाल्यापासून काही अतरावर रामगगा नदीवर कालागढ येथे एक धरण बाधण्यात आले आहे त्याची उची १२८ मीटर आहे त्याचे पाणी ८० किलोमीटर परिसरात पसरले आहे दुसरा बाध सैडल डॅम होय याठिकाणी हिवाळ्यात, फ्लेमिंगो, सैबेरियन डक्स व इतर अनेक स्थलातरीत पक्षी येतात या धरणात आणि रामगगेच्या डोहात चिल्का, राहू, काळामासा, टायगर फिश आदी विविध प्रकारचे मासे आहेत मगरी, सुसरीही आहेत उन्हाळ्यात या डोहात वाघ, हत्ती, जलक्रीडा करतात

सकाळी ६ वाजता आमची हत्तीवरून वनभ्रमती सुरू झाली वाघ आणि रानटी हत्ती पाहण्याची ओढ तीव्र झाली होती आकाश तस स्वच्छ होत. तरीही ढगाच्या काही टाळ्या आकाशात घिरट्या घालात होत्या ढिकालाचा विस्तीर्ण परिसर हा गवताळ प्रदेश अनेक प्रकारची गवते येथे उगवतात. सुरकण्डा नावाचे गवत तर एवढे उच वाढते की त्यात हत्तीसुद्धा गडप होतात येथे चरण्यासाठी चितळ, साबरे, रानडुकरे, हत्ती येतात. चरणाऱ्या चितळाच्या शिकारीसाठी वाघोबा येथे टपून बसतात या ठिकाणी रेस्ट हाऊसपासून एक किलोमीटर अतरावर घनदाट जगलाचे भागात पाण्याचे एक मोठे कुड बाधण्यात आले आहे त्याची खोली १० / १२ फुट असावी उन्हाळ्यात या ठिकाणी हरणापासून वाघ, हत्तीपर्यंत सर्व प्रकारचे प्राणी पाणी पिण्यासाठी येतात काही अतरावर एका जाभळाच्या झाडावर फळ्या ठोकून मचाण बाधण्यात आले आहे उन्हाळ्यात या ठिकाणी बसून सर्व प्राणी पहावयास मिळतात

आमची हत्तीण डुलत डुलत गवतातून वाट काढीत पुढे चालली होती या हत्तीवरील अबारीत ४ जणाची बसण्याची सोय होती. आम्ही दोघे आणि दिल्लीचे दोन प्रवासी होते पुन्हा चितळांचे कळप चरताना दिसू लागले २ / ३ किलोमीटरवर झाडी लागली या ठिकाणी हत्तीण थाबली त्यावेळी माहुताने आजूबाजूला निरखून पाहिले. त्यावेळी झाडाचा आवाज आला. तेथे हत्तीचा कळप उभा होता त्याने हत्तीणीला पुढे जाण्याचा इशारा केला थोडे पुढे गेल्यावर हा १० / १५ रानटी हत्तीचा कळप आम्हाला स्पष्टपणे दिसू लागला दुर्बिणातून या हत्तीचे भेदक डोळे, काळा कुळकुळीत रग आणि सतत सुपाएवढे कान हलवताना स्पष्टपणे दिसत होते कळपात काही सुळेवाले नर होते माद्याना सुळे नसतात ते स्पष्टपणे दिसत होते त्यात कमीअधिक वयाची बालकेही दिसत होती कसल्यातरी झाडाच्या फाद्या तोडून त्यावरील फळे खाण्यात ते मग्न होते हत्तीची घ्राणेंद्रिय अतिशय तीक्ष्ण असतात आमचा वास त्याना लागला नर हत्तीने सोंड वर करून ओरडून इशारा केला तसे पिलाना मधे घेऊन सर्व हत्ती झटपट दाट जगलात गडप झाले



मराठी ग्रंथ संग्रहालय
मु. प्रवास
८८४
दा. क्र. २८७६४
२६३१८

रानटी हत्तींचा कळप पाहावयास मिळाल्याने आनद झाला

या जगलात सुमारे ३५० रानटी हत्ती आहेत तर पर्यटकांना वन्यप्राणी दाखविण्यासाठी १३ पाळीव हत्ती वनखात्याकडे आहेत या जगलात पायी चालणे धोक्याचे म्हणून बहुतेक कर्मचारी हत्तीवरून जगलात पेट्रोलिंग करतात आम्ही भल्यापहाटे रामनगर ते धनगडी रस्त्यावर पायी भटकती केल्याबद्दलही येथील अधिकारी आम्हावर रागावला तो म्हणाला, “भाईसाब ये घना जगल है यहाँ कोईभी दुर्घटना हो सकती है उसे कोईभी रोक नही सकता ” त्याने हत्तीच्या अनेक रोमाचकारी हकिगती सागितल्या त्या ऐकून आमच्या अगावर शहारे उभे राहिले

हत्ती दिवसा माणसापासून दूर पळतो. परतु रात्री तो अतिशय आक्रमक होऊन माणसावर हल्ले करावयास मागे पुढे पहात नाही. पार्कमध्ये ३० / ४० च्या झुडीने हत्ती हिंडतात रात्री माणसाच्या झोपड्या, विजेचे खाब पाडून टाकतात हत्तीची सोंड माणसाचा वास ताबडतोब पकडते नर हत्तीलाच दात फुटतात हे दात १०० सेंटीपर्यंत वाढतात त्याचे वजन ३० / ३५ किलोपर्यंत भरते कधी कधी एखाद्या नराशी दुसऱ्या कळपाच्या हद्दीत प्रवेश केल्यावरून वा मादीच्या स्वामित्त्वावरून दुसऱ्या नर हत्तीची चित्तथरारक झुज जुपते प्राणाच्या आकाताने ते एकमेकाना भिडतात एखादा हत्ती जखमी होऊन पिसाळतो तो त्रास देऊ लागतो १९८० साली अशाच एका हत्तीने अनेक फॉरेस्ट गार्डस्‌वर हल्ले केले जगलातील वनकर्मचाऱ्याच्या झोपड्या उध्वस्त केल्या रस्त्यावरील झोपडी उध्वस्त करून लहान मुलासह तीन जणाच्या कुटुबाला त्याने पायी तुडवून चेंदामेंदा करून मारले त्याची प्रेतेही ओळखू येत नव्हती इतर झोपड्यातील मजूरही घाबरले हत्तीला पिटाळण्याचा त्यानी खूप प्रयत्न केला पण हत्ती हटवादीपणाने झोपड्या उध्वस्त करीत होता हत्ती अग्नीज्वालेला खूप घाबरतो म्हणून एका मजुराने एक उध्वस्त झोपडी पेटवली तिच्या ज्वालाना घाबरून तो पळाला. शेवटी त्राही भगवान करून सोडणाऱ्या या हत्तीला १० गोळ्या घालून ठार मारण्यात आले

हत्तीला पाढऱ्या रंगाचा खूप राग पाढरा रग पाहिला की त्याचे माथे भडकते जगलात पाढरा रग दिलेल्या किलोमीटरचे दगड पुरण्याचे काम चालू होते त्यावेळी रात्री हत्ती हे दगड रोज उपटून टाकीत असे. हत्तीला पाढऱ्या रगाची असलेली ॲलर्जी लक्षात घेता या दगडांना आता पिवळा रग देण्यात आला आहे बाहेरून पाढरा चुना लावलेली घरे आणि झोपड्या हत्तींच्या कळपाने उध्वस्त केल्या आहेत. तेव्हापासून कुणीही बाहेरून घराला पाढरा रग लावीत नाहीत पाढरी वस्तू दिसली की हत्ती त्यावर तुटून पडतो म्हणून पाढरे कपडे घालून जगलात न जाण्याच्या

सूचना पार्कच्या माहिती पत्रकात दिल्या आहेत या जगलात कॉंग्रेस पक्षाचे अधिवेशन भरविले तर काय होईल ? या मित्राच्या प्रश्नावर मला हसूं आले

रस्त्याने चालताना अगर मोटारने जाताना रस्त्यात हत्ती आडवा आला, तर शक्यतो त्यापासून दूर जावे तो गेल्यावरच आपण 'पुढे जावे. परतु त्याला पिटाळण्यासाठी जोराने हॉर्न वाजवला वा ओरडले तर त्याचे माथे भडकते ७ / ८ वर्षापूर्वी रामनगर - धनगडी रस्त्यावर रात्री हत्तीचा कळप उभा होता त्याच रस्त्याने एक कार आली हत्तीला रस्त्यातून पिटाळण्यासाठी त्याने जोरजोराने हॉर्न वाजवला या आवाजाने हत्ती बिथरले त्यानी कारवर चाल केली हत्ती चाल करून येत आहेत हे पाहून ड्रायव्हर खाली उतरून धुमचकाट पळाला म्हणून वाचला पण कारचा मात्र हत्तींनी निकाल लावला. अगदी तिची दामटी करून टाकली पधरा वीस वर्षापूर्वी धरणाचे कामावरून १५ / २० मजूर धनगडीला पायी परतत होते त्याना काही अतरावर हत्तीचा कळप दिसला हा कळप पाहून मजूर घाबरले या कळपाला रस्त्यातून पिटाळण्यासाठी सर्वजण मोठमोठ्याने ओरडू लागले. या कळपात काही पिलेही होती माणसाची ओरड ऐकून तीही घाबरून किंचाळू लागली या माणसापासून पिलाना धोका आहे असे समजून तो कळप त्या कामगारावर तुटून पडला काहीजण पळाले धनगडीच्या प्रवेशद्वारावरील रक्षकाला त्यानी खबर दिली मशाली व बदुका घेवून रक्षक त्या ठिकाणी धावले परतु अनेकाना जखमी करून व तीन मजुराना पायी तुडवून ठार मारून हत्ती निघून गेले होते कळपाचे सरक्षण करण्याची जबाबदारी नरावर असते चालताना ते रागेत चालतात पुढे नर, त्यामागे हत्तीणी, मध्ये पिले त्यामागे पुन्हा हत्तीणी व नर असतात वाघ सहसा हत्तीच्या वाटेला जात नाही. परतु हत्तीच्या पिलाच्या कोवळ्या मासाने वाघाच्या तोंडाला पाणी सुटते तो पिलाच्या मागावर असतो त्याचा वास हत्तीला लागताच ओरडून हत्ती एकमेकाना सावध करतात गोल करून मध्ये पिलाना घेतात वाघाच्या समाचारासाठी ते सज्ज होतात हत्तीची एक लाथ बसली तर वाघाची कवटी फुटते म्हणून समोरून तो सहजा हत्तीवर चाल करीत नाही

कधी कधी प्रवाशाना वाघ दाखविण्यासाठी पाळीव हत्तीवरून वाघाचा माग काढावा लागतो पाठलाग करावा लागतो या पाठलागाने वाघ वैतागतो उलटून हत्तीवर चाल करतो. अशावेळी माहूत हत्तीला धीर देऊन वाघाशी लढण्यात प्रवृत्त करतो. वाघ केवळ नख्याने बोचकारतो तोंड पुढे करून तो चाल करीत नाही. कारण हत्तीच्या लाथेची शक्ती त्यास माहीत असते. कधीकधी मागूनही हल्ला करतो अशावेळी हत्ती गोल गोल फिरून बचाव करतो. काही काही

वाघ निडर असतात लढतीपासून मागे हटत नाही अशावेळी हत्तीवरील रक्षक हवेत गोळ्या झाडतो बदुकीच्या आवाजाने वाघ पळून जातो वनाधिकाऱ्यानी सागितलेल्या या हकिगती मनात चाळवित चाळवित आम्ही हत्तीवरून पुढे पुढे जात होतो जसजस पुढे पुढे जावे, तसतशी जगलाची घनता वाढत गेली लालतोंडाची वानरे आणि चितळाचे कळप पुन्हा पुन्हा दर्शन देत होते सूर्य बराच वर आला होता. परतु ढगाच्या गर्दीमुळे जगलात त्याचा पडलेला प्रकाश कदिलाच्या प्रकाशासारखा भासत होता या प्रकाशातच आमचे हत्तीवरून वनभ्रमण चालू होते एके ठिकाणी रानडुकराचा कळप दिसला ३ ते ४ हजाराचेवर रानडुकरे अभयार यात असल्याचे समजले साबरे २५०० पर्यंत आहेत हजार दिडहजार भेकरे आहेत पाडा जातीच्या तृणभक्षी प्राण्याची सख्याही दिड पावणेदोन हजाराच्या घरात आहेत याशिवाय या जगलात कोल्हे, लाडगे, पाणमाजरे, नीलगाय, रानकुत्री, रानमाजरे तरस, ससे, साळीदर, गोरल, मुगसे, फिशिग कॅट, सिव्हेट कॅट, (उदमाजर) या प्रकारचे विविध सस्तन प्राणी विपुल प्रमाणात आहेत ९० चे वर काळी अस्वले आहेत या अस्वलानी पायी जाणाऱ्या वनकर्मचाऱ्यावर अनेक वेळा हल्ला केलेले प्रसग घडले आहेत

वरीलपैकी कोणताही प्राणी पाहण्याची इच्छा नव्हती तरी अनेक प्राणी दर्शन देत होते परतु ज्याच्या दर्शनाची उत्कठा लागून राहिली होती, तो या जगलचा राजा वाघोबा मात्र दर्शन देत नव्हता

वाघाचा माग काढीत माहुत हत्तीला पुढे पुढे नेत होता तोच चितळाचा एक कळप उधळत आमच्या डावीकडन आला झाडावरील माकडानी उड्या मारत चित्कार सुरू केले पक्षीही भयचकित होऊन आर्तपणे ओरडू लागले अचानक सुरू झालेल्या या नाट्याचा बोध होईना हत्तीही अचानक थाबला माहुताने सर्वांना गप्प राहण्यासाठी सुचवले धावणाऱ्या चितळाच्या डोळ्यात भिती उतरलेली होती ते सरळ धावत आमच्याच बाजूला आले धावण्याच्या गडबडीत अक्षरश हत्तीच्या दोन्ही पायाच्या मधून पलिकडे सटकले हत्तीही भयाने थरथरु लागले काय घडतय काहीच कळेना तोच चितळाचा पाठलाग करणारा धिप्पाड पट्टेवाला वाघ अत्यत वेगाने चितळाच्या पाठलागावर गेला एखाद्या फिल्मचे दृश्य सर्रकन डोळ्यासमोरून सरकावे तसे जगलातील हे जीवत चैतन्यमयी नाट्य आम्हास पाहावयास मिळाले आमच्या भाग्याचा आम्हालाच हवा वाटू लागला वाघाबाना अशा रितीने दर्शन देऊन आमचे समाधान केले पल्लेदारपणे धावत डोळ्याचे पाते लवते न लवतो तोच आमच्या समोरून तो गेला सकाळी सकाळीच निरागस, सुदर व निष्पाप चितळाच्या जीवावर तो उठल्याने त्याचा रागही आला

रानटी हत्ती आणि जगलातील वाघ पाहण्याचे आमचे स्वप्न साकार झाल्याने आम्ही रेस्ट हाऊसला परतू लागलो जवळ जवळ तीन तास हत्तीवरून वनभ्रमण झाले होते टूरिस्टाची गर्दी नसल्याने अधिक वेळ हत्ती वापरायला मिळाला. माहुत वेगाने हत्तीला ढिकाल्याकडे नेत होता. तोच हत्ती पुन्हा एकदा थाबला. पुढे जाण्यास त्याने नकार दिला वाघाचा वास आल्याने हत्ती थाबला हे माहुताने ओळखले त्याने उभे राहून जरा निरखून पाहिले त्यावेळी त्याला ४०० ते ५०० फुटावर एका दगडावर वाघोबाची स्वारी आरामात बसलेली दिसली वाघाला आमच्या अस्तित्त्वाचा सशय येणार नाही अशा उचवट्याच्या ठिकाणी झुडपाआड हत्तीला चुचकारून नेले तेथून ते बलाढ्य जनावर आम्हाला स्पष्टपणे दिसल. दुर्बिणीतून तो अधिकच स्पष्ट दिसला वारा आमच्या दिशेला वाहात होता आमचा वास त्याला येणार नव्हता त्याची भरदार छाती, रुद जबडा, भेदक डोळे, आणि गर्दपिवळा रग, त्यावर काळेभोर पट्टे, मऊ स्पजासारखा रुद पजा सारच कस मर्दानी होत ढगाला पडलेल्या फटीतून एक उन्हाच्या कवडश्याचा पट्टा ज्याठिकाणी उतरला होता, त्याठिकाणी उबदार सूर्यकिरणाच सुख तो निर्भयपणे अनुभवत होता बराच वेळ तो तेथे बसून होता त्यामुळे त्याचे बारकाईने निरीक्षण करता आले ९ / १० फुट लाबीच हे धुड पाहून मित्राच्या छातीत तर धडकी भरली का कोण जाणे आमची हत्तीण जोरात किंचाळली तसा तो उठून दाट राईत निघून गेला अशा रीतीने विविध वन्य प्राण्याच्या दर्शनाने आमच्या पार्क भेटीचे सार्थक झाल्याचे समाधान वाटले

१९७३ साली पतप्रधान कै. इदिरा गाधी याच्या प्रेरणेतून वन्यसरक्षणाचा कायदा झाला झपाट्याने दुर्मिळ बनत चाललेल्या वाघाचे सरक्षणासाठी टायगर प्रोजेक्ट (व्याघ्र प्रकल्प) योजना आखण्यात आली त्याचसाली जिम कॉर्बेट हे नॅशनल पार्क टायगर प्रोजेक्ट म्हणून जाहीर करण्यात आले भारतात १५ टायगर प्रोजेक्टस् आहेत त्यापैकी जिम कॉर्बेट नॅशनल पार्क हा प्रथम जाहीर झालेला व्याघ्र प्रकल्प आहे १९७२ साली पार्कमध्ये फक्त ४४ वाघ होते. १९७६ साली ५७, १९७७ साली ७३, १९७८ साली ७९, वाघ होते आज या जगलात वाघाची सख्या शभराचेवर पोहचली आहे बिबळ्याची सख्या १०० ते १२५ आहे वाघाना हे जगल कमी पडत आहे त्यामुळे काही वाघ नॅशनल पार्कच्या हद्दी बाहेरील असुरक्षित जगलात वास्तव्याला आहेत त्याची गणना झालेली नाही या वाघाच्या डोक्यावर चोरट्या शिकारीची टागती तलवार सतत लटकलेली आहे

वाघ हा सर्व प्राण्यात अतिशय हुशार व धूर्त प्राणी होय सावधानता, विलक्षण चापल्य, स्फूर्ती, रक्षणात्मक डावपेच, निडरता, नि शब्दचाल, चतुराई, क्रूरता

ही त्याच्या स्वभावाची खास वैशिष्ट्ये बारीक सारीक आवाज त्याचे कान पटकन टिपतात तो माणसाला खूप घाबरतो माणसाची चाहूल लागली की माणसापासून दूर जातो जखमी झालेले, शिकार करण्यास असमर्थ असलेले वाघ नरभक्षक बनतात खिन्नानौली भागात दोन वर्षापूर्वी असाच एक वाघ मेंटल झाला होता. त्याने अनेक माणसाना हल्ला करून जखमी केले होते शेवटी त्याला गोळी घालून ठार मारण्यात आले. वाघाने दुसरा वाघ मारून खाल्ल्याच्या घटनाही जगलात घडल्या आहेत प्रत्येक वाघ आपआपल्या क्षेत्राची हद्द ठरवून ठेवतो त्यात दुसऱ्या वाघाने अतिक्रमण केले तर त्याचे युद्ध जुपते अथवा वाघीण माजावर येते त्यावे । ती नराला साद घालते तिचा पुकार ऐकून अनेक किलोमीटरचे अतर तोडून वाघ तिच्या जवळ येतो कधी कधी दोन वाघ तिच्याजवळ येतात अशावेळी मादीवरून त्या दोघात तुबळ लढाई जुपते या युद्धात बलवान वाघ जिकतो मादीचा उपभोग घेतो या युद्धात एखादा वाघ ठार झाला, तर विजयी वाघ त्याला खातो आपल्या शत्रूची हाडेसुद्धा शिल्लक ठेवीत नाही

या पार्कमध्ये सरपटणारे प्राणी असख्य आहेत. कासवे आहेत घोरपडी, मगरी, सुसरी आहेत सरडे आहेत तसेच अजस्र अजगर ही विपुल प्रमाणात आहेत मोठमोठी हरणे, साबरे, रानडुकरे हे अजगर सहज गिळंकृत करून पचवतात दोन वर्षापूर्वी जगलातील सुलतान या परिसरात एका वाघाला बलाढ्य अजगराने विळख्यात पकडले होते दोन तास ते एकमेकाशी झुजत होते शेवटी वाघाने अजगराला ठार मारले सहाय्यक वन्यप्राणी सरक्षक श्री रावत यानी या अजगराची लाबी मोजली असता तो १८ फूट लाब होता त्याची गोलाई ३ फूट होती असे कळले या शिवाय विविध जातीचे विषारी व बिनविषारी साप येथे आहेत त्यात फड्या नाग, धामण, फुरसे, मण्यार, कॅट स्नेक, ब्राऊन सॅन्ड स्नेक, कवड्या साप याचा समावेश होतो

या चिरतरुण अरण्याच्या वास्तव्यात माझ तनमन अरण्यमय होऊन गेल. तनमनात एक प्रकारच हिरव तेजोवलय निर्माण झालं माझ्या या नश्वर देहाचे या अरण्यातील वृक्षात रुपातर झाले तर खरोखर जीवाच सोन होईल अगाखाद्यावर पक्षी खेळतील सावलीत विविध प्राणी सुखावतील त्याच्या सहवासात आपण आनदान सळसळत राहू या कल्पनेनेच मनात आनदाची कारजी उडू लागली अरण्यात उभे असलेले वृक्ष म्हणजे खरोखर पुण्यात्मेच होत म्हणूनच या चिरतन आनदमयी अरण्यात वृक्षाच्या रुपात त्याचा जन्म झाला मानवी जीवनापेक्षा ते किती सुखी, आनदी आहेत त्याच्या या भाग्याचा हेवा वाटला

ज्या वृक्षानी आणि वन्यप्राण्यानी आम्हास भरभरून निर्भेळ आनद, सुख आणि

समाधान दिले त्या जगलातून बाहेर पडायला मन तयार नव्हते ज्या जगात अहकाराचा महारोग झालेली माणसे ठायी ठायी आहेत ज्या जगात द्वेष आहे, दाभिकपणा आहे, हिंसेन पेटलेली कृतघ्न मने आहेत, जिथे पैशाच्या फुटपट्टीने माणसाच मोठेपण मोजल जाते, त्या मानवी जगात जायला मन कमालीचे नाखूष होते परतु याच मानवी जगाचा तू घटक आहे, त्याच जगात तुला जगायचे आहे, त्या जगात जाणे तुला क्रमप्राप्त आहे, ही जाणीव मेंदूने पुन्हा पुन्हा करून दिल्याने या अरण्यातील चैतन्यमयी व आनदमयी निसर्गजीवनाचा मी निरोप घेतला

या वैभवशाली समृद्ध अरण्याकडे जगातील निसर्गप्रेमी लोहचुबकासारखे आकर्षिले जातात भारतीय व परदेशी टुरिस्टाची सख्या दरवर्षी वाढते आहे अनेक नामवत निसर्गप्रेमी या जगलात वन्यप्राण्याच्या अभ्यासासाठी अनेक दिवस राहिले आपआपल्या देशातील नागरिकाना भारताच हे वनवैभव दाखविण्यासाठी अनेक देशाच्या दूरदर्शन फिल्म निर्मात्यानी जगलाच चित्रिकरण केले आहे १९७६ साली कॅनडाचे पतप्रधानानी या पार्कला भेट दिलेली आहे.

समुद्रसपाटीपासून ४०० ते ११०० मीटर उचीवर असलेला हा जिम कॉर्बेट नॅशनल पार्क १५ नोव्हेंबर ते १५ जूनपर्यंत टूरिस्टसाठी खुला असतो नोव्हेंबर फेब्रुवारीमध्ये जास्तीतजास्त तपमान २५ ते ३० डिग्री सेंटीग्रेड असते कमीत कमी ४ ते ८ डी सें. असते मार्च एप्रिलमध्ये मॅक्झीमम २५ ते ३० व मिनिमम ९ ते १३ असते मे जून मध्ये ४४ ते ४६ व ११ ते २२ डी. सेंटीग्रेड असते १५०० ते २००० मिलीमीटर पाऊस येथे पडतो. उन्हाळ्यातही पाऊस होतो

रामनगर येथ या पार्कचे मुख्य कार्यालय आहे दिल्लीपासून रामनगर २९० किलोमीटर आहे रामनगरला लागूनच पार्क आहे दिल्ली. गाझियाबाद, मुरादाबाद, काशीपूरमार्गे रामनगरला जाता येते. दिल्लीच्या आतरराज्य बस अड्ड्यावरून रामनगरसाठी बसेस सुटतात रेल्वेमार्गेही जाता येते हरिद्वारवरून कोटद्वारमार्गेही बसेस जातात. कर्णप्रयागवरुनही रामनगरला जाण्यासाठी मार्ग आहे राणीखेत, नैनीताल आदी पर्यटनस्थळे येथून जवळ आहेत

वाढत्या प्रवाशाच्या गर्दीमुळे येथील रेस्टहाऊसचे आगाऊ रिझर्वेशन करून जाणे योग्य होय रामनगर येथे कुमाँऊ विकास निगम मडळाचे रेस्ट हाऊस आहे तसेच नॅशनल पार्कमध्ये, ढिकाला, खिन्नानौली, सर्पदुली, गैरल, बिजराणी, सुलतान, काण्डा, मलानी, झिरना, ढेला येथे अतिशय सुदर रेस्ट हाऊसेस आहेत. ढिकाल येथे एकूण १०३ बेडचे ३८ सूटस् आहेत प्रत्येक सूटमध्ये दोन बेड असून प्रत्येक दिवसासाठी भारतीयासाठी त्याचे भाडे ९० रुपये आहे हेच भाडे परकिय नागरिकासाठी १५० रुपये आहे जादा बेडसाठी ४० रुपये आकारले

जातात या रेस्ट हाऊसमध्ये अे बी.सी डी असे विभाग आहेत स्वीस कॉटेजसाठी ४० रुपये, तबूमध्ये १५, लॉगहटस् मध्ये (२० बेड), प्रत्येक बेडला ३ रुपये ढिकाला वगळता बाकी ठिकाणच्या द्वितीय श्रेणीतील रेस्ट हाऊस साठी २५ ते १५ रुपये प्रमाणे सूटचे भाडे पडते या ठिकाणी २७ सुटमध्ये ५८ बेडस् आहेत ५० पर्यंतच्या समुहाने आलेल्या विद्यार्थ्यांची सोय लॉग हटस् वा तंबूमध्ये करण्यात येते रिझर्वेशनसाठी ५० टक्के रक्कम पाठवावी लागते

पहिल्या तीन दिवसासाठी पार्कमध्ये जाण्यासाठी प्रवेश फी भारतीयासाठी १० व परदेशी नागरिकासाठी ३५ रुपये आहे नतरच्या प्रत्येक दिवसासाठी ६ रुपये पडतात. जड वाहनासाठी ५० व हलक्या वाहनासाठी १० रुपये प्रवेश फी आहे स्थिर फोटोग्राफिसाठी फी नाही मूव्ही कॅमेऱ्यासाठी ५० रुपये फी आहे फिचर फिल्म चित्रिकरणासाठी १००० व डाक्युमेंटरीसाठी ५०० रुपये चार्जेस प्रत्येक दिवसाला आकारले जातात प्रोजेक्ट टायगर प्रकल्पास एक फिल्मसेट मोफत द्यावा लागतो तसेच १५ हजार व ५ हजार रुपये सिक्युरिटी डिपॉझिट ॲडव्हान्स भरावे लागते

अडीच तासाच्या हत्तीवरील भ्रमतीसाठी प्रत्येक माणसामागे २५ रुपये आकारले जातात विद्यार्थ्यासाठी १० रुपये आकारतात हत्तीवर ४ माणस बसू शकतात पार्कमध्ये फिरण्यासाठी शासकीय वाहने उपलब्ध आहेत १० सीटर मिनीबसचा दर प्रत्येक किलोमीटरला ६ रुपये आहे. १८ सीटरचा ८ रुपये पिकअप व्हॅनचा दर ५ रपये व ६ माणसे बसू शकतील अशा जीपचा दर ४ रुपये किलोमीटर आहे रेस्टहाऊसमध्ये भोजन व चहापाण्याची व्यवस्था ढिकाला येथे आहे सपूर्ण दिवसाचे मासाहारी भोजन ४५ रुपये व शाकाहारी ३८ रुपयात मिळते जनता थाळी मासाहारी ७ व शाकाहारी ५ रुपये आहे. जिम कॉर्बेट नॅशनल पार्कला भेट देऊ इच्छिणाऱ्यानी श्री फिल्ड डायरेक्टर अथवा वाइल्ड वार्डन प्रोजेक्ट टायगर, जिम कॉर्बेट नॅशनल पार्क, पो. रामनगर जि नैनीताल (उत्तर प्रदेश राज्य) या पत्त्यावर अधिक माहितीसाठी सपर्क साधावा

•

# ५

# कॉर्बेट साहीब

जिम कॉर्बेट याचे नाव माहीत नाही असा निसर्गप्रेमी जगाच्या पाठीवर सहसा आढळणार नाही आपले सपूर्ण जीवन कॉर्बेटने निसर्गरक्षणासाठीच वाहून घेतले त्याचे रोमाचकारी वनजीवन जगलात भटकती करणाऱ्या निसर्गप्रेमींना निश्चितपणे प्रेरणादायी आहे. १९ एप्रिल हा त्याचा स्मृतिदिन यादिवशी जिम कॉर्बेटच्या कारकीर्दीच स्मरण झाल्याशिवाय राहात नाही

कॉर्बेटचे वडील नैनितालमध्ये पोस्टमास्तर होते जिम हे आठवे अपत्य २५ जुलै १८७५ हा याचा जन्मदिनाक जन्मवेळी त्याचा जन्म लवकर होईना आई अडली तिच्या जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाला परतु ज्यावेळी नैनितालच्या अरण्यातून वाघाची डरकाळी तिने ऐकली त्यावेळी जिम कॉर्बेट महाशयानी टँहाटँहा करीत धरतीवर पदार्पण केले, अशी आख्यायिका सागतात निसर्गसानिध्यात जन्म झाल्यामुळे लहानपणापासून त्याला निसर्गाचे वेड लागले सळसळणारी झाडे आणि उड्या मारणारी हरणे, पाहिली की हा मुलगा आनदून जायचा जसजसे वय वाढत गेले तसतसा तो अधिकाधिक निसर्गवेडा बनत गेला एकटाच निर्भयपणे तो भटकायचा त्याच्या शोधात त्याचे आईवडील त्याला नेहमी जगलात शोधत राहायचे हा मुलगा ओकच्या झाडावरील एखाद्या पक्ष्याचे निरीक्षण करताना हमखास सापडायचा

नैनितालच्या डोंगराच्या पायथ्याशी कालाढुगी या गावात त्याचा मोठा भाऊ राहायचा हा प्रदेश घनदाट अरण्य आणि विपुल वन्यप्राण्यानी समृद्ध होता त्याच्या भावाला शिकारीचा नाद होता भावाकडे जिम नेहमी जायचा. त्याला कालाढुगीच्या

निसर्गाबद्दल खूप आकर्षण वाटायचे ज्या वयात बदूक पेलवीत नाही त्याच वयात तो बदूक चालवायला शिकला भावामुळे लहान वयातच त्याला शिकारीचा नाद जडला वयाच्या अकराव्या वर्षी त्याने चित्त्याची शिकार केली भावाने त्याची पाठ थोपटली. त्याच्या प्रोत्साहनाने जिम पुढे पट्टीचा शिकारी बनला.

नैनितालच्या स्मिथ महाविद्यालयात त्याचे महाविद्यालयीन शिक्षण झाले अभ्यासाची पुस्तके वाचण्यापेक्षा शिकारकथाची आणि निसर्गवर्णनाची पुस्तके वाचण्याकडे त्याचा अधिक ओढा या पुस्तकानी मूलत असलेले त्याचे निसर्गप्रेम अधिक जोपासले काही तरी कमाई करून प्रपचास हातभार लावावा, म्हणून बिहारमधील मोकावा घाटातील रेल्वेस्टेशनवर स्टोअर कीपर आणि सहाय्यक स्टेशनमास्तर म्हणून नोकरी केली परतु जंगलाच वेड लागलेला जिम नोकरीत जास्त दिवस रमला नाही त्याने नोकरीतून मुक्त व्हायचा निर्णय केला आणि ते स्वाभाविक होते

जगलात भटकून तुझे पोट भरणार नाही या भटकण्यातच फुकट जीवन वाया घालवशील नोकरी सोडू नको ' असे त्याच्या वडिलानी त्याला समजावून सागितले पण वनवेडाने झपाटलेल्या तरुण जिमने ते ऐकले नाही निसर्गात रमणारा माणूस कधीच उपाशी राहात नाही, अशी त्याची श्रद्धा होती या श्रद्धेच्या बळावर त्याने नोकरीवर लाथ मारली आणि त्याचे शिकारी जीवन सुरू झाले एक भटक्या वनवेडा शिकारी या पलीकडे जिमला कोणी-ओळखत नव्हते. या पोराचे पुढे काय होणार ? म्हणून आईवडील नेहमी चितेत असायचे

परतु कालडुगी परिसरातील माणसाना त्राहि भगवान करून सोडणाऱ्या दोन जबर वाघाना आपल्या बदुकीचे पाणी त्याने ज्यावेळी पाजले, त्यावेळी त्याचे नाव सर्वत्र झाले या वाघाना मारण्याची कामगिरी मोठमोठ्या प्रख्यात शिकाऱ्याना जमली नाही, ती जिम या पोरसवदा पोराने पार पाडून दाखविली त्यामुळे नेमबाज आणि निष्णात शिकारी म्हणून त्याचा लौकिक वाढला खेड्यापाड्यातले आदिवासी त्याला आदराने वागवू लागले बिहार उत्तरप्रदेशातले व हिमालयातील जंगले अनेक वेळा पायी भटकती करून त्याने पालथी घातली जगलातील वाटा आणि वन्यप्राण्याच्या ठिकाणाची त्याला खडानूखडा माहिती असायची कुणी बडे अमलदार इग्रज पाहुणे मडळी शिकारीसाठी आली की जिम कॉर्बेटला हमखास बोलावणे व्हायचे त्याचा मार्गदर्शक म्हणून कामगिरी जिमला पार पाडावी लागायची जिममुळे पाहुण्याना सहजासहजी शिकार मिळे खाली हात परतण्याची पाळी त्याच्यावर येत नसे पाहुण्याच्या हातून निसटलेली शिकार साधण्याची कामगिरी शेवटी जिमला पार पाडावी लागे त्याचा नेम इतका अचूक असायचा,

की भक्ष्यांवर दुसरी गोळी झाडायचा प्रसग त्याला क्वचित यायचा मग ती उडती पाखरे असोत, की वेगात धावणारा काळवीट असो, किंवा अगावर झेपावणारा वाघ असो, त्याचा मृत्यु जिमच्या गोळीने ठरलेला असायचा !

## पाणकोंबड्यांची हकीगत

जिम कॉर्बेटच्या शिकारीतील कौशल्य आणि चातुर्यामुळे अल्पावधीतच तो लोकप्रिय झाला सरकार दरबारातल्या मोठमोठ्या असामींशी त्याच्या ओळखी झाल्या त्याची प्रतिष्ठा वाढली

एक दिवस सेनादलातील एका बड्या अधिकाऱ्याबरोबर शिकारीसाठी उत्तरप्रदेशातल्या जगलात गेला वाटेत त्याना एक सरोवर लागले या सरोवरावर हजारो पाणकोंबड्याचा थवा उतरलेला होता हजारोंच्या सख्येने पाणकोंबड्या पाहताच शिकारीसाठी वखवखलेले अधिकारी आनदले त्यानी पाणकोंबड्यावर गोळ्याचा पाऊस पाडला आवाजाने सारे जगल दणाणून गेले पटापट पाणकोंबड्या खाली पडल्या पाणकोंबड्याच्या लज्जतदार मटणावर ताव मारायला मिळणार म्हणून सेनाधिकाऱ्याच्या तोंडाला पाणी सुटले त्यानी चागल्या दहाबारा वजनदार कोंबड्या घेतल्या त्या शिजवण्यासाठी ते कँपकडे चालू लागले जाताना त्यानी जिमला हाक मारली पण या प्रकाराने जिम अस्वस्थ झाला होता तो गेला नाही त्याने मृत पाणकोंबड्या एका ठिकाणी जमा केल्या त्याचा प्रचड ढीग बनला केवळ शिकारीची हौस भागावी म्हणून बेछूट गोळीबार करून त्यानी पाचसहाशे पाणकोंबड्याचे प्राण घेतले होते या प्रकाराने जिमचे हृदय द्रवले त्याच्या डोळ्याच्या कडा ओलावल्या. केवळ जेवणासाठी दहाबारा कोंबड्याची गरज असताना बेगुमानपणे एवढ्या प्रचड प्रमाणात या निरपराध पाणकोंबड्याचा नाश करण्याचा या माणसाना अधिकार काय ? या प्रश्नाने त्याचे मन विचलित झाले कितीतरी वेळ मृत कोंबड्याच्या ढिगापाशी त्यांना मूक श्रद्धाजली वाहात बसून राहिला वन्य प्राणीपक्षी म्हणजे निसर्गातले चैतन्य ते सपवण्याचा माणासला काहीही अधिकार नाही वाघासारखी हिंस्त्र श्वापदेही गरज लागेल तेवढीच शिकार करतात पण कृतघ्न माणसाला मात्र प्रत्येक गोष्टीची प्रचड हाव असते या प्रवृत्तीतून या शेकडो मूक निरपराध पाणकोंबड्याना आपले प्राण गमवावे लागले अशा अनेक विचाराची वादळे त्याच्या मनात निर्माण झाली त्यामुळे शिकार हा खेळ आणि शिकारी याच्याबद्दल त्याच्या मनात घृणा निर्माण झाली यापुढे कोणत्याही प्राण्याची शिकार करायची नाही असा निर्णय त्याने केला

## खेडुतांच्या रक्षणासाठी

कधीकधी खेड्यापाड्यात एखादा वाघ गावकऱ्याना त्रास द्यायचा गुरढोरे पळवायचा काही वाघ नरभक्षक बनायचे अशा वेळी जगलातील खेडुताना जगणेदेखील मुश्किल व्हायचे त्यावेळी जिम कॉर्बेटचा गावकऱ्याना मोठा आधार वाटायचा त्याच्याकडे जाऊन या नरभक्षकाचा बदोबस्त करण्याची विनती ते डोळ्यात पाणी आणून करायचे अशावेळी खेडुताच्या रक्षणासाठी त्याला बदूक खाद्यावर टाकून जगलात नरभक्ष्यकाच्या शोधात भटकावे लागयचे

कुमाऊच्या जगलात एका पटाईत ढाण्यावाघाने आणि रुद्रप्रयाग परिसरात एका नरभक्षक चित्त्याने खूप धुमाकूळ घातला या दोन्ही नरभक्षकानी अनेक तरुण, म्हातारी माणस पळवून खाल्ली घरातून, शेतातून माणस पळवली या नरभक्षकाना मारण्याची कामगिरी जिम कॉर्बेटने स्वीकारली त्यासाठी दिवस - दिवस रात्र - रात्र तो घनदाट अरण्यात दऱ्याखोऱ्यात एकटा फिरला ऊनपावसाची त्याने तमा बाळगली नाही त्याला कशाचीही भीती वाटली नाही जगलात पाऊलवाटवरून पुढे चालताना अनेक वेळा नरभक्षकाकडून त्याचा पाठलाग व्हायचा त्यावेळी त्याची आगाऊ जाणीव व्हायची अनेक वेळा त्याने नरभक्षकाना चकवले आहे या नरभक्षकाचा बळी होण्यासाठी मी जन्मास आलेलो नाही अस तो छातीठोकपणे म्हणायचा शेवटी अत्यत परिश्रमपूर्वक नरभक्षकाचा माग काढून कॉर्बेटच्या बदुकीने त्याना यमसदनास पाठविले. नरभक्षकाच्या दहशतीतून गावकऱ्याची सुटका केली जगलातील खेडुताना भयमुक्त केले जगलातील गरीब खेडुताना जीवरक्षणासाठी नरभक्षकाना ठार मारणे हे पुण्यकर्म समजून त्याचा जिमने समाचार घेतला कोणताही वन्यप्राणी कधीच धोकादायक नसतो. मग तो वाघ असो, अगर सिह असो परतु शिकाऱ्यासारख्या कृतघ्न माणसाकडून त्याना छेडल्याने ते जखमी होतात माणसाबद्दल त्याना तिरस्कार वाटून ते नरभक्षक बनतात. शिकारी हा जगलातील वन्यप्राण्याना मिळालेला फार मोठा शाप आहे असे त्याचे स्पष्ट मत होते

नरभक्षकाच्या सहारानतर मात्र त्याने बदूक खुटीला अडकवून ठेवली, ती कायमची तिच्या सोबतीशिवाय त्याने हिमालयाच्या घनदाट अरण्यात हजारो मैल वनसचार केला कित्येक वेळा त्याला त्याच्या वाटेवर वाघ, सिह हत्तीसारखे प्राणी भेटले त्याना मित्र समजून कोणतीही इजा केली नाही. त्याना बदुकीने 'शूट' करण्यापेक्षा कॅमेऱ्याने 'शूट' करणे जिमला अधिक आनददायी आणि रोमाचकारी वाटू लागले. भारतीय वन्यप्राणी, वृक्ष, लता - वेली, रगीबेरगी पक्षी, जगलातील आदिवासी यांची हजारो विलोभनीय चित्रे त्याच्या कॅमेऱ्याने टिपली जीव धोक्यात घालून भारतीय वन्यप्राण्याची फिलम त्याने काढली लडनच्या 'नॅचरल हिस्टरी म्युझियम'मध्ये ती सुरक्षित आहे सत्तर - ऐंशी वर्षापूर्वी भारतीय

प्रदेश घनदाट अरण्ये आणि वन्यप्राण्यानी किती समृद्ध होता, हे या फिलमवरून आढळते.

## निसर्गप्रेम

नरभक्षकांच्या निर्दालनानतर जिम कॉर्बेट पूर्णपणे अहिंसावादी निसर्गप्रेमी बनला त्याचे वन्यप्राण्यावरच प्रेम अधिकाधिक वाढत गेले तो वृक्षमित्र आणि पक्षीमित्र बनला कालाडुगीला त्याने काही एकर जंगल जमीन विकत घेतली तेथे अभयारण्ये निर्माण केली या भागात शिकारीस त्याने बदी केली वन्यप्राण्याची शिकार आणि वृक्षतोडीविरुद्ध त्याने आवाज उठविला त्यासाठी निसर्गप्रेमीची एक सघटना स्थापन केली या सघटनेच्यावतीने वन्यप्राण्याच्या रक्षणाचा प्रसार आणि प्रचार केला शाळा - कॉलेजात, जंगलातील खेड्यापाड्यात जाऊन वन्यजीवाच्या रक्षणाचे महत्त्व आपल्या व्याख्यानातून प्रतिपादन केले

बदुकीची सगत सुटल्यावर त्याने लेखणी हातात धरली. बदुकीमुळे त्याचे नाव बिहार, उत्तरप्रदेश, आसाममधील जगलातील खेड्यापाड्यात झाले पण लेखणीमुळे त्याची साऱ्या जगाला ओळख झाली बदुकीच्या वरदानापेक्षा लेखणीच्या वरदानाने तो अजरामर झाला त्याच्या लेखणीत प्रचड सामर्थ्य आणि जिवतपणा होता त्याच्या जंगल जीवनात घडलेल्या रोमाचकारी हकीकती 'टेम्पल टायगर', 'जगल लोर', 'ट्री टॉप्स' या पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित झाल्या. या रोमाचकारी हकिगती वाचताना प्रत्यक्ष आपण जिम कॉर्बेटबरोबर वनसचार करतोय, असा भास निर्माण होतो वाचक जिम कॉर्बेटच्या पुस्तकाशी इतका एकरूप होतो, की त्याला कशाचे भान राहात नाही या पुस्तकामुळे प्रत्यक्ष जगल भटकतीचा आनद मिळतो, हे त्याच्या लेखणीचे फार मोठे यश होय. त्यामुळे त्याच्या पुस्तकानी अफाट लोकप्रियता मिळवली जगातील अनेक भाषात त्याची भाषातरे झाली लाखो रुपयाची रॉयल्टी त्याला मिळाली निसर्गासाठी जीवन उधळून देणाऱ्या जिम कॉर्बेटला निसर्गानेच लाखोपति केले निसर्गावर प्रेम करणाऱ्या माणसाला निसर्ग भरभरून देतो, ही त्याची श्रद्धा शेवटी खरी ठरली

पुस्तकाच्या रॉयल्टीचे मिळालेले पैसे माझे नाहीत, ते निसर्गाचे आहेत अशी त्याची भावना होती सारा पैसा त्याने भारत व ब्रिटनमधील वन्यप्राण्याच्या रक्षणाच्या योजना आखण्यात, जगलातील गरीब गिरिजन आणि अंधाच्या मदतीसाठी खर्च केला

त्याला भारतात हिमालयाच्या परिसरात स्थायिक व्हायचे होते. ज्या भारतीय भूमीत जन्म झाला, त्याच भारतीय भूमीत त्याला मरायचे होते पण त्याची ही इच्छा पूर्ण झाली नाही. कौटुबिक अडचणीमुळे भारतात कायम वास्तव्य करण्याचे

त्याला जमले नाही आफ्रिकेत केनियात तो स्थायिक झाला वन्यजीवाच्या रक्षणासाठी जबाबदारी पार पाडीत असताना १९ एप्रिल १९५५ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्याचे निधन झाले.

जिम कॉर्बेटची जन्मशताब्दी १९८५ साली ब्रिटन, केनिया आणि भारतात मोठ्या उत्साहात साजरी झाली. अशा या थोर निसर्गसेवकास त्याच्या सदतिसाव्या स्मृतिदिनी अभिवादन (१९ - ४ - ९२)

•

६

# कस्तुरी मृग

श्रावणातील प्रसन्न प्रभात गगोत्रीवर अवतीर्ण झाली सूर्यकिरणानी हिम शिखरावर सुवर्णकाती चढविली देवदाराच्या पर्णसंभारातून पाखरांची गाणी फुलू लागली. गगाभागिरथीच्या जलौघाच सगीत कर्णमधुर वाटू लागलं. शीतल वारा शीळ घालीत वृक्षाच्या अगाखाद्यावर तालबद्ध नृत्य करू लागला पुष्पलतिका डुलू लागल्या वर स्वच्छ निळनिळ आकाश, खाली गंगेच्या प्रवाहात डोकावून पाहू लागल गगोत्रीचा अवघा निसर्ग बहरून आला या निसर्गाच अद्‌भूत लावण्य पहात पहात, पाखरांची गाणी व गगेचे झकार ऐकत ऐकत आम्ही पूल ओलाडला केदारगगेवरील लाकडी पुलावर येऊन थाबलो वरून तुफान वेगान खाली कोसळणाऱ्या त्या उसळत्या केदारगगेच्या प्रवाहान आमची नजर खिळवून ठेवली त्याचा वेध घेत घेत ती वर वर सरकू लागली. वृक्ष वल्लरींना प्रेमालिंगन देत देत हा फेसाळता प्रवाह बेहोशपणे खाली उड्या घेत येत होता. त्याचा धीरगभीर निनाद ऐकता एकेता आम्ही गुग झालो जणू गगामाईच्या कुशीत मिटण्यासाठी हुंकार देत आतुरतेन तो खाली झेपावतो आहे

केदारगगेचा हा प्रवाह ज्या केदारताल (सरोवर) मधून उगम पावला आहे, ते सरोवर एक विश्वसुदर सरोवर आहे, अनुपम सौंदर्याचा खजिना आहे अस स्वामी सुदरानद यानी आम्हास सागितलं होत. त्यामुळच केदारताल पाहण्याची भुरळ मनाला पडली त्यासाठी केदारगगेच्या काठाकाठानं या विश्वसुदर सरोवराकडं प्रभात समयी आमची वाटचाल सुरू झाली. छातीवरली खडी चढण होती. खाली अजस्त्र दगडधोंड्यानी वाट रोखली होती. त्यातून मनमोहक दिव्य हिमपुष्पे डोकावत

होती. वर चीड आणि देवदाराच आच्छादन होत. श्रावणाच हिरव तेज धारण केलेले अनेक अपरिचित वृक्ष आणि वनस्पती प्रसन्न दर्शन देत होत्या. काही लतिका लालपिवळ्या फुलाफळांनी बहरल्या होत्या या हिरव्या वनराईतून डोकावणार निळंभोर आकाश अधूनमधून लक्ष वेधीत होत ही आकाशाची निळाई व वृक्षांची हिरवी पालवी डोळ्यांत साठवीत व केदारगगेच जलसगीत ऐकत ऐकत आम्ही दगड धोंड्यातून वाट शोधत प्रफुल्ल मनान वर चढत होतो

हरसिलचा तरुण निसर्गमित्र झुझबिरसिंग हा माझ्या बरोबर होता हा तरुण झुझबिरसिंग म्हणजे गढवाल हिमालयाचा चालता बोलता देवदार वृक्षच आहे त्याला या परिसराची खडानखडा माहिती आहे हिमालयातील निसर्गाचं उपजत ज्ञान आहे वृक्षवल्लरी व औषधी वनस्पतीची माहिती आहे वन्यजीवनाच त्यान बारकाईन निरीक्षण केलं आहे. त्याला त्याविषयी चांगली जाण आहे १९८८ साली त्याची व माझी यम्नोत्रीच्या मार्गावर जानकीचट्टीत भेट झाली आमच्या ‘दोघाच्याही निसर्गप्रेमाचा धागा जुळला अल्पसहवासातच या ओळखीच रुपातर घनिष्ट मैत्रीत झाल गगोत्रीजवळच हरसिल त्याच गाव वडिल वनस्पती गोळा करण्याचा व्यवसाय करतात. तो उत्तरकाशीला मॅट्रिकपर्यंत शिकला. परतु पुढे परिस्थितीअभावी त्याला शिकता आल नाही. कुठेही नोकरी लागली नाही आता वडिलाना त्याच्या व्यवसायात तो मदत करू लागला आहे वनस्पतीच्या शोधात गढवाल हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यात तो मनसोक्त भटकला. अनेक हिमशिखरे त्यान पायाखाली घातली या भटकतीत त्याला हिमालयातील अनेक वन्यप्राण्याच दर्शन झाल त्याच्या जीवनाच ज्ञान झाल. भटकता भटकता हा तरुण निसर्गवेडा बनला. ज्या वयात एखाद्या तरुणीवर प्रेम करायच असत, त्या वयात हा वेडा निसर्गावर प्रेम करू लागला. दुसऱ्या वर्षी योगायोगान गगोत्रीतच तो भेटला त्याच्या आधारावरच केदारसरोवराची पंधरा किलोमीटरची अवघड वाट चढण्याचा निर्णय मी घेतला.

या वाटेनं जाऊ नको. ती खूप अवघड आणि खतरनाक आहे. एखाद सकट कोसळल तर प्राण गमवण्याची शक्यता अधिक. असा सल्ला गगोत्रीतल्या काही महाभागानी आम्हास दिला होता. परतु झुझबिरसिंग मला सांगत होता, ‘‘याच मार्गान पाडव गगोत्रीवरून केदारनाथकडे गेले. ही वाट पांडवाच्या पुण्यवत पावलांनी पवित्र झाली आहे त्याच पावन वाटेवरून आपण चालतो आहोत. हिमालय आपणावर प्राणसकट आणणार नाही गगामैयाची कृपा आपणावर आहे ’’ यामुळ अधूनमधून चिंताग्रस्त होणार मन निर्भय व्हायच चढताना पायाला गती यायची. चालता चालता तो अनेक आख्यायिका व निसर्गातील चमत्कार ऐकवायचा.

एका तरुण देवदार वृक्षाकडं बोट दाखवित तो म्हणाला "हा देववृक्ष आहे बर का सुरेशचन्द्रजी हिमालय म्हणजे देवाच घर या घराच्या दारातील हा वृक्ष होय या वृक्षाच्या द्वारातून हिमालयातील देवाच्या घरात प्रवेश होतो. म्हणून त्याच नाव पडल देवदार तो अतिशय प्रेमळ, दयाळू आहे आम्ही त्याला देव मानतो त्याची पूजा करतो "

त्याच देवदार आख्यान ऐकत ऐकत आम्ही १३ ते १३॥ फुट उचीवर जाऊन पोहोचलो वनराई आता विरळ होत चालली होती. देवदाराच्या छायेतून आम्ही भूर्जवृक्षाच्या छायेत प्रवेश केला विश्रातीसाठी एका शिलाखडावर बुड टेकवल दूरवर हिमरेखा दिसत होती हिमशिखरावरून नजर भिरभिरु लागली हिमशिखरावर चढलेली नजर खाली उतरुन ती एका भूर्जवृक्षावर स्थिरावली त्याखाली अधूनमधून हालचाल करणारी आकृती डोळ्याना जाणवली ती अधिक स्पष्ट होण्यासाठी डोळ्याना दुर्बिण लावली तो तेथे हरणासारखा प्राणी उभा असलेला दिसला वाटल चितळ आहे झुझबिरसिंगन दुर्बिणीतून त्याला पाहताच हर्षभरित होऊन तो उद्गारला "भाईसाब वो तो कस्तुरीमृग है कस्तुरीमृग" त्याच्या हातातून दुर्बिण घेऊन उत्कठतेन मी त्या दूरस्थ कस्तुरीमृगाच निरीक्षण करू लागलो त्यावेळी तो आमच्याच दिशेन धावत येताना दिसला. त्याला नजरेत पकडून ठेवीत आम्ही एका शिळेआड दडलो आम्ही दडलेल्या शिळेपासून शभर एक फुटावर येऊन तो थाबला. चोहोबाजूला कान टवकारून भिरभिरत्या नरजेनं पाहू लागला उघड्या डोळ्यानी आणि दुर्बिणीतून त्याच अलौकिक सौंदर्य एकाग्रचित्तान पहात राहिलो

त्याची उची २० / २२ इच असावी लाबी २॥ ते ३ फुट भरावी. त्याच्या सपूर्ण शरीरावर बकऱ्यासारखे राठ केस होते. त्यावर ताबड्या, भुऱ्या, तपकिरी व काळ्या रगाचे मिश्रण झाल होत डोक्यावर शिगे नव्हती त्याऐवजी दोन लाबलचक कान ताठ उभे होते त्याना आतून काळ्या पाढऱ्या रगाची केसाची झालर जडावलेली होती त्याच्या गोमुखी भावूक चेहऱ्यावर काळेभोर व पाणीदार टपोरे डोळे लुकलुकत होते त्याच्या ओठातून दोन पाढरेशुभ्र सुळे बाहेर आले होते खाली झुकलेल्या या सुळ्याची लाबी ३ ते ४ इच असावी पुढचे पाय आखुड व सरळ होते मागचे पाय लांब व काटकोनात वळलेले होते त्यामुळ त्याच्या शरीराचा पुढचा भाग खाली झुकल्यासारखा व मागचा वर आल्यासारखा दिसत होता त्याची बोटभर आखूड शेपटी गुदद्वाराकड वळली होती पाय उचलून त्यान चहुदिशेला तोंड फिरवल, त्यावेळी त्याच्या अगप्रत्यगाच विलोभनीय दर्शन घडलं त्याच्या पायाचे जाडजुड खूर ही दिसले पाय आणि माड्या काटक दिसत होत्या शिळेकड तोंड करून तो स्थिर चित्तान व ऐटदारपणे उभा राहिला त्यावेळी तो ध्यानस्थ

असल्यासारखा सुदर वाटला त्याच्यावर नजर खिळून राहिली सुदरता, शालिनता व पवित्रतेच प्रतिक आमच्या समोर उभ असल्यासारख वाटु लागल. त्याच ईश्वरीय सौंदर्य पाहता पाहता माझ देहभान हरपून गेल तो डोळ्यासमोरून हलूच नये अस वाटू लागल परतु झुझबिरसिगला न आवरता आलेल्या शिकेन घोटाळा केला या पहाडी माणसाच्या शिकेचा पहाडी आवाज ऐकताच पापणी लवते ना लवते तोच तो वाऱ्याच्या वेगान सुसाट धावत सुटला दुर्बिणीतून पाहण्याच्या डोळ्यानी त्याचा अचूक पाठलाग केला नजर त्याच्या माग लक्षपूर्वक धावू लागली विद्युतवेगान धावून त्यान दूरवर दिसणारी हिमरेषा पार केली हिमनदीपार करुन दृष्टी पोहोचणार नाही, अशा उचीवर जाऊन तो पोहचला त्याक्षणी माझ्या नजरेन त्याचा पाठलाग सोडला त्याच वाऱ्याच्या झोतासारख धावण मनोहारी वाटल त्याचा विलक्षण वेग, चापल्य आणि धावण्यातील आगळ वेगळ चापल्य पाहून डोळे धन्य झाले त्याच दुर्लभ दर्शन देवदूतासारख वाटल

कस्तुरीमृग कळपान राहातो असा माझा पूर्वी समज होता परतु एकच कस्तुरीमृग दिसल्यान तो एकाकी एकट्यान वावरतो याच ज्ञान झाल. झुझबिरसिगला विचारता त्यानही दुजोरा दिला जीवनात कस्तुरीमृग प्रथमच पाहिला अचानक त्यान दर्शन दिल्यान मनात आनदाच तुफान निर्माण झाल या आनदात आम्ही उठलो. पुढची वाटचाल करू लागलो. त्यावेळी झुझबिरसिगान कस्तुरीमृग आख्यान सुरू झाल

कस्तुरीमृग हा हिमालयातील अधिक उचीवर आढळणारा सर्वांगसुंदर वन्यजीव गगोत्री केदारनाथच्या परिसरात पूर्वी कस्तुरीमृगाचा मोठ्या प्रमाणात वावर होता परतु कस्तुरीसाठी त्याची अदाधुद शिकार झाल्यान तो आता दुर्मिळ झाला आहे कस्तुरीमृगाला उष्ण वातावरण सहन होत नाही म्हणून तो नेहमी तेरा हजार फुटावरील हिमरेषेजवळ वावरतो कस्तुरीमृग खाली मैदानी प्रदेशात सहसा येत नाही त्याच्या पुढच्या पायापेक्षा मागचे पाय अधिक मजबूत असतात त्याची निसर्गान अशी काही रचना केली आहे की मजबूत खुरानी तो खड्या चढणीवरही अतिशय वेगात धावतो अतिशय उच हिमशिखरावर कुशल गिर्यारोहक वा इतर वन्यप्राणी चढू शकणार नाही, अशा ठिकाणी कस्तुरीमृग सहज चढू शकतो हिमचित्त्यासारख्या हिंस्त्र प्राण्यालाही त्याची शिकार सहज साध्य होत नाही स्वसरक्षणासाठी निसर्गान त्याला दोन टोकदार सुळे दिले तरी कस्तुरीमृग अतिशय भित्रा असतो सकटाची चाहूल लागताच चित्तथरारक वेगात तो धावतो कुणी पोहोचू शकणार नाही अशा ठिकाणी चढून लपतो ताशीव कड्यावरही तो चढतो

हरणाच्या जातीतील एका विशेष उपजातीत कस्तुरीमृग मोडतो त्याच्या नरमादीला शिगे नसतात सुळे फक्त नरालाच असतात मादी नरापेक्षा लहान

असते नराचं वजन १० ते १६ किलोपर्यंत व मादीच वजन ९ ते १० किलोपर्यंत भरत. कस्तुरी ही फक्त नराच्या ग्रथीतच तयार होते त्याच्या जठराखाली नाभीजवळ एक गाठ असते जठरातून पाझरणारा रक्तासारखा लाल द्रव या गाठीत वा ग्रथीत जमतो. तो द्रव म्हणजेच कस्तुरी होय

नोव्हेंबर डिसेंबर मध्ये ही कस्तुरी पिकते ग्रथीतली कस्तुरी त्याच्या नाभीत उतरुन पाझरु लागते त्यावेळी तिचा सुगध बाहेर दरवळु लागतो या सुगधान कस्तुरीमृग धुद होऊन धावत सुटतो ज्याप्रमाण माणसाच्या हृदयात ईश्वर असतो, परतु त्याची ओळख न पटल्यान तो त्याला बाहेर शोधत भटकतो त्या प्रमाण स्वत च्या नाभीत कस्तुरी असताना कस्तुरीमृग तिच्या शोधात भटकतो, अस म्हटल जात परतु ज्यावेळी कस्तुरीमृगाच्या ग्रथीतली कस्तुरी पिकते तो काळ त्याच्या प्रणयराधनेचा काळ असतो. त्यावेळी तो कामविव्हल होऊन मादीच्या शोधार्थ भटकत असतो कस्तुरीच्या सुगधान मादी त्याच्याकड आकर्षिली जाते कधी कधी दोन नराची एकाच मादीशी गाठ पडली तर तिच्या वरून दोघां नरात लढत जुपते जो जिकतो तो मादीचा मालक होतो

कस्तुरीमृगाच्या मादीचा गर्भधारणेचा कालावधी ५ ते ५॥ महिन्याचा असतो मे मध्ये बर्फ वितळू लागते हिरवे गवत आणि वनस्पती उगवतात पिलांच्या उदरभरणासाठी भरपूर खाद्य उपलब्ध होते त्याचवेळी मे जून मध्ये खडकाच्या व झुडपाच्या आडोशाला मादी प्रसवते, पिलाला जन्म देते तिला एकच पिलू होत वर्षभर ते आईच्या सोबतीन राहात चरत नोव्हेंबर डिसेंबरातला पुढील वर्षीचा प्रणयराधनेचा काळ आला की ते आईपासून दूर होत पान, फुल, फळ, वनस्पती, सुचिपर्णी वृक्षाच्या कोवळ्या फाद्या, खुरटी झुडप हे कस्तुरीमृगाच खाद्य होय हिवाळ्यात सार हिममय झाल्यावर ते झाडाची साल, शेवाळ व दगडफूल खाऊन गुजराण करतात

नोव्हेंबर डिसेंबरमध्ये आठ नऊ हजार फुटापर्यंत खाली बर्फ पडतं. तेव्हा कस्तुरीमृग खाली येतात ज्या खडकावर, गवतात वा झुडपात प्रणयराधनेच्या प्रसगी लोळतात ती जागा कस्तुरीच्या गधान सुगधित झालेली असते त्याची विश्रातीची जागाही ठरलेली असते त्याच ठिकाणी ते विष्ठा टाकतात या काळातील त्यांची विष्ठाही सुगधित असते या काळात शिकारी कस्तुरीमृगाच्या शिकारीसाठी फिरू लागतात त्याच्या विष्ठेच्या वासावरून त्याच विश्रातीस्थान शोधून काढतात त्यासाठी कुत्र्याचाही उपयोग करतात विश्राती घेत बेसावध असलेल्या कस्तुरीमृगाची बदुकीन शिकार करतात त्याच्या नाभिखालची कस्तुरीची गाठ चाकून कापून काढतात बाकी कस्तुरीमृगाच्या कलेवराचा काही उपयोग नसल्यान

ते तसच टाकून देतात

वन्यसरक्षण कायद्यान्वये कस्तुरीमृगाच्या शिकारीस बदी आणि कडक शिक्षेची तरतुद झाल्यान हुशार शिकाऱ्यानी कस्तुरी मृगापासून कस्तुरीची गाठ हस्तगत करण्याची एक नवीन क्लुप्ती शोधून काढली आहे. कस्तुरीमृगाच्या पुढील आखुड पायात साधे नसल्यान त्याला खाली बसून विश्राती घेता येत नाही. एखाद्या झाडाच्या बुध्याला वा खडकाला पाठ टेकवून वा आधार घेऊन तो विश्राती घेतो त्याच्या विश्रातीस्थानाचा शोध लागताच शिकारी त्याच नैसर्गिक विश्राती स्थान उध्वस्त करतात त्याठिकाणी एक खोल खड्डा खणतात त्याच्या कडेला मातीत तकलादू आधार देउ, एखाद लाकूड वा झाडाची फादी उभी करतात कस्तुरीमृगाची विश्रातीची वेळ व ठिकाण ठरलेल असल्यान तो विश्रातीसाठी ठराविक वेळी नेहमीच्या ठिकाणी येतो विश्रातीस्थानातले फेरफार त्याच्या लक्षात येत नाहीत तो मातीत रोवलेल तकलादू लाकूड वा झाडाच्या फादीला टेकून बसताच तो लाकूड वा फादीसह तो खड्ड्यात पडतो जवळपास दबा धरुन बसलेले शिकारी त्वरेन खड्ड्याकड धावतात त्यास पकडून त्याच्या नाभिजवळची कातडी चाकून कापून कस्तुरीची गाठ काढून घेतात कापलेला कातडीचा भाग सुईदोऱ्यान शिवून पुन्हा त्यास सोडून देतात परतु ही जखम भरून येऊन कस्तुरीमृग जगतो की जखम चिघळून मरतो त्याची कापलेली कस्तुरीची ग्रथी पुन्हा येते की नाही ? तो पुन्हा प्रजाजनक्षम राहातो की नाही ? हे सारे प्रश्न अनुत्तरीत आहेत

आयुर्वेदात कस्तुरीचे अनेक औषधीगुण सागितले आहेत वध्यत्व घालविण्यासाठी कस्तुरी गुणकारी समजली जाते तसेच इतर अनेक असाध्य रोगावरील औषधात व सुगध बनविण्यासाठी कस्तुरीचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात येतो त्यासाठी जगाच्या बाजारात कस्तुरीला मोठ्या प्रमाणात मागणी आहे त्यापायी कस्तुरीमृगाची अनेक वर्षापासून प्रचड प्रमाणात शिकार होते आहे त्यामुळे हा सुदर वन्यजीव दुर्मिळ होत चालला आहे

कस्तुरीची गाठ वा ग्रथी अक्रोडासारखी दिसते मोठ्या लिबाएवढा तिचा आकार असतो या गाठीतली कस्तुरी रक्तासारखी लाल द्रवरुप असते - म्हणून उन्हात ती वाळवतात द्रव वाळवल्यावर त्याचे दाणेदार कस्तुरीत रुपातर होते ती अतिशय उष्ण गुणधर्माची असते नाकाजवळ नेऊन हुगल्यास घोळणा फुटतो एका गाठीत १॥ ते २ तोळे कस्तुरी निघते औषध उत्पादक शुद्ध कस्तुरीची ही गाठ ५ ते ६ हजार रुपये देऊन विकत घेतात बदरीनाथ जवळ जोशीमठ या ठिकाणी वनस्पती औषधी बरोबरच कस्तुरीचा व्यापार करणारे ठेकेदार आहेत पहाडी लोक कस्तुरीमृगाची शिकार करुन कस्तुरीची गाठ या ठेकादाराना

अल्पकिंमतीत विकतात ठेकेदाराचे प्रतिनिधी दिल्ली मुबईसारख्या शहरात येऊन ही ग्रथी भारी किंमतीत विकून प्रचड नफा कमावतात लाब घडीची टोपी वा डोक्याला साफा बाधलेल्या या कस्तुरी विक्रेत्याना कस्तुरीवाले म्हणतात काहीजण बनावट कस्तुरीही विकतात.

दुर्मिळ होत चाललेल्या गढवाल हिमालयातील कस्तुरीमृगाचे रक्षण व सवर्धनासाठी उत्तरप्रदेश सरकारन खास योजना आखल्या आहेत त्यानुसार गगेच्या उगमापासून मदाकिनीच्या उगमापर्यंतचा शेकडो चौरस किलोमीटरचा प्रदेश कस्तुरीमृग अभयारण्य म्हणून जाहीर केला आहे

गगोत्री, गोमुख केदारनाथ, जोशीमठ, तपोवन, गुप्तकाशी, नाला, सोनप्रयाग, मदमहेश्वर, तुगनाथ, उखीमठ, चमोली, गोपेश्वर, रुद्रप्रयाग, गोविंदघाट, फुलोकी घाटी, हेमकुड या परिसरातील गढवाल हिमालयाच्या पर्वतीय प्रदेशाचा या अभयारण्यात समावेश करण्यात आला आहे कस्तुरीमृगाची कोणत्याही प्रकारे शिकार करून कस्तुरी मिळवण्यास कायदेशीर बदी घालण्यात आली आहे. तरी वनकर्मचाऱ्याना हाताशी धरून कस्तुरीमृगाची बेकायदेशीर शिकार अद्याप चालू आहे कस्तुरीचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालूच आहे या वृत्तीमुळे निसर्गाचा हा अनमोल ठेवा नामशेष होण्याची भिती आहे

कस्तुरीमृग भारतात गढवाल व काश्मीरमध्ये अधिक उंचीवर असलेल्या हिमालय परिसरात आढळतो त्याचप्रमाणे तिबेट, पश्चिम चीन, कोरिया, मगोलिया सायबेरियातही आढळतो नेपाळ तर कस्तुरीमृगाचे माहेरघर आहे नेपाळमधील कस्तुरीमृग आणि कस्तुरी जगप्रसिद्ध आहे. एकेकाळी कस्तुरीमृगाची कस्तुरी नेपाळच्या आर्थिक उत्पन्नाच फार मोठं साधन होत. नेपाळची कस्तुरी जगभर निर्यात होई त्यातून फार मोठ परकिय चलन नेपाळला मिळत असे त्यासाठी नेपाळमधील कस्तुरीमृगाची प्रचड प्रमाणात शिकार झाली तो नामशेष होतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली निसर्गप्रेमींनी या बेबद शिकारीबद्दल आवाज उठविला त्यावेळी नेपाळ सरकार जाग झालं. कस्तुरी मृगाची शिकार करण कायद्यान गुन्हा ठरविण्यात आला. तरी भारताप्रमाण नेपाळमध्येही कस्तुरीमृगाच्या चोरट्या शिकारीला सरकार अद्याप पूर्णपणे प्रतिबध करू शकले नाही परतु कस्तुरीमृगाला नेपाळ सरकारन राष्ट्रीय वन्यप्राण्याचा दर्जा दिला आहे चलनी नोटेवर नेपाळच वैभव म्हणून कस्तुरीमृगाची छायाचित्रे छापण्यात आली आहेत. विविध प्रदेशातील हवामानानुसार कस्तुरीमृगाचे रगरुपात विविधता आढळते त्यामानान नेपाळमधील कस्तुरीमृग अधिक सर्वांगसुंदर आहेत

कस्तुरीमृगाच्या गप्पात आम्ही विलक्षण रगून गेलो होतो झुझबिरसिगन माझ्या

ज्ञानात बरीच भर घातली. बोलता बोलता आम्ही बरीच वाटचाल केली. आम्ही जवळ जवळ अर्ध्या अतरावर आलो होतो. त्यावेळी पाय कुरकुर करू लागले "यहाँ थोडा विश्राम करेंगे" अस म्हणून मी एका सपाट शिलेवर बैठक मारली थकवा चागलाच जाणवू लागल्यानं त्या विशाल शिलेवर अग टाकल. वर पाहात असतानाच अथाग निळ्याभोर आकाशात नजर घिरट्या घालू लागली निळ्या आकाशात पाढऱ्याशुभ्र मेघमालाची धावपळ सुरू झाली होती त्याची गमत पाहता पाहता डोळे डावीकडे गोमुखावरील गगोत्री हिमशिखराकड वळले. त्या शिखराआडून एक अतिविशाल कृष्णमेघ गजगतीनं वर सरकत होता हा कृष्णमेघ पहाताच ¯ाचानक मला कालिदासाचा मेघदूत आठवला. त्याला मेघदूताला अलकानगरीचा मार्ग सागताना कालिदासान गगोत्री व कस्तुरीमृगाच केलेल वर्णन स्मृतीपटलावर उमटल -

आसीनाना सुरभितशिल नाभिग्रन्थहमृगाणा
तस्य एव प्रभवमचल प्राप्य गौर तुषारै ।
वक्ष्यस्थध्वश्रमविनयने तस्य श्रृङ्गे निषण्ण
शोभा शुभ्रत्रिनयवृषात्खात पङ्कोपमेयाम ॥

या त्या मेघदूतातील सस्कृत ओळी कुसुमाग्रजानी त्याच सुदर भाषातर केल आहे ते अस

शिलाबरी कस्तुरी मृगाचा सुवास हृदयगम
भगिरथीचे उगमस्थल ते हरतील सारे श्रम ।
शैलावर त्या धवल बैसशिल, दिसेल तेव्हा जणु
नदीने उकरून काढला हिमभूवर कर्दम ॥

या ओळी गुणगुणताच मन प्रसन्नतेन बहरुन आल व कालिदासान मेघदूतात वर्णिल्याप्रमाण गगाभागिरथीच्या उगमस्थळी आम्हाला कस्तुरीमृगाच दर्शन झाल त्याच्या काव्यातील भौगोलिक वास्तवाची अनुभूती आली नागपूर समीप रामटेक टेकडीवर त्यान हे मेघदूत लिहिल म्हणतात परतु त्यामधील निसर्गवर्णन भौगोलिक दृष्ट्या अचूक आहे त्याचा प्रत्यय गोमुख - गगोत्री परिसरात ठायीठायी आला मेघदूत लिहिण्यापूर्वी कालिदास या परिसरात आला असावा अस वाटू लागत. तो केवळ प्रतिभावत कवीच नव्हता, तर तो निसर्गतज्ज्ञ व भूगोल तज्ज्ञ होता. वृक्ष, वन्यप्राणी व पक्ष्याचा त्याचा अभ्यास होता याची साक्ष पटते

मनात मेघदूताच नृत्य चालू असताना आकाशात मेघाचा कुभमेळा जमू लागल्याच डोळ्यांना दिसल क्षणार्धात सार वातावरण झाकोळून गेलं. हवेतला गारवा शरीराला चागलाच झोंबू लागताच मेघदूतात हरवलेल मन भानावर आल

उठून बसलो "चलो सुरेशचन्द्रजी और सात किलोमीटर चलना है" अस झुझबिरसिगन सागताच उठून उभा राहिलो. काही पावल चाललो कोणत्याही क्षणी पाऊस वा हिमवर्षाव होण्याची चिता सतावू लागली अशा अवस्थेत केदारतालला जाऊन पुन्हा गगोत्रीला सुखरुप परतण अशक्यप्राय वाटू लागल. दुपारचे दोन वाजले होतो दुर्गम वाटचाल पूर्ण होईल की नाही. अंधार पडायच्या आत गगोत्रीला पुन्हा परत येऊ की नाही याबद्दल मनात सशय निर्माण झाला. पाऊल पुढे टाकताना पाय डगमगू लागले तनमनाचा विरोप पत्करुन पुढं जावस वाटेना केदारतालच्या अर्ध्यावाटेवरन परत फिरण्याचा मनोदय झुझबिरसिग जवळ व्यक्त केला. त्यान तो मानला. आम्ही परत फिरलो केदारतालच सौंदर्य आम्हास पाहाता आल नाही. परतु कस्तुरीमृगाच्या दर्शनान लाभलेली प्रसन्नता घेऊन आम्ही खाली उतरलो गगोत्रीत सुखरुप पोहोचलो मेघदूत व कस्तुरीमृगाची सुदर स्वप्ने पहात पहात निद्रादेवीच्या चरणी लीन झालो

●

# ७

# हिमालयातील देवबाग

सकाळी सात वाजता आम्ही हृषीकेश सोडल हृषीकेश बद्रीनाथ हायवेवर प्रवास करून सायकाळी जोशीमठला आलो. बिर्ला धर्मशाळेत रात्र कादून सकाळी नऊ वाजता ४० किलोमीटरवरील गोविंदघाट गाठले १८२६ मीटर उचीवरील गोविंदघाट पासून आमच पदभ्रमण सुरू झाल. भ्युदार गावापर्यंत भ्युदार व पुढे लक्ष्मणगगेच्या जलतरगाचं सगीत ऐकत ऐकत तेरा किलोमीटरची चढउताराची वाट तुडवून सूर्यास्ताला आम्ही घागरियात पाय ठेवला. येथील गढवाल विकास निगम मडळाच्या रेस्ट हाऊसमध्ये मुक्काम केला पहाटे सहा वाजता उठून पुष्पघाटीची वाट धरली शीखयात्रेकरूचा महापूर हेमकुडाच्या दिशेने वाहात चालला होता या यात्रेकरूच्या लोंढ्याबरोबर एक किलोमीटर पर्यंत आम्ही वाहात गेलो लक्ष्मणगगेवरील एक छोटा पूल पार केला यात्रेकरूचा प्रवाह उजवीकडे वळला आम्ही पाचजण डावीकडे वळलो पाढऱ्याशुभ्र धुक्यात हरवलेली पुष्पघाटीची वाट शोधत एक लहान टेकडी चढलो. तेथे वनखात्याची तबूतील चौकी लागली याठिकाणी माणशी दोन रुपये प्रमाणे अधिक कॅमेऱ्याची दोन रुपये अशी एकूण चार रुपये फी भरली आणि उत्कटतेने इद्रवाटिकेची वाट चालू लागलो

आजूबाजूच्या शिखरावर आता कोवळ्या सूर्यकिरणाची सुवर्णकाती चमचमत होती. झाडाझुडपातून पक्ष्याचा किलबिलाट कानी पडत होता. सगळीकडे हिरवागार गध दाटला होता या गधाचा आनद लुटीत आम्ही एक शुभ्रपाण्याचा झरा ओलाडला या झऱ्याचे काठ निळ्या पिवळ्या अष्टरानी फुलले होते याशिवाय इतर अनेक सुकुमार सुदर फुले या स्थळी फुलली होती सूर्यफुलाच रूप धारण

केलेलं लार्ज फ्लॉवर इनुला अथवा क्लीबेन (INULA GRANDIFLORA) तेथे दिसल तीन फूट उची असलेल्या या रोपट्याचे अग्रभागावरील फुलाला शभर सुकुमार सुवर्ण पाकळ्या होत्या जाड व लाब पर्णकडावर छोटे छोटे काटे होते. तीन हजार मीटर उचीवर जून पासून सप्टेंबर अखेर ही फुल दिमाखानं फुलत राहतात या फुलझाडाच्या वाळलेल्या पानाचा धूर केल्यान माशा पिसवा पळतात म्हणून फ्लीबेन (पिसवा नाशक) म्हणतात

अष्टरची सुदर जाभळी फुल पाहून तर मन मोहून गेल याही झाडाची पावडर माशा वा पिसवा मारण्यासाठी वापरतात, म्हणून त्यालाही हिमालयीन फ्लीबेन म्हणतात सस्कृतमध्ये त्याला मक्षिकविश म्हणतात ERIGRON MULTIRADIATUS हे त्याचे वनस्पतीशास्त्रीय नाव होय तीन फुटापर्यत वाढलेल्या या फुलझाडाला अनेक फाद्या फुटलेल्या होत्या प्रत्येक फादीच्या अग्रभागी जाभळ्या पाकळ्याची सुदर फुले फुलली होती पाकळ्याच्या मध्ये पिवळ्याधमक बिंबाने या फुलाच सौदर्य द्विगुणीत झाल होत या फुलाची तेजस्वीता अतिशय मनमोहक होती त्याचा टवटवीतपणा हृदयात साठवून आम्ही पुढे चालू लागलो वाटेवर ममेरी, मॅवल, कातुरा, रागा, फर ट्री, भुर्जपत्र, चीड व त्यापुढे देवदाराच्या वृक्षवल्लरीचं दर्शन झाल

या पुष्पवाटिकेच्या हिरव्याकंच प्रवेश द्वारातून आम्ही पुष्पगगेवरील लाकडीपुलाच्या अलिकडे येऊन थाबलो खालून तुफान वेगाने घनगर्जना करीत लक्ष्मणगगा धावत होती तिचा उसळता प्रवाह पुलाच्या लाकडीफळ्याना अधुनमधून स्पर्श करायचा त्यावेळी पुल हेलकावे खायचा त्या प्रवाहाबरोबर वाहात जाणारी नजर पुलाच्या पलिकडील टोकावर जाऊन थाबली त्यावेळी गर्द तपकिरी रगाचा व झुपकेदार शेपटीचा एक प्राणी लाकडी फळ्यावर उभा असलेला दिसला त्याची शेपटी जायट स्किरल सारखी होती. आकार मुगसासारखा होता तो हिमालयीन व्हिसल होता. १६ / १७ इच लाबीचा हा प्राणी हिमालयात पाच पासून चौदा हजार फुटापर्यंत आढळतो गढवाली लोक त्याला नेवला म्हणतात उदीर, सरडे, लहानपक्षी, त्याची अडी, नागतोडे, फुलपाखरे, मुग्या हा त्याचा आहार मासाहार मिळाला नाही तर कदमुळेही खातो. जमिनीत खोलवर बिळे करून हे प्राणी राहातात त्यांच्या मऊ उबदार लोकरीसाठी त्याची मोठ्या प्रमाणात शिकार झाल्यान या हिमालयीन व्हिसलची सख्या रोडावली आहे पुलाच्या फळीवर पाऊल टाकताच हा गच्च झुडुपात गडप झाला

लाकडाच्या झुलत्या पुलावरून आम्ही पुष्पगगा पार करताच चढणीचा रस्ता लागला त्यावेळी एका कोपऱ्यात जगली गुलाब परिवारातल एक छोट रोपट

दिसलं या रोपट्याच्या प्रत्येक पर्णकडेवर, दवबिंदूची मौक्तिक माळ दिसली मोत्याच्या सुरेख मुडावळ्या बाधून मुजीच्या मुलासारख ते सजल होत

जीवघेणी चढाई चढताना आमची चागलीच दमछाक झाली. हा चढ चढून १०॥ ते ११ हजार फुट उची आम्ही गाठली उन्हं डोक्यावर आल्यान अगातून घामाच्या धारा वाहात होत्या. परतु या चढाईत भेटलेल्या रमणीय फुलाच्या दर्शनाने आमचा श्रमपरिहार झाला, नऊ इच उच झाडावरील पाच पाकळ्याच सुदर सेक्सीफ्रायमा, (पाषाणभेदी) गुलाबी रगाच ॲरीगॉन, पाढऱ्या झुपक्याची ॲनाफलोरा या अनेक दिव्यपुष्पाच दर्शन झाल इपॅशियलच्या जाभळ्या रगाने तर आम्हास मोहित करून टाकल.

दोन किलोमीटरचा दमछाक करणारा चढ चढून आम्ही पाचशे फुट लाबीच्या हिमनगावर येऊन उभे राहिलो या कठीण बर्फाच्या ग्लेशियरने पुष्पगगेचे दोन्ही किनारे साधले होते पुष्पगगेवर एक नैसर्गिक हिमपूलच तयार झाला होता नागपाल हे या हिमनदीच नाव, उन्हाने हे ग्लेशियर चादीसारख चमचम करीत होत उन्हान तडकून या ग्लेशियरला ठिकठिकाणी भेगा पडल्या होत्या हे ग्लेशियर ओलाडून आम्ही खाली उतरलो. त्यावेळी मद मादक सुगध नासिकेशी रुजी घालू लागला. थोडे पुढे गेल्यावर पाढऱ्या फुलाच्या तुऱ्यांनी बहरलेली झुडपे दिसली या झुडपानी पुष्पगगेचे दोन्ही किनारे व्यापले होते स्थानिक लोक त्याला मचुटी म्हणतात १० ते १३ फुट उचीपर्यंत वाढणाऱ्या या झुडपाचे वनस्पतीशास्त्रीय नाव POLYGONUM POLYSTACHYUM आहे काही झाडाचे पाढऱ्या तुऱ्याला गुलाबी झाक होती याच फुलातून मद मादक सुगध येत होता हे शेळ्या बकऱ्या व कस्तुरीमृगाच आवडत खाद्य आहे आमचा मार्गदर्शक भरतसिग चौहान या झाडाची हिरवी कोवळी फादी तोडून ती उसासारखी खाऊ लागला आम्हीही त्याच अनुकरण केल त्यावेळी तिची चव आबट गोड लागली ऑगस्ट सप्टेंबरमध्ये ही झाडे बहरतात लहान बोरा एवढ्या आकाराचे लाल पुष्पगुच्छ असलेली ॲनाफर्शलसनीही आमच लक्ष वेधून घेतल कळसाचे आकाराची गुलाबी ब्रिस्टोला मायक्रोफिलानी आमची नजर बाधून ठेवली

नागपाल ग्लेशियर पासूनचा सारा प्रदेश वृक्षहिन होता पुष्पगगेच्या पलिकडे पहाडाच्या उतारावर भृजवृक्ष उभे होते त्याच्यावर सबशिरीन पहाड होता डावीकडे नर पर्वत उच मान करून उभा होता त्याच्या पलीकडे बदरीधाम आहे. काही साहसी ट्रेकर्स १६ हजार फुट उचीवरून गेलेल्या वाटेने बदरीधामला जातात ही वाट हनुमानचट्टीजवळ उतरते त्यासाठी दोन दिवस लागतात मध्ये गुहेत मुक्काम करावा लागतो

चार किलोमीटरच पदभ्रमण करून आम्ही एका उसळत्या पाण्याच्या पारदर्शी झऱ्याजवळ आलो झऱ्याच शुद्ध व थड पाणी पिऊन तृष्णा शमवली या झऱ्याला स्थानिक लोक बामनीधार वा बामनीदौड अथवा बामनगधेरा या नावाने सबोधतात कठखालमधून तो उगम पावतो डावीकडे नर पर्वताच्या उच बोडक्या शिखराकडे पहाताना आम्हाला ब्ल्यू रॉक पीझनचा घोळका उडताना दिसला समोर नजर जाताच शुभ्र हिममुगुट धारण केलेला रातबन पर्वत डोळ्यासमोर उभा राहिला उन्हात त्याचा हिममुगुट तेजस्वीपणे झळकत होता. २०२३१ फूट उचीचा हा हिमाच्छादित रातबन पुष्पघाटीतील शिखराचा राजाच वाटला त्याच्यावर अतिशय स्वच्छ व गर्द निळ्या रगाच आकाश होत बामनगधेरावरील फळ्याच्या पुलावरून आम्ही पलीकडे गेलो. त्यावेळी प्रचड शिलाखड दिसला या शिलाखडाच्या आडोश्याला पूर्वी गिर्यारोहक मुक्काम करीत परतु आता व्हॅलीत मुक्काम करावयास बदी असल्याने मातट व पिवळसर रगाच्या चिमण्यानी येथे आपले ससार थाटले होते.

हा शिलाखड ओलाडून आम्ही पुढे गेलो त्यावेळी शेकडो जातीची आणि रग रुपाची फुललेली फुले पाहून मत्रमुग्ध झालो पुष्पगगेकाठच्या साऱ्या मैदानी प्रदेशात पुष्पनगरी बहरली होती वाऱ्याच्या झुळका येत, त्यावेळी या फुलांचे देह डोलू लागत त्यावेळी ती ईश्वराचे भजन करीत असल्यासारख भासत आनदान डुलणारी ही फुले, येथली भूमी व निळंभोर आकार मला ईश्वरी पावित्र्याचं प्रतिक वाटली त्याच्या हळणाऱ्या पर्णसभारातून मद नाद कानावर येत होता जणू माझ्याशी ती सभाषण करू पहात आहेत. असा भास मला झाला परमेश्वरा या फुलाना तू जर वाचा दिली असती तर किती बर झाल असत. त्यामुळ त्याच नाव, गोत्र, कुळ सर्व त्याना विचारता आल असत. या दुर्गम व निर्जन ठिकाणी त्याना फुलवणाऱ्या, त्याच सगोपन करणाऱ्या जादूगाराची माहिती मला त्याना विचारता आली असती. असे अनेक विचार माझ्या मनात डोकावू लागले निसर्गदेवतेची ही अद्‌भुत किमया पाहून माझी भावसमाधी लागली पुष्पवाटीकेच्या हृदयात फुललेल्या या फुलावरून माझी नजर फुलपाखरा सारखी भिरभिरू लागली

आम्ही भावविभोर होऊन एकेक पाऊल पुढ टाकीत होतो एखाद फुलझाड पायाखाली तुडवल जाऊ नये ही भावना पायाना सतत सावध करीत होती म्हणून पुष्प लतिकाच्या गालिच्यावरून चालताना आम्ही अतिशय हळुवार चालत होतो हिमालयातील चैतन्यमय पुष्पनगरी पहाताना डोळ्यात सारखे आनदाश्रू जमा होत होते भरतसिंग आम्हाला फुलाची नावे व त्याचे गुणधर्म सागत होता. डॉ. सत्यशील नाईक हे सार पुषवैभव कॅमेऱ्यात बद्ध करण्यात गुग झाले होते एका ठिकाणी

फुलझाडाच्या कदमुळाना स्पर्श करून अतिशय शुद्ध व पारदर्शी पाण्याचा छोटासा झरा बाहेर येत होता या झऱ्याचे औषधी पाणी आम्ही पोट भरून प्यायलो या सुगधित पाण्याची चव काही न्यारीच लागली. मध्येच पॉलिगोनम प्रचड प्रमाणात वाढल होत या पॉलिगोनमच्या हिरव्या बोगद्यातून गेलेल्या पाऊल वाटेवरून आम्ही बाहेर पडलो डोक्याच्यावर वाढणाऱ्या या पॉलिगोनमची सवर्धनक्षमता अधिक असल्यान ती मोठ्या प्रमाणात फोफावली होती ही झाडे मातीतला सारा अन्नरस व मूलद्रव्ये स्वार्थीपणान शोषून घेतात त्यामुळे लहान लहान फुलझाडाना अन्न मिळत नाही. तरी काही फुलझाड पॉलिगोनमच्या ताटव्यात जगण्यासाठी धडपडत होती परतु पॉलिगोनमची झुडप त्याना सूर्यप्रकाश मिळू द्यायला तयार नव्हती

पॉलिगोनमच्या बोगद्यातून बाहेर पडताच आम्ही मोकळ्या मैदानावर प्रवेशलो त्यावेळी पुष्पघाटीच खर भव्य आणि दिव्य स्वरूप पहायला मिळाल सार तनमन पुष्पमय व सुगधित झाल प्रत्येक फुल झाडाच्या जवळ जाऊन आम्ही त्याच्या सौंदर्याच रसग्रहण करू लागलो. कडुलिबाच्या आकाराची पान असलेल्या ५ फूट उच फांदीला घंटेच्या आकाराची सुदर निळी जाभळी फुल फुललेली आम्ही पाहिली त्याना लार्ज बेल फ्लॉवर म्हणतात (AMPAULA LATIFOLIA) त्याच वनस्पतीशास्त्रीय नाव, ऑगस्ट सप्टेंबरमध्ये दहा हजार फुटावर ही फुल फुलतात

लार्जबेल फ्लॉवर शेजारी निळी फुले फुललेली चार फुट उचीची अनेक झाडे दिसली या फुलाच्या पाकळ्याची रचना विचित्र परतु चित्ताकर्षक होती टोकाला उघड्या असलेल्या पाकळीत परागकेश व केशराग्र होते खालच्या पाकळीवर वरची पाकळी टोपी सारखी बसली होती या फुलाला मकशुड (MONK SHOOD) म्हणतात वनस्पतीशास्त्रात त्याला ACONITUM HETEROPHYLLUM म्हणतात हे झाड विषारी आहे म्हणून त्याला मराठीत अतिविष, सस्कृतमध्ये अतिविषा, हिंदीत अतीव अशी नावे आहेत नऊ ते बारा हजार फुट उचीवर ऑगस्ट सप्टेंबरमध्ये ही फुलझाडे फुलतात फुलापासून मुळ्यापर्यंत या फुलझाडाचा सर्व भाग विषारी असतो जनावराचे खाण्यात हे झाड आल्यास ती तडफडून मरतात हे झाड बचनाग वर्गात मोडते आर्युवेदात औषधे बनविण्यासाठी या झाडाचा उपयोग करतात मध्ययुगीन काळात युरोपमध्ये बाणाचे टोकाला या झाडाचे विष लावून लाडग्याची शिकार केली जाई म्हणून तिकडे त्याला वुल्फबेन (WOLF BANE) म्हणतात

हॅटच्या आकाराची गुलाबी फुले तर भ्युदारपासून पुष्पघाटीपर्यंत जागोजागी दिसली ४ / ५ फूट उचीच्या या झुडपावर लागलेल्या या रॉयल स्नॅपवीड

(IMPATIENS GLANDUIERA) या फुलाचा गुलाबी रग व त्याचा आकार सुदर होता. पाच पासून बारा हजार फूट उचीवर फुलणाऱ्या या फुलात पिवळा लाल रगही आढळतो  जुलै ते सप्टेंबर हा त्याचा हगाम आहे.

जसजसा व्हॅलीच्या अंतरगात आमचा प्रवेश होऊ लागला  त्यावेळी डोळ्यांना सुखविणाऱ्या फुलाचे अनत आविष्कार आम्हास पहावयास मिळाले  स्वर्गीय दिव्य पुष्पसागरच येथे निर्माण झाला होता  प्रत्येक फूल शालीनता, पवित्रता व तेजस्वीतेच प्रतिक वाटत होतं. ही हे पुष्पघाटीच स्वर्गीय लावण्य पाहताना देहभान हरपून गेले. या निर्जनस्थळी अनतकाळापासून फुलणाऱ्या या फुलाना खतपाणी कोण देतं, त्याची माडणी कोण करतं ? त्याच रक्षण व सगोपन कोण करत ? असे अनेक प्रश्न मनात रुजी घालू लागले  या प्रश्नाची उत्तरं शोधत शोधत फुलाच्या ताटव्यातून चालत होतो. फुलांचा मखमली स्पर्श शरीराला व्हायचा त्यावेळी सार शरीर रोमाचित होत असे

गोलाकार पाच सयुक्त पाकळ्याचे राऊडलिक एशियाबेल (CODONOPSIS ROTUNDIFOLTA) या फुलाची मोहकता पाहून मती गुग झाली. गोड घडीच्या निमुळत्या पानामध्ये कपाच्या आकाराची ही फुले पर्णहीन दाड्यावर फुलली होती फलाच्या अग्रभागात पाढऱ्या व हिरव्या रगाचा सुरेख सगम साधला होता  अर्तभागात जाभळ्या व तपकिरी रगाची सुंदर रंगसगती साधली होती. तळाला मोहक हिरवा रग सजवलेला होता. तोच या फुलाचा पुष्पकोश. त्यात तीन तीन केशराग्र उठून दिसत होते  या फुलझाडाची उची ३ ते ४ फुट होती

छत्रीच्या आकाराच व त्यावर पाढऱ्याशुभ्र शेकडो फुलाचे गुच्छ लटकलेलं हिमालयीन हॉगवीड (HERAVCLEUM LANATUM) या सुदर फुल झाडापासून तर आम्हाला हलावस वाटेना  नऊ पासून अकरा हजार फुटापर्यंत वाढणारी ही फुलझाडे मध्यहिमालयाप्रमाणे काश्मीरमध्येही आढळतात  विविध रुप रगाची ही फुलझाडे पाहून निसर्ग प्रतिभावत चित्रकार असल्याची साक्ष पटते  बामणीधार वरून दोन किलोमीटर्सची पायपीट करीत आम्ही बिसतोली नाल्यापर्यंत आलो तुफानवेगान वाहणारा हा बिसतोली नाला आम्ही मोठ्या प्रयासाने पार केला या मार्गात अनत प्रकारच्या नेत्रदीपक रगाच्या फुलांनी दर्शन दिल  कुणी आकाशाचे विविध रग धारण केले होते, तर काही धरतीचे रगाने नटली होती  काही निळ्या तर काही हिरव्या पाण्याचा रग धारण केला होता. इद्रधनुच्या सप्तरंगातले सारे रंग प्रत्येक फुलावर दिसत होते  बिसतोली नाल्याच्या परिसरात अनेक विषारी वनस्पती आढळून आल्या  म्हणूनच या नाल्याला बिसतोली (बिस म्हणजे वीष) नाला असे नाव पडले.

पाच गुलाबी पाकळ्याचं सायनेथस, काळ्या तपकिरी रंगाचं ससुरिया, लाल तुऱ्याच डायपेन्सी, पिवळ्या हिरव्या फुलाच पेडीक्युलॅरिस, पांढऱ्याशुभ्र, पाच पाकळ्याचं ॲनिलियन, फरगेट मी नॉट (लैलामजनू) गर्द पिवळ गॅगुक्युलस फ्लामिस, गुलाबी मुरेवाल्या ममश, या अतिशय सुंदर फुलाना पाहून आमचे देहभान हरपले

**बीसतोली ते शिवाचांद**

बीसतोली नाला ओलाडून पुढे आल्यावर आम्ही एका शुभ्रपाण्याच्या निर्झराजवळ लचपॅक उघडून पोटोबा उरकला ऊन आता चागलच तापल होत व्हॅलीत उतरलेल्या अल्ट्राव्हायलेट किरणानी चटके द्यायला सुरुवात केली होती तरी दहा किलोमीटर लाबीची व दोन किलोमीटर रुदीची सपूर्ण पुष्पनगरी पाहण्याचा सकल्प आम्ही केला होता म्हणून शरीर विश्रांतीची मागणी करीत असतानाही आम्ही पुढे चालू लागलो चालताना सहज डाव्या उजव्या बाजूच्या शिखराकडे लक्ष गेल. त्यावेळी पाढऱ्या शुभ्र ढगाच्या पड्द्यान ही शिखरे झाकली होती जणु पाढऱ्या वस्त्राचा घुघटच या शिखरानी घेतला होता हे ढग एकमेकाना ढकलीत व्हॅलीत उतरत होते. परतु शिखराच्या अगाखाद्यावरुन खाली उतरु लागताच त्याच अस्तित्वच सपून जायच खाली येताच शिखराच्या खाद्यावरील पाढऱ्याशुभ्र उपरण्यासारखे ते दिसत होते हे ढगाचे उपरणे व्हॅलीत खाली घसरु लागताच व्हॅलीतील आर्द्रतेमुळे ते क्षणात विरघळून जात उच शिखरावरून पुष्पघाटीत उडी टाकून ते जणू आत्महत्याच करीत आहेत, अशी माझ्या मनाची भावना झाली. ही ढगाची गमत पहात आम्ही थोडा वेळ थाबलो त्यावेळी एका कड्याजवळ दहाबारा काळ्या पक्ष्याचा घोळका उडताना दिसला. दुर्बिणीतून त्याचे निरीक्षण केले असता ते अल्पाईत चफ (हिमकावळे) असल्याचे दिसले. या हिमकावळ्याचा वेध घेता घेता रातबन वरुन त्याच्या शेजारच्या गौरीपर्वतावर आमची नजर स्थिरावली २२०२७ फूट उचीचा हा हिमाच्छादित पर्वत आम्हास रातबन राजाच्या प्रधानासारखा वाटला

रातबन व गौरीपर्वताच हिमवैभव पहात पहात आम्ही पुढे चालू लागलो एका दगडाला अडखळले म्हणून खाली पाहिले तर निळ्या पाढऱ्या रगाचा सुदर सगम साधलेल्या एलिनियम फुलानी आमची नजर आकर्षून घेतली त्याच्याशेजारी गोल चक्राकार माडणी केलेल गुलाबी फुलाच सुदर जेरुसलेम सेज (PHLOMIS BRACTEOSA) भेटल एकाखाली एक असे गुलाबी फुलाचे गुच्छ त्याच्या खोडाभोवती होते लाब निमुळत्या पानावरील रसवाहिन्या व पर्णरेखा स्पष्ट दिसत

होत्या. माणसाच्या हस्तरेखेप्रमाणे या पर्णरेखावरून या झाडाच भविष्य वाचता आल असत तर बरं झाल असत, हा विचार सहज मनाला स्पर्शून गेला जुलै ऑगस्ट मध्ये फुलणारी ही फुलझाडे अकरा ते बारा हजार फुटावर फुलतात

दूर अंतरावर अतिशय मनोहारी सुदर फुलझाड गवतातून डोकावताना दिसल. या झाडान आम्हास लोहचुबकासारख खेचल या झाडावरील पुष्परचना कारजासारखी होती तीन ते चार फुट उचीच्या या झाडाच्या धट्याकट्ट्या खोडावर प्रत्येक दोन तीन इच अतरावर चार घायपातासारखी काटेरी जाड पाने होती या प्रत्येक पानाच्या कक्षातून गुलाबी पाढरी सुकुमार फुले बाहेर आली होती या फुलाचा आकार देवचाफ्यासारखा होता या फुलाची माडणी अतिशय नेत्रदीपक होती पुष्पघाटीतल हे फुलझाड मला अधिक सुदर वाटल. शकूच्या आकाराची फुले असलेल्या या झाडाला लॉग लिव्ह मोरीना म्हणतात त्याच वनस्पती शास्त्रीय नाव MORINA LONGIFOLIA आहे नऊ पासून बारा हजार फुट उचीपर्यंत ऑगस्ट अखेर ही फुलत राहात

या मोरीनाच्या सहवासात गोल्डन फर्न व डाळिबासारखी लहान लाल फळे धरलेल्या जगली गुलाबवेली होत्या निळ्या रगाच एलिनियम, फिक्कट निळ ॲपीलोनियन, जाभळ्या रगाच फाल्कनरी अस्टर हिंदीत याला अस्टरला तारक म्हणतात. हळदीसारखा पिवळ धमक शीनीशीयो, गोल्डनलिली, तुळशीसारख्या मोहर आलेल मिडलस्वीट, जाभळी जिरॅनियम, पाढऱ्या पिवळ्या फुलाची ॲडपाईन आदी अगणित फुले पावलापावलावर दिसली ॲडपाईन ही जर्मनाची आवडती फुल जर्मनीतही ती आढळतात, गुलाबी, लाल रगाची मुक्त उधळण करणारी अनेक आर्किडस् पुष्पघाटीत आढळून आली पाढऱ्या तुऱ्याची पॉलिगोनमची झुडपे ठायी ठायी आढळली या झुडपानी इतर फुलझाडाच जीवन उध्वस्त केल्याच दिसल

एका ठिकाणी एका फुलावर आकाशी रगाच फुलपाखरु एकाग्रपणे फुलातला मध चाखताना दिसल. तोच एक भगवा रग धारण केलेला भ्रमर त्या ठिकाणी आला रागान फुलपाखराभोवती गुणगुण करून फुलावरून फुलापाखराला त्यान हाकलून लावल स्वत फुलावर बसून मधप्राशन करू लागला बळी तो कान पिळी या सृष्टीतल्या नियमाचा येथे आम्हास प्रत्यय आला ओबडधोबड दगडधोंड्यातून चालत आम्ही पुष्पगगेवरील किनारी आलो या किनाऱ्यावरील मैदानात एक स्मारक होत. लडनच्या वनस्पतीतज्ज्ञ जॉन मार्गारेट लेगीच ते थडग होत १९३९ साली ती लडनच्या क्यू गार्डनसाठी व्हॅलीतल्या फुलाच बीज गोळा करण्यासाठी आली होती बीज गोळा करताना एका खडकावरून पाय घसरून

१०० फूट खाली कोसळून तिची प्राणज्योत मालविली व्हॅलीतल्या पुष्पशय्येवरच तिला चिरसमाधी लाभली तिच्या स्मृतीस अभिवादन करून आम्ही पुढे मार्गस्थ झालो

लांबून एका खडकाळ जागेत गुलाबी गालिचा अथरल्यासारखा दिसत होता जवळ जाऊन पाहिले तर ती दहा ते तेरा हजार फुट उचीवर उगवणारी रोझ कारपेट नॉटवीड (BISTORTA VACCINIFOLIA) होती आम्ही जसेजसे अधिकाधिक उचीवर जाऊ लागलो, तसतसा गवताळ प्रदेश कमी कमी होत गेला दगडधोंडे व खडकाळ भागातून आम्हाला मार्ग शोधावा लागत होता मध्ये कोरडा ठणठणीत पडलेला द्रोणागिरी नाला आम्ही पार केला जवळ जवळ ११ ते १२ हजार फुट उचीवर आम्ही आलो असू अधूनमधून भूर्जपत्राची झाडे दिसत होती मे मध्ये फुलझाडी लाल फुलाची बुराश व फ्युलीची हिरवीगार झुडपेही दिसली लालभडक रगाच बाजरीच्या कणसासारख फुललेल हिमालयीन नॉटपीड दिसल खडकावर पाढऱ्या हिरव्या, भगव्या रगाच्या बुरशी या अपुष्प वनस्पती आढळल्या खडकावरील शेवाळावर रॉक ॲनिमोनची पाढरीशुभ्र फुले फुलली होती एका उतारावर सुदर निळ्या प्रिमुलानी नजर खिळवून ठेवली

बिसतोली नाल्यापासून तीन किलोमीटर खडकाळ वाट तुडवल्यावर आम्ही एका ग्लेशियरपाशी येऊन पोहोचलो या ग्लेशियरने पुष्पावतीचे दोन्ही किनारे साधले होते. या ग्लेशियरला शिवाचाद ग्लेशियर म्हणतात अस भरतसिग चौहानन आम्हास सागितल शिवा म्हणजे कस्तुरीमृग व चाद म्हणजे त्याचे विश्रातीस्थान असा शिवाचांद या शब्दाचा अर्थ आहे हे ग्लेशियर कस्तुरीमृगाच विश्रातीस्थान असल्याचे कळताच आम्हास आनद झाला या ठिकाणी कस्तुरीमृग दर्शनाचे भाग्य लाभावे म्हणून ग्लेशियर वरुन चालत पुष्पगगा नदी पार केली पलिकडील किनाऱ्यावर जाऊन भूर्जवृक्षाच्या छायेत बरीच भटकती केली परतु कस्तुरीमृगान दर्शन दिलं नाही याठिकाणी आम्हास मार्श आर्किडस् ॲरिगॉन व पोन्टेटिलाची फुले आढळली लालचेरीज बरोबर निळ्या चेरीजही जमिनीवर पसरलेल्या दिसल्या या चेरीज तोडून खाल्ल्या असता त्यांची चव आयोडीन सारखी लागली.

थोड वर चढून हेमकमळ व नेत्रकमळ आम्ही शोधू लागलो परतु ही फुल यास्थळी आढळली नाहीत नजर पुष्पगगेच्या पलिकडील मैदानावरुन पहाडावर गेली पहाडावरुन ती आकाशात चढली त्यावेळी आकाशात दोन क्रेस्टल उडताना दिसले. मधुनच स्थिर होऊन खाली आपले भक्ष्य एकाग्रपणे न्याहळीत होते

शिवाचाद ग्लेशियर नतर आम्ही रातबनच्या पायथ्याला असलेल्या टिपरा बॅक ग्लेशियकडे निघाले. हे ग्लेशियर पुष्पावती नदीचं उगमस्थान होय. परंतु

पाय आता पुढे जायला नकार देऊ लागले घागारियापासून जवळजवळ १० / ११ किलोमीटर चाल झाली होती सार शरीर खूपच थकल होत त्यात पुन्हा दहा किलोमीटर माग जायच होत सूर्यही झपाट्याने ढळू लागला होता परतायला अधार होणार होता मी सर्व परिस्थितीचा विचार करून टिपराबॅककडे जाण्याचा निर्णय आम्ही स्थगित केला आमची परतीची वाटचाल सुरू झाली या वाटचालीत पुन्हा सर्व फुलाच प्रसन्न दर्शन झाल सकाळी व भर दुपारी दिसलेल्या फुलाच्या रगातील छटामध्ये सायकाळी किंचितसा बदल झालेला पाहून नवल वाटले. १९८७ मध्ये मे, जून मध्ये, १९८८ जुलै मध्ये व १९८९ साली ऑगस्ट प्रारभी व्हॅलीला मी भेट दिली होती त्यावेळी विविध फुले आढळली होती १९८७ च्या प्रथम भेटीतच मी व्हॅलीच्या प्रेमात पडलो तेव्हापासून दरवर्षी माझी पुष्पयात्रा सुरू झाली व्हॅलीतील दिव्यपुष्पाच्या सहवासातील काळ हा माझ्या जीवनातील सर्वोच आनदाचा क्षण आहे येथील निसर्गाच आत्मसगीत ऐकून हृदयस्थ ईश्वराची ओळख मला झाली १९९० मधील ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यातील पुष्प घाटीची चौथ्या भेटीने मला अधिक आनद मिळाला

**व्हॅलीतील पर्यावरण**

एप्रिलमध्ये उन्हाळा सुरू होतो बर्फ वितळायला सुरुवात होते बीजाना आणि कदाना अकूर फुटतात शेकडो फुलाच जीवन फुलू लागत काहींचा जीवनकालावधी दोन दिवसाचा असतो, तर काहींचा आठ दिवसाचा असतो काही फुलझाडे आठवडा पधरा दिवस फुलत राहतात काही महिने दोन महिने फुलतात ऑगस्ट हा पुष्पघाटीतला वसतऋतु होय मध्य जुलै ते मध्य ऑगस्टपर्यंत जास्तीत जास्त फुले फुलतात सप्टेंबर नतर पुष्पबहार ओसरायला प्रारभ होतो ऑक्टोबर पर्यंत सर्व फुलाच जीवनचक्र पूर्ण होत नोव्हेंबर मध्ये बर्फ पडायला लागतो सारी फुले बीजरुप व कदरुपात हिमचादरीखाली झोपी जातात व्हॅलीमधील फुलाच ही जीवन साखळी अनत काळापासून चालत आली आहे या देवबागेची काळजी कोण घेतो ? फुलझाडाना खाद्य कोण परवत ? त्याची काळजी कोण घेतो ? त्याच रक्षण कोण करतो ? असे अनेक प्रश्न निर्मीत होतात व्हॅलीतली ईश्वरीशक्ती या निसर्गबागेची काळजी घेते अशी काहीची श्रद्धा आहे परतु सखोल अभ्यास करता व्हॅलीतला निसर्गच सर्व फुलझाडाची काळजी घेतो, फुलाच सवर्धन करतो, अस मला आढळून आल.

मे ते ऑक्टोबर अखेर व्हॅलीत जी आर्द्रता निर्माण होते, ती आर्द्रता फुलाच सवर्धन करते. तसेच पालापाचोळा कुजून व्हॅलीतल्या जमिनीत जे खत तयार

होत ते खत फुलझाडाच पोषण करत सर्व फुलझाडाना प्रकाश, क्षार व खनिज योग्य प्रमाणात मिळण्याची व्यवस्था येथील निसर्गाने केली आहे व्हॅलीत निर्माण होणाऱ्या शेवाळातून त्याना ततूमय खाद्यपुरवठा होतो कोणत्याही झाडाच्या अभिवृद्धीसाठी त्याच्या बियाना वा कदांना विश्राती द्यावी लागते त्यानतरच ती जोमाने फुलतात त्यासाठी आपण बटाटे, बियाणे शीतगृहात ठेवतो व्हॅलीतल्या कदवर्गीय व बीजवर्गीय फुलझाडाचे बीज सहा महिने बर्फात असते नैसर्गिक शीतगृहातच ती असतात अशा रितीने नैसर्गिकरित्या त्याना विश्राती मिळते. बर्फ वितळल्यावर पुन्हा ती जोमाने वाढतात व्हॅलीतल्या पर्यावरणाचा समतोल येथील निसर्ग सभाळत असतो म्हणूनच हजारो वर्षापासून विविध प्रकारची फुल आपली जीवनसाखळी जिवत ठेवू शकली.

**व्हॅलीतले वन्यजीव -**

व्हॅलीत पूर्वी कस्तुरीमृगाचा सचार मोठ्या प्रमाणात होता परतु कस्तुरीसाठी त्याची शिकार झाल्याने तो आता दुर्मिळ बनू लागला आहे तरीही व्हॅली ऑफ फ्लॉवर्समध्ये कस्तुरीमृग तग धरुन आहेत त्याच बरोबर स्नो लिओपार्ड (हिमचित्ते), अस्वले, जगली मेंढ्या (भारल व ताहर) व इतर अनेक लहान मोठे प्राणी आहेत तसेच पक्ष्यात ब्लॅक बर्ड, ब्राऊन बर्डस, अलपाईन चफ, ससाणे आदी पक्षीही दिसतात ६ नोव्हेंबर १९८२ रोजी उत्तर प्रदेश सरकारने व्हॅलीचा ८७५० हेक्टर परिसर व्हॅली ऑफ फ्लॉवर्स नॅशनल पार्क म्हणून जाहीर केला त्यामुळे येथील फुले आणि वन्यजीवाना सरक्षण मिळाले आहे

**पुष्पघाटीसमोरील धोके**

व्हॅली ऑफ फ्लॉवर्सचा शोध १९३१ साली इग्रज गिर्यारोहक फ्रँक स्मिथ यास योगायोगाने लागला २५४४७ फूट उचीच कॉमेट शिखर मोहिम यशस्वी करून त्याची ६ जणाची टीम खाली उतरत होती. त्यावेळी ते गगेच उगमस्थान शोधत होते पाऊस व धुक्यामुळे ते चुकून व्हॅली ऑफ फ्लॉवर्स मध्ये उतरले व्हॅलीत फुललेली फुले पाहून ते चकित झाले १९३७ साली पुष्पबीज गोळा करण्यासाठी फ्रँक स्मिथ पुन्हा व्हॅलीत आला त्यानतर त्याने 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स' नावाचे पुस्तक लिहिले त्यातून जगाला गढवाल हिमालयातील व्हॅलीचा परिचय झाला त्याअगोदर व्हॅलीत फुलणाऱ्या फुलाबद्दल रामायण महाभारतात उल्लेख आहेत व्हॅलीत अनेक दिव्य औषधी वनस्पती आहेत राम - रावण युद्धात लक्ष्मण मूर्च्छित पडला त्यावेळी हनुमान सजीवनी वनस्पती नेण्यासाठी व्हॅलीत आला होता, अशी आख्यायिका सागतात श्रीकृष्णपूजेसाठी भीमाने व्हॅलीतली नेत्रकमळे

आणून द्रौपदीला दिली होती अशीही कथा आहे भ्युदार व्हॅलीतील स्थानिक लोक नदनकानन या नावाने पुष्पघाटी ओळखीत होते बर्फ वितळले की ते बकऱ्या चरण्यासाठी पुष्पघाटीत जात त्यावेळी पॉलिगानम उगवलेल असे हे गवत बकऱ्या खाऊन फस्त करीत त्यामुळे त्याची वाढ होत नसे फुलझाडांना त्याचा उपद्रव होत नसे, म्हणून फुले जोमाने फुलत. १९८२ साली नॅशनल पार्क जाहीर झाल्यापासून बकऱ्या चरण्यास बदी करण्यात आहे त्यामुळे पॉलिगोनमची गवताळ झुडपे व्हॅलीत प्रचड प्रमाणात वाढली ९ / १० फुट उच वाढणाऱ्या या झुडपामुळे फुलाना सूर्यप्रकाश, क्षार व मुलद्रव्ये मिळेनाशी झाली आहेत, त्यामुळे फुलझाडाच्या फुलण्यावर विपरित परिणाम झाला आहे बकऱ्याच्या लेंड्याच खतही जमिनीत राहिल नाही पॉलिगोनमचा हा फारमोठा धोका व्हॅलीसमोर निर्माण झाला आहे वनखात्याने या गवताचा बदोबस्त मे मध्ये ते लहान असताना बीजावर येण्याच्या अगोदर करणे जरुरीचे आहे

पर्यटकाचा लोंढा आता व्हॅलीकडे वाहू लागला आहे माणूस तिथ घाण यानुसार माणसानी व्हॅलीत घाण करावयास सुरुवात केली आहे एका ठिकाणी आम्हास प्लॅस्टीक पिशव्या, सिगरेट पाकिटे, टिनचे डबे आदी कचरा आढळून आला काही पर्यटक अदाधुदपणे फुले तोडतात फुलझाडे पायदळी तुडवतात व्हॅलीत कुणी रक्षक नसल्याने पर्यटकाना कुणीही प्रतिबध करू शकत नाही यासाठी काहीवर्षे व्हॅली पर्यटकासाठी बद करणे गरजेचे आहे.

अशा अनेक समस्याचे विचारचक्र परतीच्या प्रवासात सुरू झाले या विचारचक्राला गती देत आम्ही बामनगधेरा नाल्याजवळ आलो त्याच थडगार पाणी प्यायलो थोडी विश्राती घेतली मावळती सूर्यकिरणे रातबनवर पडली होती त्याची सुवर्णकांती व्हॅलीत पडल्याने व्हॅलीतले वातावरणही सुवर्णमय झाल ते पाहून आम्ही उठलो फुलाच्या चैतन्यनगरीला अभिवादन केल

माणसाच जीवन पाढऱ्याशुभ्र वाहत्या प्रवाहासारख असाव त्यान सावली देणाऱ्या वृक्षासारख जगाव सुगध वाटणाऱ्या फुलासारख फुलाव हा जीवन सदेश घेऊन आम्ही फुलाच्या चैतन्य नगरीचा निरोप घेतला

•

# ८

# माणा

## सीमेवरील अखेरचं गाव

बदरीनाथवरुन अलकनंदेच्या काठाकाठाने आम्ही तिच्या उगमाकडे निघालो डावीउजवीकडे वृक्षहीन उघडेबोडके नर आणि नारायण पर्वत उभे होते मागे हिमवयांकित शिवालिंग शिखर पुन्हा पुन्हा मागे वळून पहायला भाग पाडत होत आकाशातली निळाई मंत्रमुग्ध करीत होती तर अलकनंदेच्या फेसाळत्या हिरवट प्रवाहाचा नाद मनाला सातत्याने साद घालीत होता अलकनंदेच्या काठावर फुललेला श्रावण तनमन सुखवित होता मनमोहक रंगीबेरंगी दिव्यपुष्पांनी शृंगारलेला अलकनंदेचा किनारा पाहून मन फुलोंकी घाटीत जाऊन पोहोचलं शीतल मन्द सुगंधी पवन मनाला पुलकित करीत होता

या पुण्यपावन धरतीचं पवित्र सौंदर्य उत्कटतेनं पहात पहात पावलं पुढं पडत होती खाली सपुष्प आणि अपुष्प काटेरी वनस्पती उगवल्या होत्या त्या अधून मधून पायांना बोचकारत होत्या एके ठिकाणी एका काटेरी वनस्पतीने कपड्यांना पकडून ठेवले तीपासून सुटका करून घेण्यासाठी खाली वाकलो असताना बिच्छुबुटीच्या पानांनी हाताला दंश केला बराचवेळ हात खाजवत राहिलो पुढे पुढे स्थानिक लोकांची शेती लागली या तुकड्यांच्या पहाडी शेतीत सुहागचावल, बटाटा, मका व इतर पिके होती आपले पर्णहस्त हालवित ही पिकं डुलत होती त्यांच्या पर्णधारांनी दवाच्या मौक्तिकमाला परिधान केल्या होत्या या शेतातून चालत असताना सूर्य नारायण पर्वताच्या डोक्यावरुन वर आला होता पर्णधारेवरील

दवाच्या थेंबावर सूर्यकिरण पडताच ते हिऱ्याप्रमाणे चमकू लागले अतिशय विलोभनीय दृश्य पाहावयास मिळाले

दगडमातीच्या खाचरातून आम्ही सेनादलाच्या चेकनाक्यावर आलो तिथून खाली उतरुन बेली ब्रिजवरुन अलकनदा पार केली पाऊलवाटेन चढ चढून १०६० फुटावरील माणा गावात आम्ही प्रवेश केला भारत चीन सीमेवरील मनुष्यवस्ती असलेल माणा हे अखेरच गाव होय मार्छिया भोटिया या जमातीची स्लेटच्या दगडाची छप्परे असलेली ७० / ८० घरे येथे आहेत गोल चेहऱ्याचे हे लोक मगोलियन वशाचे समजले जातात शतकानुशतके हे लोक या दुर्गम ठिकाणी वस्ती करून राहतात

आम्ही गावात प्रवेश केला, त्या वेळी काही भोटिया स्त्रिया पाठीवरील कडीतून जळणासाठी लाकुडफाटा घेऊन घराकडे परतत होत्या काही वृद्ध व प्रौढ स्त्रिया मेंढ्याच्या लोकरीचे सूत कातीत बसल्या होत्या काही तरुण स्त्रिया आपल्या पोराला छातीशी लावून तन्मयतेने गालिचा विणीत बसल्या होत्या. फळ, फुल, पक्षी वन्यप्राण्याची सुरेख चित्रे त्या गालिचावर रेखाटीत होत्या एका घरासमोर उभे राहून त्याच्या सराईत हाताची ही कारागिरी एकाग्रतेन पहात बसलो. त्या सुदर तरुण स्त्रीने गालिचा जवळ जवळ पूर्ण करीत आणला होता निसर्गाच अवघ लावण्य तिन या गालिचावर साकारल होत या सुदर गालिचासह त्या तरुणीच सौंदर्य कॅमेऱ्यात बद्ध कराव म्हणून डॉ सत्यशील नाईकानी बॅगमधून कॅमेरा बाहेर काढला ते पहाताच ती तरुणी घरात पळाली बाकीच्या स्त्रियानी कॅमेऱ्याकडे पाठ केली लोकरीच सूत कातणाऱ्या प्रौढेला आम्ही फोटो घेऊ देण्याची विनती केली त्यावेळी तिन फोटो काढण आम्हाला आवडत नाही फोटोचा आम्हास काय फायदा ? असा प्रश्न आमच्यासमोर टाकून एखादा गालिचा घेतला तर फोटो काढून देऊ अशी अट मोडक्या तोडक्या हिंदीत बोलून घातली गालिच्याच्या किंमती ७०० पासून २ हजार रुपयापर्यंत होत्या म्हणून आम्ही पक्ष्याची कलाकुसर असलेल एक रगीत पूजासन १०० रुपयास विकत घेतल त्यावेळी आसन कापतानाच दोन भोटिया तरुणींचा डॉ नाईकानी फोटो घेतला त्यावेळी एका तरुणीन डोक्यावर पाढर कापड टाकून तोंड फिरवून कॅमेराकडे पाठ केली सूत कातणाऱ्या प्रौढेचा व दोन वृद्धेचा फोटो घेऊ लागताच एक वृद्धा मागे सरकली दुसऱ्या वृद्धेन तोंड फिरवल गालिचा विणतानाचा फोटो अखेर आम्हास घेता आला नाही

भोटिया तरुणींनी परकरासारख्या रगीत लुग्या व लाब अगरखा घातलेला होता त्याभोवती घोंगडीसारखे जाड काळे वस्त्र लपेटले होते डोक्यावर पाढरे वस्त्र घेतले हाते या पाढऱ्याशुभ्र वस्त्रातून त्याचा विपुल केससभार उठून दिसत होता

त्याच्या गोल चेहऱ्यावरील लालगुलाबी गालावर गुलाब पुष्पाचा टवटवीतपणा होता त्याचा कमनीय बाधा त्याच्या सौंदर्यात अधिक भर टाकीत होता कर्नाटकातील हळेबीड आणि बेलूर येथील नृत्याप्सराच्या शिल्पातले सौंदर्य या भोटिया तरुणीत मला पहावयास मिळाले प्राचीनकाळी यक्ष, किन्नर, किरात व नाग जमातीच्या लोकाच वास्तव्य या ठिकाणी होत भोटिया ही त्याचीच प्रजा असल्याच ते समजतात पुरुष ढिला पायजमा व लोकरीचा अगरखा घालतात तरुण पिढी आता शर्ट पॅन्ट वापरू लागली आहे भोटिया पुरुषापेक्षा स्त्रिया अधिक सुदर दिसल्या

मणी' द्रपुर हे माणाचे प्राचीन नाव मणीभ्रद नावाचा यक्ष येथे राहात होता त्याचा येथे मणीभद्र आश्रम होता या मणीभद्राचा अर्जुनाने युद्धात पराभव केल्याचा उल्लेख महाभारतात आहे त्यानतर या परिसरात बौद्धधर्माचा प्रचार झाला बुद्धाच्या अनेक खडीत शिल्पमूर्ती या परिसरात आढळतात माणातले रहिवासी भोटिया हे ही बौद्धधर्मीय आहेत तिबेटातील थोलिगमठचे लामा हे या भोटियाचे धर्मगुरु आहेत बौद्ध धर्माबरोबरच हे भोटिया लोक हिंदुधर्मालाही मानतात पद्मासनातील बदरीनाथाचे मूर्तीला गौतमबुद्ध आणि नारायण मानून तिची पूजा करतात. माणागावचे समोर अलकनदेच्या पलिकडील किनाऱ्यावर बदरीनाथाच्या मातेचे मदिर आहे वामनद्वादशी व नदाष्टमीच्या दिवशी येथे मोठा मेळा भरतो त्यात भोटिया लोक पारपारिक पोषाख करून नाचतात, गातात, बदरीनाथाचे मातेसाठी स्वत चे हाताने विणलेली साडीचोळी वाहतात

माणातील पुरुष मडळी येथील घटाकर्णाचे मदिराचे आवारात गप्पा मारत होती परत स्त्रिया खाली मान घालून मातत्याने काम करताना आढळल्या

या जमातीत अजूनही स्त्रीप्रधान कुटुब पद्धती प्रचलित आहे भोटिया स्त्री हीच कुटुबाचा प्रमुख आधार आहे ती अतिशय कष्टाळू असून सर्व कामे ती करीत असते डोंगर उतारावरील पायऱ्याच्या शेतीत काम करणे मेंढ्या बकऱ्याना उच पहाडावर नेऊन चारणे, त्याची लोकर काढून सूत कातणे शाली, ब्लॅकेट गरम कपडे गालिचे विणणे झुपकेदार शेपटाची सुरा गाय ते पाळतात. तिला ते चॉवर म्हणतात तिची देखभालही स्त्रिया करतात काही कुटुबात तादळाची दारू बनवून विकतात. सेनादलातले जवान व बदरीनाथला येणारे गुलहौशी पर्यटक ही या दारूची गिऱ्हाईके होत हे सारे उद्योग स्त्रिया करतात कुटुबाचा चरितार्थ चालवतात त्याच्या जीवावर भोटिया पुरुष मडळी आरामात जगत असतात फक्त थोडी पुरुष मडळी सेनादलात काम करतात काही यात्रेकरुसाठी चहाची हॉटेल्स चालवितात मात्र बहुसख्य भोटिया पुरुष दिवसभर गप्पात दिवस

घालवितात. रात्री दारू पिऊन धुद होतात

माणा घाटीत राहणारे मार्च्छिया भोटिया, नीती घाटीत राहणारे नित्वाला अथवा टोच्छा, निलंग घाटीतले खाम्या अशा तीन जमाती भोटियात आहेत सर्वात उच ठिकाणी मार्च्छिया भोटिया राहतात त्याखाली टोच्छाचा व अधिक कमी उचीवर खाम्या राहतात या तिन्ही घाटीतून तिबेटला रस्ते जातात पूर्वी हे लोक बकरी, खेचरावर तादूळ, लोकर, गरम कपडे, मीठ घेऊन तिबेटला व्यापारासाठी जायचे तिबेट व चीनमधील वस्तु घेऊन भारतात परतायचे या घाटीतून तिबेटला जाणारा मार्ग अतिशय दुर्गम आणि प्रचड शिलाखडाने व्यापलेला आहे काही ठिकाणी तो १८ हजार फुटावरुन जातो. बर्फ वितळल्यानतर जून ते ऑक्टोबर अखेर हा व्यापार चालत असे या दुर्गम प्रदेशात खेचर २५ ते ३० शेर, बकरी १५ शेर मेंढा, २० शेर वजनाचा माल सहज वाहून नेतात पूर्वी हिंदू यात्रेकरु मानस सरोवराची यात्रा माणाघाटीमार्गे करीत माणाघाटीच्या पुढे २५ हजार फुट उचीवरील हिमशिखरे आहेत

मार्छिया, टोल्च्छा खाम्पा या भोटियातील तिन्ही जमातीचे लोक तिबेटी, गढवाली व हिंदी भाषा बोलतात टोल्ला मार्छियाच्या हातची रोटी खातात, पण भात खात नाहीत मार्छियाला आपली मुलगी देतात, परतु मार्छियाची मुलगी करीत नाहीत खाम्पाकडे ते चहाशिवाय दुसर काही घेत नाहीत. फार पूर्वी या जमातीत राक्षस विवाह पद्धती अस्तित्वात होती या पद्धतीत मुलीला पळवून नेली जाऊन तिचा वराशी विवाह लावला जाई त्यानतर मुलीच्या पित्याला कन्याशुल्क देऊन त्याची विवाहास मान्यता मिळवली जाई परतु कालमानानुसार त्यात बदल होऊन आता वराचा सौदा करण्यात येतो मुलाच्या पित्याला मुलीचा पिता सौंदर्यानुसार ठरलेले पैसे देऊन नवरा मुलगा विकत घेतो त्याच्याशी मुलीचा विवाह लावतो याच्या विवाह लावण्याच्या पद्धती आणि परपरा खूपच चमत्कारिक आहेत

प्रत्येक घरात अस्वलासारखे केस असलेला अक्राळविक्राळ उच केसाळ कुत्रा असतोच भोटिया त्याला आपल्या कुटुबातील एक सदस्य समजून त्यावर पुत्रवत प्रेम करतात त्याला हिमचित्त्याने खाऊ नये म्हणून त्याच्या गळ्यात अणकुचीदार कडा वर आलेली जाड लोखडाची पट्टी बांधतात हिमचित्त्याने त्याला पकडताच अणकुचीदार कडा हिमचित्त्याच्या दाढेत घुसतात तो कुत्र्याला सोडून देतो कुत्रा मात्र त्याच्यावर तुटून पडतो त्यावेळी माघार घेऊन हिमचित्ता पलायन करतो त्यामुळे मेंढ्या बकऱ्याचेही रक्षण होते ही बलवान केसाळ कुत्री अतिशय साहसी असतात एक कुत्रा एक हजार बकऱ्याचे रक्षण करतो मोठ मोठी ग्लेशियर्स

(हिमनद) पार करताना त्याना खेचराचा फार उपयोग होतो कारण बर्फात अनेक अरुद दऱ्या असतात वरुन त्या मातीने झाकलेल्या असतात त्याना क्रिव्हायसेस म्हणतात त्यावर पाय पडला तर माणूस एकदम खाली जातो त्याला पुन्हा वर काढता येत नाही खेचरे या क्रिव्हायसेस चाणाक्षपणे ओळखतात म्हणून मोठमोठी ग्लेशियर पार करताना प्रथम खेचराना हे लोक पुढे हाकलतात खेचर क्रिव्हायसेस टाळून ग्लेशियरमधून सुरक्षित मार्ग अचूकपणे हेरुन पुढे जाते त्यामार्गावरुन भोटिया जातात व ग्लेशियर्स ओलाडतात

या पहाडी भोटियाच्या विकासाकडे शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. अज्ञानाच्या अधारात चाचपडत असतानाही अतिशय कष्टाळू महिलाच्यामुळे या लोकांना दोनवेळची भाकरी मिळते त्यातच ते आनद मानतात उत्तरप्रदेश सरकारने येथे एक प्राथमिक शाळा काढली आहे परंतु त्याचे पालक मुलाना शाळेत पाठवत नव्हते त्यासाठी शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलाला रोज एक रुपया देण्याची योजना आखण्यात आली शाळेत हजेरी लावल्याबद्दल रोज एक रुपया मिळू लागल्याने प्रत्येक घरातली मुले आता न चुकता शाळेत येऊ लागली आहेत मे ते ऑक्टोबर पर्यंतच भोटिया लोक माणात वास्तव्य करतात नोव्हेंबर पासून येथे बर्फ पडावयास सुरुवात होते त्यावेळी ते पाडुकेश्वर, जोशीमठ, चमोली, गोपेश्वर येथे सहा महिन्यासाठी स्थलातर करून राहतात हिवाळ्यात माणातील त्याची घरेदारे बर्फात गाडली जातात मे मध्ये बर्फ वितळू लागताच सारेजण पुन्हा आपल्या मायभूमीत येतात घराची डागडुजी करतात माणा गावच्या चारही दिशेला घटाकर्णची चार छोटी मदिरे आहे हा घटाकर्ण हिवाळ्यात आपल्या घरदाराचे व गावाचे रक्षण करतो, अशी मार्च्छिया भोटियाची भावना आहे

माणाच्या वर प्रचड शिलाखडामुळे एक निसर्गनिर्मित गुहा तयार झालेली आहे या गुहेत बैठकीचा एक आयताकृती दगड आहे त्यावर बसून व्यासानी १८ पुराणे व महाभारतासारखा अलौकिक ग्रथ लिहिला म्हणून या गुहेला व्यास गुहा म्हणतात या गुहेत सरस्वती व व्यासाची दगडी मूर्ती व काही शिलालेख व मूर्ती कोरलेले दोन दगड आहेत व्यासानी सागितलेले महाभारत श्रीगणेशानी भूर्जपत्रावर लिहून घेतले असे म्हणतात त्याची गणेश गुहा उजवीकडे व्यासगुहेपासून काही अतरावर आहे त्यात श्रीगणेशाची मूर्ती आहे व्यासाची प्रतिभा फुलवणारी ज्ञान सरिता सरस्वती व्यासगुहेच्या डावीकडे पहाडाच्या उदरातून हृदयाचा थरकाप उडविणारा निनाद करीत तुफान वेगाने बाहेर पडते या वेगवान प्रवाहामुळे येथे एक अरुद खोल दरी निर्माण झालेली आहे देह विसर्जनासाठी ही दरी ओलाडून पाडव पुढे मार्गस्थ झाले असे म्हणतात. त्यासाठी भीमाने एक प्रचड शिला आणून

या दरीवर टाकून पूल बनवला त्याला भीमपूल म्हणतात आजही ती शिला अस्तित्वात आहे

व्यासगुहेवरुन खाली उतरुन आम्ही भीमपुलावर आलो. त्यावेळी घनगर्जना करीत कातळाच्या हृदयातून बाहेर पडणाऱ्या सरस्वतीच्या रौद्र आणि रुद्र स्वरुपाचे दर्शन झाले सरस्वतीचा शुभ्र प्रवाह कातळाच्या छातीतून उसळत खाली उडी घेत अलकनदेच्या कुशीत उत्कटपणे विसावत होता या दोन सरिताच हे भावपूर्ण मिलन पाहून भारावून गेलो या सगमाला केशवप्रयाग म्हणतात

भीमपूल ओलाडून आम्ही पुढे मार्गस्थ झालो दगडधोंड्यातून गेलेली चढउताराची वाट तुडवित पाच किलोमीटरवरील व बारा हजार फुटावरील वसुधारा स्थळी जाऊन पोहोचलो लालबुद फळानी लगडलेल्या चेरीजची झाडे रस्त्यात भेटली अनेक दिव्य पुष्पे आणि वनस्पतींचे दर्शन झाले काही सुदर फुलाच्या रोपट्यानी तर खडकावरच आपला जीवन ससार माडला होता ठायी ठायी आम्हास निसर्गाची अद्‌भूत लिला पहावयास मिळाली चारशे फुट उच असलेल्या पहाडाच्या छातीतून खाली कोसळणारी नयनमनोहर दुग्धधार पाहताच चालण्याचे सारे श्रम क्षणात विसरुन जातात या जलधारेचे तुषार अगावर पडू लागताच साऱ्या शरीरात शीतलतेचा सचार होतो बेगुमानपणे खाली कोळसणाऱ्या तिच्या जलधाराच सौंदर्य नजर खिळवून ठेवत. ग्लेशियरच्या बर्फाळ पुलाखालून धीरगभीर निनाद करीत अलकनदेच्या भेटीसाठी ही जलधार धावत जाते. या वसुधारेचे तुषार अगावर पडले की आपली तीर्थयात्रा सफल झाली, अशी भोळ्याभाबड्या यात्रेकरुची श्रद्धा आहे म्हणून आपल्या यात्रेची सफलता परिक्षण्यासाठी बद्रीनाथधामपासून ८ किलोमीटरची दुर्गम वाट चालत काही साहसी यात्रेकरु याठिकाणी येतात या पवित्र निर्मळ वसुधारेजवळ भीष्मादी अष्टवसूनी तपश्चर्या केल्याचा पुराणात उल्लेख आहे येथून अलकनदा ग्लेशियर व पर्वतराजीच विलोभनीय दर्शन घडत

आकाशात घुसलेली उच पर्वतराजी, त्यावरून खाली कोसणारे जलप्रपात, रगीबेरगी फळेफुले प्रसवणाऱ्या खुरट्या वनस्पती, आखुड शेपटीचे हिमउदीर, हिमचित्ते व अस्वले, जगली मेंढ्या व अलपाईन चफ या वन्यजीवाच आढळणार अस्तित्व, भोटियाच रगीतसगीत मुक्त जीवन यामुळे गढवाल हिमालयातील माणाच्या या उजाड परिसरालाही आगळेवेगळे सौंदर्य प्राप्त झाले आहे

•

# ९

# आदिबदरी आणि योगबदरी

अनतकाळापासून युगानुयुगे बदरीनाथाची पाचमंदिरे हिमालयाच्या कुशीत आजही उभी आहेत पचबदरी या नावाने ती प्रसिद्ध आहेत कर्णप्रयाग पासून १५ किलोमीटरवर राणीखेत मार्गावर १६३० मीटर उचीवर आदिबदरीचे शिल्पाकृत मंदिर आहे कृतयुगात बदरीनाथाची येथे पूजा होत असे म्हणतात जोशीमठ पासून ८ किलोमीटरवर गोपेश्वर मार्गावर (उची १७४० मीटर) अनीमठ येथे वृद्धबदरीचे मदिर आहे येथे त्रेतायुगात बदरीनारायणाची पूजा करीत जोशीमठ पासून १८५७ मीटर उचीवर व २० किलोमीटर अतरावर पाडुकेश्वर नावाचे गाव आहे या ठिकाणी द्वापारयुगात बदरीनाथाचे पूजन केले जात होते

निसर्गातील अनेक घडामोडींमुळे काळाच्या ओघात आदिबदरी, वृद्ध बदरी योगबदरी या ठिकाणच्या मदिराचे महत्त्व कमी झाले कलियुगात आज अलकनंदेच्या किनारी असलेल्या विशाल बदरीची पूजा होते याठिकाणी बहुसख्य यात्रेकरु जातात हे विशालबदरीचे मदिर ३१३३ मीटर उचीवर आहे. कलियुग सपेपर्यत श्री बदरीनारायणाची याठिकाणी पूजाअर्चा होणार आहे कलियुगानतर काही नैसर्गिक घडामोडी होतील त्यामुळे नर - नारायण पर्वत एक होऊन विशालबदरीकडे जाणारा रस्ता बद होईल त्यानतर दिव्ययुग पृथ्वीवर अवतरेल त्या दिव्ययुगात जोशीमठ - मलारी रस्त्यावर २८ किलोमीटरवर भविष्यबदरीची मूर्ती आकार घेत आहे दिव्ययुगात श्री बदरीनाथाची पूजा व यात्रा या ठिकाणी होणार आहे असे कर्णप्रयागच्या एका सस्कृत पडिताने आम्हास सागितले पूर्वी पायी मार्गाने या पचबदरीची यात्रेकरु यात्रा करीत पचबदरीची यात्रा अधिक पुण्यदायी व फलदायी

असते, असे त्या सस्कृत पडिताचे मत आहे परतु मोटारमार्ग झाल्याने यात्रेकरु विशाल बदरी वगळता इतर मदिराकडे फिरकत नाहीत त्यामुळे आज ही जुनी मदिरे ओस पडली आहेत भविष्यबदरी हे मदिर ३८६२ मीटर उचीवर आहे या मदिरानी अधिकाधिक उची गाठली आहे आदीबदरी (१६३०), वृद्धबदरी (१७४०), योग बदरी (१८५७), विशाल बदरी (३११३) व दिव्ययुगात पुजिली जाणारे भविष्यबदरी ३८६२ मीटर उचीवर आहे

कर्णप्रयागवरुन रामनगरकडे जाणाऱ्या बसने सकाळी आम्ही आदिबदरीला आलो निसर्गाच्या कुशीत वसलेला आदिबदरीचा परिसर अतिशय रम्य व शात वाटला येथे यात्रेकरूची गडबड नव्हती एक प्रकारची गूढ शाती येथे नादत होती उच दगडी चौथाऱ्यावर एकूण चौदा मदिरे येथे आहेत प्रत्येक मदिरे अप्रतिम शिल्पकलेन नटलेल आहे आदिबदरीसह सर्व पंचबदरी मदिराचा जीर्णोद्धार आद्य शकराचार्यांनी केल्याची माहिती आदिबदरी मदिराच्या पुजाऱ्याने सागितली

या चौदा मदिरापैकी एक मदिर सर्वात उच आहे ते आदिबदरीचे प्रमुख मदिर होय या मदिरात आदिबदरीची काळ्या पाषाणाची प्रसन्न श्यामल मूर्ती आहे बदरीनाथ म्हणजेच भगवान विष्णू प्रसन्न मुद्रेची त्याची उभी मूर्ती गदा, शख, चक्र व दिव्य अलकारानी अलकृत केलेली आहे मूर्तीवरील अलकाराच कोरीव काम अतिशय उठावदार व नेत्रदीपक आहे. मूर्तीत भव्यता आणि दिव्यत्वाचा सुरेख सगम साधलेला आहे मूर्तीसमोर गरुडाची मूर्ती आहे हात जोडलेल्या अवस्थेतली ही' मूर्ती तत्कालीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमूना आहे विष्णू मदिराशिवाय इतर मदिरात लक्ष्मीनारायण, महिषासूर मर्दिनी, श्रीगणेश, गौरी याच्या सुदर मूर्ती आहेत या चौदा मंदिरातील प्रत्येक खाबावर घटपल्लवच्या प्रतिमा कोरण्यात आल्या आहेत प्रवेशद्वारावर गगा यमुना, नृत्यागना वाद्य वाजविणाऱ्या मदनिका, सिहमुख, श्रीगणेश, शखचक्र इत्यादी प्रतिमा कोरण्यात आलेल्या आहेत योगासनात बसलेल्या व ध्यानधारणेत एकाग्रचित्त झालेल्या स्त्रीपुरुषाच्या प्रतिमाही कोरण्यात आलेल्या आहेत प्रत्येक प्रतिमाचे चेहऱ्यावर प्रसन्नता आणि पवित्रतेच्या छटा उमटलेल्या दिसतात मदिराचे गर्भगृह शिल्पाकृतीनी नटलेलं आहे मंदिराचे कळसही चित्तवेधक आहेत आदिबदरीच्या १३ ही मदिराच वास्तुशिल्प प्रतिनिधी शैलीच आहे

अदिबदरी मदिराचे आवारात व मदिरात पूर्वी अनेक सुदर मूर्ती होत्या त्या बहुतेक चोरीला गेल्या आहेत परदेशात या कलात्मक मूर्तीना चागली किंमत येते मागे श्रीविष्णूची मूर्ती चोरट्यानी पळवण्याचा प्रयत्न केला. जागृत ग्रामस्थामुळे तो अयशस्वी झाला अशी माहिती पुजाऱ्यान दिली

## योगबदरी

जोशीमठ वरुन निघून आम्ही एक तासात पाडुकेश्वरला पोहचलो  अलकनंदेच्या किनारी वसलेलं हे एक सुदर गाव  नजर पोहोचणार नाही अशा उच शिखरानी गाव वेढल आहे  याठिकाणी पाडुराजा, कुती आणि माद्री या आपल्या पत्नींसह राहात होता  पाचही पाडवाचा जन्म याच ठिकाणी झाला असे म्हणतात  पाचही पाडवाना घेऊन कुती हस्तीनापुरला गेली  माद्री अखेरपर्यंत येथेच पाडुराजा जवळ राहिली  भगवान विष्णूनी या स्थळी तपध्यान केले  योगसाधना केली  त्यावरुन याठिकाणी असलेल्या बदरीनाथाचे मदिराला ध्यानबदरी वा योगबदरी म्हणतात  द्वापार युगात बदरीनाथाची पूजा याच ठिकाणी केली जाई  पाडुराजाही योगबदरीची पूजा करीत होता

पाडुराजाचा अत झाल्यावर माद्री सती गेली  गधमाधन पर्वतात जाताना पाचही पाडवानी बराचकाळ आपल्या या जन्मभूमीत वास्तव्य केले  पाडुराजा आणि माद्रीचे आत्म्यास शाती लाभावी यासाठी येथे शास्त्रीय क्रियाकर्म केले  पाडूराजाचे स्मरणार्थ येथे महादेवाचे एक मदिर बाधले  ते मदिर पुढे पाडुकेश्वर नावाने प्रख्यात झाले  पाडुकेश्वरा भोवती असलेल्या वस्तीला पाडुकेश्वर असे नाव पडले

पाडुकेश्वर व योगबदरीची मदिरे रस्त्याच्या खाली उजवीकडे अकलनदेच्या किनारी आहेत  रस्त्यावरून आम्ही खाली उतरलो  पाडुकेश्वर गावाच्या बोळामधून मदिराजवळ आलो  गावात बहुसख्य गढवाली रजपुत ब्राह्मण व भोटिया जमातीची वस्ती आहे  एका मोठ्या पडक्या दरवाजातून मदिराचे प्रागणात पोहचलो  पाडुकेश्वर आणि योगबदरीची दोन्ही मदिरे भव्य आहेत

योगबदरीचे मदिरात बुनियाल नावाचा वेदपाठी पुजारी भेटला  त्यान मोठ्या आत्मीयतेन मदिराबद्दल माहिती सागितली  मदिरात योगबदरीची विशाल मूर्ती आहे  ही मूर्ती गडकी नदीतल्या निळसर झाक असलेल्या काळ्या पाषाणातली असल्याच पुजाऱ्याने सागितले  श्रीकृष्ण मदिरात अष्टधातुची श्रीकृष्णाची अतिशय विलोभनीय मूर्ती आहे  ही मूर्ती द्रौपदीच्या पुजेतली असून पाडवाना ती इद्रान दिली असल्याचे तो म्हणाला  या मूर्तीच्या मुखमडलावर फाकलेली दिव्यत्वाची प्रभा पाहून मन कृष्णमय झाल  भक्तीभावान भारावून गेल

प्राचीन मदिरे मला गूढ ईश्वरी शक्तिची केंद्रस्थाने वा प्रतिके वाटतात  या मदिराची रचनाच अशी काही अलौकिक असते की आपला आवाज गर्भगृहात घुमतो. त्या आवाजाने मन पवित्र व स्वच्छ होते  या प्राचीन मदिरात नादब्रह्माची लय साधण्यात आलेली आहे  हा नाद हृदयातील ईश्वराची ओळख करुन देणारा आहे  बारा ज्योर्तिलिगाच्या मदिरातील गर्भगृहे याच कल्पनेतून बाधण्यात आली

आहेत त्यात मातेच्या गर्भाची सकल्पना आहे मातेच्या गर्भात जसा अधार असतो त्याला एकच द्वार असते या गर्भात सुप्तावस्थेतला जीव शातपणे पहुडलेला असतो प्राचीन मदिराच्या गर्भगृहाची योजनाही तशीच असते त्याला एकच प्रवेशद्वार असते गर्भगृहात प्रवेशताच मनाला सुख शाती आणि समाधान लाभते ही प्राचीन मदिरे आज उध्वस्त अवस्थेत आहेत याबद्दल खत वाटते

ध्यानबदरीचे श्रीकृष्ण मदिरातून आम्ही पाडूकेश्वर महादेवाचे मदिरात प्रवेशलो या मदिरात पाडुकेश्वर महादेवाची मूर्ती आहे डाव्या बाजूला लक्ष्मीनारायण, उद्धवजी आहेत उजव्या बाजूला द्रौपदी, श्रीदेवी व भूदेवीच्या मूर्ती आहेत पाडुकेश्वर महादेवाच्या मूर्तीखाली नवरत्नजडित स्फटिकलिग असल्याचे पुजाऱ्याने सागितले

पाडुकेश्वर व ध्यानबदरी (श्रीकृष्णमदिर) या दोन्ही मंदिरे कत्यूरी शैलीत उभारण्यात आली आहेत कळसावर बभ्रुवाहनचे शिल्प आहे दगडी अशोकस्तभ आहे चार दिशेला चार सिहाची शिल्पे आहेत. या मदिराना तटबदी होती. परंतु ती आता ढासळली आहेत प्रवेश द्वारापाशीच फक्त दोन भिती उभ्या आहेत.

ज्याठिकाणी पडुराजाबरोबर माद्री सती गेली, त्याठिकाणी माद्रीची दगडी समाधी बाधण्यात आली आहे परतु अलकनंदेच्या वाळूत ती गाडली गेली आहे, असे बुनियाल म्हणाला पाडुकेश्वर महादेवाचे सभागृहात एक पितळी घटा आहे त्यावर उर्दूत लेख लिहलेला आहे १६२० साल एवढाच शब्द वाचता येतो ही घंटा अकबर बादशहाचे वतीने राजा जयसिहाने अर्पण केली आहे

पाडुकेश्वरात याशिवाय अनेक मदिरे आहेत भगवान विष्णुचे खजिनदार श्रीकुबेर, नदादेवी, भगवान विष्णू, देवीमाता, जानकीमाता मदिरेही प्रेक्षणीय आहेत दरवर्षी पाडुकेश्वराला जानकीमेळा भरतो तसेच दर पाच वर्षांनि नदाष्टमीला देवीमातेचा पालखी सोहळा असतो ही पालखी भुकटी या नावाचे वाद्याचे गजरात बदरीधामला प्रयाण करते.

आदिबदरी आणि योगबदरी (ध्यानबदरी) या दोन्ही प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार आद्य शकराचार्यांनी केला ही प्राचीन मदिरे भारतीय सस्कृती आणि शिल्पकलेचा वारसा आहेत. हे मदिरे त्यातील मूर्ती ह्याच रक्षण करून हा वारसा आपण जतन केला पाहिजे

•

# १०

# भगीरथ तेरी गंगा मैली

जगाच्या पाठीवर गगेइतकी पवित्र नदी दुसरी कुठलीच नाही हजारो वर्षापासून कोट्यावधी भारतीयाना जीवनदान देत गगेचा प्रवाह वाहतो आहे भारतीय वैदिक हिंदू सस्कृतीचा जन्म गगाकिनारीच झाला वृक्षाच्या सावलीत ती विकास पावली. गगेने हिंदु सस्कृतीला प्रगतीची वाट दाखवली. नद, चन्द्रगुप्त, मौर्यसारखे महापराक्रमी राजे आणि त्याच्या राजधान्या गगेच्या काठी उभ्या राहिल्या व्यास, वसिष्ठ व वाल्मिकी सारखे द्रष्टे ऋषीमुनि व कालिदासासारखे महाकवि याच्या प्रतिभा गगाकिनारीच फुलल्या त्यातून रामायण, महाभारत, वेदपुराणे, शाकुतल, मेघदूत यासारखा ज्यष्ठ महाकाव्य व वदपुराण आदी ग्रथनिर्मिती झाली गंगा किनाऱ्यावरील बोधिवृक्षाखाली गौतमबुद्धाला ज्ञानाचा साक्षात्कार झाला

भारतीय सस्कृतीशी गगेचे अतूट नाते जडलेले आहे जन्मापासून मृत्यूपर्यंत हिंदू माणसाच्या जीवनात गंगेला महत्त्वपूर्ण स्थान आहे हिंदू सस्कृतीचे तिचे ममेतेने पालनापोषण केले आहे हिंदू सस्कृतीचे वैभवही तिने पाहिले आणि विनाशही पाहिला स्वतत्र भारताचे प्रथम पतप्रधान कै. पडित जवाहरलाल नेहरु म्हणतात

"गंगा ही सर्वार्थाने भारताची नदी आहे गंगेवर भारतीय जनतेचे अलोट प्रेम आहे गगानदीच्या भोवती भरतवशाची अनेक सस्मरणे गुफली आहेत. भारताच्या आशा आकाक्षा, जयपराजय याची गगा ही साक्षीदार होय भारतमातेच्या विजयाची गाणी तिने ऐकली पराभवाचा आक्रोशही तिने ऐकला गगा भारताच्या प्राचीनतम् सस्कृतीचे व जीवन प्रवाहाचे प्रतिक होय हा जीवन प्रवाह मात्र बदलत राहातो त्याचे प्रतिक मात्र गगाच राहाते"

आपल्या पूर्वजानीही गगेचे महत्त्व जाणले होते गगा ही भारतीय हिंदू संस्कृतीचा प्राण होय गगेने वाहायचे थाबवले तर भारतवर्षाचे वाळवटात रुपातर होईल, मानवी सस्कृती नष्ट होईल याची जाणीव त्याना होती म्हणूनच स्वर्गीय गंगेला पवित्र मानून विविध पौराणिक ग्रथातून गंगेची स्तुती केली आहे गगेचे महत्व प्रतिपादन केले आहे

गगा गगेति या ब्रूयात, यो जनना शतैरपि ।
मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोके स· गच्छति ॥

गगेच्या स्मरणाने व तिच्या जलस्नानाने मनुष्यास सर्व पापकर्मातून मुक्ती मिळून त्याला स्वर्गलोक प्राप्त हातो. अशा या पुराणातील सस्कृत ओळींचा अर्थ प्रत्येक हिंदूच्या मनात आजही हीच भावना असलेली आहे त्याच भावनेने गगाकिनारी वसलेल्या तीर्थस्थळांकडे गगास्नानाचे पुण्यपदरात पाडून घेण्यासाठी धावतो आहे

भगीरथाने भरतवर्षाला सुजलाम, सुफलाम, करण्यासाठी महत्प्रयासाने पृथ्वीवर प्रवाहित केले त्या पवित्र गगेचे पावित्र्य राखण्याचे मात्र आपणास विस्मरण झाले आहे भौतिक सुखाच्या शोधापायी पवित्र गगा आम्ही इतकी अपवित्र करुन टाकली आहे, की प्रत्येक भारतीयाची मान शरमेने खाली जावी नद्याना अस्वच्छ करणे हा जणू आज आम्हा प्रत्येक भारतीयाचा जन्मसिद्ध हक्कच बनला आहे याच मनोवृत्तीने पछाडून आम्ही स्वच्छ नदीचे काठ नरकाचे किनारे बनविले. स्वार्थापायी जगले सपासप कापून वन्यजीवन उध्वस्त केले निसर्गाला विद्रूप बनविले स्वातत्र्य स्वैरपणे उपभोगून निसर्ग विनाश घडवून आणला त्यातून पवित्र गगाही सुटली नाही

मध्यहिमालयात उत्तरकाशी जिल्ह्यात गगोत्री पासून अठरा किलोमीटरवर तीन हजार आठशे ब्याण्णव मीटर उचीवर गोमुख येथून गगा उगम पावते. चौदा हजार फुटावरील छत्तीस किलोमीटर लांबीच्या भागीरथी नावाच्या ग्लेशियर मधून गगा खाली वाहात येते भगीरथाचे प्रयत्नामुळे ती स्वर्गातून पृथ्वीवर आली, म्हणून देवप्रयागपर्यंत भागीरथी या नावाने ओळखले जाते. हिमालयाच्या अगाखाद्यावरुन खाली उतरत उतरत हरसिल, गगनानी, भटवाडी, मणेरी, गगोरी, उत्तरकाशी टेहरी मार्गे ती देवप्रयागला येते चार हजार चारशे मीटर उचीवरील सतोपथ सरोवरातून निघालेल्या अलकनदा देवप्रयागात भागीरथीत सामावून जाते या दोन पवित्र नद्याचा विशाल प्रवाह पुढे गंगा नावाने पुढे धावत धावत हृषीकेशच्या मैदानात उतरतो येथूनच गगा प्रदुषित करणाऱ्या कृतघ्न मानवी कृत्यास प्रारंभ होतो

[illegible] मोहून टाकते. परंतु हृषीकेश व हरिद्वारच्या मैदानातून वाहणारी मलिन गगा पाहून

मन खिन्न होते हृषीकेशमध्ये नागरीवस्तीतील मैलापाणी व भेल या कारखान्याचे रासायनिक अशुद्ध पाणी गंगेत सोडले जाते. ती जसजशी पुढे पुढे जाते तस तशी अधिकाधिक प्रदुषित अपवित्र होते. हरिद्वारच्या मैदानात आल्यावर अधिक घाण तिच्या प्रवाहात सोडली जाते. शौचकुपे, सांडपाणी व कारकान्याचे घाण पाणी मिळून रोज हरिद्वारात पन्नास हजार लिटर दुषित पाणी गगेत सोडले जाते याशिवाय मृतात्म्याच्या शेकडो टन अस्थिची भर गगेत पडतच आहे

गोमुखापासून अडीच हजार किलोमीटरचा प्रवास करुन प बगालमध्ये गंगासागर येथे गगा समुद्रास जाऊन मिळते. मार्गात तिला सत्तर ऐंशी नद्या मिळतात. या नद्यांमध्ये त्यांच्या काठावरील नागरी वस्तीतील घाणही शेवटी गगेला येऊन मिळते हृषीकेश, हरिद्वार, अलाहाबाद (प्रयाग) वाराणशी, (काशी) गया, ही गगेच्या तीरावरील प्रमुख तीर्थस्थाने या तीर्थस्नानामधील निवासी आणि यात्रा करणारे यात्रेकरु याचा गगा प्रदुषित करण्यात मोठा सहभाग आहे मृतात्म्याला शाती मिळावी या धार्मिक भावनेने अस्थिविसर्जनासाठी हजारो यात्रेकरु सबध भारतातून काशीला येत असतात त्यामुळे राज पाचशे किलो हाडाची भर गगेत पडते तसेच वाराणशीत दरवर्षी पाच हजार प्रेते गगेच्या प्रवाहात सोडली जातात विविध रोगानी दगावलेली बालके व मृत जनावरे ही गंगेत सोडली जातात. वाराणशीतील शौचालये, स्वच्छतागृहे व इतर हजारो टन मलयुक्त घाण पाणी मोठ्या साठ सत्तर नाल्याच्या द्वारे गगेत सोडण्यात आलेले आहे हृषीकेशपासून गगासागरापर्यंत अस्थि विसर्जनाचे क्रियाकर्म चालू असते याशिवाय गगाकिनाऱ्यावरील हजारो देवळातील सडलेली फळेफुले व केरकचरा निर्माल्य म्हणून गगेत टाकला जातो त्याचेच वजन लाखो टनात असते

पाटणा, कानपूर, वाराणशी, अलाहाबाद, कलकत्ता अशी दोनशे लहानमोठी शहरे गंगा किनारी वसलेली आहेत या सर्व शहरांची एकूण लोकसंख्या सुमारे पधरा कोटीच्या आसपास असेल या पंधरा कोटी लोकाची सर्व घाण गंगेत येऊन मिसळते. एकट्या पाटणा शहरातील तीन कोटी गॅलन घाण पाणी गंगेच्या प्रवाहात सोडले जाते याशिवाय उत्तरप्रदेश बिहार पश्चिम बगाल मधील हजारो कारखान्याचे कोट्यावधी गॅलन रासायनिक टाकाऊ पाणी गगेत प्रवाहीत होते.

नदीला पवित्र मानून तिची पूजा करणाऱ्या प्राचीन ऋषीमुनींच्या भरतखंडातील आजच्या भारतीयानी चालवलेली गगेची विटबना पाहून ऋषीमुनी व राजा भगीरथ स्वर्गात अश्रू ढाळित असतील गगेच्या विटंबनेची ही करुण कहाणी सागावी तेवढी थोडीच आहे आम्ही गंगाउगमापासून गंगासागरापर्यंत प्रवास केला. उगमापाशी दिसणारी पारदर्शी अवखळ नितळ गगा काशीत प्रदुषणाच्या रोगाने

मलिन झालेली पाहून डोळ्यातून टपटप अश्रूबिंदू गगेच्या प्रवाहात पडले गोमुख गगोत्रीच सौंदर्य पाहताना ज्या डोळ्यातून आनदाश्रू बाहेर पडले होते, त्याच डोळ्याना गगेच विद्रुप रूप पाहून नरकाश्रू ढाळावे लागले जी पवित्र गगा हजारो वर्षापासून भारतीयाच जीवन फुलवित आहे आज देशातल्या एकूण जमिनीपैकी चाळीस टक्के जमिन गगाजलावर भिजते आहे गगानदी म्हणजे निसर्गाने भारतीयाना दिलेले फार मोठे वरदान होय. परतु आपण गगेचे ऋण विसरलो कृतघ्नपणाने वागून तिचे पवित्र नैसर्गिक रुप अपवित्र व कुरुप करुन टाकले या कृतघ्न मानवी प्रवृत्तीतून गगेतील प्रदुषणाचा राक्षस अक्राळविक्राळ रुप धारण करीत आहे त्याने गगाकाठच्या वृक्षवल्लरींचा बळी घेतलाच आहे, त्याचबरोबर गगेतील जलचराचाही विनाश घडवून आणला आहे अनेक विषारी पदार्थ व सडलेल्या कचऱ्यामुळे कुजलेल्या प्रेतामुळे, मृतदेहाच्या अस्थिमुळे सूर्यप्रकाशाची किरणे पाण्याच्या तळाशी पोहोचणे अशक्य झाले आहे त्या कारणान पाण्यात प्राणवायू निर्माण होण्याची प्रक्रिया थाबली आहे पाण्यात कार्बनडायक्साइडचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे, त्यामुळे मासे व इतर जलचर प्राण्याचे जीवन सपुष्टात येऊ लागले आहे गगेच्या पाण्यात अनेक औषधी गुणधर्म आहेत त्याचे परिक्षण केल्यावर परदेशी जलतज्ञाना हे गुणधर्म आढळून आले. गगाजलप्राशनाने अनेक व्याधी बऱ्या होत काही मोगल बादशहा गगेशिवाय दुसरे पाणी पीत नसत. गगाजल आणण्याची त्यानी खास व्यवस्था केली होती व्याधीग्रस्त माणसे, गगेच्या किनाऱ्यावर येऊन राहात या किनाऱ्यावरील शुद्ध हवा खाऊनच ते रोगमुक्त होत परतु गगेच्या पाण्याबरोबरच सुदर गगाकिनारे माणसानी गलिच्छ करुन टाकले आहेत गुदमरुन टाकणाऱ्या दुर्गंधीमुळे या किनाऱ्यांवर उभे राहणेही मुष्कील झाले आहे पृथ्वीवरील जीवनसत्वयुक्त पवित्र औषधी जल म्हणून परदेशी शास्त्रज्ञानी गगाजलाचा गौरव केला. ते गगाजल प्रदुषणाच्या भस्मासुराने औषधी गुणधर्म नष्ट करुन घाण करुन टाकले आहे की काशी, पाटणा, कलकत्ता, येथील गंगाजलात स्नान करण्याची इच्छा होत नाही केलीच तर आरोग्याला धोका निर्माण होईल की काय अशी भिती वाटू लागते या गगाजल प्राशनाने पदरात पुण्य पाडण्याऐवजी एखादी व्याधी जडेल की काय ? असे वाटू लागते. बुहसख्य शहरात गंगेचे पाणी पिण्यासाठी वापरले जाते त्यामुळे एखादे दिवशी माणसानीच निर्माण केलेला प्रदुषणाचा भस्मासूर मानवाचे मानगुटीवर बसून माणसाचे आरोग्य धोक्यात आणल्याशिवाय राहणार नाही

आज बहुसख्य शहरात साडपाणी शुद्धीकरणाचे प्रकल्प नाहीत नैसर्गिक साधन सपत्तीचा स्वैरपणे उपयोग करून जास्तीत जास्त नफा मिळवण्याकडे बहुसख्य

कारखानदाराची प्रवृत्ती असते जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यासाठी लागणारी मोठी रक्कम खर्च करण्याची त्याची तयारी नाही ज्या नदीचे पाणी कारखानदाराच्या नफ्यात कोट्यावधी रुपयाची भर घालते, त्या जोरावर हा श्रीमत धनिक सुखाच्या गादीवर लोळत ऐश्वर्य भोगतो त्या जीवनदायिनी नदीचे प्राविञ्य राखण्यासाठी पैसा खर्च न करण्याची त्याची प्रवृत्ती हा फार मोठा कृतघ्नपणा होय काही दानशूर धार्मिक कारखानदार मदिरे, बाधून आपल्या दानशूरपणाचा गवगवा करतात त्यानी चैतन्यमयी नद्या शुद्धीकरणासाठी हा पैसा खर्च केला तर त्याच्या पदरात अधिक पुण्य पडेल

प्रत्येक राज्यात प्रदुषण नियत्रण मडळे आहेत त्या मडळाच्या अध्यक्षपदी ज्याला प्रदुषण म्हणजे काय कळत नाही, अशाच माणसाची निवड करण्यात येते निवडणुकीत उपयोगी पडणाऱ्या आपल्या माणसाची कोणत्यातरी खुर्चीत सोय व्हावी, हाच या निवडीमागे हेतू असतो भ्रष्टाचाराच्या गटारात लोळण्याची सवय जडल्याने नदीत दूषित पाणी सोडून त्याची गटारे बनविणाऱ्या कारखान्यावर परिणामकारक प्रभावी कारवाई होत नाही त्यामुळे प्रदुषणग्रस्त प्रवृत्तीला आळा बसत नाही ज्या शहरात जलशुद्धीकरण प्रकल्प आहेत, ते नीट चालत नाहीत अनेक यत्रणा बद आहेत राज्यकर्ते व कर्मचारी वर्ग त्याबाबत उदासीन आहेत भारतातील सर्वच राज्यात अशी अवस्था आहे

ज्या देशातील नद्या स्वच्छ त्या देशातील नागरीकाच आरोग्य चागल असा सकेत आहे फ्रान्स, हॉलड, ब्रिटन रशिया अमेरिका या देशातील नद्या कारखानदारी मुळ दूषित बनल्या होत्या परतु त्या देशातील सरकारे व नागरीक यानी वेळीच उपाययोजना करुन नद्याच शुद्धीकरण केल नद्या शुद्धीकरणाचा या देशाचा अनुभव लक्षात घेऊन त्याच्या सहकार्याने पतप्रधान इदिरा गाधी यांनी १९८४ साली गगा, शुद्धीकरणाची मोहिम आखली होती परतु आकस्मित झालेल्या त्यांच्या हत्येमुळे ही मोहिम लोंबकळत राहिली. राजीव गाधी यानी पतप्रधान पदाची सूत्रे हाती घेताच १९८५ साली गगा प्राधिकरण स्थापनेची घोषणा केली या प्राधिकरण समितीत उत्तरप्रदेश, बिहार, व पश्चिम बगालचे मुख्यमत्री व मुख्य सचिवाचा समावेश करण्यात आला प्राधिकरण समितीच्या अनेक बैठका झाल्या. गगा शुद्धीकरण प्रकल्पाची शास्त्रशुद्ध पायावर आखणी करण्यात आली या प्रकल्पासाठी सातव्या पचवार्षिक योजनेत दोनशे पन्नास कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली त्यापैकी जवळ जवळ साठ सत्तर कोटी रुपये खर्च करून गगा शुद्धीकरण योजनेस गती देण्यात आली आहे त्यानुसार चाळीस शहराचे दूषित साडपाणी गंगेत सोडण्यास प्रतिबध करण्यात आला आहे ज्याठिकाणी साडपाणी शुद्ध करण्याचे प्रकल्प

नाहीत, त्या ठिकाणी नव्याने ते उभारण्यात येत आहेत जलशुद्धीकरणाच्या नादुरुस्त यत्रणेची दुरुस्ती करण्यात येत आहे. गगा शुद्धीकरणाचे काम युद्धपातळीवरून सुरू झालेले आहे प्राधिकरणाच्या प्रत्येक प्रत्येक बैठकीत शुद्धीकरण कार्याचा आढावा घेतला जातो बैठकीला कै पतप्रधान ना राजीव गाधी स्वत हजर राहात या ऐतिहासिक कार्यास गती व दिशा देण्याच्या दृष्टीने प्रकल्प अधिकाऱ्याशी चर्चा करीत या गगा शुद्धीकरण प्रकल्पाबाबत सहकार्य लाभावे यासाठी काही देशाबरोबर तात्रिक करारही करण्यात आले आहेत या प्रकल्पासाठी जागतिक बँकेने भरघोस आर्थिक मदत देऊ केली आहे

गगा शुद्धीकरणाचे मोहिमेचा शुभारभ हृषीकेश हरिद्वार पासूनच करण्यात आलेला आहे १९८६ साली हरिद्वारात झालेल्या कुभमेळ्याच्या सुमूहुर्तावर गगा सफाईच्या माहिमेचा शुभारभ करण्यात आला हृषीकेशमध्ये मुनिको रेतो या ठिकाणी दहा मीटर व्यासाची पाईप लाईन असलेले पपिंग स्टेशन उभारण्यात आले नाल्यातून येणारे घाण पाणी गगेत सोडण्यास प्रतिबध करण्यात आला आहे त्यासाठी सत्तर लाख रुपये खर्च करण्यात आले हरिद्वारात चाळीस नाल्यातून दूषित पाणी गगेत सोडण्याचे जवळ जवळ बद करण्यात आले आहे घाणपाणी वाहून नेऊन ते शुद्ध करण्यासाठी पधराशे किलोमीटरच्या साठ पाईप लाइन्स नव्याने टाकण्यात आल्या आहेत त्यासाठी नव्याने वीस पपिग स्टेशन्स उभारण्यात आली असून त्यावर पन्नास लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत पतप्रधान कै राजीव गाधीच्या नेतृत्वाखाली भगीरथाची मैली गगा शुद्ध करण्याचे काम वेगाने करण्यासाठी तत्रज्ञ भगीरथ प्रयत्न केला आहे

लोकानी प्रेते नदीत सोडू नयेत म्हणून काशीत (वाराणशी) भव्य विद्युतदाहिनी उभारण्यात आली आहे बेवारशी प्रेतेही येथे दहन केली जातात परतु या प्रेतदाहिनीत प्रेत जाळणे धर्मबाह्य असल्याचा प्रचार स्वार्थी पडे करीत आहेत मृत शरीराला थोडासा अग्नीडाग देऊन प्रेत नदीत सोडण्याचे व मृताच्या नातेवाईकाकडून वाटेल तसे पैसे उकळण्याचे कार्य हे पडे वशपरपरेने करीत आले आहेत त्यातून त्याना लाखो रुपयाचे उत्पन्न मिळते त्याच्या उत्पन्नावर गदा आल्याने लोकाच्या अधश्रद्धेच्या फायदा घेऊन विद्युतवाहिनी विरुद्ध अपप्रचार करीत आहेत या विद्युतदाहिनीविरुद्ध त्यानी मोर्चेही काढले आहेत विद्युतदाहिनीत प्रेत दहन केले तर मृतात्म्यास शाती मिळणार नाही, त्याचा आत्मा तडफडत राहातो हा त्याचा अपप्रचार अद्यापि चालूच आहे मृतात्म्याला शाती मिळवून देणाऱ्या या ठेकेदाराच्या प्रचाराला धार्मिक अधश्रद्धाळू लोक भुलतात त्यामुळे या विद्युतदाहिनीबद्दल लोक साशक आहेत. त्यामुळे मोठ्या सख्येने लोक विद्युतवाहिनीचा उपयोग करीत

नाहीत धार्मिक भावनाचा प्रश्न असल्याने शासनालाही काही कारवाई करता येत नाही

शहरातील साडपाण्याचे शुद्धीकरण करुन ते पुन्हा गगेत न सोडता कॅनॉलद्वारे शेतीस पुरविण्याची योजना ठिकठिकाणी कार्यान्वित होत आहे परतु हे घाणपाणी समजून शेतकरी ते शेतीसाठी वापरण्यास तयार नाहीत अशा अनेक समस्या या मोहिमेसमोर निर्माण झालेल्या आहे. ही मोहिम ज्या गतीने पूर्ण व्हावयास हवी त्या गतीने मोहिमेत अनेक अडसर निर्माण झाले आहेत

या सर्व समस्या व जलशुद्धीकरणाचा अभ्यास करण्यासाठी काशीतील हिंदू विश्वविद्या यात भव्य आधुनिक गगा प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे प्रदुषित क्षेत्राचा अभ्यास करुन गगा शुद्धीकरणाचे महत्त्व लोकाना पटवून देणे आदीबाबत या प्रयोग शाळेत काम केले जाते उगमस्थानी व गगेच्या मार्गात प्रचड वृक्षतोडीने हजारो एकर जमीन गगेच्या प्रवाहाने वाहून जाते ही हजारो टन माती मैदानी प्रदेशात पसरुन गगेचे पात्र उथळ बनले आहे त्यामुळे पुराचे पाणी नागरी वस्तीत शिरून वित्त व प्राणहानी होते यावर उपाय म्हणून गगेच्या काठी मोठ्या प्रमाणात झाडे लावण्याची मोहिम या प्रयोग शाळेच्या वतीने राबविण्यात येत आहे साडपाण्यापासून शेतकऱ्याना गोबर गॅस प्लॅन्ट उभारून देण्याचे कार्य या प्रयोगशाळेच्यावतीने सुरू करण्यात आले आहे

कोणत्याही सार्वजनिक कामात शासनाबरोबर जनतेचा सहभाग हवा त्याशिवाय तो यशस्वी होऊ शकत नाही मग तो वृक्षसवर्धनाचा कार्यक्रम असो की गगा शुद्धीकरणाचा असो त्यासाठी अगोदर लोकजागृती होणे जरुरीचे आहे हिंदू धर्मात नद्याना पवित्र मानून त्याची मातेप्रमाणे पूजा करण्यात येते त्यामागे नदीचे पावित्र्य राखण्याची प्रेरणा आहे परतु कर्मकाडी धर्ममार्तडानी धर्माची खरी शिकवण बाजूला ठेऊन स्नानविधीसारख्या बाह्य उपचारास अवास्तव महत्त्व दिले गगेत स्नान करणे जरूर पुण्यदायी आहे परतु तिच्या काठी घाण करणे म्हणजे तिची विटबना असून ते महापातक होय हा विचार जनमानसावर बिंबवला पाहिजे नद्या स्वच्छ राखणे आरोग्यदृष्ट्या कसे योग्य आहे, हे सामान्य माणसाला पटवून दिले पाहिजे त्यातून गगा शुद्धीकरणाची मोहिम केवळ सरकारी न बनता लोकाची चळवळ बनावी त्यातून ही मोहिम अपेक्षेपेक्षा लवकर यशस्वी होईल

●

# ११

# गोपेश्वर महादेव – हिमालयातील प्राचीन मंदिर

गढवाल मधील मध्य हिमालयाच्या कुशीत अनेक प्राचीन शिल्पमदिरे विखुरलेली आहेत कालाशी झगडत काही मदिरे आजही उभी आहेत प्राचीन भारतीय शिल्पकलेचा इतिहास या मदिरांच्या रुपान गढवालने शतकानुशतके जतन करून ठेवला आहे. चमोली जिल्ह्यातलं गोपेश्वर महादेव मदिर अशाच प्राचीन मंदिरापैकी एक मदिर होय.

या मदिराची प्राचीनता अवलोकन करण्यासाठी वाकडी वाट करून आम्ही चमोलीवरुन उजवीकडे वळालो. वनश्रीने नटलेला सर्पाकृती वळणाचा हा घाटरस्ता चढताना मनाभोवती अतर्बाह्य प्रसन्नतेचा सुगंध दरवळत होता. या गंधाच्या धुंदीत १० किलोमीटरचा घाट चढून आम्ही १३९८ मीटर उचीवरील घाटमाथ्यावर जाऊन पोहोचलो त्यावेळी डोंगर उतारावर वसलेल्या गोपेश्वर या सुदर नगरीने आमचे स्वागत केले. या घाटमाथ्यावरून चमोली आणि अलकनदेच अतिशय नयनमनोहर दृश्य दिसत होत.

१९६० साली चमोली जिल्ह्याची स्थापना करण्यात आली सुदर गोपेश्वर नगराची या जिल्ह्याच प्रमुख ठिकाण म्हणून निवड करण्यात आली निसर्गाच्या हृदयात वसलेल गोपेश्वर मला खूपच आवडलं गढवालमधील या छोटेखानी नगराची रचनाच मुळी अतिशय कलात्मक आहे. कडेकपारीत वसलेली माणसाची घरे दुरुन पाखराच्या घरासारखी सुदर दिसतात पुण्या - मुबईसारखी सिमेंट कॉंक्रीटची जगले येथे नाहीत माणसाची गर्दी नाही परतु वृक्षवल्लरीची गर्दी आहे त्यामुळे कुणालाही या नगरीत राहण्याचा मोह व्हावा असच गोपेश्वर रम्य आहे. चमोली

जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणापेक्षा येथे असलेल्या गोपेश्वर महादेवाच्या प्राचीन मदिरामुळे ते प्रसिद्ध पावले आहे या मदिरावरूनच या नगराला गोपेश्वर नाव पडले. केदारनाथ आणि गोपेश्वर महादेव ही गढवालमधील दोन मदिरे अतीप्राचीन आहेत, असा पुराणवास्तु सशोधकांचा दावा आहे

गोपेश्वर नगरीच सौंदर्य डोळ्याखालून घालीत आम्ही भुकहरताल बस सर्व्हीस स्टॅन्डवर आलो तेथे मदिराचा रस्ता एका गढवालीस विचारला त्याने दाखविलेल्या रस्त्याने आम्ही चालू लागलो बैठ्या दुमदार बाजारपेठेतून पुढे गेलो खाली मदिराच्या प्रागणात उतरलो गोपेश्वर महादेवाच भव्य मदिर नजरेसमोर आले त्यावेळी ए ्रा अनामिक गुढ शक्तीने मनाचा कब्जा घेतला तन्मय होऊन मदिराच अवलोकन करू लागलो मंदिराची एकूण रचना व त्याची अवस्था यावरूनच त्याची प्राचीनता जाणवत होती. विशाल द्वारातून सभागृहात प्रवेशलो त्यातील आयताकृती दगडाच्या भितीवर अनेक शिलालेख कोरलेले आढळले काही दगडावर ते उलट्या अक्षरात दिसले यावरून या मदिराचा जिर्णोद्धार झाल्याच जाणवलं कारण प्राचीन काळी वापरण्यात आलेले दगडच पुन्हा त्यासाठी वापरण्यात आले ते पुन्हा रचताना उलट्या बाजूने रचण्यात आले असावेत त्यामुळे पाली व सस्कृतमधील शिलालेखाची अक्षरे उलटी दिसतात तसेच हवामानाचा परिणाम होऊन मदिराच्या बाधकामाचे दगडही अतिशय झिजलेले आहेत सभागृहात नदी आणि जटाधारी सूर्याच्या दगडी मूर्ती आहेत छतावर कमळाकृती कोरीव काम आहे

सभामडपातून आम्ही गर्भगृहात प्रवेश केला तेथे मद दगडी दिवे तेवत होते त्या प्रकाशात अतिशय झिजलेली शकराची प्राचीन पिंड होती आजूबाजूला काळ्या पाषाणातल्या काही शिल्पाकृती होत्या गर्भगृहात बसलेले मदिराचे पुजारी श्री सुरेशानद नोगार यानी पिंडीमागील मूर्ती पार्वतीची, डाव्या उजव्या हाताला आकाश भैरवाच्या सागर राजाच्या ज्येष्ठ पुत्राची मूर्ती असल्याचे सागितले आज नदाष्टमी असल्याने भक्तानी घटात उगवलेले धान्य गोपेश्वर महादेवाला अर्पण केल्याचे सागितले त्याचप्रमाणे गोपेश्वर महादेव मदिराचा इतिहास सागितला

गोपेश्वर महादेव हे सहा हजार वर्षापूर्वीचे प्राचीन मदिर आहे सदर मंदिर राजा भगीरथाचे आजोबा राजा सगर यानी बाधल्याचे सागून सुरेशानदानी त्या सबधीची पुराणकथा सागितली

या मदिर आणि भोवतालचा सारा परिसर घनदाट जगली गुलाबवेलींनी व्यापलेला होता गोपेश्वराजवळच्या वैतरणीकाठी पार्वतीने शिवप्राप्तीसाठी कठोर तप केले ते सिद्ध होऊन भगवान शकर प्रसन्न झाले त्याठिकाणी गोपेश्वर मदिरानतर

वैतरणीकुड आणि सिद्धेश्वर महादेव मदिर निर्माण झाले शिव आणि शक्तीचे प्रथम मिलन या गोपेश्वराच्या स्थळी असलेल्या जगली गुलाब वाटिकेत झाले कालातराने हरिद्वारमधील राजा दक्षाच्या यज्ञप्रसगी भगवान शकराचा घोर अपमान झाला हा पतीचा अपमान सहन न झाल्याने पार्वतीने यज्ञात उडी टाकून बलिदान केले भगवान शकर दु खाने व्याकुळ झाले सती पार्वतीचे प्रेत घेऊन ते या आपल्या प्रिय स्थळी आले शिव व शक्तीचे प्रथम मिलन झालेल्या या स्थळी येताच त्याच मन शात झाल. येथे अनंतकाळ तपश्चर्या केली त्याच्या घोर तपसाधनेचे प्रभावाने इद्रासन डोलू लागले म्हणून भगवान शकराचे तपोभगासाठी इद्राने कामदेवास पाठविले तल्लीन शकरानी कामदेवाच भस्म याच ठिकाणी केल

सहा हजार वर्षापूर्वी राजासगर हिमयात्रा करत करत या स्थळी आला त्यावेळी या गुलाब जगलात एक गाय खाली दुग्धधारा सोडताना आढळली त्याला त्याच नवल वाटल त्यान त्या स्थळी मजूर लावून खोदकाम केल त्यात तेथे त्याला शिवलिग आढळल त्याच रात्री त्याला स्वप्नात दृष्टात झाला स्वप्नातल्या त्या दिव्यशक्तीने त्याला सागितले, "ही भगवान शकराची तपोभूमी आहे त्यांच्याच कृपेने तुझा नातू गगेला स्वर्गातून पृथ्वीवर आणील त्यामुळे तुझ्या वशाच नाव अमर होईल "

या वरदानान राजा सगर अतिशय प्रभावित झाला त्यान भगवान शकराच्या तपोभूमीवर हिमाद्री शिल्पकलेन नटलेल अतिशय भव्य अस मदिर उभारल गोपाच्या गाईमुळे या स्थानाचा शोध लागल्यान त्याचं नाव पडल गोपेश्वर महादेव या परिसरातलाच दगड वापरुन या मदिराच बाधकाम करण्यात आल सगराचा ज्येष्ठपुत्र या मदिराच्या बाधकामाची खास देखरेख करीत होता त्याचा अकस्मात मृत्यू झाला त्याच्या स्मृतीप्रित्यर्थ राजाने मदिरात त्याच्या मूर्तीचीही स्थापना केली पुत्रशोकामुळे पुढे राजा सगरानेही राजत्याग केला. वानप्रस्थाश्रम स्वीकारून गोपेश्वर महादेवापाशी येऊन त्यान तपाचारण केले

सुरेशानदानी सागितलेली ही पुराणकथा आम्हाला पुराणकाळात घेऊन गेली ही कथा मला अतिशय गूढरम्य वाटली

गर्भगृहातून भारावलेल्या मानान आम्ही बाहेर आलो मदिराला प्रदक्षिणा घालत मदिराच सौंदर्य अवलोकन केल हिमालयातील वादळ वाऱ्याला तोंड देत मदिर चागल्या अवस्थेत उभ होत तरी अनेक ठिकाणी वातावरणाचा परिणाम होऊन मदिराचे दगड अतिशय झिजले होते मदिराच्या डाव्या हाताला २० फुट उचीचा एक अष्टधातुचा भव्य त्रिशूळ गाडलेला आहे या त्रिशूळाशेजारी एक १२ इच रुदीची एक धारदार व जाड फरशी आहे हा त्रिशूळ बाणासुराचा व फरशी परशुरामाची

असल्याचे सुरेशानदाची सागितले त्याबाबतचा पौराणिक इतिहास सागताना ते म्हणाले, "श्रीकृष्णपुत्र अनिरुद्ध आणि बाणासूर कन्या उषा याचे प्रेम जुळले. त्यांनी प्रणयविवाह करण्याचा निर्णय घेतला त्यास बाणासूराने विरोध करून प्रत्यक्ष भगवान कृष्णाशी युद्ध पुकारले भगवान शकरानी श्रीकृष्णास सहाय्य केले त्याच्या मायाप्रभावाने पराक्रमी बाणासुर हतबल झाला. आकाशातून त्याच्या हातातला त्रिशूळ खाली पडला तो हा त्रिशुळ तसेच महाप्राक्रमी परशुराम यानी शस्त्रसन्यास स्वीकारला त्याप्रसगी आपले शस्त्र फरशी त्याने भगवान शंकराना अर्पण केली ती ही फरशी होय "

ही पुराणकथा ऐकत आम्ही या त्रिशूळाची बारकाईने पाहणी केली असता त्यावर प्राचीन पाली लिपीत काही मजकुर लिहिलेला होता मजकुरातील अक्षरे बरीच झिजली होती याबाबत बोलताना सुरेशानद म्हणाले,

"नेपाळच्या पूर्वेकडील मालावशीय अनिकपाल नावाच्या राजाने गोपेश्वरापर्यंतचा भाग जिकला होता त्या विजयाच्या स्मरणार्थ त्याने या त्रिशूळावर शिलालेख कोरला आहे "

मदिराच्या भोवती अनेक खंडित कमळाकृती दगडी मूर्ती पडलेल्या आहेत जटाधारी सूर्य, चौमुखी शिवलिग याचा त्यात प्रामुख्याने समावेश आहे मदिराच्या डाव्या बाजूला चतुरानन गणपतीचे छोटे मदिर आहे त्याभोवती जगली गुलाबवेली वाढलेल्या आहेत या वेलींना मे जून मध्ये बहर येतो परतु या ठिकाणी ऑगस्ट महिन्यातही या वेली फुललेल्या दिसल्या या गुलाबवेली वर्षभर फुलतात तशी माहिती आम्हास मिळाली हा निसर्गातील एक चमत्कारच म्हणावयास पाहिजे मदिराभोवती सपूर्ण तटबदी असून आतमधे साधूसत व यात्रेकरु याना राहण्यासाठी ओवऱ्या बाधलेल्या आहेत या ओवऱ्या व तटबदी अनेक ठिकाणी कोसळल्या आहेत मदिरामागे देवदाराच्या लाकडात कोरीव काम केलेले दोन सुदर वाडे आहेत दर्शनी भागावर प्राणी पक्ष्याचे कोरीव काम केलेले आहे एक वाडा सपूर्ण रिकामा होता त्यातील चौकात पावसाच्या पाण्याचे तळे साचले होते तर दुसऱ्या वाड्यात प्राथमिक शाळा भरली होती वर माडीवर सिंहासनादी ऐतिहासिक वस्तू होत्या या वाड्यात पूर्वी गोपेश्वराचे दर्शनासाठी येणारे राजे व राजघराण्यातील लोक वास्तव्य करीत तसेच केदारबदरीनाथचे रावळ राहात होते

गोपेश्वर महादेवाचे हे प्राचीन मदिर केदारनाथ सारखेच कत्युरी शैलीचे आहे हत्तीवर सिंह आरुढ झाल्याचे दगडीशिल्प मदिरावर आहे पाठीमागे नागराजाची शिल्पाकृती आहे याशिवाय मयूर, हत्ती या प्राण्याच्या प्रतिकृती आहेत

गोपेश्वर प्राचीनकाळी महत्त्वपूर्ण कलाकेंन्द्र होत. या परिसरात गुप्तकालीन बौद्धशिल्पाचे अनेक प्रकार पहावयास मिळतात गोपेश्वर महादेवाच्या मदिरापासून काही अतरावर प्राचीन चण्डी मदिर (दुर्गा मदिर) आहे या ठिकाणी नटराजसिंह, कलशधारिणी गगा, कंचुकधारी सूर्य आदी सुदर शिल्पे आहेत

गोपेश्वरातील शिल्पकलेला प्राचीन व गुप्तपूर्वकालीन शिल्पकलेचा वारसा लाभलेला आहे या शिल्पात पर्वतीय वेशभूषा तर साकारलेली आहेच, शिवाय आद्य, क्लासिकल, रिती व मध्य हिमाद्री शैलीचा सुरेख सगम गोपेश्वरातील शिल्पकलेत साधलेला आहे प्राचीन गोपेश्वर महादेवाचे मंदिर त्याचे प्रतिक होय

●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
७६९
अ. क्र. ९७३७४
२४।३।८०

## १२

# केदारनाथ : कस्तुरीमृग पालन केंद्र

श्रावण भाद्रपदातील हिरवे दिवस होते गढवाल हिमालयातला निसर्ग बहरून आला होता. गोपेश्वरावरून आम्ही या बहरलेल्या निसर्गाकडे प्रयाण केले. वैतरणीवरील पूल पार केला देवलधारवरुन निसर्गाच्या कुशीत विसावलेल्या मडल गावात प्रवेशलो सुहागचावलने (घंगोरा) फुललेली हिरवीगार शेती सर्वत्र दिसत होती. मौसबी सारखी फळे धरलेली माल्टाची झाडे शिवारात होती अनतगगेवरील पुल ओलाडताच घनदाट अरण्यातून आमचा प्रवास सुरू झाला सपूर्ण रस्ता चढणीचा होता हिरव्यागच्च झाडाच्या गर्द छायेमुळे या रस्त्यावरचा प्रवास कमालीचा आनददायी वाटत होता. येथूनच कस्तुरीमृग अभयारण्याला प्रारभ झाला होता रस्ता सुनसान होता कुणी माणूस भेटायला तयार नव्हता कुठेही माणसाची साधी झोपडीही दिसत नव्हती परतु वृक्षराजी व वन्यपक्ष्यानी मात्र आमची चागली सोबत केली राखाडी रगाचे डोळे असलेला स्लेटी हेडेड पॅरट, सुवर्ण गरुड, सप्तरगाचा मोनॉल प्लीझन्ट, जगली कोंबड्या, कोतवाल, बुलबुल, लाल तोंडाची माकडे, (बॉनेट मकी) यानी प्रत्येक टप्प्यावर दर्शन दिले तुरेवाले हुद हुद (हुप्पी) तर बरेच अतर आमच्या समोर धावत असायचे त्याच्या या धावण्याचे गूढ काही आम्हास उकलता आले नाही एका उच पहाडावर जगली बकऱ्याचा कळप चरताना दिसला १३०८ मीटर उचीवरून आम्ही अधिकाधिक उचीवर चाललो होतो जसजस अधिकाधिक वर जाऊ लागलो तसतसा विविध वृक्षवल्लरीचा ताटवा वाढू लागला पुढे पुढे तर त्याची अधिक गर्दी झाली. अनेक वृक्षाची ओळख पटत नव्हती त्यातूनही साग, वनपिंपळ, तुतू, बाबू ओळखता आले खाली

फुललेल्या वनस्पतीच व झुडपाच दाट आच्छादन होत त्यात पत्थरफोड, हाडसाधी, आकाशवेल, विहगवायू या वनस्पतींचा समावेश होता.

झाडाच्या ताटव्यातून आम्ही पुढे मार्ग आक्रमण करीत होतो मध्येच झाडाच्या मुळाना स्पर्शून येणारा अतिशय नितळ व पारदर्शी पाण्याचा झरा भेटला त्याचं पाणी पिण्याचा मोह आवरता आला नाही त्या झऱ्याच्या पाण्यावर चतुराची लहान लहान पिले आपले इवले इवले, पारदर्शी पख फडकवीत तरगत होते त्याच्या पारदर्शी शेपटीवरील हिरवा निळा रग उन्हात पाचूसारखा चमकत होता या चतुराची चतुराई पहात आम्ही बराच वेळ झऱ्याकाठी घालवला तोच त्या चतुराची आई धावत तेथे आली. त्या पिलाना आमच्यापासून दूर घेऊन गेली या झऱ्याच्या भोवती शखाकृती निळ्या रगाची अगणित फुले फुलली होती पाच पाकळ्याची ही निळी ज्योत वाऱ्यान डुलताना पाहून आमचं भान हरपून गेल या फुलामधील मध चाखण्यासाठी विविध रगी फुलपाखरे आणि मधमाशाची तर येथे यात्रा भरली होती ज्या दाट झाडीतून हा झरा वाहात येत होता, त्या झाडीकड लक्ष गेल त्यावेळी हिरव्यागर्द शेवाळाचं वस्त्र त्या झाडानी परिधान केल होत. काही झाडाच्या फाद्यावरुन शेवाळ दाढीसारख काली लोंबत होत हे वृक्ष वर्षानुवर्षे तपास बसलेल्या साधुपुरुषासारखे भासले. उजव्या हाताच्या दरीकडे नजर टाकली, त्यावेळी पहाडाच्या छातीतून पाढऱ्याशुभ्र दुग्धधाराचे प्रवाह खाली कोसळत होते त्या पहाडाच्या पलिकडे मेघ दबा धरुन बसले होते सात हजार फुट उचीवर पोहोचताच हे मेघ एकदम आमच्या डोक्यावर गोळा झाले. चार शितोडे खाली टाकून ते पळाले पुन्हा उन्ह झाडाना कवटाळून बसली त्यावेळी सार जगल ताजतवान झाल्यासारख दिसल. रानगध दरवळू लागला या गधान धुद होऊन कुठ एखादा कस्तुरीमृग दिसतो का ते पहात पुढची वाटचाल करीत होतो कस्तुरीमृग दर्शनासाठीच या घनदाट जंगलात आम्ही प्रवेशलो होतो

दुपारी तीन वाजता आठ हजार फुटावरील कांचुला खरक या ठिकाणी पोहोचलो हा सारा परिसर पांगारा, अगारा, काचला पाईन खरसु, मोरु, बाज आरव या हिमालयीन वृक्षराजींनी बहरला होता या काचुला खरकच्या माथ्यावर पोहोचताच रस्त्याच्या कडेला कस्तुरी प्रजनन केंद्राचा फलक दिसला आणि आमच्या आनदाला पारावर राहिला नाही. दुर्लभ कस्तुरीमृगाच्या दर्शनाच भाग्य आम्हाला अखेर या ठिकाणी लाभणार होत.

रस्त्याच्या उजवीकडचा लोखडी दरवाजा आम्ही स्वत.च उघडला. दरवाज्यात पसरलेल्या बी एच सी पावडर मध्ये पाय बुडवले केंद्राच्या कर्मचाऱ्याशिवाय इतरांना प्रवेशास मनाई असलेला बोर्ड वाचूनही आम्ही आत प्रवेशलो प्रवेशद्वारात

१ / २ बड्या इमारती होत्या पण त्याला कुलुप लागली होती जवळपास कुणी नव्हत दगडाच्या पायऱ्या उतरुन आम्ही खाली गेलो तर तिथे चोहोबाजुनी २० फुट उचीच्या जाळ्या लावलेल्या आढळल्या तिथ दोनतीन कामगार जाळ्या दुरुस्तीच काम करीत होते. त्याना या केंद्रातील कस्तुरीमृगाविषयी विचारलं. तेव्हा त्यान सागितल की, या ठिकाणी दहा एकर जागेला जाळीच कपाऊण्ड केल त्यात अर्ध्या अर्ध्या एकराचे २० भाग पाडून मध्ये जाळ्याचं पार्टीशन केल आहे त्या प्रत्येक ब्लॉकमध्ये १ / १कस्तुरीमृग आहे तुम्ही जाळ्याच्या कडेन फिरुन त्याना पाहू शकता बिबळ्या सारख्या प्राण्यान उडी मारून आत प्रवेश करू नये यासाठी जाळ्या २० फुट उची पर्यंत उभारल्या आहेत

त्या कामगाराने सागितल्यानुसार जाळ्याच्या कडेन बनविण्यात आलेल्या चढउताराच्या दगडी रस्त्यावरून आम्ही चालू लागलो चार ब्लॉक पाहिले पण त्यात कस्तुरीमृग आम्हास न दिसल्याने नाराज झालो या ब्लॉकमध्ये झाडाझुडपाची गर्दी होती आमच्या चाहुलीने कस्तुरीमृग या गच्च झुडपात दडले असावेत प्रत्येक ब्लॉकमध्ये ३ फुट उचीच मचाण जमिनीवर उभारण्यात आलं होत त्यावर कस्तुरीमृगासाठी गवत अथरण्यात आल होत

आम्ही पाचव्या ब्लॉकच्या जाळीसमोर आलो आणि आनदून गेलो झुडपाची गर्दी नसलेल्या या ब्लॉकमधील मचाणावर एक कस्तुरीमृग उभा राहून गवत खाण्यात मग्न होता. आम्ही अतिशय एकाग्रचित्ताने व शातपणे या कस्तुरीमृगाच सौंदर्य पहात बसलो मधूनच तो कस्तुरीमृग पायान तोंड खाजवित होता तर कधी ओठावरून जीभ फिरवित होता. त्याच्या तोंडातून दोन पाढरे शुभ्र सुळे बाहेर आले होते तो नर होता नराच्याच नाभीपाशी कस्तुरीची गाठ असते त्याच्या शरीरावर राखाडी दाट केस होते उची दोन फुट व लाबी ३ फुट असावी डॉ सत्यशील नाईकाच्या कॅमेऱ्याचा आवाज होताच त्याने कान टवकारले. डोळ्याच्या बाहुल्या ताणून तो आमच अवलोकन करू लागला त्याच्या स्वप्नाळू नेत्रात मूर्तिमंत कारुण्य आणि भिती उतरलेली दिसली. आमच्याकडे पुन्हा एकवार पाहून त्याने मचणावरुन खाली उडी मारुन तो त्या अर्ध्या एकराच्या जागेत इकडून तिकडून उड्या मारत लपण्यासाठी जागा शोधू लागला. अतिशय वेगान धावून त्याच उड्या मारण्याच चापल्य आणि कौशल्य पाहून आमच्या नेत्राचे पारणे फिटले त्याला लपण्यासाठी जागा नसल्याने तो आमच्यासमोर सारखा इकडून तिकडे उड्या मारत धावत होता. त्याचे पुढचे पाय आखूड आणि मागचे लाब होते शेवटी तो मचाणाच्या खाली जाऊन उभा राहिला त्याला जास्त त्रास न देण्याच्या हेतूने आम्ही पुढच्या ब्लॉककडे चालू लागलो. १९८४ साली गगोत्रीस केदारतालच्या वाटेवर

कस्तुरीमृगाचे दूरुन दर्शन मला घडले होते. परंतु इतक्याजवळून त्याला मी प्रथमच पाहात होतो

आम्हाला पहाताच खाली असलेल्या घरातून एक खाकी कपड्यातला वनरक्षक धावत आमच्याकडे आला हे कस्तुरी पालन केंन्द्र पाहण्यास प्रेक्षकांना खुले नाही. आत येण्यास मनाई आहे हा नियम त्यान आम्हास ऐकवला आम्ही खूप दूरवरन पुण्यावरुन आलो आहोत. हे सागताच त्या सहृदयी वनरक्षकाने इतर ब्लॉकमधील कस्तुरीमृही दाखविले या कस्तुरीमृगाची खुर अतिशय मजबुत होती त्याच्या पायात विलक्षण ताकद असते सापाच आणि कस्तुरीमृगाच हाडवैर आहे साप दिसला की कस्तुरीमृग त्याला खुरान ठेचून मारतो. या परिसरात १॥ फुट लाबीचे विषारी साप आहेत. अनेक वेळा या सापाना कस्तुरीमृगानी ठेचून मारले आहे. एका कस्तुरीमृगान तर मारलेला साप खाल्ल्याची विचित्र घटना येथे घडली तसेच साप व कस्तुरीमृग लढतीत एक कस्तुरीमृग सर्पदशाने मृत झाला. अशी माहिती वनरक्षकाने दिली

एका ब्लॉकमध्ये दोन महिन्याच कस्तुरीमृगाच पिलू आईच्या अंगावर दूध पित होतं. त्यावेळी त्या कस्तुरीमृगाच्या मादीची भावसमाधी लागली होती ते कस्तुरीमृगाच्या जीवनातली ती तन्मयता पाहून आम्ही भारावून गेलो येथील कस्तुरीमृगाना अतिशय सुदर अशी नावे ठेवण्यात आली आहेत आम्ही प्रथम पाहिला त्याचं नाव हिरा होतं बाकी नराची पन्ना, लव्ह, टिपु, श्यामु, रामू, अशी नावे आहेत तर माद्याची प्रगती, क्राती, आशा, संध्या ही नावे ठेवली आहेत सध्या या कस्तुरीमृग पालन केंद्रात ६ नर ४ माद्या व २ पिले मिळून १२ कस्तुरीमृग आहेत.

कस्तुरीमृग पालन केंद्र पाहिल्यावर आम्ही एका झाडाखाली बैठक मारली कस्तुरीमृग आणि या ब्रिडींग फॉर्म विषयी वनरक्षकाने सविस्तर माहिती सागितली मात्र आपल्या नावाचा उल्लेख न करण्याबद्दल त्यान आम्हास विनती करून बजावल.

१९५२ साली इंडियन वाईल्ड लाईफ बोर्डाने दुर्मिळ होत चाललेल्या तेरा वन्यजीवाची यादी केली त्यात कस्तुरीमृगाचाही समावेश आहे कस्तुरीमृगांचे सरक्षण झाले नाही तर पृथ्वीवरील हा सुदरप्राणी नष्ट होईल अशा इशाराही बोर्डान देवून ठेवला आहे कस्तुरीचा १५० ते २०० विविध प्रकारच्या औषधात उपयोग करण्यात येतो. सुगधातही उपयोग करतात त्यामुळे औषध व सुगध निर्मिणाऱ्या कारखान्यासाठी जगातून मोठ्या प्रमाणात कस्तुरीची मागणी आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी कस्तुरीमृगाची अदाधुद हत्या झाली. दिवसेंदिवस कस्तुरीमृग

दुर्मिळ होऊ लागला १९७२ साली वन्यजीवन सरक्षण कायदा करण्यात आला खास कस्तुरीमृग आढळणारा केदारनाथचा ९६७ २ चौरस किलोमीटर परिसर केदारनाथ कस्तुरीमृग अभयारण्य म्हणून जाहीर करण्यात आला. या अभयारण्यात साबर ७०० आहेत पहाडी बकऱ्याची सख्या ८०० आहे ७० बिबळे वाघ आहेत याशिवाय कोल्हे, तरस, जायंट स्क्वीरल, अस्वले, पट्टेरी वाघ ही आहेत पुर्वी कस्तुरीमृग हजारो होते परतु चोरट्या शिकारीने त्याची सख्या २५० पर्यंत खाली आली आहे जगाच्या बाजारात कस्तुरीला भारी किंमत येत असल्याने कस्तुरी स्मगलिग करून परदेशात पाठविली जाते त्यासाठी पहाडी लोक कस्तुरीमृगाची चोरटी शिकार अद्यापही करीत आहेत

कस्तुरीमृग हा कळपाने कधीच राहात नाही. एकट्यानेच तो फिरत असतो तो अतिशय वेगवान धावपटु आहे तो सहसा सापडत नाही. मोनॉल हा त्याचा मित्र होय काही धोका आढळल्यास तो झाडावरुन विशिष्ट आवाज काढून त्याला धोक्याचा इशारा देतो मोनॉलचा आवाज ऐकताच कस्तुरीमृग अधिक उचीवर सुरक्षित ठिकाणी जातो. कस्तुरीमृग ठराविक मार्गावरुन ओळब्याच्या सरळ रेषेत सरळ चालतो उच कडा चढताना त्याचा तोल अजिबात ढळत नाही शिकारी त्याचा येण्याजाण्याचा मार्ग लक्ष ठेऊन शोधून काढतात. ज्यावेळी कस्तुरी पिकते त्यावेळी त्याची लघवी व विष्ठाही सुगधित असते या विष्ठेवरुनही त्याला शोधतात १५ / २० जण त्याला घेरतात धावून धावून तो थकतो त्यावेळी त्याला गोळी घालतात कस्तुरीमृग अतिशय भित्रा असतो माणसाला तो खूपच घाबरतो त्याच काळीज खूप नाजुक असत त्याला जिवत पकडल तर तो लगेच प्राणत्याग करतो

१५ डिसेंबर ते १५ जानेवारी हा कस्तुरीमृगाचा प्रणयराधनेचा काळ असतो या काळातच कस्तुरीमृग नराच्या नाभि कस्तुरीची गाठ पिकते. दूरवर कस्तुरीचा सुगध दरवळतो या सुगधाने नर कामातुर होऊन भटकत असतो नरामधील कस्तुराच्या सुगधाने मादीही उद्दिपीत होऊन त्याच्या शोधात असते. एकमेकाची भेट होताच ते १५ ते ३० दिवस एकमेकाच्या सहवासात राहतात. कधी कधी दोन नराची एकाच मादीशी भेट झाल्यास नराची लढत जुपते. या प्रणयराधनेच्या काळात नराची विष्ठा सुगधित असते त्यावरुन शिकारी कस्तुरीमृगाचा माग काढतात अनेक युक्त्या आणि क्लुप्त्या योजून कस्तुरीमृगाची शिकार करतात मादीला नरावर, कोसळणाऱ्या सकटाचं ज्ञान असतं म्हणून ती खुरान खड्डा खणून त्यात नराची विष्ठा टाकून त्यावर माती लोटते विष्ठा लपवून ठेवते ''

वनरक्षकाने वरील माहिती सागितली. विश्वविख्यात प्राणी तज्ज्ञ श्री. मायकेल ग्रीन कस्तुरीमृगाच्या अभ्यासासाठी केदारनाथ परिसरात येऊन राहिला होता.

त्याच्याबरोबर हा वनरक्षक फिरला होता त्यामुळे कस्तुरीमृगाच्या विषयी त्याने बरीच माहिती मिळवली होती •

कस्तुरीमृगाची वशवृद्धी व्हावी त्याच्या प्रणयराधनेच्या व गर्भधारणेच्या काळात त्याना सरक्षण मिळावे. या हेतूने श्री मायकेल ग्रीन याच्या मार्गदर्शनाखाली १९८२ साली १० हजार फुटावरील सौफखर्क या ठिकाणी कस्तुरीमृग पालन वा प्रजनन केद्र सुरू करण्यात आले. परतु हे दुर्गम ठिकाण दळणवळणाच्या दृष्टीने अवघड वाटू लागले त्यात आर्थिक कमतरता म्हणून ते आठ हजार फुटावरील काचुला खरक या ठिकाणी हलविण्यात आले कस्तुरीमृगाची प्रजोत्पती करून पिल मोठी झाल्यावर त्याना पुन्हा निसर्गात सोडून देऊन त्याची सख्या वाढविणे, अशी या प्रजानन केंद्राची योजना आहे त्यासाठी प्रारभी लहान पिलाना पकडून या केंद्रात आणले जाते कधी कधी मेंढपाळाला सापडलेली कस्तुरीमृगाची पिले ते या केंद्रात आणून देतात

कस्तुरीमृगाच पिलु अतिशय हुशार असत आई चरायला गेल्यावर ते गवतात वा झुडपात लपून बसत आई आली तरच ते बाहेर येत मेंढपाळ नऊ दहा हजार फुटावरील गवताळ प्रदेशात बकऱ्या चारण्यासाठी जातात एखादी बकरी चरत चरत गवतात दडलेल्या पिलाजवळ गेली की तिला आई समजून पिलू तिच्या माग धावत जवळ जाऊन दुधासाठी बकरीच्या कासेला लागून स्तनपान करू लागत पाय मारुन बकरीचे सड (आचळ) जोरजोरात ओढू (चोखु) लागत

त्यामुळे बकरी वेदनेने ओरडू लागते बकरीला एखाद्या हिमचित्त्याने पकडले की काय या भावनेने मेंढपाळ धावत बकरीजवळ येतो कस्तुरीमृगाचा बच्चा दिसताच त्याला तो पकडतो कस्तुरीमृग पालन केंद्रात आणून देतो गेल्या ९ / १० वर्षात या केंद्रात जवळ जवळ ९० कस्तुरीमृगाचा जन्म झाला परतु त्याचे जगण्याचे प्रमाण खूपच अल्प आहे दोन महिन्यापूर्वी या केंद्रात २० कस्तुरीमृग होते फुट आणि माऊथ या रोगाने ८ कस्तुरीमृग मरण पावले जे बारा कस्तुरीमृग आहेत तेही अशक्त दिसले. ज्वर, निमोनिया आणि सर्पदशाच्या धोक्यामुळे या कस्तुरीमृगाचे जीवन ही सकटात आहे कस्तुरीमृगाना अति थंड हवामान अधिक मानवते १० हजार फुटावरील गवताळ व बर्फाळ प्रदेशात भटकायला त्याना आवडते मायकेल ग्रीनची सुचना डावलून दहा हजार फुटावरील हे कस्तुरीमृग पालन केंद्र आठ हजार फुटावर आणल्याने येथील वातावरण कस्तुरीमृगाना सहन होत नाही येथील उष्णतेने ते हैराण होतात

दगडफूल (Lichen) हे कस्तुरीमृगाच मुख्य भोजन. याशिवाय पत्थरवेल, लालवेल, इतर लहानमोठ्या वेली, खरसु, मोरु, भुर्जपत्र साली पाने या नऊ

ते दहा हजार फुटावर उगवण्याच्या वनस्पती व फुले कस्तुरीमृग आवडीने खातात बर्फ पडल्यावर शेवाळ व झाडाची पाने खातात. या वनस्पती प्रजनन केंद्रात ठिकाणी मुबलक नसल्याने त्याच भरणपोषण योग्य रितीने होत नाही वनखात्याच्या वतीने त्याना देण्यात येणार खाद्य केवळ नाईलाज म्हणून या केंद्रातील कस्तुरीमृग खातात. त्याचा त्याच्या प्रकृतीवर विपरित परिणाम झाला आहे कुमॉऊमधील धरमगड येथील भारतीय आयुर्वेद सस्थेने कस्तुरीमृगासाठी बनविलेले खाद्य सध्या त्याना देण्यात येत आहे.

हे केन्द्र मोठमोठ्या झाडाच्या गर्दीत वसवल्यामुळे पावसाळ्यात झाडाच्या पानावरुन टपोरे थेंब कस्तुरीमृगाच्या अगावर पडतात त्यान बिचारे हैराण होतात घाबरतात

या कस्तुरीमृग पालन केंद्रात जे कर्मचारी आहेत त्याना कस्तुरीमृगांच्या जीवनाचा अभ्यास नाही. त्याच्या स्वभावाची, वागण्याची माहिती नाही त्याना होणाऱ्या व्याधींच ज्ञान नाही. येथे कुणी प्राण्याचा डॉक्टर नाही ताप येऊन गळा बद होऊन दोन महिन्यापूर्वी मृत झालेले. कस्तुरीमृग नक्की कोणत्या रोगामुळे मेले याच निदान अद्याप झाल नाही गोपेश्वरला सरकारी दवाखाना आहे परतु आजारी कस्तुरीमृगाना तेथे नेण्यासाठी केंद्राकडे कोणतेही वाहन नाही कस्तुरीमृगाच आयुष्य १५ वर्षाच असत. परतु या केंद्रात अल्पायुष्यातच कस्तुरीमृग मृत्युमुखी पडताहेत कस्तुरीमृगाना हव्या असलेल्या नैसर्गिक वातावरणाच्या अभावामुळे त्याच्या प्रजनन शक्तीवरही त्याचा विपरित परिणाम झाला आहे. या केंद्रावर आतापर्यंत लाखो रुपये खर्च झाला तो खर्च दिशाहीन झाला त्यामुळे या कस्तुरीमृग पालन केंद्राच अस्तित्व धोक्यात आल आहे

कस्तुरीमृगप्रेमी तो वनरक्षक पुढे बोलताना अतिशय भावनाविवश झाला तो म्हणाला, ''साब कस्तुरीमृगोंकी हमें हालत देखी नही जाती सब घुटघुटके मर रहे है यहाँ नौकरी करनेको दिल नही लगता सरकार और बडे अधिकारीयोंका इस केंद्रपर कोई ध्यान नही. तडप तडपकर मरनेवाले कस्तुरीमृग देखकर बडा दर्द और दु.खं होता है ''

त्याने व्यक्त केलेले विचार आणि सागितलेली कस्तुरीमृगाची करुण कहाणी ऐकून आम्ही भारावलो कस्तुरीमृगाच्या वशवृद्धीसाठी निर्माण करण्यात आलेल कॉचुला खरक कस्तुरीमृग प्रजनन केंद्र कस्तुरीमृगाच्या वशसहाराच केंद्र बनल आहे. कस्तुरीमृगाच्या मृत्युचा सापळा बनला आहे त्यापेक्षा त्याना स्वतत्र करण अधिक चागल ठरेल.

●

## १३

# तुंगनाथची निसर्गयात्रा

चमोलीवरुन गोपेश्वर, मण्डल मार्गे आम्ही काचलाखरकला आलो. तेथील कस्तुरीमृग पालनकेंद्र पाहून चोपताला पोहोचलो सपूर्ण प्रवास गढवाल हिमालयातल्या घनदाट अरण्यातून झाला होता. हे नदादेवी अभयारण्य नाना प्रकारच्या वृक्षवल्लरीन नटल होत त्यात श्रावणासारखा हिरवागार महिना. निर्मनुष्य रस्ता सोबत होती हिरव्या झाडाची, एगबेरगी पाखराची आणि वन्यजीवाची म्हणून हा प्रवास अधिक रोमाचकारी झाला. चोपताला पोहचलो त्यावेळी सूर्य मावळला होता आकाशात कृष्णमेघाची यात्रा भरली होती. मधूनच या कृष्णमेघाना पाझर फुटला श्रावण धारा धरतीवर वर्षाव करू लागल्या. जणु वृक्षवेलींना कृष्णमेघ आपल्या हृदयातल अमृतच पाजत आहेत

चोपता हे साडे आठ हजार उचीवर निसर्गाच्या कुशीत वसलेलं छोटस गाव घर आणि ३ / ४ झोपडीतली हॉटेल्स याखेरीज येथे वस्ती आढळली नाही एका टपरीत गरमगरम चहा घेतला त्यावेळी शरीरात हवीहवीशी वाटणारी उब वाटू लागली रात्री येथील गढवाल निगम मडळाचे विश्रातीगृहात मुक्काम केला सकाळी पाखराच्या गाण्यानी जाग आली. सकाळचे सहा वाजले होते पांघरुण फेकून बाहेर आलो. निसर्गाच स्वर्गीय लावण्य पाहून मत्रमुग्ध झालो. काचरा, पांगारा, बुराश, मोरु रागा (पाईन) खालु आरव ही परिचित अपरित झाड नुकत्याच न्हाऊ घातलेल्या बाळासारखी टवटवीत व शुर्चिभूत दिसत होती. पांढऱ्याशुभ्र धुक्यांच्या दुलईत जणु साखर झोपेत असल्यासारखी वाटली. मंद वाऱ्याच्या झुळकांनी झाड हळुवार डुलायची, त्यावेळी ही झाडे साखर झोपेत बाळासारखी हसताहेत अस

वाटू लागायच. एका झाडावरुन खरोखरच हॅं हॅं हॅं हॅं असा हसण्यासारखा आवाज आला तो हसऱ्या कस्तुर पक्ष्याचा (लाफिंग थ्रश) आवाज होता मधूनच जगली कोंबड्याचा आवाज कानी यायचा बुलबुलाच गोड गाण तर सारख कानावर येत होत दूरवर दरीत काही ढग झाडावर विश्रातीसाठी थाबल्यासारखे वाटत होते सृष्टीच एवढ सुदर, पवित्र व प्रसन्न रूप प्रथमच पहात होतो सृष्टीच हे रूप पाहताना वेळेच भान राहिल नाही पूर्व दिशा लाल झाली साऱ्या सृष्टीचा प्राण असलेला भास्कर वर आला त्यावेळी आकाशाची निळाई डोळ्याना खुणावू लागली आम्ही त्वरेने आवराआवर केली. तुगनाथच्या दिशेन आमची पावल चालू लगाली तुगनाथ तीन किलोमीटर असा फलक व त्यावर लावलेल्या बाणाच्या दिशेने आम्ही चालू लागलो काही दगडी पायऱ्या चढत असतानाच तपकिरी रगावर पाढऱ्या रेषा असलेला लाब चोच असलेला हुप्पी (हुद्हुद) आम्हास भेटला. तो जमिनीवरील किडे टिपण्यात मग्न होता आम्ही त्याच्याजवळ गेलो तरी तो न घाबरता उदरभरणाचे कार्यात मश्गुल होता पुढे एक आस्ट्रेलियन जातीचा मेंढा दिसला तो उतारावर चरत होता बाजूला त्याचा मालक हातात काठी घेऊन उभा होता त्यापलिकडे हिमालयीन मेंढ्या चरत होत्या हा मेंढपाळ जवळच्याच वस्तीवरील होता. सकाळी सकाळी मेंढ्या चरायला घेऊन आला होता त्या ऑस्ट्रेलियन मेंढ्याची शरीरयष्टी अतिशय दणकट होती त्याच्या साऱ्या शरीरावर या लडाख तिबेट मधील याक या प्राण्यासारखे केस लोंबत होते त्या केसाळ मेंढ्याची शिगे पिळदार व दणकट होती त्याची धडक बसली तर माणसाच्याही हाडाचा चुरा होतो सहसा वाघासारखा प्राणीही या मेंढ्याच्या वाटेला जात नाही मेंढपाळ सागत होता.

तीन किलोमीटरची निसर्गरम्य पाऊलवाट चालताना मनाचे झाडावर प्रसन्नता आणि आनदाची पाखर किलबिल करू लागायची चढ चढताना पाय मात्र सतत कुरकूर करायचे एका चढावर थाबले तर एक सुदर पक्ष्यांने दर्शन दिले तो होता सप्तरगी मोनॉल. मोरही त्याच्यापुढे फिका पडावा अस स्वर्गीय सौंदर्य या पक्ष्यान धारण केल होत निळ्या आणि हिरव्या पाचूच रूप या पक्ष्याला लाभल होत डोक्यावर मोरासारखा शानदार तुरा होता डोळ्याचं पात लवत न लवत तोच हा हिमालयातला देवदूत गर्द झाडीत अदृश्य झाला. निसर्गामृत प्राशन करीत करीत आम्ही चालत होतो. मोनॉल सारखा सर्वांगसुदर पक्षी प्रथमच पहायला मिळाल्यान मनात प्रसन्नतेची फुल फुलली होती मोनॉल मनाच्या घरट्यात दडला होता तो काही बाहेर पडायला तयार नव्हता

जस जसे आम्ही अधिक उचीवर जाऊन लागलो तसतशी वृक्षाचा सहवास

कमी झाला बारा हजार फुटावर तुगनाथच्या पायथ्याला पोहोचलो त्यावेळी सारा प्रदेश वृक्षहीन होता हिरव्यागार गवताची चादर मात्र धरतीवर ठायीठायी अथरलेली दिसत होती पायथ्याला गढवालींची वस्ती होती पाच सहा झोपड्या होत्या त्यात चहाची दुकाने थाटण्यात आली होती वर तुगनाथचं शिखर दिसत होत. दोन फुट अतर असलेल्या पायऱ्या चढून आम्ही तुगनाथच्या प्रागणात प्रवेशलो. अकरा वाजले होते सगळीकडे लख्ख ऊन पडले होते आकाश निरभ्र होते निळ्या आकाशाखाली आम्ही १२५०० फुट उचीवर उभे होतो दूरवर पाढरीशुभ्र हिमशिखरे उन्हात चादीसारखी चमकत होती

ताशीव दगडात बाधलेल्या तुगनाथच्या मदिरात आम्ही प्रवेशलो केदारनाथ, मदमदेश्वर, रुद्रनाथ, कल्पेश्वर आणि तुगनाथ याला पचकेदार म्हणतात तुगनाथ हे दुसरे केदार तुगनाथ मदिरात भगवान शकराच्या बाहुच्या आकाराचे स्वयभू शिवलिग आहे या शिवलिगावर मस्तक टेकवले असता एका वेगळ्या अनुभूतीचा सचार शरीरात सुरू झाला. पुजाऱ्याने लाब तादळाच्या अक्षता व हळदीचे मिश्रणाचा टिळा कपाळी लावला आम्ही भक्तीभावाने हात जोडले त्यान तुगनाथसह पचकेदारची कथा आत्मीयतेन सागितली महाभारत युद्ध समाप्तीनतर ब्रह्महत्येतून मुक्त होण्यासाठी वेदव्यासानी भगवान शकराना प्रसन्न करून त्याचा आशीर्वाद मिळविण्यास सागितले भगवान शकराचा शोध घेत घेत पाडव काशीवरुन हिमालयात गुप्तकाशीला आले याठिकाणी भगवान शकर गुप्त झाले. पाडव त्याचा पाठलाग करत करत मदाकिनी नदीच्या किनाऱ्याने केदारधामला पोहोचले तेथे भगवान शकराची महिषाचे रूप धारण केले. अर्तज्ञानी पाडवानी महिषा रूपातल्या भगवान शकराना ओळखले ते त्याचे दर्शन घेण्यासाठी पुढे धावले त्यावेळी भगवान शकर भूमित प्रवेश करू लागले पाडवानी त्याचा मागचा भाग पकडला दर्शन व आशीर्वाद देण्यासाठी भगवान शकराची त्यानी प्रार्थना केली भगवान शकर पाडवाची भक्ती, निष्ठा व धैर्य पाहून प्रसन्न झाले पाडवाना आशीर्वाद देऊन ब्रह्महत्येतून त्याना मुक्त करून ते अंन्तर्धान पावले केदारधामला महिषारूपी भगवान शकराचा पृष्ठभाग शिलाखड रूपात राहिला त्यावर पाडवानी केदारनाथ मदिर बाधले अग्रभाग नेपाळमध्ये प्रगट झाला ते पशुपतीनाथ या नावाने प्रख्यात झाले रेडारुपी शिवजीचे मुख २२८६ मीटर उचीवर प्रगट झाले, ते रुद्रनाथ दुसरे केदार होत त्याची नाभि कालीमठ पासून २५ किलोमीटरवर ३२८९ मीटर उचीवर प्रगट झाली ते मदमहेश्वर चौथे केदार होत शिवजीच्या जटा रुद्रनाथपासून बारा किलोमीटर अतरावर २४३९ मीटर उचीवर प्रगट झाल्या, ते पाचवे केदार कल्पेश्वर होत. त्याचे बाहू या ठिकाणी प्रगट झाले, ते तिसरे केदार तुगनाथ होत पचकेदाराची

सर्व मदिरे पाडवानी बाधली आहेत आद्य शकराचार्यानी त्याचा जीर्णोद्धार केला या पचकेदारची यात्रा करणे मोक्षदायी मानण्यात आले आहे. पूर्वी पायी यात्रा करणारे यात्रेकरु पचकेदारची यात्रा करीत

तुगनाथ हे इतर चार केदारापैकी १२५०० फुट उचीवरील सर्वात उच मदिर आहे. मदिराची उभारणी केदारनाथ शैलीत करण्यात आलेली आहे मकु गावचे मैठाणी ब्राह्मण तुगनाथचे पुजारी आहेत ऑक्टोबर ते मे पर्यंत हा सारा प्रदेश हिमाच्छित असतो तुगनाथ शिखरापासून एक पाढरीशुभ्र जलधार निघते तिला पापनाशनी आकाशगगा म्हणतात काही अंतर चढल्यावर रावणशिला दिसते भगवान श ऱाना प्रसन्न करून घेण्यासाठी रावणाने या शिलेवर बसून तपश्चर्या केली असल्याचे पुजाऱ्याने सागितली

तुगनाथच्या अष्टदिशाना आम्ही नजर टाकली पूर्वेला नदादेवीच शिखर चमकत होत द्रोणाचलच्या शिखर शृखलाही नजरेला मोहिनी घालत होत्या उत्तरेला बदरीनाथ केदारनाथ व रुद्रनाथच्या शिखर मालिकेन नजर खिळवून ठेवली पश्चिमेला गगोत्री यमनोत्रीच नयन मनोहर दृश्य दिसत होत अवघड वाट चढून आम्ही तेरा हजार फुटावरील चन्द्रशिलेवर पोहोचलो त्यावेळी हिमालयातल्या सृष्टीच अपार सौंदर्य व विविध हिमशिखराच्या अपूर्व रगशोभा पहायला मिळाल्या चौखबा आणि त्रिशुल शिखराच पाढरशुभ्र लावण्य पाहताना डोळ्याना अपरपार सुख झालं पचजुली, बदरपुष्प, चन्द्रवदनी, पौडीचे कडोलिया या साऱ्या शिखराच दर्शन झाल, हे नेत्राच परम भाग्य या शिखराच्या खाली पसरलेली गवताळ मैदाने, वृक्षाच्या रागा आणि दऱ्याखोऱ्या पाहताना ईश्वराने या धरतीवर केवढ भव्य आणि दिव्य सौंदर्य ओतले आहे याचा साक्षात्कार होतो

दऱ्याखोऱ्यातून वाहणाऱ्या नद्या व खाली कोसळणारे प्रपात तर अगदी क्षीण दिसतात चोपता उरखीमठच्या मधील दरीतून वाहणारी कामिनी तर आकाशात चमकणाऱ्या सौदामिनी सारखी दिसत होती ब्रिटीश काळात अनेक निसर्गवेड्या अधिकाऱ्यानी तुगनाथला भेट दिली बॅटन नावाचा इग्रज अधिकारी तर म्हणतो, तुगनाथ ते देवरिया सरोवरपर्यंतचा सारा प्रदेश धरतीवरील सर्वात सुदर प्रदेश होय देवरिया हे सुदर सरोवर उरखीमठ व दोगलबीडाच्या मध्ये आहे या प्रदेशात कस्तुरीमृगाचा सचार आहे जगली मेंढ्या आहेत बिबळे व पट्टेवाले वाघ आहेत भाग्यवतालाच ते दिसू शकतात औषधी वनस्पती या परिसरात विपूल आहेत या वनस्पती गोळा करण्यासाठी गढवाल विश्वविद्यालयाने खाली वनस्पती सर्वेक्षम केंद्र उभारले आहे ते तुगनाथवरुन दिसत चोपतापासून ४ किलोमीटरवर कस्तुरीमृग प्रजनन केंद्र आहे चन्द्रशिलेवर असतानाच ढगाची आकाशयात्रा सुरू झाली

होती. तुगनाथला येईपर्यंत सारं आकाश ढगानी व्यापून टाकल आम्ही खाली उतरू लागलो तेवढ्यात दोन अल्पाईन चफ (हिमकावळे) या पक्ष्यानी दर्शन दिल. जमिनीवरुन धावणारे बटेर दिसले तुगनाथची आमची निसर्गयात्रा कमालीची आनददायी झाली धार्मिक यात्रेकरु तुगनाथला फार कमी येतात निसर्गावर प्रेम करणारे, निसर्गात ईश्वर पाहणारे निसर्गयात्री तुगनाथला जास्त येतात. गुप्तकाशीवरुन चोपतासाठी बसेस सुटतात प्रत्येक निसर्गप्रेमीने तुगनाथची निसर्गयात्रा करावी. हिमालयातील निसर्गाच अवघ लावण्य अनुभवाव.

•

# १४

# टेहरी बांध एक विनाशकारी प्रकल्प

गढवालमधील श्रीनगरवरुन आम्ही निघालो मलेठा डागचौरा दुगड्डा, काण्डीखाल, गडोलिया या छोट्या खेड्याच्यामार्गे व भिलगना नदीच्या किनाऱ्याने टेहरी गावी पोहोचलो भागीरथी व भिलगनेच्या सगमावर वसलेले टेहरी एक ऐतिहासिक सस्थानी शहरवजा गाव गावचा सारा परिसर शेकडो ट्रक्स, ट्रॅक्टर, बुलडोझर व माणसाच्या गर्दीन व्यापला होता उडणाऱ्या धुराळ्यान सार टेहरी गाव माखल होत भागीरथीगगेवर ८५० फुट उचीच अजस्र धरण बाधण्याच काम वेगात सुरू होत हे धरण जगातील सर्वोच्च उचीच आणि उचावरील धरणापैकी एक ठरणार आहे या धरणाच्या विरोधात गेली दहा वर्षे चळवळ चालविणारे आतरराष्ट्रीय ख्यातीचे चिपको आदोलनाचे प्रणेते श्री सुदरलालजी बहुगूणा याना भेटून त्याचे विचार ऐकण्याची तीव्र इच्छा होती रस्त्यात घनसालीला जाऊन त्याच्या आश्रमात चौकशी केली असता ते टेहरीला असल्याचे समजले टेहरीत चौकशी करता १० किलोमीटरवर उत्तरकाशी मार्गावर सिल्यारा गावी असल्याचे समजले आम्ही त्वरेने सिल्याराकडे मार्गस्थ झालो या छोट्याशा गावात पोहोचलो त्यावेळी सूर्य मावळला होता गावातल्या एका तरुणाला घेऊन भातशेतीतून गेलेल्या पाऊलवाटेवरुन एक किलोमीटर चाललो मातीच्या एका जुन्या दुमजली घरापाशी पोहोचलो त्या तरुणाच्या पाठोपाठ झिजलेला लाकडी जीना चढून वर गेलो मागच्या सज्जात खादीचे पाढरेशुभ्र धोतर व अर्धी बडी घातलेला, छातीवर पाढरीशुभ्र दाढी रुळत असलेला तेजस्वी चेहऱ्याचा सत्तरीतला वयोवृद्ध समोरुन वाहणाऱ्या गगाभागरथीच्या प्रवाहाकडे एकाग्रतेन पहात आत्मचितन करीत बसला

होता आमच्या आगमनान त्याची एकाग्रता भग पावली आम्ही त्याना नमस्कार केला ते प्रतिनमस्कार करीत लगबगीने उठले बसा मी आलोच अस म्हणत ते आतल्या खोलीत गेले आम्ही सज्जातल्या फाटक्या सतरजीवर स्थानापन्न झालो समोर लक्ष गेल गगाभागीरथी ब्रह्मानदात तल्लीन होऊन टिहरीच्या दिशेन कलनाद करीत चालली होती मावळलेल्या सुर्याची भगवी प्रकाशछाया आसमतातील विखुरलेल्या मेघाच्या कायेवर साडली होती. त्यातून अद्भुत चित्रसृष्टीचे दर्शन होत होते खाली हिरवीगार वनश्रीने नटलेले डोंगर सध्याछायेत खुणावत होते मधूनच वाऱ्याच्या झुळकाबरोबर भातशेतीचा सुगध उधळत होता भावसमाधी लागावी अस प्रसन्न वातावरण होत

पाण्याचा जलकुभ आमच्या समोर ठेऊन सुदरलालजी आपल्या स्थानी स्थानापन्न झाले पुन्हा एकदा हात जोडून त्यानी आमचे सुहास्य स्वागत केले आतरराष्ट्रीय कीर्तीच्या या सच्च्या गाधीवादी पुरुषोत्तमाची विलक्षण नम्रता पाहून आम्ही भारावून गलो आम्ही आमची ओळख त्याना करुन दिली आणि आमच्या सभाषणास प्रारभ झाला

"टेहरी धरणामुळे दोन हजार किलोवॅट वीज निर्मिती होणार आहे पावणेतीन लाख एकर जमिनीला पाणी मिळणार आहे देशाला प्रगती आणि विकासाकडे नेणारी ही योजना आहे अस सरकारने जाहीर केले असताना या प्रकल्पाला आपला विरोध का ? हा पहिलाच प्रश्न विचारता सुदरलालजी उत्तरले

"टेहरीबाध प्रकल्प हा मुळातच प्रलयकारी व विनाशकारी आहे शिवाय आमच्या पहाडात अशी कोणती एवढी जमीन आहे की तिला या धरणाचे पाणी मिळू शकेल शेवटी हे पाणी मैदानी प्रदेशातील बड्या बागायतदाराच्या शेतात उस पिकविण्यासाठी व दिल्लीतल्या धनदाडग्याच्या बागा फुलविण्यासाठी वापरले जाणार तसेच पश्चिम उत्तरप्रदेशातील औद्योगिकरणासाठी यातून निर्माण होणारी वीज वापरली जाणार असून त्यातून १४० मोदीनगर कायम होणार आहेत रानावनात व डोंगरदऱ्यात राहणाऱ्या गोरगरीबाचे ससार पाण्यात बुडवायचे, त्याना देशोधडीला लावायच त्याच्या ससाराच्या थडग्यावर करोडो रुपये खर्च करून मोठमोठी धरण बाधायची त्यातील पाण्याचा लाभ धनदाडग्याना देऊन त्याना अधिक श्रीमत करायच निवडणुकीसाठी त्याच्याकडून निधी उकळायचा प्रकल्पात लाटता येईल तितका पैसा लाटायचा निवडणुकीत वारेमाप खर्च करून निवडून यायच ही प्रत्येक राज्यकर्त्यांची आज निती बनली आहे परतु केवळ यासाठी आमचा टेहरी बांधला विरोध नाही हा सारा इलाखा भूकप इलाखा आहे टेहरीच्या २७ किलोमीटर परिसरात भूकपाचे नाभिकेंद्र आहे भूकपाच्या पट्ट्यात ८५०

फुट उचीच हे अजस्त्र धरण होत आहे ४५ किलोमीटर जलाशयातील पाण्याच्या प्रचड दाबान अथवा डोंगरातील भेगांमध्ये पाणी मुरुन त्याचा दाब भूकपाच्या नाभिकेंद्रावर पडून भूकप कार्यान्वित होईल ७ ते ८ पेक्षा जास्त रिष्टर भूकपाचे धक्के बसतील. या परिसरातील पर्वतशिखरावरील ८० टक्के वनांचे आच्छादन नष्ट झाल्याने ते ढिले झाले आहेत. भूकपाच्या धक्क्याने हे पहाड व कडे तुटून पडतील. प्रचड वित्त आणि प्राणहानि होईलच शिवाय भूकपाने धरण फुटून हाहा·कार माजेल पाण्याचा लोंढा ताशी १०० किलोमीटर वेगाने धावून ५७ मिनिटात हृषीकेश, ६९ मिनिटात हरिद्वारला पोहोचेल. भारताचा पौराणिक आणि सास्कृतिक वारसा जतन करणारी अनेक तीर्थस्थळे २०० फुट पाण्याखाली जातील. त्याची पुन·निर्मिती कधीच करता येणार नाही हे पाणी मीरत, गाझियाबादपर्यंत जाऊन ही शहरे २५ फुट पाण्याखाली जातील अब्जावधी रुपयाच्या मालमत्तेचे नुकसान आणि लाखो माणसाचे प्राण गमावले जातील

या धरणाचे आयुष्य १०० वर्षाचे आहे असे धरणाचे इजिनियर आणि सरकारी अधिकारी सागत असले, तरी धरण ४० / ५० वर्षेही टिकणार नाही कारण भागीरथीच्या व भिलगनेच्या परिसरातील पर्वतशिखरावरील वन आच्छादन नष्ट झाल्याने माती व सारे पहाड ठिसूळ बनले आहेत त्यामुळे ग्लेशियरमधून उगम पावलेल्या या दोन नद्याच्या प्रवाहा बरोबर बर्फ वितळू लागल्यावर बारीक वाळू, गाळ आणि असख्य प्रस्तरखड, प्रचड प्रमाणात वाहात येतात नदीत कोसळणारे प्रचड कडे आणि मातीही या नद्या वाहून नेतात या माती व गाळाने धरण काही वर्षातच पूर्णपणे भरुन जाईल तसेच धरणातील जलाशयाच्यावर असणारे पहाड अतिशय कमजोर व त्याना प्रचड भेगा पडलेल्या आहेत त्या भेगात जलाशयातील पाणी भरताच त्यावरील वस्तीसह ते धरणात कोसळून पडतील यासबधी वाडिया भूगर्भ सशोधन सस्थेने अभ्यास करून आपला अहवाल केंद्राकडे सादर केला आहे

त्याचप्रमाणे या धरणामुळे ८ हजार कुटुबाचे ससार घरदार व शेतीसह पाण्यात बुडणार आहेत आमच्या परिसरात एक हेक्टर जमिनीवर १७ लोक कसेतरी पोट भरतात टेहरीबाधमुळे ८६ हजार लोक धरणग्रस्त होणार आहेत त्याच्या पुनर्वसनासाठी ९ हजार एकर जमिनीची गरज आहे एवढी जमीन गढवाल भागात उपलब्ध होऊ शकत नाही गढवाल सोडून त्याच उत्तरप्रदेशात इतरत्र पुनर्वसन झाल तर आपल्या मायभूमीला हे लोक मुकतीलच, शिवाय हिमालयातील गढवाली सस्कृती नष्ट होईल टेहरी सारख सुदर ऐतिहासिक गाव तेथील बदरीनाथ, लक्ष्मीनारायण मदीर, स्वामी रामतीर्थांच तपस्थळ असलेली गुंफा, देवप्रयाग सारखं

प्राचीन तीर्थस्थळ, अशी एकूण ११६ गावं या गावची उत्तम पिकाऊ शेती, भारतीय् सस्कृतीचा प्राचीन वारसा सागणारी हजारो सुदर शिल्पे, मदिरे या धरणात तुटणार आहेत.

या साऱ्या धोक्याची कल्पना केंद्रिय पर्यावरण आणि वन मंत्रालय, वन्य जीवन सस्था (डेहराडून), सेंटर फॉर अर्थ साईसेज (त्रिवेंद्रम), मुबई पर्यावरण, ॲक्शन ग्रुप, कॉलेज ऑफ इजिनियरिंग व आध्र विश्वविद्यालय (विजयापट्टम), वनस्पती विज्ञान विभाग (दिल्ली), कृषि विश्वविद्यालय (हिस्सार), राष्ट्रीय पर्यावरण नियोजन समिती, हिमालयन एकॉलॉजी व वाडिया इन्स्टीट्यूट, कुमायु विश्व विद्यालय (नैनिताल), राष्ट्रीय भूभौतिक अनुसधान सस्था (हैद्राबाद), मृद विज्ञान अध्ययन केंद्र (केरळ), भूविज्ञान विभाग दिल्ली विश्वविद्यालय, रुडकी विश्वविद्यापीठ, कट्रोलर ऑफ ऑडिटर जनरल ऑफ इडिया, यु एस आर्मी इजिनियर, भारतीय सास्कृतिक निधी, वर्ल्ड वाईड लाईफ फड ऑफ इडिया या सस्थामधील आतरराष्ट्रीय किर्तीच्या पर्यावरण आणि इजिनियरिंग शास्त्रज्ञ व सशोधकानी आपल्या रिपोर्टातून टेहरी धरणाने उद्‌भवणाऱ्या धोक्याची आणि त्यातून होणाऱ्या विनाशाची सुचना सर्व बाजूने अभ्यास करून केंद्र व उत्तरप्रदेश सरकारला अनेक वेळा कळविली आहे टेहरी बांध विरोधी कृती समितीने केंद्रातील जनता, कॉंग्रेस व राष्ट्रीय मोर्च्याच्या प्रत्येक सरकारला निवेदने आदोलन सत्याग्रह उपोषणाद्वारे जागृत करण्याचा सातत्याने प्रयत्न केला, करीत आहोत त्यासाठी [illegible] लाठीमार सहन केला जलयात्रा केली परतु कमालीचे हटवादी असलेले राज्यकर्ते ही धरण योजना सोडून द्यायला तयार नाहीत वैयक्तिक आणि राजकिय स्वार्थासाठी गढवाली जनतेच गढवाल हिमालय व निसर्गाच वाटोळ करण्याचा नेतागण आणि टिहरी बांध इजिनियरानी चग बाधला आहे असं सागून पुढे बोलताना सुदरलालजी म्हणाले, "भारतातील कोट्यावधी लोकाच जीवन फुलवणारी गगामैया साक्षात भगवती आहे अनादी कालपासून भारतीयाच ती प्रेरणास्थान आहे टिहरी बाध पूर्ण झाला की ती जीवत स्वरुपात वाहताना दिसणार नाही. ऋषीकेश हरिद्वारला तिचा कलकल निनाद ऐकू येणार नाही भावी पिढीला तिच खळखळ वाहणार जिवत रूप दिसणार नाही त्यामुळे आमची प्राचीन सस्कृती नष्ट होईल. परंतु आम्ही अशी गगामातेची हत्या होऊ देणार नाही त्यासाठीच गगा आणि हिमालयाच्या रक्षणासाठी टेहरी बाध चळवळीचा महायज्ञ आम्ही सुरू केला आहे.

टेहरीचा परिसर हे भूकप क्षेत्र आहे अस तज्ज्ञाच आणि आपलही मत आहे. मग आतापर्यंत असे किती भूकपाचे धक्के या परिसरात बसले ? तसेच जलाशयामुळे

भूकपाचे धक्के बसून धरणे फुटल्याची आपण काही उदाहरण सागू शकला काय ? या सयुक्त प्रश्नावर श्री सुदरलालजी बहुगुणा उत्तरले,

''३० ऑगस्ट १८०३ व ४ एप्रिल १९०५ रोजी या परिसरात प्रचड भूकंपाचे मोठे धक्के बसले आहेत त्याचं नाभिकेंद्र टेहरीच्या २७ किलोमीटरच्याच परिसरात होत त्यावेळी मोठी प्राणहानी व वित्तहानी झाली त्यानतर अनेकवेळा कमीजास्त शक्तीचे भुकपाचे धक्के बसले आहेत १९७१ ते १९७७ या पाच सहा वर्षांच्या कालावधीतही लहान भुकप धक्के बसलेले आहेत टेहरी धरणातील जलाशयाच्या भाराने भूकपाचे मोठे धक्के बसतील हे सागायला आता ज्योतिषाची गरज नाही कारण जलाशयाची खोली आणि उची याचा भूकपाशी निकटचा सबध आहे, अस सिद्ध झाल आहे तुमच्या महाराष्ट्रात ६ ५ स्केलचा झालेला भूकप कोयना जलाशयामुळेच झाला याशिवाय नैनिताल (१८८०) गोहना लेक (१८८३) बेलाकुची (१९७०) कनुडीगड (१९७८) या भागातील दुर्घटना अधिक उचीच्या जलाशयामुळे जमीन खचून झालेल्या आहेत इटलीत वाजोत डॅम मधील जलाशयाने भोवतालचा पहाड तुटून पाण्यात पडला, त्यामुळेले धरण फुटून मोठी प्राणहानी व वित्तहानी झाली गुजरातमधील ५० फुट खोलीचा जलाशय असलेल धरण १९७९ रोजी फुटून हजारो लोक मरण पावले मोठ्या धरणातील जलाशयाच्या दाबाने भूगर्भातील हालचाली कार्यान्वित होऊन भारतात आतापर्यंत जवळ जवळ १४ धरणे फुटली आहेत. इग्लडमध्ये १०, ऑस्ट्रेलियात १०, अमेरिकेत ८, अल्जोरिया ७, कॅनडात ७, रशियात ४, धरणे फुटून प्रचड वित्त व प्राणहानी झाली आहे चीन, इराक, इराणमध्येही मोठ्या प्रमाणात या दुर्घटना झाल्या आहेत म्हणून अनेक देशानी मोठमोठ्या धरणयोजना बाधण्याऐवजी लहान लहान धरणे बाधण्याचा निर्णय घेतला आहे

१९०८ साली इटलीत ७ ३ शक्तीच्या भूकपाने १ लाख लोक मृत्यु पावले तर चीनमध्ये २ लाख ४० हजार, इराणमध्ये १ लाख लोकाना प्राण गमवावे लागले टेहरी धरणातील जलाशयामुळे ८ पेक्षा जास्त शक्तीचे भुकपाचे धक्के बसतील असा विविध शास्त्रज्ञानी सिद्धात मांडलेला आहे. त्याचा अभ्यास करूनच मी बोलतो आहे आतरराष्ट्रीय किर्तीचे तज्ज्ञ जेम्स ब्रुने यानीही मोठ्या भूकपाची शक्यता वर्तविली आहे ९ हजार टन स्फोटकाद्वारे जेवढी उर्जा निर्माण होईल तेवढी ७ रिष्टरशक्तीच्या भूकपामुळे निर्माण होईल २४ लाख टन स्फोटकातून निर्माण होणारी उर्जा ८ शक्तीच्या भूकपातून निर्माण होईल त्यातून सर्वविनाश घडून येईल टेहरी परिसरात ८ पेक्षा जास्त होणाऱ्या भूकपाचा विस्तार सपूर्ण उत्तरप्रदेश, बिहार, प बगाल व बांगलादेशपर्यंत पोहोचेल या धरणामुळे

उद्‌भवणाऱ्या भूकंपाच्या धोक्याबरोबरच मोठ्या प्रमाणात भूस्खलन, होऊन नागरी वस्ती व घरे जमिनदोस्त होतील उन्हाळ्यात गंगेच्या पुरात वाहून येणाऱ्या सकस मातीला ऋषीकेशच्या पुढचा मैदानी प्रदेश मुकेल ''

टेहरी धरणामळ उदभवणाऱ्या या धोक्याची कल्पना विविध क्षेत्रातील तज्ज्ञानी सरकारला दिली असतानाही या धरणाच काम का सुरू करण्यात आल? या प्रश्नाबाबत बोलताना सुंदरलालजींनी सांगितल

''वीस वर्षापूर्वी टेहरी बाधची योजना आखण्यात आली. तेव्हापासून मी व माझे सहकारी या धरणाच्या विरोधात आहे १९६९ साली याबाबत तत्कालीन पाटबधारे मत्री श्री के एल. रांव याना भेटलो त्याना धरणापासून उद्‌भवणाऱ्या धोक्याची कल्पना दिली त्यावेळी सर्व इजिनियर्स आणि अधिकाऱ्याची त्यानी बैठक घेतली भागीरथी घाटीचे नकाशे टेबलावर ठेऊन चर्चा केली या घाटीतला पर्यावरणाचा समतोल ढासळू नये, मोठ्या धरणामुळे उद्‌भवणारे भविष्यातील धोके आणि विनाश, लक्षात घेऊन आम्ही मागणी केल्यानुसार केवळ वीजनिर्मितीसाठी भागीरथी आणि भिलगेवर दोन लहान बाध बाधण्याचा प्रस्ताव यानी मान्य केला परतु कालांतराने हा प्रस्ताव धुडकावून लावण्यात आला ही योजना म्हणजे देशाच्या प्रगती आणि विकासाचे प्रतिक असल्याचा मुद्दा अधिकाऱ्याकडून नतरच्या राज्यकर्त्यांच्या मनावर बिबवण्यात आला टहरी बाध योजनेला अतिम स्वरुप देण्यात आलं. लोकक्षोभ वाढू नये यासाठी ही योजना गुप्त ठेवण्यात आली १९७७ साली सर्व्हे करण्याच्या कामास प्रारभ झाला त्यावेळी टेहरी बाध विरोधी कृती समिती आम्ही स्थापन केली प्रत्यक्ष धरणाच्या जागेवर सत्त्याग्रह केला त्यावेळी टेहरीला बदूकधारी छावणीच स्वरुप आल आमच्या सत्याग्रहात ५० गावातील शेकडो लोक सहभागी झाले होते पाशवी बळ वापरुन उत्तरप्रदेश सरकारन आमची चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. २०० सत्याग्रहींना अटक करण्यात आली शिक्षा झाल्या तुरुगवास भोगावा लागला. आमच आदोलन अधिक तीव्र झाल त्यावेळच्या पतप्रधान श्रीमती इदिरा गांधी याना आम्ही भेटलो धरण विरोधी आणि धरण व्हावे असे वाटणाऱ्या सरकारी अधिकारी, नेतागण यांच्या बरोबर त्यानी चर्चा केली पर्यावरणाच्या होणाऱ्या विनाशाचा अभ्यास करण्यासाठी मार्च १९८० मध्ये केरळ मधील सायलेंट व्हॅलीप्रमाणे एक कमिटी त्यानी नेमली प्रसिद्ध पर्यावरण तज्ज्ञ श्री एस.के. रॉय त्याचे प्रमुख होते त्यानी धरणामुळे उद्‌भवणाऱ्या धोक्यांचा व पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करून टिहरी बाध हा विनाशकारी प्रकल्प ठरणार आहे. विकासाच्यासाठी बाधण्यात येणाऱ्या या धरणाचा पाया हा विनाशाचा पाया ठरणार आहे. म्हणून हे धरण

बाधण्यात येऊ नये, असा रिपोर्ट २८ - १० - १९८६ रोजी पर्यावरण व वन मत्रालयाकडे सादर केला. परतु हट्टाला पेटलेले स्वार्थी नेते धरणाची योजना सोडून द्यायला तयार नव्हते उत्तरप्रदेशचे त्यावेळचे सार्वभौम नेते श्री नारायणदास तिवारी तर धरण बांधण्याच्या जिद्दीला पेटले होते गगाशुद्धीकरण प्रकल्प राबविणाऱ्या आणि पर्यावरणाची चळवळ सुरू करणाऱ्या पतप्रधान कै राजीव गांधी याना तर आम्ही शेकडो पत्रे निवेदने पाठविली परतु त्याच्याकडून एकाही पत्राच उत्तर आल नाही पर्यावरण खात्याच्या धरण विरोधी रिपोर्टमुळे प्लॅनिंग कमिशनने धरणासाठी आर्थिक तरतूद करण्यात नकार दिला. जागतिक बँक व अनेक पाश्चिमात्य देशानीही आर्थिक मदती बाबत नकार घटा वाजविली शेवटी रशियाच्या मदतीन धरण बाधण्याचा निर्णय घेण्यात आला त्यासाठी रशियन सरकारशी करार करण्यात आला त्यासाठी रशियन सरकारने ३० कोटी रुबल (२ हजार कोटी रुपये) कर्जाऊ आर्थिक सहाय्य केल पर्यावरण खात्याचा रिपोर्ट गुप्त ठेवण्यात येऊन रशियन तत्रज्ञाच्या सहाय्यान योजना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न सुरू झाला ''

या धरण योजनेची इत्थभूत माहिती सागताना सुदरलालजी पुढे म्हणाले

''१२ जुलै १९८८ रोजी टेहरी हायड्रो डेवलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात आली त्याकडे टेहरी प्रकल्प हस्तातर करण्यात आला हे कॉर्पोरेशन, केंद्र सरकार, उत्तरप्रदेश सरकार व रशियन तत्रज्ञ एकत्रितरित्या या प्रकल्पाची योजना आखू लागले त्यानतर श्री राजीव गाधीच सरकार जाऊन श्री विश्वनाथ प्रतापसिगाच सरकार आल. त्यात श्रीमती मेनका गाधी याना वन व पर्यावरण खात्याच राज्यमत्रीपद मिळाल त्याच्या हाती पर्यावरण खात्याचा गुप्त रिर्पोर्ट लागला श्रीमती मेनका गाधीने त्वरेने ॲक्शन घेऊन नैसर्गिक साधन सपत्तीचा विनाश व गरीब गढवालींना उध्वस्त करणाऱ्या या प्रलयकारी प्रकल्पास परवानगी नाकारली. वृत्तपत्रात गौप्य स्फोट झाला त्यावेळी श्री विश्वनाथ प्रतापसिग जागे झाले थोड्याच दिवसात श्रीमती मेनका गाधीच्या हातून महत्त्वाचे अधिकार काढून घेवून ते श्री राऊत रॉय याच्याकडे सुपूर्त करण्यात आले त्यानतर सरकारन पर्यावरण विरहित पाच जणाच एक वॉटर कमिशन नेमल या पाच जणापैकी ४ जणानी भूकपाला प्रतिबध करू शकेल अशीच धरणाची योजना आहे. त्यामुळे धरणापासून कोणताही धोका उद्भवणार नाही भूकपाचे धक्के धरणाची भित सहन करील त्यामुळे ते फुटण्याची भिती नाही असा निर्णय दिला कमिटीचे एक सदस्य श्री विनोद गौड यानी या धरणाने फार मोठा अनर्थ ओढवणार आहे, या अनर्थातून प्रत्यक्ष परमेश्वरही वाचवू शकणार नाही, असं सागून प्रत्येक धोक्याचा उल्लेख करून धरण बाधू नये असा सल्ला दिला परतु त्याकडे दुर्लक्ष करुचन इतर चार जणाचा रिपोर्ट

मान्य करण्यात आला पर्यावरण व वनखात्याचे मंत्री श्री. राऊत रॉय यानी योजनेस हिरवा कदील दाखविला त्यानुसार प्लॅनिंग कमिशनने आर्थिक तरतूद केली धरणाचे काम वेगाने सुरू करण्यात आले या धरणात रशियाचे हितसबध गुंतले आहेत रशिया दुखावला जाऊ नये या साठी भविष्यातील विनाशाकडे डोळेझाक करून धरणाचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे

रशियाची ९०० कोटी रुपयाची मशिनरी टेहरीला आली आहे २०० रशियन तत्रज्ञ आणि कामगार आले. ज्याना रशियात दोन तीन हजार रुपये महिना पगार मिळत नव्हता त्याना टेहरी धरणावर एका दिवसाला १५०० ते २ हजार रुपये पगार मिळू लागला आहे शिवाय त्याच्यासाठी ४८ कोट रुपये खर्च करुन वातानुकुलीत निवासस्थाने बाधण्यात आली आहेत भविष्यातील पर्यावरण भूकप आदी धोक्याचा परिणाम या धरणावर होणार नाही अशा रितीने आम्ही या अती उच धरणाचे डिझाईन बनविले आहे असे रशियन तत्रज्ञाचे म्हणणे आहे निसर्गाच्याविरुद्ध जाऊन उच धरणे बाधली तर निसर्ग कधीच क्षमा करीत नाही पर्यावरणाचा समतोल राखण्यास सहाय्य ठरतील अशीच धरणे बाधली नाही, तर निसर्ग इजिनियराचे सारे तत्रज्ञान एका झटक्यात धुळीला मिळवतो त्यातून निसर्ग आणि माणूस दोधाचाही नाश होतो. असे जगप्रसिद्ध इजिनियर श्री हेनूरी एच थॉमस याने म्हणले आहे ''

आता पर्यत या योजनेवर ४२५ कोटी रुपये खर्च झाले असे म्हणतात. अनेक धरणग्रस्तानी नुकसान भरपाई स्वीकारली आहे नवीन टेहरी गावही वसविण्यात आले आहे अशा अवस्थेत या धरणाचे काम बद करून ही प्रकल्प उभारणे सोडून देणे भारतासारख्या गरीब देशाला पडवणारे आहे काय? या प्रश्नावर सुदरलालजी विचार माडताना म्हणाले,

''या धरणातून निर्माण होणाऱ्या धोक्यानी नैसर्गिक साधनसपत्ती, नागरी जीवन याचा जो विनाश घडून येणार आहे तो अब्जावधी रुपये ओतूनही थाबवता येणार नाही त्याची किंमत रुपयात मोजता येणार नाही हा विनाश थाबविण्यासाठी ४२५ कोटी रुपयावर पाणी सोडल तर बिघडल कुठ !

१९७२ साली या धरणाची योजना १९७ कोटी रुपयाची होती १९८६ साली ती १३५० कोटी रुपयावर पाहेचली आज या योजनेसाठी ३१०० कोटी रुपये खर्च येणार आहे या धरणामुळे निर्माण होणारे भूकपासारखे ब्रह्मराक्षस आणि धरणाचे अल्पजीवन यामुळे यातून मिळणारा फायदा एकूण खर्चाच्या मानाने अल्प ठरणार आहे त्यामुळे टिहरी बाध देशाचे करोडो रुपये मातीत घालविणारी योजना आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. या अजस्त्र योजनेऐवजी छोटे छोटे

बाध बाधण्याच्या योजना व वृक्षारोपणं करुन या परिसरातील बोडका हिमालय हिरवागार करण्याच्या योजना राबविण्यातच या भागातील लोकाचे खरे कल्याण आहे.''

धरणाचे कामातील भ्रष्टाचाराबाबत सागताना ते म्हणाले, ''या कामात होणाऱ्या भ्रष्टाचारात फार मोठी रक्कम मधल्यामध्ये गडप होते आहे सबधित ठेकेदार, इजिनियर आणि नेतागण सारे मिळून जितकी लूट करता येईल तितकी लूट करीत आहेत बोगदे खणताना निघालेली दगडमाती गगेत टाकली जात आहे ती पुन्हा गगेतून काढण्यासाठी लाखो रुपयाची कत्राटे दिली जात आहेत धरणाच्या नावाखाली लुटण्याचा नवा व्यवसाय सुरू झाला आहे '' अस सागून गगेच्या किनाऱ्यावर नव्याने बाधलेल्या घराकडे बोट दाखवित ते म्हणाले

''ती घरे राहण्यासाठी बाधण्यात आली नाहीत तर पैसे उकळण्यासाठी बाधलेली ती बोगस घरे आहेत. धरणात बुडणाऱ्या घरासाठी ६० हजार व जमिनीसाठी ४० हजार अशी १ लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात येते त्यासाठी एजन्टाची एक गॅग निर्माण झाली आहे हे एजन्ट लोकाना गगेकिनारी बोगस घरे बाधायला लावतात नुकसान भरपाईच्या रकमेतून आपले कमिशन आणि सबधित इजिनियरला द्यावयाची रक्कम ठरवतात अशा रितीने पैसे हडप केले जात आहेत प्रत्येक जण वाहत्या गगेत हात धुवून घेण्याच्या प्रयत्न करतो आहे परतु खऱ्या धरणग्रस्ताला नुकसान भरपाईची रक्कम मिळत नाही जी मिळते तीही अपुरी भ्रष्टाचाराच्या अशा अनेक रम्यकथा सागता येतील गेल्यावर्षी एका इजिनियरला रंगेहात पकडण्यात आल या साऱ्या भ्रष्टाचाराचा उल्लेख लेखा परिक्षक महानियत्रकानी आपल्या १९८६ / ८७ च्या रिपोर्टमध्ये केला आहे

नर्मदा सागर, सरदार सरोवर आणि टेहरीबाध स्थानिक लोकाचे जीवन उध्वस्त करणाऱ्या योजना आहेत गरीब माणुस आणि निसर्ग याचा विनाश घडविण्याऱ्या योजना आहेत प्रसिद्ध स्वातत्र्य सेनानी वीरेन्द्र दत्त सकलानी व नर्मदा सागर व सरदार सागराच्या विरोधात उभे ठाकलेली श्री बाबा आमटे व मेधा पाटकर ही सारी नि:स्वार्थ माणसं गोरगरीब सामान्य भारतीयाच्या कल्याणासाठीच लढत आहेत त्यात आमचा कुणाचाही वैयक्तिक स्वार्थ नाही परतु आम्ही भारताचा विकास आणि प्रगती होऊ न देणाऱ्या परकिय शक्तींची हातमिळवणी केली आहे. आम्ही परकिय हस्तक आहोत असा सरकारी अधिकाऱ्याकडून अपप्रचार केला जात आहे काही सरकारी भाट असलेले लेखक आमच्याविरुद्ध वृत्तपत्रातून लिहीत आहेत. मी एक अतिसामान्य गरीब माणूस आहे वृत्तपत्रातील लेखन हे माझ्या चरितार्थाच एक साधन आहे सरकारी अधिकाऱ्यानी वृत्तपत्राच्या सपादकाचेही

कान फुकले आहेत शिवाय आमचे आदोलन दडपण्यासाठी व सरकारी अधिकाऱ्याच्या भ्रष्टाचाराविरुद्ध तोंड उघडणाऱ्याची हाडे पिसण्यासाठी गुडाची सेना टेहरीत तैनात करण्यात आली आहे. गगेचा हा पवित्र भाग आज गुन्हेगार व गुंड प्रवृत्तीच्या माणसाचा अड्डा बनले आहे चिपको आणि दारुबदी आंदोलनामुळे धनिक ठेकेदाराचा मोठा वर्ग मला पाण्यात पाहातोय. मला या लोकाकडून व सरकारी अधिकाऱ्याकडून अपमान, अपेक्षा, उपहास व धमक्या सहन कराव्या लागत आहेत. परंतु न डगमगता व प्राणाची पर्वा न करता आम्ही आंदोलन चालूच ठेवलं आहे.''

पुढे बोलताना सद्‌गदीत होवून ते म्हणाले ''आमच आदोलन कुणाच्या विरुद्ध नाही तर जनता जनार्दनाच्या प्राण रक्षणासाठी आहे. माझा जन्म गगा भागीरथी किनारीचं झाला तिच्या पवित्र प्रवाहात डुबण्यात आणि खेळण्यात माझ बालपण व तारुण्य व्यतित झाल. तेरा वर्षाचा असताना महात्मा गाधीचे जीवलग सत्याग्रही श्रीदेवर सुमन याच्याकडून दिक्षा घेतली अनेक वेळा शिक्षा भोगली गगाभागीरथी माझ्या सार्वजनिक जीवनाच प्रेरणास्थान आहे. माझ्या शक्तीचा आधार आहे. म्हणून मी गगेला माझा प्राण मानतो गंगेशिवाय मी जगू शकणार नाही सरकारन टेहरी धरण बाधण्या अगोदर आम्हास गोळ्या घालून माराव म्हणजे पुढील विनाश पाहण्याचं दुर्भाग्य वाट्याला येणार नाही. धरण पूर्ण झाल्यावर ज्यावेळी विनाश होईल, त्यावेळी सुदरलाल बहुगुणाची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही'' हे सागताना ते अतिशय भावनाविवश झाले त्याच्या डोळ्यात गगाजमुना जमा झाल्या आम्हीही गलबलून गेलो

''गगा माई तेरी बलि जाऊं,
हाड मास का फुल बताशा
तुझको अर्पित कर जाऊँ।''

या स्वामी रामतीर्थाच्या ओळी गाऊन त्यानी मुलाखत सपविली.

१५

# कुलू मनालीची निसर्गयात्रा

हिमाचल प्रदेशातील कुलूमनाली स्वर्गीय निसर्गसौंदर्याचं वरदान लाभलेल भारतातील एक अतिरम्य स्थळ आहे. येथे आकाशाला गवसणी घालणारी हिमशिखरे आहेत. कलकल निनाद करीत उतारावरून धावणाऱ्या सरिता आहेत. चीड देवदाराची हिरवी वनराई आहे त्यात बागडणारी रंगीबेरंगी पाखरं आहेत कुलूमनालीच हे सारं निसर्गवैभव पाहाताना मन मंत्रमुग्ध होत येथील निसर्गाची मोहिनी एकदा मनाला पडली की कुलूमनालीला मन पुन पुन्हा ओढ घेऊ लागत या ओढीतूनच मला दोन वेळा कुलूमनालीची निसर्गयात्रा घडली दिल्लीच्या आतरराज्य बस अड्ड्यावरून कुलूमनालीसाठी बसेस सुटतात हा बस प्रवास पधरा - सोळा तासाचा आहे. चडीगड, अबाला, पठाणकोट, सिमला येथूनही कुलूमनालीकडे बसेस जातात दिल्ली व चडीगडवरून वायूदूतसेवाही उपलब्ध आहे. याशिवाय खासगी टुरिस्ट बसेस व मोटारकारही मिळतात. मार्च ते मे व ऑगस्ट ते सप्टेंबर हा कुलूमनालीला भेट देण्यासाठी उत्तम असा काळ आहे

दिल्ली - मनाली मार्गावर हिमाचल प्रदेशातील जिल्ह्याच ठिकाण असलेलं विलासपूर नावाच सुंदर शहर लागत निसर्गाच्या कुशीत वसलेल हे शहर सुरम्य व शीतल हवेच ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे दिल्ली, चंडीगड व अमृतसरवरून अनेक पर्यटक येथील निसर्गाचा आनद लुटण्यासाठी येतात. त्याच्या निवासस्थानासाठी येथे शासकीय विश्रामगृहे, पर्यटनकेंद्रे, हॉटेल्स बाधण्यात आली आहेत येथे मोठी औद्योगिक वसाहत असली तरी तिचा निसर्गाला उपद्रव होऊ दिलेला नाही. येथील सतलज जलाशयाच्या निळ्याभोर पाण्यात बदकाच जलतरण

नयनमनोहर वाटत पुढे कदौर नावाचा पूल लागतो. हा जगातील अधिक उचीवरील दुसऱ्या क्रमाकाचा पूल आहे पूल ओलांडल्यावर सुदर नगर लागते हे नगर नावाप्रमाणेच सुदर आहे. येथून कुलूमनालीची हिमशिखर दिसू लागतात या हिमशिखराच धवल सौंदर्य पाहून प्रवासाचा शीण क्षणार्धात नाहीसा होतो. सुंदरपूलला एक सुदर तळे आहे या तळ्यात पर्यटक नौकानयनासाठी येतात महामायेच एक प्राचीन मदिर तेथे आहे सुदरपूरपासून नागमोडी घाटास प्रारभ होतो डाव्या बाजूला सुटलेले ठिसूळ कडे व उजवीकडे खोल दरीतून वाहणारी फेसाळती व्यास अथवा बियास नदी

निसर्गाच हे रौद्र स्वरूप पाहाताना डोळे गरगरतात मनात मृत्यूच चितन सुरू होतं या चितनात मग्न असतानाच आपण मडी या कुलूमनालीच्या प्रवेशद्वारात येऊन पोहोचतो आणि मडीचा निसर्ग पाहून मन मृत्यूच्या चितनातून मुक्त होते, प्रफुल्लित होते मडी हा माडव नावाच्या ऋषींची कोलसारा नामक तपोभूमी पुढे माडव ऋषीच्या नावावरून या ठिकाणाला मडी हे नाव पडल २४८० फूट उचीवरील या ठिकाणी व्यास आणि सुकेती या नद्याचा सुदर सगम आहे सगमावर प्राचीन शिल्पकलेचा आविष्कार असलेली अनेक प्राचीन मदिरे आहेत मडीच्या सर्वात उच तारण नावाच्या शिखरावर बुद्ध उद्यान व श्यामकाली देवीच भव्य प्राचीन मदिर आहे येथून मडीघाटीच सुदर दृश्य दिसत

मडीपासूनचा प्रवास देवदार आणि बियास नदीच्या सगतीन सुरू होतो मधूनच उडणारा पक्षी लक्ष वेधून घेतो. डोंगरावरील लाकडाची व स्लेट दगडाच छप्पर असलेली घर दुरून पाखराच्या घरट्यासारखी सुदर दिसतात पाठीवर गवताचा भारा घेऊन चाललेली, रगीबेरगी वेष परिधान केलेली, गुलाबी गालाची सुदर युवती नजर खिळवून ठेवते मडीपासून साठ किलोमीटरवर भून्तर हे टुमदार गाव लागत येथे वायूदूत सेवेसाठी विमानतळ बाधण्यात आला आहे या ठिकाणी पार्वती आणि बियास नद्याचा सुरेख सगम आहे भून्तर येथून एक फाटा ३५ किलोमीटरवरील मणिकर्ण या गरम पाण्याच्या कुडाकडे जातो दुसरा १० किलोमीटरवरील कुलू शहराकडे जातो कुलूपासून मनाली ४० किलोमीटरवर आहे मनालीवरून भून्तरला पुन्हा ५० किलोमीटर मागे येण्याऐवजी आम्ही भून्तरला बस पकडून मणिकर्णकडे प्रयाण केले पार्वती नदीच्या खोऱ्यातून जाणारा एकेरी रस्ता जिवाचा थरकाप उडविणारा आहे. एका बाजूला पुढे डोकावणारे उचच उच कडे आणि दुसऱ्या बाजूला पार्वतीची खोल दरी कडा कधी कोसळेल याचा नेम नाही चक्रधराची सावधानता थोडी जरी ढळली तर काय होईल ? या कल्पनेनेच काळजाचा ठोका चुकतो नागमोडी वळणावरून मणिकर्णला येऊन पोहोचलो,

तेव्हा आम्हाला हायस वाटल  मणिकर्ण हे २० - २५ घराच गाव आहे. येथे ७०० वर्षापूर्वीचे श्रीरामाचे मदिर आहे  या मदिरासमोर उकळत्या पाण्याचे एक चौकोनी कुड आहे  हे वाफळते पाणी कारज्यासारखे वर उसळी मारून जमिनीतून वर येते  हात घातला तर भाजून फोड येतात  पार्वती नदीकाठी एक भव्य गुरुद्वार बाधण्यात आले आहे  तेथे कायम लगर चालतो  या गुरुद्वारासमोर शंकराचे एक मदिर आहे  त्याखालूनही उकळत्या पाण्याचा झरा उगम पावला आहे  फडक्याने तोंड बाधलेल्या हड्यात डाळ, तादूळ घालून या झऱ्यातील कुडात ठेवतात  अर्ध्या तासात अन्न शिजते  लगरचे सारे अन्न अशा प्रकारे शिजवले जाते  त्यामुळे इधनाची मोठ्या प्रमाणात बचत होते  गुरुद्वारात गरम पाण्याचे दोन हौद आहे स्त्रिया - पुरुषासाठी स्नानाची वेगवेगळी व्यवस्था आहे  पार्वती नदीवर एक झुलता पूल बाधण्यात आलेला आहे  या पुलावरून नदी ओलाडताना खाली तुफान वेगाने पार्वती वाहते  खाली पाहिल्यावर पार्वतीच रौद्र स्वरूप अतिशय भीषण वाटत. आपण पुलासह पाण्याबरोबर वाहून जातो आहोत असा भास होतो  जात, धर्म, पथ न पाहता गुरुद्वारात आपुलकीने आदरातिथ्य केल जात  मणिकर्णजवळ कटरकेन येथे मधुमक्षिका पालन केंद्र आहे  मणिकर्णच्या पुढे अधिक उचीवर मलाना नावाचे एकमेव गाव आहे  हे मलाना लोक स्वत·ला भारतीय मानीत नाहीत. भारतीयापेक्षा आपली सस्कृती उच्च व वेगळी मानतात  त्याची भाषाही भारतीय भाषांपेक्षा वेगळी आहे. कुणी भारतीय या गावात गेला तर ते त्याच्याशी बोलत नाहीत  जवळ फिरकू देत नाहीत

मणिकर्णवरून आम्ही कुलू या रम्यनगरीत प्रवेशलो. कुलू जिल्ह्याच प्रमुख ठिकाण असलेल हे नगर समुद्रसपाटीपासून २५८० फूट उचीवर बियास नदीच्या काठी वसलेल आहे  चढउतारावरील घरानी आणि चीड, देवधराच्या वृक्षानी कुलूच सौंदर्य द्विगुणित केल आहे  हे नगर कुलू नावाच्या राजान प्रथम शतकात वसवल आहे. त्याला रघुनाथपूर असेही म्हणतात  बियास नदीकाठी गवताचा हिरवा गालिचा अथरलेल विशाल पटागण आहे. त्याला ढालपूर मैदान म्हणतात. या ठिकाणी पाच दिवस साजरा होणारा दसरा महोत्सव विश्वविख्यात आहे महोत्सवासाठी हिमाचल प्रदेशातील लोक रगीबेरगी कपडे घालून येथे जमतात. बरोबर विविध देवदेवता घेऊन येतात  अयोध्यावरून रघुनाथाची रथयात्रा येथे येते  त्यावेळी सार मैदान फुलून जात  हा दसरा महोत्सव म्हणजे कुलू लोकाच्या सास्कृतिक जीवनाचा एक केंद्रबिंदू आहे  कुलूपासून ११ किलोमीटरवर २४३५ फूट उचीवर महादेवाच एक प्राचीन मदिर आहे  या मदिरावर वीज कोसळली म्हणून त्याला बिजली महादेव म्हणतात  कुलू परिसरात चहाचे मळे व सफरचदाच्या

बागा आहेत गालीचे, शाली विणण्याचे छोटे लघुउद्योग आहेत पर्यटक येथे शाली, ब्लँकेट खरेदी करतात कुलूच वातावरण निसर्गरम्य, थड व आल्हाददायक आहे, त्यामुळे देशी व परदेशी पर्यटक येथे गर्दी करतात सरकारी विश्रामगृहे, हिमाचल राज्य पर्यटन खात्याचे छोटे टुमदार बगले, पर्यटन केंद्राचे अशोका ट्रॅव्हलर्स लॉज, बाइटवे, प्रिमियर, सेंट्रल, स्टॅन्डर्ड इत्यादी हॉटेल्स आहेत पुराना बाजारजवळ कुलूचा राजा रुपीराय याचा भव्य महाल आहे बियास नदीच सगीत, वृक्षवल्लरीची सळसळ, पाखराची गाणी व हवीहवीशी वाटणारी गुलाबी थडी यामुळ कुलूच वातावरण सदैव प्रसन्नतेन फुललेल असत, त्यामुळे येथील निवास सुखद व शातिदायी वाटतो

कुलूहून मनालीकडे जाताना एक हजार फूट उचीवर जग्गर नावाचे ठिकाण आहे हे ठिकाण पूर्वी कुलू प्रदेशाची राजधानी होती येथे लाकूड व दगडात बाधलेला प्राचीन महाल आहे त्याचे आता शासकीय विश्रामगृहात रूपातर करण्यात आले आहे राजा विशुद्धसेन याने येथे राजधानी वसविली होती १६६० मध्ये राजा जगतसिह याने राजधानी कुलूला हलविली जग्गरला लाकडावर कोरीव काम असलेले शकर व राधाकृष्णाचो प्राचीन मदिर आहे रायसन या ठिकाणी बियास नदीकाठी तबूत राहण्याची सोय आहे. याठिकाणी विद्यार्थ्यांसाठी कँप भरविण्यात येतात जग्गरवरून बियास नदी कुलूघाटी व धौलाधार पर्वत मालिकेतील हिमशिखराचे विलोभनीय दर्शन घडत

कुलूघाटीच्या विलोभनीय निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत घेत आम्ही ६७०० फूट उचीवरील मनालीत पोहोचलो तिन्ही बाजूनी उन्नत हिमशिखरानी वेढलेल आणि आकाशाकडे झेपावलेल्या देवदारानी सजलेल मनाली स्वर्गीय नदनवनासारख वाटल आपल्या जलसगीताचे सप्तस्वर छेडत वाहणारी बियास नदी तर मनालीच हृदय आहे या नदीकाठी फुललेली रगीबेरगी फुले पाहताना भान हरपून जात मनालीचा बाजार रगीबेरगी लोकरीच्या कपड्यानी सजलेला आहे हिमाचल प्रदेशातील खास वैशिष्ट्य असलेली सुदर कुलू टोपी येथे मिळते हा व्यापार बहुतेक तिबेटी लोकाच्या हातात आहे. आता काश्मीरमधील व्यापारी येथे आले आहेत बर्फावर चालताना थडी न लागणारी गवताची विणलेली सुदर चप्पल मनालीत मिळते मनालीच्या बाजारात गरम शाली, स्वेटर्स, ट्रॅकसूट स्वस्तात मिळतात कुलू लोकानी तयार केलेल्या कलात्मक वस्तू मिळतात कलात्मक वस्तूप्रिय माणसाना मनालीचा बाजार आवडतो, तर निसर्गप्रेमींना मनालीचा निसर्ग अधिक भावतो. मनालीत एक सुदर उद्यान आहे त्यात विविध वृक्षवनस्पतींची गर्दी आहे त्यात विविध हिमालयीन पक्षी मुक्तपणे विहरतात या बागेत सरकारी

अतिथीसाठी एक सरदारगृह आहे फॉरेस्टचे विश्रातीगृह आहे मनालीपासून उच टेकडीवर देवदाराच्या गर्द वनराईत हिडींबाचे लाकडी मंदिर आहे पॅगोडा शैलीचे हे मंदिर ७०० वर्षांपूर्वी बाधण्यात आल आहे. मदिरातील लाकडावर सुंदर कोरीव काम करण्यात आले आहे. मदिरात एक विशाल पाषाण शिळा आहे तीच हिडींबाची मूर्ती आहे मनाली परिसरात जालमू नावाचा एक मात्रिक असतो त्याला लोक हिंडीबाचा भाऊ समजतात हा जालमू मत्रसामर्थ्यान भूतबाधा व रोग बरे करतो, अशी कुलू लोकाची अधश्रद्धा आहे त्यासाठी त्याला एक बकरे द्यावे लागते

हिमालयीन माऊटेनीयरिंग इन्स्टिट्यूट ही सस्था मनालीचेच नव्हे तर भारताचे भूषण आहे. बियास नदीच्या पलीकडे निसर्गरम्यस्थानी ही सस्था उभी आहे या ठिकाणी गिर्यारोहणाचे तत्रशुद्ध शिक्षण दिले जाते त्यासाठी बेसिक व ॲडव्हान्स गिर्यारोहणाचे कोर्सेस येथे घेण्यात येतात विद्यार्थ्यांसाठी येथे सुदर वसतिगृह आहे. गिर्यारोहण, पदभ्रमण व निसर्ग अभ्यास सहलीही सस्थेच्यावतीने आयोजित करण्यात येतात मनालीच्या परिसरात शंकरबे (उची २८०३० फूट), मकरबे (१९९१० ), मनाली (१८६०० फूट), लडाखी (१८३०० फूट), फ्रेंडशिप (१४००० फूट), हनुमान तिब्बा (१८००० फूट) इत्यादी हिमशिखरे आहेत ही हिमशिखरे धाडशी गिर्यारोहकाना सतत साद घालत असतात त्यावर चढाई करण्यासाठी अनेक देशी व परदेशी गिर्यारोहक मनालीत येत असताल त्याना सर्वप्रकारचे सहकार्य मनालीची गिर्यारोहण सस्था करते पदभ्रमणाचा आनद लुटणाऱ्या भटक्याना तर मनालीचा परिसर स्वर्ग वाटावा इतका रम्य आहे बियास नदीवरून पलीकडे गेले, की उजवीकडचा रस्ता गिर्यारोहण सस्थेकडे जातो डावीकडचा रस्ता लेहकडे जातो. हा रस्ता जगातील सर्वाधिक उंचीवरून जाणारा रस्ता आहे या रस्त्यावर तीन किलोमीटरवर गरम पाण्याचे वशिष्ठ कुड आहे या कुडाजवळून विपाश नदी वाहाते आपल्या प्रिय मुलाच्या मृत्यूचे दुःख असह्य होऊन हातपाय बाधून वशिष्ठ मुनींनी विपाश नदीत उडी टाकली परतु दैवयोगाने वशिष्ठाचे हातपाय सुटून ते किनाऱ्याला लागले वशिष्ठाचे पाश सोडविणारी म्हणून या नदीला विपाश असे नाव पडले येथे वशिष्ठ व दोन हजार वर्षांपूर्वी तक्षपाल राजाने बाधलेले राम मंदिर आहे पुढे अतिशय चविष्ट पाण्याचा एक झरा लागतो त्याला नेहरूकुड म्हणतात मनालीपासून ११ किलोमीटरवर ५० / ६० घराचे १० हजार फूट उचीवरील सोलंगनाला नावाचे छोटे गाव लागते गावात कुलू लोकाची दुमजली लाकडी सुंदर घरे आहेत हा सपूर्ण प्रवास बियासनदीच्या काठाकाठाने होतो सोलंगवरून उजवीकडचा रस्ता रोहतांगपास वरून लेहला जातो डावीकडे

गिर्यारोहण सस्थेच्या लाकडी वसतिगृहापर्यंत जातो या ठिकाणी हिरवळीचा गालीचा अथरलेले सुदर मैदान आहे. येथून पाताळसू या १४५००० फूट उचीवरील शिखरावर जाण्यासाठी मार्ग आहे. तसेच दुसरा मार्ग बियास नदीच्या पात्रातून तेरा हजार फूट उंचीवरील बियासकुड या बियासनदीच्या उगमस्थानी जातो हा सपूर्ण परिसर देवदार चीड, अक्रोड, मद्र्, कायल इत्यादी नानाविध वृक्षराजीने फुललेला आहे रानगुलाबासह लाल पिवळ्या, निळ्या रगाची रानफुले येथे उन्हाळ्यात फुलतात नागाच्या फडीच्या आकाराची कोब्रालिली (नागफणी) येथे फुलते अनेक औषधी वनस्पतींचे भाडार या परिसरात आहे त्याशिवाय या परिसरात हिम कबुतरे (स्नो पिजन) सप्तरगी मोनॉल, हिमकावळे, मुनिया, चकोर इत्यादी अनत प्रकारचे पक्षी आढळतात. तसेच हिमालयीन तपकिरी अस्वल, हिमचित्ता (स्नो लिओपार्ड), जगली बकरी, लाडगे, कोल्हे, फ्लाईंग जायट क्सिरल या वन्यजीवाचा या भागातील अरण्यात वावर आहे ऑगस्ट सप्टेंबरमध्ये हा सारा परिसर विविध रगाच्या मनोहारी फुलानी बहरलेला असतो सूर्योदय आणि सूर्यास्तसमयी हिमशिखरे सुवर्णकातीने मढतात. त्याचे मत्रमुग्ध करणारे दर्शन सोलगनाल्यातून घडते ऐन उन्हाळ्यातही सोलंगची हवा हुडहुडी भरायला लावते हिवाळ्यात सोलगला स्केटिंग खेळतात

रोहतागपासच्या भेटीशिवाय कुलूमनालीच्या निसर्गयात्रेस पूर्णता येत नाही मनालीपासून ५१ किलोमीटर अतरावरील व चौदा हजार फूट उचीवरील रोहतांगला मनालीहून बसेस व खासगी मोटारी जातात मनाली ते लेह या ४७५ किलोमीटर मार्गावर रोहतागपास (खिड) आहे रोहतागपर्यंतचा प्रवास म्हणजे निसर्गाची मेजवानी वाटते खाली पाताळात घुसलेली दरी त्यात बेगुमानपणे उडी घेणारे दुग्धधातारेसारखे पाढरेशुभ्र धबधबे, हिरव्यागर्द झाडानी शृगारलेल्या डोंगरदऱ्या, रस्त्यालगत फुललेली सप्तरगी फुले, झुळझुळ वाहणारे निर्झर, वर निळेभोर आकाश, त्याखालची शुभ्र हिमशिखरे हे सृष्टीचे लावण्य पाहताना डोळ्यात आनद मावत नाही मनात प्रसन्नता आणि आनदाच नृत्य सुरू होत. हा प्रवास लवकर सपू नये अशी मनाची अवस्था होते मार्गात कोठी, गुलाबा ही निसर्गाचा वरदहस्त असलेली छोटी वस्ती लागते गुलाब्याला सेनादलाचा कँप आहे रोहतांगखिडीत बर्फात खेळण्याचा आनद लुटता येतो लेहकडे जाणारा रस्ता बर्फाच्या खिडीतूनच पुढे गेला आहे रोहतागच्या उचीवरून हिममडीत शिखराची विशाल शृखला डोळ्यासमोर उभी राहते येथून संकरी घाटीच अनुपम दृश्य दिसते रोहताग खिडीपलीकडे लाहुलास्पिती घाटीचा ओसाड वैराणभाग सुरू होतो लेहला जाणारा हा रस्ता पुढे कैलाग या लाहुलास्पती तहशीलमधील गावातून जातो लाहुलस्पिती घाटीतील दुर्गम प्रदेशात लाहुली जमातीचे बौद्धधर्मीय लोक राहतात तेथे उन्हाळा

व हिवाळा अतिशय प्रखर असतो या व्हॅलीतून चद्रभागा नदी-उगम पावते रोहतागच्या पुढे चद्रताल नावाचे सुदर सरोवर आहे रोहतागखिडीतून जाणारा मनाली लेहरस्ता मे ते ऑक्टोबरअखेर खुला असतो हिमवर्षावामुळे हिवाळ्यात तो बंद असतो या मार्गावरून सेनादलाच्या ट्रक्स, जीप्स लेहपर्यंत जातात आता नागरी वाहतुकीसाठी हा मार्ग खुला करण्यात आला आहे जीपमधून मनाली ते लेह असा ट्रेक करता येतो त्यासाठी मनालीत जीप्स भाड्याने मिळतात या मार्गात बौद्धकालीन सस्कृती व कला याचा सगम असलेले अनेक बौद्धमठ (मॉनेस्ट्री) पाहायला मिळतात

कुलू मनाली परिसरातील पलचान अलीयू, मलाना, चिचोगा, प्रीती, कोठी, सोलग, गुलाबा, शियाल डगरी या पहाडी गावातील निसर्ग व त्यात राहणाऱ्या निसर्गपुत्राची संस्कृती अवलोकन करण्यासाठी या गावाना जरुर भेट द्यावी कुलूघाटीत कुलू मलाना, नेपाळी, तिबेटी, डुगरी व स्पिती घाटीत लाहुली जमातीचे लोक राहतात कुलू लोकाचा मुख्य व्यवसाय शेती आहे तिबेटी लोकरीचे कपडे विकण्याचा व्यवसाय ते करतात, नेपाळी हमाली व मोलमजूरी करतात छोटीछोटी हॉटेल्स चालवितात कुलू लोकाच्या सफरचदाच्या मोठमोठ्या बागा कुलू - मनालीत आहे ७० - ८० घराचे मिळून गाव आहे घरे लाकडी व दुमजली असतात पूर्ण वाढलेल्या एका देवदार वृक्षाच्या लाकडापासून ४ / ५ घरे सहज तयार होतात १० / १२ मैलावर बोलीभाषेत फरक आढळतो बहुतेक पहाडी लोक पहाडी भाषा बोलतात. तिचा उगम सस्कृत भाषेतून झाला आहे पर्यटकाशी सर्वजण हिंदीतून सभाषण करतात कुलुघाटीत सस्कृतचे गाढे अभ्यासक आहेत बौद्ध धर्मीयाबरोबरच शिव व वैष्णवपथीय हिंदूच्या चार उपजाती कुलू घाटीतच आहेत ब्राह्मणासह बहुतेक हिंदू मासाहार करतात कुलू - मनाली घाटीत पावलापावलावर देवदेवताची मदिरे आहेत या मदिरात साजरे होणारे धार्मिक सण येथील लोकाच्या सास्कृतिक जीवनाचा भाग बनले आहेत कमी उचीच्या प्रदेशात स्त्रिया सलवार चुडीदार कुडता, दुपट्टा व नक्षीदार चोळ्या परिधान करतात उच भागात दुपट्टाऐवजी रगीत स्कार्फ घालतात 'धत्तू' नावाचे रगीत वस्त्र डोक्याभोवती आवळून बाधतात थडीत शरीराभोवती (वुलन चादर) व ब्लँकेट गुडाळतात प्रत्येकीच्या नाकात सोन्याची मोठी गोल रिंग असते पुरुषाचा पोषाख शर्ट पायजमा व कोट व डोक्यावर गोल कुलू टोपी असते सण व उत्सवाच्या दिवशी नखशिखात दागिन्यानी व रगीत कपड्यानी नटून स्त्रिया लोकगीते आळवीत पुरुषाबरोबर सुदर पहाडी नृत्य करतात कुलू माणसाला सगीत व नृत्याची विलक्षण आवड आहे पुरातन सास्कृतिक चालीरूढीचा व जादूटोणा मत्रतत्रावर त्याचा

विश्वास आहे मनालीत मार्च ते मे, ऑगस्ट ते सप्टेंबरपर्यंत पर्यटकांची गर्दी वाढते रोमाचकारी हिमवर्षाव अनुभवण्यासाठी ऐन हिवाळ्यातही पर्यटक मनालीकडे धावतात जुन जुलैमध्ये भरपूर पाऊस पडतो. कडे कोसळून रस्ते बंद पडतात. पर्यटकाच्या निवासासाठी हिमाचल राज्य पर्यटन खात्याने बांधलेली सुदर निवासस्थाने मनालीत आहेत. वनविश्रातीगृह आहे. शासकीय विश्रामधाम आहे याशिवाय कमी जास्त दराची हिलकीन, ब्राइटवे मोटेल, प्रीमियर इत्यादी अनेक आरामदायी हॉटेल्स व लॉजेस मनालीत आहेत. कुलू - मनाली पर्यटन, निवास, भोजन व आरक्षण यासाठी व्यवस्थापक हिमाचल गव्हर्न्मेंट टूरिस्ट ब्यूरो कुलू जि कुलू (हिमाचल प्रदेश राज्य) तसेच हिमाचल गव्हर्मेंट सब टूरिस्ट ब्यूरो मनाली जि कुलू (हिमाचल प्रदेश राज्य) याना लिहावे.

उन्हाळ्यात शिखरावरून कोसळणारे दुधसागरी धबधबे, बियास व पार्वती नद्याचे जलसगीत, रगीबेरगी रानफुले, सफरचदाच्या बागा, देवदाराच सौंदर्य, सप्तरगी पाखराची गाणी, येथील तरुणींच्या चेहऱ्यावरील गुलाबी झाक, शालीनता व निरागसता, शिखराची हिमशोभा हा सारा हिमालयीन सौंदर्याचा आविष्कार कुलू - मनालीत पाहायला - ऐकायला मिळतो.

●●●

REFBK 0027374

REFBK-0027374

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
२८३६४
२४३१८
(स्थल प्रत)

# सुरेशचन्द्र वारघडे यांचे प्रकाशित साहित्य

- बदरीकेदारची निसर्गयात्रा
  (साहित्य परिषदेचा कै. दि बा. मोकाशी व नगरचा कै.- यशवंतराव काळे पुरस्कार)
- कुभमेळा (कै दादासाहेब किराड पुरस्कार)
- पांढरी शिखरे / हिरव्या वाटा
- भीमाशकरचा नरभक्षक
- वाघ्याच्या वाडीचा व्याघ्रभक्षक
- राळेगण सिद्धीचा कर्मयोगी अण्णा हजारे
- हिमालयातील पुष्पघाटी

आगामी

- महाराष्ट्रातील अभयारण्ये
- अरण्यपूत्र
- सातपुड्यातील आदिवासी
- रोहितयात्रा
- स्वामी निसर्गानद (कादबरी)